म.ग्रं.सं. ठाणे
विषय : चरित्र
सं.क्र. : २८५७

REFBK-0002237



Photo by R N Joshi.

विदग्ध—वाङ्मय—पुस्तक ३ रें

तणें कारणें मी बोलेन। बोलीं अरूपाचें रूप दावीन॥
अतींद्रियपरी भोगवीन। इंद्रियाकरवीं॥

नटसम्राट गद्यनाट्याचार्य

# गणपतराव जोशी

यांचें चरित्र.

संग्रहालय ... ज्ञानेश्वर ... ता. ... मालिक ...
... ग्रंथ संग्रहालय ठाणे ... दा. क्र. 2236 ... ग्रंथ. (स्थळ प्रत)

लेखक

लक्ष्मण नारायण जोशी

प्रथमावृत्ति—१९२३.

वाङ्मय-विहार-मंडळ,

REFBK-0002237

( सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन आहेत. )

किंमत १॥ रुपया.

प्रकाशकः—
सदाशिव कृष्णराव शिंदकर
मं० वाङ्मय-विहार-मंडळ.
२४८ सदाशिव पेठ, पुणें शहर.

मुद्रकः—
बापू श्रीकृष्ण महाजन,
रघुवीर प्रिंटिंग प्रेस २७ बुधवार, पुणें.

# प्रस्तावना

कै. गणपतराव यांच्या चरित्रास प्रस्तावना लिहिण्यास एखादा नाट्यकुशल नट पाहिजे होता. नटाचे परिश्रम नटच जाणतो. इतरांस त्याची कल्पना कोठून येणार! हें जरी खरें, तरी नटाचे कौशल्याशीं इतरांचाहि संबंध येत असतो व जसा नाटककारास नट रंगवूं शकतो त्याचप्रमाणें तो प्रेक्षकांसहि रंगवूं शकतो. नटानें नाटककारास उजेडांत आणण्याची कल्पना कित्येकांस विचित्र वाटेल, परंतु अभिनयपटु गॅरिक चमकूं लागेपर्यंत शेक्सपिअर अंधेरांतच होता ही गोष्ट ज्यांस माहीत आहे त्यांस वरील विधानाचें आश्चर्य वाटणार नाहीं. आगरकरकेळकरादि नाट्यलेखकांची योग्यता—निदान नाट्यविषयक योग्यता—जनतेस पटण्यास महाराष्ट्रीय गॅरिक गणपतराव यांचीच जरूरी होती. राणाभीमदेव, तुकाराम व रामदास यांच्या भिन्न स्वभावांच्या मनोवृत्तींतील फरक प्रेक्षकांस जो पटविला तो इंडियन गॅरिक गणपतराव यांनींच! नाट्यकला म्हणजे कमदर्जाच माणसांचा पोट भरण्याचा एक धंदा, ही समजूत खोटी ठरवून, त्या कलेस रसिकांच्या व विद्वानांच्या खऱ्या आदरास जें पात्र केलें तें गणपतराव यांनींच! नट सद्वृत्त असूं शकतो—किंबहुना सद्वृत्त नटासच रंगदेवता वश होते ही गोष्ट जनतेस पटविली ती गणपतरावांनींच! मानवी स्वभावाच्या सूक्ष्म पापुद्र्यांचें प्रत्यंतर आंतरमनास आणून देण्याचें काम करील तर तें उत्तम नटच करील असा समज रूढ केला तो गणपतराव यांनींच! रंगभूमी हीं चटोरांचा अड्डा नसून करमणुकीशिवाय शिक्षणासह बोध देण्याकडे सुद्धां नटांचें कसब उत्तम असल्यास तिचा उपयोग राष्ट्रसेवेंतहि करतां येतो हें जें शिकविलें तें गणपतरावांनींच! या त्यांच्या

गुणांनीं जनता जवळ जवळ तीन तपें रंगून गेली होती. जनतेच्या जलरूप ओघांतून ज्या व्यक्ति निघून जाऊन कालवश होतात व त्यांची सृष्टिनियमाप्रमाणें पुढील जनतेस जी विस्मृति पडत जाते, ती पडूं नये व त्यांच्या गुणांचें अनुकरण करण्यास पुढील पिढीस अवकाश मिळावा याच हेतूनें गतकालच्या गुणी माणसांचीं चरित्रें लिहिण्याचा प्रघात पडला आहे.

नटाची योग्यता व कसब अंगीं नसतांना सुद्धां प्रो. गणपतराव यांचें मजवर स्नेहाच्या ऋणाचें जें ओझें आहे तें अंशतः तरी फेडावें या हेतूनें रा. लक्ष्मणराव जोशी यांची प्रस्तुत गणपतरावांच्या चरित्रास प्रस्तावना लिहिण्याची आज्ञा मला मोडतां आली नाहीं. चरित्राची प्रस्तावना म्हणजे तिनें पुढील पुस्तकांतील विषयाशीं व त्या ग्रंथाचे लेखकाशीं वाचकांचा परिचय करून दिला पाहिजे हें उघड आहे; परंतु या बाबतींतलें माझें काम, चरित्रनायक व चरित्रलेखक हे दोन्ही समाजाच्या पूर्ण परिचयाचे असल्यानें फार सोपें झालें आहे; किंबहुना त्याबद्दल कांहीं लिहिण्याचें तादृश प्रयोजनच नाहीं. रा. जोशी यांनीं वाङ्मयाची सेवा पुष्कळच केली आहे, व गणपतराव तर आबालवृद्धांचे पुढें निरनिराळे वेषानें ३ तपांवर हजर राहात होते. असें आहे तरी इतर बाकीच्या गृहस्थांचीं चरित्रें व नटांचीं चरित्रें यांत अनेक प्रकारचें अंतर आहे. सामान्यतः नट म्हणजे दुर्वर्तनांचा पुतळा असावयाचा असा समज एका काळीं रूढ होता, व त्या समजाची साक्ष म्हणून 'नटस्वरूपं दृष्ट्वं चेत्सचैलं स्नानमाचरत्' ही म्हण पडली आहे. बऱ्याच वर्षांपूर्वी एका नटाचें आत्मचरित्र करमणूक पत्राचे एका अंकांत दिलें आहे तेंहि या समजास धरूनच आहे.

उपरोक्त समजास कारणें कांहीं झालीं असलीं तरी नटवर्गाचा दर्जा कमी करण्याची जबाबदारी नटांप्रमाणेंच समाजावर नाहीं असे

मात्र नाहीं. आपला वर्तनक्रम सुधारण्याची सुधारावयाची इच्छा असली तरी समाज त्यास संधि देत नाहीं हें सर्वांच्या परिचयाचें आहेच. दैवयोगानें चुकलेल्या पश्चात्ताप्यांच्या पांजरपोळांत जे दीन प्राणी येतात त्यांची कींव करण्याची व त्यांस पंकांतून वर काढण्याची वृत्ति समाजांत कितीकांची असते बरें ? समाजानें—सुशिक्षित म्हणविणाऱ्या समाजानें—आजपर्यंत हें वर्तन कितीसें पाळलें आहे याचा विचार ज्यानें त्यानें आपापल्या मनाशीं करावा हेंच बरें.

ही जबाबदारी—सुशिक्षित वर्गावरील ही जबाबदारी पार पाडण्याचा यत्न म्हणून नटादिकांचीं चरित्रें उजेडांत आलीं पाहिजेत. कोणीहि मनुष्य पूर्णपणें निर्दोष अथवा गुणहीन असत नाहीं ह उघड आहे. यामुळेंच प्रत्येक मनुष्याचे गुणांचें अनुकरण करावें व दोष टाळण्याचा यत्न करावा या हेतूनें समाजांत महत्वाचा भाग घेतलेल्या पुरुषांचीं चरित्रें लिहिणें अवश्य आहे. अशीं चरित्रें राजमार्गावरील दीपस्तंभांप्रमाणें जनतेस उपयोगीं पडत असतात. अशा दृष्टीनें विचार केला असतां, प्रो. गणपतराव यांचें चरित्र लिहिण्याचे योग्यतेचे ते पुरुष होऊन गेले हें उघड आहे. गणपतरावांचे सार्वजनिक स्टेजवर दिसणारे गुण तर प्रसिद्धच आहेत, परंतु त्यांच्या सारखी दानत व सत्यप्रियता अलीकडच्या सृष्टींत तरी फारच क्वचित दृष्टींस पडेल. ज्या चरित्रांत मजसंबंधें उल्लेख आला आहे, त्यास मीं प्रस्तावना लिहिणें हें कदाचित शिष्टरिवाजसंमत होणार नाहीं हें मनांत यत असतां सुद्धां, हे चार शब्द जें लिहिण्याचें धाडस केलें तें गणपतराव यांच्या गुणांवर आणि दानतीवर मन बसल्यामुळेंच केलें आहे.

असो. अशा प्रकारचा सर्वगुणसंपन्न नट महाराष्ट्रांतून नाहींसा व्हावा व तोहि अशा काळीं कीं, ज्या वेळीं सर्व गुणी माणसांची राष्ट्रास गरज आहे—ही एक महाराष्ट्राच्या मनास चटका लावून सोडणारी गोष्ट आहे. या पुरुषाचें काहीं तरी स्मारक करणें अवश्य आहे व त्या दिशेनें कांहीं प्रयत्नहि झाले आहेत. त्याचे ट्रस्टींजवळ आर्यसुबोध ना. मं. नें त्या कामाकरतां शंभर रुपये जमाहि केले आहेत. यांत भर घालून त्याचें मोठेंसें स्मारक करण्याची शक्ति महाराष्ट्रास येवो अशी प्रार्थना करून हा लेख आटपतों.

**सिताराम दिनकर जोगळेकर,**
बी. ए., एल्एल्. बी.
हायकोर्ट प्लीडर, मुंबई.

# प्रकाशक.

जगच्चालक प्रभूच्या कृपेनें आणि आमच्या प्रेमळ ग्राहकांच्या आश्रयानें आज आम्ही आमच्या त्रैमासिकाचा हा तिसरा अंक वाचकांच्या हातीं देत आहोंत. आम्ही आमच्या पुस्तकांची स्तुती करावयाची नाहीं असा जरी निर्धार केला असला तरी आमच्या उदार आश्रयदात्यांचें औदार्य आमचा निर्धार लुप्त पाडल्याशिवाय राहणार नाहीं; कारण आमच्या मागील दोन पुस्तकांना इतका लोकाश्रय मिळाला आहे कीं, आम्हांस आमचीं पुस्तकें उत्तमच असतात असें आत्मविश्वासानें म्हणतां येऊं लागलेलें आहे. आमच्या पहिल्या पुस्तकांवर महाराष्ट्रांतील प्रमुख वर्तमानपत्रांचे आणि मासिकांचे प्रसिद्ध झालेले अभिप्राय वाचले म्हणजे आम्ही आत्मविश्वासानें आमच्या पुस्तकाबद्दल जे कांहीं प्रशंसापर उद्गार काढतों त्याची सत्यता पटणारी आहे.

गेल्या दोन खेपांस आम्ही वाचकांच्या चरणीं उत्तम दोन कादंबऱ्या सादर केल्या आहेत. आतां या तिसऱ्या खेपेस आम्ही त्यांस हें चरित्र देत आहोंत. हें चरित्र कशाप्रकारचें आहे हें चरित्र लेखकाच्या आजपर्यंतच्या वाङ्मयसेवेवरून सहज समजणारें असल्यामुळे येथें त्याच्या स्तुतीस्तव जास्त जागा अडवून कालापव्यय करण्याचें कारण नाहीं. आमच्या पुस्तकाच्या अंतरंगाप्रमाणेंच पुस्तकाचें बहिरंग कसें सुबक आणि मोहक असतें हें आमच्या मागील सर्व पुस्तकांवरून कळून येईल. या चरित्रांत आम्ही अनेक फोटो घालून हें अत्यंत सुबक करण्याचा शक्य तितका प्रयत्न केला आहे. पुस्तकांत नाट्याचार्य गणपतराव जोशी यांचे जे फोटो घातलेले आहेत ते सर्व आजपर्यंत अप्रकाशित असेच आहेत, हा या पुस्तकांतला एक विशेष आहे.

पुस्तक प्रसिद्ध करण्याचें कामीं व्यवहारी नात्यापेक्षां लेखकानें आम्हांस स्नेहभावें जी हरएक बाबतींत मदत केली त्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत. तसेंच पुस्तकाची छपाई सुबक आणि वेळेवर करून दिली त्याबद्दल रघुवीर प्रेसचे मालक रा. बापुसाहेब महाजन आणि पुस्तकांतील ब्लॉक शक्य तितके लौकर करून दिल्याबद्दल फोटो झिंकोचे रा. दत्तात्रय रामचंद्र फडके या उभयतांचेहि आम्ही आभार मानतों.

पुणें
१९।२।२३

नम्र वाङ्मयसेवक
**सदाशीव कृष्णराव शिंदकर.**



चरित्रलेखक,

लक्ष्मण नारायण जोशी.

Photo by R. N. Joshi.

श्रीलक्ष्मीकेशव प्रसन्नोऽस्तु

गद्यनाट्याचार्य

# गणपतराव जोशी

## यांचें चरित्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय क्र. २२३५०

## अंक पहिला.

### प्रास्ताविक विषयप्रवेश.

पंचमहाभूतांपैकीं कोणचेंहि तत्त्व घेतलें, तरी त्याच्या अंगीं इतर चारी तत्त्वांपैकीं वाटेल त्या तत्त्वाशीं सम्मिश्रित होऊन जाण्याचा जो नैसर्गिक धर्म परमेश्वरानें ठेविला आहे, तो त्याच्यापासून जगतानें बोध घ्यावा याच उद्देशानें ठेवला असला पाहिजे, असें म्हणणें केव्हांहि व्यर्थ व्हावयाचें नाहीं. पंचमहाभूतें हे पांच प्रकारचे विकारच होत. हे विकार जसे परस्परांत विलीन होतात, म्हणजे सदेह एकरूप बनतात, तद्वत् प्राणीमात्राला जरी प्राणीमात्रांत सम्मिश्रित होतां येत नाहीं, तरी मनुष्यप्राणी हा जात्याच अनुकरणप्रिय आणि अनुकरणशरण असल्यानें, प्राण्यनुकरणाचा धर्म मानवाला कष्टसाध्य आहे, ही गोष्ट हरघडी प्रत्ययाला येते.

इतिहास हा वस्तुमात्राला आहेच आहे; परंतु तो समग्र असा, ती वस्तु नष्ट होऊन तिला भूतकाळाचें रूप प्राप्त झाल्यावांचून मात्र कोणा-

लाहि लिहितां अथवा सांगतां येणें अशक्य असतें. प्रचारांत असलेल्या भाषेचें व्याकरण जसें संपूर्णावस्थेंत दृष्टीस पडणें अशक्य, तसेंच कोणच्याहि इतिहासाचें असतें. कोणच्याहि प्राण्याचा समग्र इतिहास, मृत भाषेच्या व्याकरणाप्रमाणें, त्याच्या मृत्युकाळींच संपूर्णावस्थेंत लिहून काढण्या सारखा दृश्यमान होतो. इतिहासांत लोकोत्तर गोष्टींच्या इतिहासाचीच महति अधिक असते. कारण, त्यांत अनेक गोष्टी धडा घेऊन प्रचारांत आणण्यासारख्या आणि बोधप्रद अशा असतात. परिस्थिति आणि देशकालवर्तमान, या गोष्टी नेहमी एकाच स्वरूपाच्या नसतात व त्या वेळपरत्वें बदलून जशीं निरनिराळीं रूपें धारण करीत असतात, तशीच गोष्ट लोकोत्तरपणाची आहे. लोको-त्तर गोष्टींचें तुलनाशास्त्र याचमुळें अस्तित्वांत आलें आहे. लोकोत्तर गोष्टींची जरी नैसर्गिक पद्धतीनें पुनरावृत्ती झाली, तरी ती इतिहा-साच्या पुनरावृत्तीच्याच सदरांत दीर्घावधीनें व फरकानें प्रविष्ट होणार हें उघड आहे. जें कारण लोकोत्तरपणाला तेंच दीर्घावधीला. राष्ट्रामध्यें अनेक प्रकारच्या लोकमान्य विभूति जन्माला येणें हें त्या राष्ट्राचें भाग्यच होय. असें भाग्य ज्या राष्ट्राचें असतें, त्या राष्ट्राच्या दैवीं जरी आजपर्यंत अलौकिक अशा फारशा व्यक्ति लाधत नसल्या तरी लोकमान्य व्यक्ति जन्माला येऊन, ती पूर्ण प्रकाशानें राष्ट्रांत झळकणें हेंच जें राष्ट्राचें खरें सौभाग्य, तें नेहमीच वांट्याला येणें शक्य नसतें. फलज्योतिषाचा अंगिकार करून ग्रहबलावर भिस्त ठेवली काय, किंवा कर्मवादाला हृदयाशीं घट्ट कवटाळून धरून युगांतराची कल्पना स्वीका-रिली काय—दोहोंचा मतलब एकच. या दोन्ही गोष्टींचा जरी स्वीकार

केला, तरी लोकोत्तर ठरण्यासारख्या घटना किंवा रचना विशिष्ठ काला-वधीनेंच निर्माण होत असतात हें सत्य आहे. जो न्याय भाग्ययोगाला तोच हानियोगालाहि लागू पडतो.

जगांत ज्या हरवडि नानाविध घटना निसर्ग घडवून आणित असतो, त्यापैकीं कांहीं प्रत्यक्ष बघावयाला सांपडतात व कांहीं ऐकूं येतात. त्या कधीं मनांत अवतरतात, तर कधीं कल्पनामय होतात. कधीं कांहीं चिंतनीय असतात, तर कधीं कांहीं चिंताव्यग्र करून सोडणाऱ्या असतात. त्यांपैकीं कांहीं सुखकारक, तर कांहीं दुःख-कारक होतात. सुखप्राप्ति आणि दुःखपरिहार यांत जनता सर्वत्र नेहमीं गुंग होऊन गेलेली दृष्टीस पडते. या सर्व गोष्टी जें कोणी घड-वून आणितें, त्यालाच चित्त अथवा चेतना असें म्हणण्याचा प्रघात आहे. संवेदना, उपलब्धी, स्मृति, कल्पना, विचार, सुख, दुःख, प्रेम, भय आणि संकल्प या गोष्टीं, त्याच चित्ताच्या अथवा चेतनेच्या वृत्ती होत. या चित्तवृत्तींचें जें नियमबद्ध वर्णन आणि जी व्याख्या, त्यालाच मनोविज्ञान असें म्हणतात. प्राकृत्तिक प्राक्तनाचें वाचन व स्पष्टीकरण याच मनोविज्ञानाच्या साहाय्यानें होतें.

मनोविज्ञान हें ज्ञान आहे, कला नव्हे. नियमबद्ध व्याख्या आणि वर्णन याला जसें विज्ञान म्हणतात, तद्वतच नियमबद्ध कार्याला कला असें म्हणतात. कला ही स्वतःच्या नियमांची उत्पादक असते आणि म्हणूनच ती नियमबद्ध असते. तिचें स्वतःसाठीं केलेले नियम कडक नसतात म्हणूनच तिची उन्नती होते. कांहीं विशेष ज्ञानाच्या बाब-तींत घटनांचें ऐक्य करून, त्या ऐक्याची जी नियमबद्ध व्याख्या

करावी लागते आणि त्या व्याख्येपासून जी ज्ञानप्राप्ती होते, तिचें कार्य—केवळ अमूक प्रकारची घटना ही काय आहे हें सांगणें इतकेंच नसतें. कारण, ज्ञान दोन प्रकारचें असतें. एक आदर्शभूत व दुसरें प्राकृतिक. आदर्शविज्ञानांत ज्याप्रमाणें आदर्शाचें वर्णन व व्याख्या यांचा अंतर्भाव होतो, तद्वतच—तर्कशास्त्र, सौंदर्यशास्त्र व आचारव्यवहार यांचाहि होतो. तर्क कसा करावा हें जसें तर्कशास्त्र शिकवितें, तद्वतच मनुष्याच्या परमपुरुषार्थाचें ज्ञान आचारव्यवहारशास्त्र शिकवितें. सौंदर्य-शास्त्र हें—चित्रें, मूर्ति आणि कवित्व हीं कशीं असावींत याचा आदर्श पुढें मांडतें. प्रकृती ही स्वतंत्र असून, ती कोणाच्याही अनुसंधानानें वागणारी नाहीं. ती स्वेच्छेनेंच सर्व गोष्टी घडवून आणीत असते. मानवाला ज्या सुखदुःखात्मक वाटणाऱ्या गोष्टी तोच प्रकृतीचा इति-हास होय! अशा त्या अमोघ प्रकृतीच्या अनंत इतिहासांतल्या अत्यंत अल्प अशा ज्या एका फक्त चौपन वर्षें, सहा महिने आणि चोवीस दिवसांच्या स्वतंत्र ऐतिहासिक भागाचें मी यापुढें विवेचन करणार आहें, त्यालाच गद्यनाट्याचार्य गणपतराव जोशी—त्यांचें चरित्र या नांवानें संबोधिलें आहे. त्या थोर पुरुषाच्या जन्ममृत्युकालांच्या मध्या-वधींत जी घटना घडून आली त्याचा इतिहास आतां यापुढें अनुक्रमें मी विशद करीत आहें.

हें पुस्तक मी गणपतरावजींचें स्तुतिस्तोत्र लिहित नसून, चरित्रा-त्मक लिहीत असल्यानें, यांत मी त्यांच्या गुणांबरोबर दोषाचेंहि आविष्करण करणार आहें, याबद्दल त्यांचे भक्त मला क्षमा करतील अशी आशा आहे. मी गणपतरावांचा जसा भक्त आहें, तसाच जरी फार वर्षांचा स्नेहीहि आहे, तरी मी त्यांचे चरित्र लिहिण्याचें काम हातीं घेतलें

असल्यानें, ज्यांचें चरित्र लिहावयाचें त्यांचा निवळ स्तुतिपाठ करायचा नाहीं किंवा केवळ दोषाविष्करणच करीत बसायचें नांहीं, हा जो खऱ्या चरित्रलेखकाचा मूळधर्म त्याचा मीं पूर्ण अवलंब केला आहे. मृताबद्दल अप्रिय अथवा प्रतिकूळ बोलूं नये या सामान्य शिष्टाचाराला इतिहासासारख्या विषयांत स्थान नसल्यानें मीं तो प्रस्तुत पुस्तकांतून वगळला आहे. मृताचे नुसते गुण गावयाचे व त्याच्या अवगुणांवर पांघरूण घालावयाचें हा जरी अंधभक्तांचा न्याय असला, तरी प्रेम आणि द्रोह या दोहोंनां फांटा देऊन, यापुढें गणपतरावांच्या आयुष्य-क्रमाचें सत्यान्वेषक दृष्टीनेंच विवेचन केलें आहे. याचें कारण इतकेंच कीं, थोर माणसांचीं जीं चरित्रें जनतेपुढें मांडायचीं त्यांत दोन हेतू असतात. एक त्यांनीं ज्या गुणांच्या प्रतिभांवर थोरपणा संपादन केला, त्या गुणांचें अनुकरण करण्याची जनतेंत उत्कट लालसा उत्पन्न होईल अशा रीतीनें मृतांच्या अंगच्या गुणांचें यथार्थ आविष्करण करणें, व दुसरा—ज्या अवगुणांच्या योगानें मृताची कर्तृत्वशक्ती साधारणपणें कमजोर झाली, ते अवगुण टाळण्याचा लोकांनां बोध मिळेल अशा प्रकारें त्या अवगुणांचें सहृदयतेनें पण स्पष्टपणें स्पष्टीक-रण करणें. त्रयस्थ आणि निःपक्षपाती दृष्टीनें जें चारित्र लिहिलें जातें तेंच खरें बोधप्रद होतें, अशी माझी पूर्ण कल्पना असल्यानें, गणपतरावांचें चरित्र लिहितानां तशाच प्रकारची भूमिका मीं धारण करून हें चारित्र लिहिलें आहे, इतकें सांगितलें असतां पुरें होईल.

मुख्य विषयाला सुरवात करण्याच्या आधीं वाचकांना एक गोष्ट मुद्दाम सांगणें आवश्यक वाटते. ती गोष्ट म्हणजे प्रस्तुत पुस्तकाचा लेखक व चारित्रनायक यांच्या परिचयाची होय. शाहुनगरवासी नाटक

मंडळी ही इ. स. १८९१ सालीं ज्यावेळीं प्रथम पुण्यास आली त्या वेळीं त्या नाटकमंडळींची स्थिति अत्यंत कर्जबाजारी अवस्थेंतली होती. पुण्यास अखेरचा प्रयत्न करून पाहून मंडळीचें विसर्जन करावें असा त्या मंडळीच्या चालकांचा हेतू होता. त्यावेळीं ती मंडळी—**श्री** शाहूनगरवासी नाटकमंडळी—या नांवाच्या छापिल जाहिरातींनीं प्रसिद्ध होत असूनही, त्या मंडळीजवळ **श्री**चा अभाव असल्यानें ती अत्यंत दारिद्र्यपंकांत रुतून गेलेली होती. ती तिची दीनावस्था पुढें नाहींशी होऊन, ती जेव्हां **श्री**संपन्न होऊं लागली, तेव्हां तिच्या नांवाच्या मागचें **श्री** हें अक्षर कसें लुप्त झालें व ती मंडळी गणपतरावांच्या मृत्यूपर्यंत **श्री** या अक्षरावांचून आपल्या—शाहूनगरवासी नाटक मंडळी—या नांवानें नाट्यवातावरणांत कशी चमकली याचें यथास्थळीं विवेचन येईलच. असो.

मंडळी प्रथमतःच पुण्यास आली त्या वेळीं येथील फर्ग्यूसन कॉलेजच्या विद्यार्थ्यांचें संकृत 'वेणीसंहार नाटक' बसत होतें, व कॉलेजांतील सर्व प्रोफेसर्स त्यांनां मोठ्या उत्साहानें मदत करीत होते. आदल्यावर्षीं डेक्कन कॉलेजच्या विद्यार्थ्यांनीं जो संकृत 'मृच्छकटिक' नाटकाचा प्रयोग येथें केला होता त्याच्या तोडीसतोड म्हणूनच हा प्रयोग करून दाखविण्यांत आला होता, व तो प्रयत्नाहि पूर्णपणें यशस्वी झाला होता. अशा त्या प्रयोगाच्या वेळीं शाहू मंडळी पुण्याच्या आर्यभूषण थिएटरांत आपले पौराणिक आणि बुकिश प्रयोग करीत असतां, त्या मंडळीचें कॉलेजच्या विद्यार्थीमंडळीला चांगलेंच साहाय्य झालें. त्याच प्रसंगीं प्रस्तुत पुस्तकलेखकाची आणि गणपतरावांची जी प्रथम ओळख झाली, ती उत्तरोत्तर वाढत जाऊन अखेर-

पर्यंत तशीच टिकली, हें नमुद करण्यास मला अभिमान वाटतो. त्या वेळेपासून गणपतरावांचा आणि माझा उत्तरोत्तर प्रत्यक्ष भावासारखा जो दृढपरिचय होत गेला, त्याचेंच प्रस्तुत पुस्तक हें दृश्यफल होय.

गणपतरावांचें चरित्र लिहिण्याची मला प्रथम स्फूर्ति इ. स. १८९८ सालच्या मे महिन्यांत झाली. शेक्सपियरचीं नाटकें संगीतांत पुण्याच्या रंगभूमीवर, नाट्यकलाप्रवर्तक मंडळीमार्फत प्रथम धिंगाणा घालूं लागलीं, त्यावेळीं मला नाट्यकलेच्या दुःस्थितीबद्दल अत्यंत वाईट वाटून, मीं 'जगद्धितेच्छु' नांवाच्या वर्तमानपत्रांत 'लक्ष्मण' या सहीनें टीकात्मक लेख लिहिण्यास सुरुवात केली. दोन तीन लेख वाचल्यावर, गणपतराव जोशी व नाट्यकलाप्रवर्तक मंळळीचे शिक्षक आणि माझे स्नेही प्रसिद्ध नाट्यकलापटु कै. शं. आ. पाठकर, यांनीं ते लेख लिहिणाराचा बारकाईनें शोध केला, व मीच त्यांचा लेखक अशी उभयतांची खात्री पटल्यावर, त्यांनीं मला स्वतंत्रपणें तसें करण्याचा उद्देशहि विचारला. शंकरराव आणि गणपतराव हे दोघे परस्पर मित्र खरे, परंतु एक नवेच बनलेले संगितराव व दुसरे गद्यराव असल्यानें त्या दोघांचे दोन तट त्यावेळीं निर्माण झाले होते, आणि मी दोघांचाहि मित्र होतों, यामुळें जरी प्रथम ते लेख लिहिणारा मीच असें मी त्यांना स्पष्ट सांगितलें नाहीं, तरी त्यानंतर आणखी दोन लेख प्रसिद्ध झाल्यावर, कांहीं एका चमत्कारिक आणि अस्फोटनीय अशा प्रसंगीं 'ते लेख मीच प्रसिद्ध केले आहेत,' अशी मला गणपतरावांपाशीं कबूली देणें भाग पडलें. तो प्रसंग प्रकृत विषयाशीं विशेष सलग्न आणि महत्वाचा नसल्यानें, त्याचें स्पष्टीकरण करण्याचें येथें प्रयोजन आहे असें नाहीं.

अशा त्या प्रसंगीं गणपतरावजींचें चरित्र मला लिहिण्याची स्फूर्ती झाली व मी तसा प्रश्नहि केला. ती वेळ गणपतरावांनीं नाट्यकलेच्या उत्कर्षाच्या सिंहासनावर जाऊन बसण्याच्या अगदी जवळची आली होती. गणपतराव त्यानंतर १९०१ मध्यें नाट्यसिंहासनाच्या शेवटच्या पायरीवर चढून गेले व तेथें त्यांनां कांहीं काळ ग्रहण लागलें. पुन्हां १९०४ मध्यें महाराष्ट्राच्या रंगभूमीवर ग्रहणमुक्त चंद्राप्रमाणें गणपतराव आपल्या मनोरम कांतीनें जननयनांना आल्हाद देऊं लागले. मला लेखनव्यवसायाची हौस असल्यामुळें व त्यांतल्या-त्यांत मी नाट्यकलाभक्त असल्यानें, तद्विषयक जे गणपतरावांचें चरित्र तें लिहिण्याची माझी उत्कंठा दिवसेंदिवस अधिकच वाढत चालली. गणपतरावांची व माझी भेट आणि ओळख झाली त्यावेळीं गणपतराव तेवीस चोवीस वर्षांचे अगदीं तरणे बांड होते. तत्पूर्वीचा त्यांच्या चरित्राचा इतिहास सांगण्याविषयीं मी जरी गणपतरावांना दोन चार वेळां प्रश्न केला, तरी 'माझें पूर्वचरित्र चमत्कारिक आहे. ते जनतेपुढें येण्यानें कोणाचा मोठासा फायदा होणार आहे असें नाहीं. माझ्यापेक्षां अनेक थोर माणसें आहेत. मी यकःश्चित नाटक्या आहें. माझ्या चरित्रवाचनाची जनतेला अपेक्षा वाटेल असें जरी मला वाटत नाहीं, तरी पण सध्यांच काय अडलें आहे! पाहूं पुढें!' असेंच जेव्हां त्यांनीं आपलें एकच उत्तर देण्याचें वेळोंवेळीं चालविलें व कांहीं तरी सबबी सांगून, ते आपले पूर्ववृत्त सांगण्याची टाळाटाळी करूं लागले, तेव्हां त्यांच्या तोंडून त्यांचें पूर्वचरित्र ऐकून घेण्याची मी आपल्या मनांत एक निराळीच क्लृप्ति योजिली व दैवयोगानें ती सफळही झाली.

"नवयुग" वर्ष ९ अंक २–३– पृष्ठ १३६ खालून दुसरा वरून ओळ १९ मध्यें प्रो. गो. गो. टिपणीस यांनीं **के. नटाग्रणी गणेश कृष्ण जोशी** यांच्या मृत्युलेखांत–'दुर्दैवानें गणपतरावाना ज एक व्यसन (जडलें) होतें त्या व्यसनाच्या अभूतपूर्व माऱ्यापुढें ....' वगैरे जो मजकूर लिहिला आहे, त्यांतील ज्या व्यसनाचा त्यांनीं संदिग्ध उल्लेख केला आहे, त्याच गणपतरावांनां जडलेल्या व्यसनाचा फायदा वेळोवेळीं घेऊन, त्यांच्या व्यसनासक्ततेंतील आनंदमय रंगाच्या स्थितींत त्यांच्या तोंडूनच मीं जो त्यांचा पूर्वेतिहास अनेक प्रसंगीं थोडा थोडा काढून घेतला त्याचीं टिप्पणें वेळोवेळींच करून ठेविलीं. हें काम मला अनेक निरनिराळ्या स्थळीं व वेळीं करून घ्यावें लागलें. तीं स्थळें व त्या वेळा कथन करण्यापासून वाचकवृंदाचा मोठासा फायदा होणार आहे असें नसल्यानें, त्यांचें स्पष्टीकरण येथें करण्याची आवश्यकता वाटत नाहीं.

तीं वेळोवेळीं करून ठेविलेलीं टिप्पणें बरोबर आहेत किंवा त्यांत कांहीं चुका आहेत, याचा पडताळा बघण्याचें गेल्यावर्षीं ज्या कांहीं कारणानें माझ्या मनांत आलें, व तीं तपासून घेण्याचाहि परमेश्वरकृपेनें जो योग आला, त्यामुळेंच मला गणपतरावांचें हें प्रस्तुतचें चरित्र छातीठोकपणानें लिहून प्रसिद्ध करण्याचें आज धाडस होतें आहे.

इ. स. १९२१च्या जुलै व आगष्ट महिन्यांत गणपतरावांचा त्यांच्या नाटकमंडळीसह पुण्यास मुक्काम होता. नाटकाचे प्रयोग किर्लोस्कर थिएटरांत होत हेते. मी मधून मधून नाट्यप्रयोग बघ-ण्यास जात असें. त्यांच्या मंडळीचा एके शनवारीं मंजुघोषा नाटकाचा प्रयोग लागला असतां, तो प्रयोग बाळाभाऊ जोग वारल्यापासून अलीकडे दाहाबारा वर्षांत मीं पाहिलेला नव्हता, त्यामुळें तो कसा काय

वठतो तें बघण्यासाठीं मुद्दाम गेलों होतों. प्रयोगाला सुरवात होण्यास सुमारें अर्धा तास अवकाश होता. थिएटरातील रंगभूमीच्या उत्तरेच्या बाजूला एका पलंगावर तक्याला टेंकून गणपतराव बसलेले होते, शेजारीं रंगभूमी नाटकाचे कर्ते व मालक रा. फाळके बसले होते व पलंगाच्या पुढील दोन तीन खुर्च्यांवर जीं दोन तीन माणसें बसलीं होतीं, त्यापैकीं 'माईसाहेब' या नावांच्या नाटकाचे कर्ते रा. कुळकर्णी एवढेच काय ते माझ्या ओळखीचे गृहस्थ तेथें बसलेले होते. अशा त्या वेळीं मी तेथें गेल्यावर गणपतरावांनीं आणखी एक खुर्ची आणायला सांगितलें; परंतु मंडळी गडबडींत असलेली पाहून रा. कुळकर्णी यांना सरकायला सांगून मी त्यांच्या अर्ध्या खुर्चीवर बसलों. त्या वेळीं गणपतराव सर्वांशीं कांहीं आनंदानें तर कांहीं कळवळ्याच्या आवाजानें भाषण करीत होते. तशा प्रकारची त्यांची स्थिति पाहून मला जरी कांहींच चमत्कार वाटला नाहीं, तरी सभोंवारच्या पांचचार माणसांचीं हृदयें सद्गदित झालेलीं मला दिसून आलीं. मला चमत्कार न वाटण्याचें कारण कांहीं विशेष नव्हतें. कारण, ते आपल्या खऱ्या प्रेमानंदांतल्या मद्यावस्थेंत असतांना अशाच तऱ्हेनें बहुतेक नेहमी आपला भाषणचमत्कार व्यक्त करीत असत, असा माझा अनेक वर्षांचा अनुभव होता. असो. गणपतरावांच्या बोलण्याचा झोंक एकदम मध्येंच बदलला व ते म्हणाले " रंगभूमीवर मराठींत करतां येईल अशाप्रकारचें जर कोणी शेक्सपियरचें ' किंग लियर ' नाटक मला करून देईल, तर त्याचा प्रयोग करून दाखवून, करुणरसांतील आवाजाची टीप अत्युच्च शिखराला नेऊन भिडवून शेक्सपियरच्या एका अवशिष्ठ अशा सर्वोत्तम पात्राची बहार दाखविण्याची माझी आतां शेवटची इच्छा राहिली आहे.

काय हो 'डाव जिंकला' कुळकर्णी, देतां कां लिहून ?" कुळकर्णी कांहींच उत्तर देत नाहींत असें पाहून ते माझ्याकडे पाहून म्हणाले, "काय हो बळवंतराव, आहे का तुमची इच्छा ?" मीं लगेच उत्तर दिलें, "तुम्ही सांगत असाल तर प्रयत्न करतों ?" त्यांनीहीं लगेच "करा तर मग सुरू उद्यांपासून" असें मला सांगितलें.

'किंग लियर' नाटकांतील 'एडमंड'ची भूमिका मीं पूर्वी १९०१ सालीं रंगभूमीवर केली होती, त्यामुळे तें नाटक मीं त्यावेळीं मननपूर्वक वाचलेलें होतें. कै. शंकर मोरो रानडे यांनीं त्या नाटकाधारें जें 'अति-पीडचरित' या नांवाचें मराठींत नाटक लिहिलेलें प्रसिद्ध आहे, तें मूळापेक्षां फारच भिन्न प्रकारें लिहिलें गेलें आहे, यामुळें तें गणपतरावांना आवडत नव्हतें. त्यांना मूळांतली ट्रॅजेडी पाहिजे होती. त्यामुळें त्यांच्या सांगण्याप्रमाणें, त्यांचा पुण्याचा मुक्काम हलण्याच्या वेळीं त्यांना त्या नाटकाचे पहिलें तीन अंक मीं मराठींत लिहून दिले. 'संगीत माधुरी' नाटकाची हस्तलिखित प्रत वाचून दाखविण्यास रा. फाळके याच वेळीं त्यांच्या मंडळीच्या बिऱ्हाडीं मधून मधून येत असत.

वर सांगितल्याप्रमाणें 'किंग लियर' नाटकाच्या भाषांतरासंबंधानें गणपतरावांच्या भाषणांत जे '.... आतां शेंवटची इच्छा राहिली आहे' वगैरे उद्गार निघाले होते, त्यांतील खोंच त्यावेळीं तेथें हजर असलेल्या एकाहि माणसाच्या लक्ष्यांत आली नाहीं, हें साहजिकच झालें. मीं मात्र ती खोंच ध्यानांत आणून प्रसंगाची वाट पाहूं लागलों. मंडळीचा मुक्काम पुण्याहून हलला व गणपतरावांनीं मंडळीला बारामतीला लावून देऊन, ते स्वतः हवापालट करण्यासाठीं लोणावळ्यास जाऊन राहिले. आठ दिवसांनीं मागून मीहि माझ्या जवळच्या त्यांच्या चरि-

त्रात्मक जुन्या टिप्पणांच्या वह्या घेऊन लोणावळ्यास गेलों. तेथें गेल्यावर मी आपला मनोदय त्यांना कळवून, "माझें चरित्र जर कोणी लिहील तर बळवंतराव तुम्हींच लिहाल आणि मित्रऋणांतून मुक्त व्हाल!" असे जे त्यांनीं अनेक वेळां माझ्याशीं एकांतांत किंवा कांहीं विशिष्ट मंडळींच्या देखत काढलेले उद्गार, त्यांची त्यांना आठवण दिली. त्यावेळी ते मौजेनें म्हणाले, "एकंदरींत आमच्या घटका भरत आल्या अशीच यावरून कल्पना केली पाहिजे!"

हे त्यांचे उद्गार ऐकून मीं त्यांना म्हटलें, "पुण्यास किर्लोस्कर थिएटरांत 'आतां माझीं किंग लियर नाटक करून दाखवायची शेवटची इच्छा राहिली आहे' असे जे तुम्ही उद्गार काढलेत, त्यावरून नाट्यसृष्टींत विहार करण्याची तुमची आयुष्यमर्यादा आतां संपत आली आहे असा अंदाज बांधून, मीं जें तुमचें चरित्र लिहिण्याचें योजिलें आहे, तें बंद करावें अशी तुमची इच्छा असेल तर तसें सांगा!"

यावर ते म्हणाले, "ही गोष्ट अगदीं मनकौडेपणाचीच झाली असें म्हणायला हरकत नाहीं. असो. काय टिप्पणें आहेत तीं वाचा."

ती वेळ सकाळच्या चहाची होती. चहापान झाल्यावर मीं टिप्पणें वाचायला सुरुवात केली; जेथें जेथें फरक होता, तेथें तेथें त्यांनीं दुरुस्त्या सांगितल्या व त्या मीं तत्काळ करून घेतल्या. चरित्र लिहून प्रसिद्ध करण्यासंबंधानें त्यांनीं आपल्या मनाची संतोषवृत्ति व्यक्त केली. तें त्यांचें चरित्र त्यावेळीं नाट्यसृष्टीला अखेरचा रामराम ठोकून 'वार्धके मुनिवृत्तीनाम्' ही जी वृत्ति ती स्वीकारण्यापर्यंतचेंच होणार होतें.

गणपतरावांनीं आपलें चरित्र लिहून तें प्रसिद्ध करण्याची जरी मला आनंदानें परवानगी दिली, तरी त्यांनीं त्यांत ज्या कांहीं गोष्टींचें

स्पष्टीकरण करण्यासंबंधानें आपली नाखुषी व्यक्त केली, ती त्यांची मनीषा मीं या त्यांच्या चरित्रात्मक ग्रंथांत पूर्णपणें पाळलेली नाहीं, हें स्पष्टपणें कबूल करण्यावांचून गत्यंतरच नाहीं. या चरित्रग्रंथाशीं ज्या एकदोन गोष्टींसंबंधानें मुळींच संबंध येत नाहीं, त्या गोष्टी मीं यांतून वगळल्या असून, त्यांचें योग्य स्थळीं केवळ दिग्दर्शन मात्र केलेलें आहे. फक्त एकाच गोष्टीसंबंधानें त्यांचें व माझें जें विरुद्ध दिशेचें मत पडलें, तें त्यांच्या व्यसनाधीनतेसंबंधानें होय. जी गोष्ट अगदीं स्पष्टपणें आणि सरळ मार्गानें जगापुढें ढळढळीत सूर्यप्रकाशाप्रमाणें दिसली गेली, ती ऐतिहासिक स्वरूपाच्या चरित्रात्मक पुस्तकांतून जाणून बुजून गाळून टाकणें,ही गोष्ट स्पष्टपणें अन्यायाची, सत्यापलापाची आणि इतर पक्षपाति चरित्रलेखकांप्रमाणें नामोष्कीची असल्यामुळें, तसें धारिष्ट प्रस्तुत पुस्तकांत माझ्या हांतून झालें नाहीं, याबद्दल गणपतरावांचा परलोकगत आत्मा मला क्षमा करो.

चरित्र लिहून काढून छापण्याची परवानगी घेऊन मी लोणावळ्याहून परत पुण्यास आलों, 'किंग लियर' नाटकाचा चवथा व पांचवा अंक पुरे लिहून काढले आणि गणपतरावांना त्याबाबतींत पत्र धाडलें. त्यावेळीं गणपतराव दादरला आपल्या जांवयाकडे मुलीला व नातवांना भेटण्यास आणि तेथें पंधरा वीस दिवस मुक्काम करण्यासाठीं लोणावळ्याहून गेले होते. मला पत्र येतांच मी दादरला गेलों. गणपतरावांची कंपनी बारामतीहून याचवेळीं सोलापुरास गेली होती. आपल्या मागें आपली कंपनी कशी काय चालेल याचें चित्र, अशा तऱ्हेनें कंपनीला स्वतंत्रपणें मुक्काम करण्याची सवलत आपल्या हयातींतच देऊन, बघण्याचा परिपाठ, याप्रमाणें गणपतरावांनीं सुरूं केला होता. तो महिना

भाद्रपदाचा होता. सर्वत्र श्रीगजाननाचे उत्सव सुरू होते. मी दादरला गणपतरावांकडे गेल्यावर दुसऱ्या दिवशीं सकाळीं चहापानानंतर 'किंग लियर' नाटकाचें मराठी भाषांतर त्यांच्यापाशीं वाचण्याची सुरवात झाली. रोज अर्धा पाऊणच अंक वाचला जाऊन, आधुनिक महाराष्ट्र—रंगभूमीला साजेल अशा तऱ्हेचें त्याला स्वरूप देण्याचें काम होत असे. अनंत-चतुर्दशीला गणपतराव नेहमीं आपला वाढदिवस आनंदानें घालवीत असत. त्याप्रमाणें त्या दिवशीं अनेकप्रकारचे आनंदोत्सव करून त्यांनीं तो पार पाडला.

वास्तविक म्हटलें तर गणपतरावांची जन्मतिथी श्रावण शु० १४ सह पौर्णिमा असतां ते आपला वाढदिवस एक महिन्यानें पुढें कां करीत असत याचा उलगडा येथें करणें आवश्य आहे. वाढदिस म्हणजे जो वाढदिवस तो साजरा न करितां, जाढमहिनाच साजरा करण्याचा गण-पतरावांनीं बरींच वर्षे परिपाठ ठेविलेला होता, आणि त्याचें कारणहि ते तसेंच आपल्या चमत्कारिक अनुभवाचें सांगत. स्वरोदय आणि ज्योतिषशास्त्र या दोहोंवर जरी गणपतरावांचा भरंवसा होता, तरी त्यांतल्या त्यांत स्वरोदयशास्त्राचा त्यांनीं स्वतः अभ्यास करून अनु-भव घेतला असल्यामुळें, त्याचे त्यांना जसे तात्काळ दाखले येत असत, तशी गोष्ट ज्योतिषशास्त्राच्या अनुभवासंबंधानें त्यांच्या ठाम मताची झालेली नव्हती. ज्योतिषशास्त्राप्रमाणें ज्योतिष्यांनीं त्यांच्या जन्मलग्नकुंडलींतील ग्रहांप्रमाणें वर्तविलेल्या भविष्याचे दाखले त्यांना नेहमीं एका वर्षाच्या फरकानें अस्पष्टपणें येत असल्याचें ते सांगत असत. या बाबतींत त्यांनीं जे अनेक दाखले सांगितले त्यांपैकीं एकच येथें नमूद करतों, म्हणजे त्यावरून या बाबतींत वाचकांची खात्री पटेल.

ज्योतिषशास्त्र खरें आहे, असें जरी धरून चाललें, तरी तें बरोबर वर्तविणारा अजूनपर्यंत तरी आमच्या पाहाण्यांत येत नाहीं हेंहि खरें आहे. हें आमचें म्हणणें खोटें असल्यास वाटेल त्या ज्योतिर्विदानें पुढें येऊन आमचें म्हणणें खोटें करून दाखविल्यास आम्हीं आनंदानें त्याला शरणचिठ्ठी देऊं. जन्मकुंडली बरोबर नसल्यानें ज्योतिष खरें ठरत नाहीं, ही नेहमींची सर्वसाधारण सबब हवा तो ज्योतिर्विद झटक्या सरशीं सांगून आपल्या जबाबदारींतून पार पडतो. पण आमचें सर्व ज्योतिर्विदांना असें प्रेमाचें आणि सविनय अगत्याचें विचारणें आहे कीं, मेहेरबान, कुंडली मांडण्याच्या घटकापळांची चूक झालीं असली पाहिजे असें जें आपण म्हणून पर्यायानें आपलें खरें अज्ञान प्रगट करतां, त्या बाबतींत आमचें म्हणणें असें आहे कीं, घटकापळांची जन्मलग्नकुंडली मांडण्याची चूक राहूं द्या. आम्हांला चोवीस तासांचीहि चूक कबूल करण्याचें कांहीं वाईट वाटत नाहीं, पण आपण मात्र कृपा करून, तेवढ्याच फरकाचें भविष्य जरी आम्हांला खरें करून दाखविलें, तरी आम्हांला अर्धवट देवच भेटला असें आम्ही समजूं. असो. अशा प्रकारचें अनेक ज्योतिष्यांशीं आमचें भाषण झालें असून, हरघडीं जसा त्यांच्या ज्ञानाच्या अपूर्णतेचा अनुभव आलेला आहे, तद्वतच गणपतरावांनाहि जरी आलेला होता, तरी ते रंगभूमीवर जितक्या धिटाईनें वीररसादिकाचें अद्भुत प्रदर्शन करीत असत, तसे ते गृहस्थितींतल्या व्यवहारांत फारच भित्र्या आणि कोंवळ्या मनाचे असल्याकारणानें, भाकितांवर अंधश्रद्धेनें विश्वास ठेवून कचरत असत.

एका ज्योतिष्यानें गणपतरावांना इ. स. १९२० सालच्या फाल्गुन शु० षष्ठीला घेडगुजरी तिथीसनाचें त्यांचा मृत्यु असल्यानें

गुप्त भाकित सांगितलें होतें, व ती तिथि उलटून जाईपर्यंत कोणाशींहि ती गोष्ट उघड न करण्याचें त्यानें त्यांना सांगून ठेविलें होतें. यांच त्याच्या त्या सांगण्यांत केवढा अनुमानधक्का होता ही गोष्ट गणपतरावां-सारख्या चाणाक्ष बुद्धीच्या माणसाच्या कशी लक्षांत आली नाहीं याचेंच आश्चर्य वाटतें. असो. उपरिनिर्दिष्ट सालाच्या फाल्गुन महिन्यांत नेहमी येणाऱ्या इंग्रजी मार्च महिन्यांत गणपतरावांचा त्यांचा नाटक मंडळीसह सोलापुरास मुक्काम होता. ज्योतिष्यानें ज्या तिथीला त्यांचा मृत्यु असल्याचें त्यांना सांगितलें होतें, ती तिथी आपल्याला फारच अनिष्ट व हानीकारक आहे इतकेंच त्यांनी दोन तीन माणसांच्या जवळ अगाऊ दोन चार दिवस सांगून ठेविलें होतें, आणि अलीकडे त्यांच्या बऱ्याच विश्वासास पात्र झालेल्या त्यांच्या कंपनींतील एक पुरातन रा. सदाशिव वासुदेव दाते या नांवाच्या पुण्यास नौकरींत असलेल्या नटास तावडतोब सोलापुरास निघून येण्याबद्दल तारहि दिली होती. सदाशिवराव दाते त्याप्रमाणें पुण्याहून सोलापुरास निघून गेले व तेथें जो प्रकार झालेला त्यांनीं समक्ष पाहिला, तो ऐकून, भाकित सांगणाऱ्या ज्योतिष्याची कींव करण्या-पलीकडे कांहींहि करणें आमच्या हातीं नसल्यानें आम्ही स्वस्थ बसलों.

दाते पुण्याहून सोलापुरास जाऊन पोहोंचले ती वेळ फाल्गुन शु० षष्ठीच्या प्रभातकाळची होती. दाते भेटल्यानंतर गणपतरावांचा जीव बराच खालीं पडल्याचें त्यांच्या निदर्शनास आलें. गणपतरावांनीं आपली गुप्त गोष्ट दात्यांच्या जवळ एकांतांत सांगितली व पुढें कसें काय घडून येतें याबद्दलचा विचार सुरू झाला. ज्योतिष्यांनीं वर्तविलेली व सरळ गणितान्वयें घडणारीं ग्रहणासारखीं स्थूल भाकितें वजा टाकितां, इतर भाकितें जर खरीं ठरूं लागलीं, तर त्यांनां उदरंभरणासाठीं



व्यापारी वृत्ति पतकरण्याचें कामच राहणार नाहीं, व ते अनायासेंच परमेश्वराप्रमाणें सर्वजनवंद्य होऊन बसतील; ही कल्पना जरी गणपतरावांची अनेक वर्षे होती, तरी ते जन्मतः भिऱ्या स्वभावाचे असल्यानें, त्या दिवशीं त्या कल्पनेच्या धारिष्टावर उभें राहून, ज्योतिष्याच्या भविष्यवादाचा प्रतिकार करण्याची बुद्धि त्यांचें हृदय त्यांना आकलन करूं देईनाशी झाली होती. गणपतरावांच्या मृत्युतिथीचीं नेमकी घटका पळें ज्योतिषी सांगायला कसा विसरला होता, तें कांहीं सांगतां येत नाहीं. तेंही सांगण्याचें पुण्य त्यानें स्वीकारलें असतें तरी त्याच्या अगाध ज्योतिषज्ञानानें तो यावेळीं आकाशमंडपांत बृहस्पतीच्या ताऱ्यासारखा खचीत चमकत न राहातां कोठल्या तरी अज्ञानांधःकारांतल्या निरुपयोगी कणाप्रमाणेंच—सध्यांप्रमाणें कोठें तरी पोट भरीतच भटकत राहिला असता, यांत संशय नाहीं.

तो मृत्यूच्या भाकिताचा दिवस गणपतरावांनीं जरी कसाबसा आपल्या अंतस्थ तळमळींत सायंकाळपर्यंत पार पाडला, तरी त्यांच्या हृदयांतील भीति त्यांना एकसारखी डिंवचीतच होती. मृत्यूचे फक्त बारा तासच कायते अवशिष्ट राहिले. गणपतरावांनीं सायंकाळीं हातपाय धुऊन शुद्धावस्थेंत प्रसन्नांतःकरणानें विष्णुसहस्रनाम म्हटलें व गीता म्हणण्यास सुरवात केली. दीडदोन अध्याय पुरे होतात न होतात तोंच त्यांना थंडी वाजूं लागून ताप भरण्याचीं चिन्हें स्पष्ट होऊं लागलीं. गीतापाठ थांबला व गणपतराव पांघरूण घेऊन खिन्न मनानें अंथरुणावर देवनामस्मरण करीत पडले. मंडळींतील एका मनुष्यानें डॉक्टराला जाऊन आणिलें. डॉक्टरानें थंडीवाऱ्याचा ताप आहे, असें जरी निदान सांगितलें, तरी गणपतरावांची अंतस्थिति अगदीं घाबरून गेली

मनांत वारंवार येऊं लागले होते, आणि ‘ आतां शेवटची किंग लियर नाटक करून दाखविण्याची इच्छा उरली आहे ’ असे जे त्यांचे मागें दिलेले उद्गार वाचकांनां वाचलेलें स्मरत असतीलच, तेच त्यांच्या अलीकडील या विचारांचें द्योतक होत.

प्रेक्षकवर्गादेखत आपल्या हातानें ‘ किंग लियर ’ च्या वेषांत ‘किंग लियरनें’ केलेल्या घोडचुकीची दुरुस्ती करून, आपली कंपनी आपल्या हाताखालीं काम करणाऱ्या बाल्गोपाळांच्या स्वाधीन करायची आणि नट या नात्यानें रंगभूमीवर करुणा आणि शोक या रसांचें आपल्या स्वतःच्या भूमिकेबद्दल साम्राज्याविष्करण करून, आपल्या आंगच्या कलेवरोवर आपलीही रंगभूमीशीं फारकत करून घ्यायची अशी जी गणपतरावांची त्यांच्या उतार वयांतील खरी आकांक्षा, तिनेंच ‘ किंग लियर ’ चें मराठी रूपांतर मजकडून करवून घेतलें.

‘ किंग लियर ’ चें मीं केलेलें रूपांतर श्रावण वद्य द्वितीयेला वाचून व दुरुस्त करून पुरें झाल्यावर त्या नाटकाचें मराठींत नांव काय ठेवावें या बद्दलची वाटाघाट सुरू झाली. कै. आगरकरांनीं आपल्या ‘ हॅम्लेट ’ च्या मराठी रूपांतराचें नांव ‘ विकारविलसित ’ असें जें ठेविलें आहे, त्याबद्दलही त्या चर्च्येंत साहजिकपणेंच गोष्ट निघाली. गणपतरावांनीं ‘ हॅम्लेट ’ चा अभ्यास सशास्त्र केलेला असल्यामुळें त्यांनीं प्रथम ‘ विकार ’ या शब्दासंबंधानें प्रतिकूल असें आपलें मत प्रदर्शित करून, अनेक साधकबाधक प्रमाणें पुढें मांडिलीं, व ‘ हॅम्लेट ’ हा सुशिक्षित असल्यानें तो क्षणैक जरी ‘ विकारवश ’ होई तरी लगेच पूर्णपणें ‘ विचारवश ’ होई आणि याच विचाराला अनुसरून आपण आपली भूमिका रंगभूमीवर नेहमीं करून दाखवितों असें त्यांनीं

आपलें आपल्या अधिकारवाणीनें स्पष्ट मत दिलें. 'हॅम्लेट' हा वेडा किंवा भ्रमिष्ट कधींच नव्हता. त्याची परिस्थिति त्याच्या सुसंस्कृत मेंदूला असहनीय झाली होती व तिच्यांतून तो विचारपूर्वक पार पडण्याच्या अनेक प्रकारच्या खटपटी करति असतां, खरी वस्तुस्थिति काय आहे, तिचें मोठ्या चतुराईनें सूक्ष्मपणें निरीक्षण करण्याचें त्यानें जें काम चालविलें होतें, तें साधण्यासाठीं त्याला मुद्दाम वेड पांघरावें लागलें होतें. याच वेडाच्या पोटांत त्याच्या अंतःकरणानें सूडाची प्रबल भावना धारण केलेली असल्यानें, तो योग्य संधी पाहात होता, परंतु त्याचें ईश्वराला भिणारें मन सूड घेण्याची संधी आली असतांही, त्याला सूडापासून मागें खेचीत होतें आणि तो आपल्या विचारांचें दडपण त्यांवर टाकून त्याला पुढें ढकलीत होता. अशा चमत्कारिक विरोधाच्या कचाट्यांत सांपडलेल्या उत्तम सुशिक्षित माणसाच्या हांतून कधींही अविचाराचें कृत्य होत नाहीं व त्यामुळें तो जसा भांबावून गेलेला भ्रमिष्ट दिसावा तशी 'हॅम्लेट'ची भूमिका शेक्सपियरनें रंगविलेली असल्याबद्दल आपली खात्री झाली असल्यानें, आपण तेंच चित्र रंगभूमीवर वठवण्याचा प्रयत्न करतों, असेंहि गणपतरावांनीं त्या बाबतींत सांगून, 'किंग लियर'चें मराठी नांव यालाच अनुसरून 'विकारविहार' ठेवावें असें मला वाटतें असें सांगितलें. या बाबतींतही त्यांचा व माझा बराच वादविवाद होऊन अखेरीस तेंच त्यांनी सुचविलेलें नांव ठेवण्याचें मीं कबूल केलें. तें नाटक पुढें प्रथम मुंबईस रंगभूमिवर आणण्याचें ठरून मी पुण्यास निघून आलों व गणपतराव सोलापुरास आपल्या कंपनींत निघून गेले. याच वेळीं दादरमुक्कामीं त्यांनीं आपले दोन निश्चय कायम केल्याचें मला स्पष्टपणें बजावून सांगितलें. आषाढ व श्रावण या महिन्यांत ते

पुण्यांत असतानां बहुतेक आपल्या सर्व भूमिका खादीच्या पेहरावांतच फारसा बभ्रा न करतां मधून मधून जें करूं लागले होते, ती स्थिति तदुत्तर करावयाच्या सर्व भूमिकांत सर्व ठिकाणीं कायम ठेवण्याचा एक दृढनिश्चय, व पुन्हां आमरण पुण्याच्या रंगभूमीवर नट या नात्यानें कोणचीही भूमिका न करण्याचा दुसरा दृढनिश्चय! असे ते दोन निश्चय होत. यापैकीं मला जरी पहिला पटला, तरी मी जेव्हां दुसऱ्या निश्चयाचें कारण विचारलें तेव्हां त्यांनीं आपण होऊनच दोन्ही निश्चय करण्याचीं कारणें मोठ्या शांततेनें व स्पष्टपणें सांगितलीं. तीं कारणें येथेंच नमूद करणें इष्ट असल्यामुळें, पुढील प्रमाणें नमूद करतों.

" अलीकडील पुण्याचें वातावरण ड्रेनेजच्या घाणीनें जसें बिघडून गेलें आहे, तसेंच तेथील जनतेला लोकमान्यांच्या मागें कोणीही आवरता उरला नसल्यानें, सर्वत्र बेबंदशाही माजली आहे. लोकमान्यांच्या बरोबर तेथील खऱ्या संस्कृतीचा लोप होऊन गुणग्राहकतेनें आपलें चंबुगवाळें खाकोटीला दडवून टाकलें आहे. लोकमान्यांनीं अनेक वर्षांच्या परिश्रमानें प्राप्त करून घेतलेला वकूब त्यांच्या जागीं काम करीत असलेल्या नरसोपंत केळकरांच्या अंगीं नाहीं हें बघणें ही दुर्दैवाची गोष्ट आहे. नरसोपंतांची निवड खऱ्या धूर्ताला शोभेल अशी जरी बळवंतरावांनीं केली आहे, तरी अद्यापि त्यांचें बसावें तसें बस्तान बसलेलें नाहीं, व सध्यांची हरघडी बदलत असलेली परिस्थिति आपल्या कह्यांत ठेवण्याचें सामर्थ्य कधीं-काळीं नरसोपंतांत येईल तो सुदिन. पुणें म्हणजे सर्व बाबतींत महाराष्ट्राचें केंद्रस्थान. असें असतां त्याची सद्यःस्थिति ज्या प्रकारची दृष्टीस पडते तिचें

पर्यवसान काय होईल याचें भाकित महान् समर्थही सांगूं शकणार नाहींत हें म्हणणें अनुचित होईल असें वाटत नाही. ‘ आधीं केलें, मग सांगितलें ’ ही जी श्रीसमर्थांची शिकवण महाराष्ट्र सध्यां पुणेकरी बडबडींमुळें विसरला आहे. असें वाटतें. जिकडे पहावें तिकडे ‘ क्रियेवीण वाचाळता ’ छाती काढून भटकत असलेली दिसते. खरी कळकळ आणि खरें राजकारण या गोष्टींचा तेथें पूर्ण अभाव झालेला दिसतो आहे. देशहित साधण्याची जी बडबड सर्वत्र ऐकूं येते, ती केवळ बाह्यात्कारें असून, तिला आंतून स्वार्थाचा रोग जडलेला असल्या कारणानें ‘आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः ’ ही म्हण वज्रलेप होऊं पाहत आहे. लोकमान्य टिळकांचीं निःस्वार्थी देशसेवा आणि खऱ्या कळकळीची देशभक्ति, त्यांच्या अनुयायी म्हण-विणाऱ्या एकाहि व्यक्तीच्या कृतींत दृगोचर होत नसल्यानें, स्वराज्य प्राप्त करून घेण्याच्या खऱ्या आत्मयज्ञापासून जे ते अलिप्त असलेले दिसतात, तें त्यांच्या लब्धप्रतिष्ठा प्रस्थापित कर-ण्याच्या उद्योगाला शोभण्यासारखेंच आहे. लोकमान्यांच्या शेंफार-लेल्या अनुयायांत अहंमन्यतेच्या पोंकळ गर्वाची सांथ उद्भवल्यानें, इतर खरें बोलणारे लोक त्यांना कःपदार्थ वाटतात. त्या सांथीच्या रोगानें त्यांना पछाडल्यामुळें त्यांना आत्महिताचाच अंतर्यामीं खरा भ्रमवात झाला आहे, व याचमुळें लोकमान्यांचें राजकारण त्यांच्या पश्चात अगदीं अल्पावधींतच नामशेष होण्याचीं जीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत त्याला बिचारा एकटा नरसोपंत तरी काय करणार! नरसोपंत विद्वान आहेत, हुषार आहेत, चतुर आहेत, बहुश्रुत आहेत, फार काय पण केसरीच्या सिंहासनावर बसण्यास ते ज्या एका गुणावांचून सर्वस्वी योग्य आहेत, टिळकासारखी धडाडी जर त्यांच्यांत वास करती तर सध्यांचें

पुण्याचें वातावरण पूर्वीसारखेंच निःसंशय कायम राहिलें असतें. नरसोपंता-शिवाय लोकमान्यांच्या इतर अनुयायांच्या स्थितीचें निरीक्षण केलें असतां, त्यांची कींव येण्याच्या ऐवजी उद्वेग मात्र उत्पन्न होतो. खऱ्या कलेचें कौतुक करणें आणि सारासार विचार न करतां प्रतिष्ठा मिळविण्यासाठीं हव्या त्या गोष्टींत अधूर्ततेनें हात घालणें या गोष्टींचा, खऱ्या धुरीणाच्या अभावीं, पुण्यास सुकाळ झाला असल्यानें सत्यासत्यतेची चाड दिगंतराला गेली आहे.जो उठला तो शहाणा असेंच सर्वत्र होऊन बसलें आहे. नरसोपंत आणि लक्ष्मणराव भोपटकर हे कंठशोष करून जनतेला खऱ्या मार्गावर आणण्याचा प्रयत्न करीत असतांही, त्यांना मूर्खांत आणि बाडग्या राजकारणपटांत ओढण्याचा पुण्यांत प्रयत्न केला जाण्याची जबरदस्त भीति वाटते आहे. मोठेपणाला हपापलेले पुण्यांतील कांहीं ढोंगी, स्वार्थसाधू आणि परोत्कर्षासहिष्णु लोक आपले व्यभिचार झाकण्यांसाठीं सदसद्विवेकांचा विचार न करितां आत्मश्लाघेनें उन्मत्त झाल्या सारखे दिसताहेत; पण नागकन्येला मागणी घालणाऱ्या गांडुळांप्रमाणें ते लोक बनलेले आहेत. खऱ्या नाण्याची किंमत उतरून खोट्या नाण्याला भाव आलेला आहे. मत्सर, हेवा, सत्यापलाप, स्वार्थ, लब्ध-प्रतिष्ठा वगैरे महान् समर्थ अशा त्रिकाळ सैतानांनीं पछाडल्यामुळें लोक-मान्यांचे अनुयायी म्हणविणारे, पण खरे ढोंगी आणि स्वार्थी लोक, लोकमान्यांच्या शिकवणीचा पर्यायानें विपर्यास करून, तिचे धिंडवडे मात्र करीत आहेत. लोकमान्यांच्या कार्यपटाचे अशातऱ्हेनें तुकडे उडून ते इतस्ततः पडलेल्या स्मशानाचा देखावा बघणें अपरिहार्य आहे. पूर्वीचें दिलदार पुणें आणि सध्यांचें हृदयविहीन पुणें—हीं दोन्हीं पुण्यांचीं स्वरूपें बघणें, दुर्दैवानें ज्यांच्या नशीबीं येतें तो खराच भाग्यहीन! फुलें वेंचलीं तेथ

गोंवऱ्या वेंचण्याचा प्रसंग कोणावरही येऊं नये. तो मोठा कष्टकारक असतो. होतां होईल तों तसा प्रसंग टाळण्याचाच प्रयत्न करावा, असें म्हणणारांपैकीं मी एक असल्यानें, आतां इतउत्तर अशा त्या माझ्या गुणग्राही आणि सर्वोत्तम पुण्यभूमीला जें सध्यां खातेऱ्याचें स्वरूप प्राप्त झालें आहे, तें निदान माझ्या आयुष्यांत तरी मला पूर्वावस्थेंत बघायला सांपडण्याची पुन्हां आशा नसल्यानेंच, मीं पुण्याचें पुन्हां यावज्जन्म दर्शन न घेण्याचें ठाम ठरविलें आहे."

याप्रमाणें पुण्यास पुनरपि न येण्याचें जें कारण गणपतरावांनीं स्पष्टपणें सांगितलें, तें त्यांच्याच शद्बांत येथें नमूद केलें आहे. आतां महात्मा गांधींच्या म्हणण्याप्रमाणें खादी वापरण्याचा जो त्यांनीं रंगभूमीवर आणि बाह्यव्यवहारांतही कृतसंकल्प केला होता, त्याबद्दलचें त्यांचें जें मत त्यांनीं मला सांगितलें तें येथें उद्धृत करण्याच्या आधीं, त्या बाबतींतली थोडीशी पूर्वपीठिका सांगतों.

खरें पाहिलें असतां गणपतरावांनीं प्रथम पुण्यासच इ. स. १९२१ च्या जुलै आणि ऑगस्ट महिन्यांत रंगभूमीवर आणि प्रचारांतील व्यवहारांत स्वतः खादीचे कपडे वापरण्याची सुरुवात केली. 'हॅम्लेट' मधील 'चंद्रसेन' आणि 'त्राटिका' नाटकांतील 'प्रतापराव' ह्या दोन्हीं भूमिका गणपतरावांनीं प्रथम पुण्याच्या रंगभूमीवर खादीच्या कपड्यांतच प्रेक्षकांसमोर आणिल्या व नंतर सोलापूर, ठाणें आणि मुंबई येथें त्यांनीं ज्या ज्या भूमिका केल्या त्या त्या सर्व खादीच्या पोषाखांतच जनतेपुढें मांडल्या. रंगभूमीवर प्रथम खादी कोणी प्रचारांत आणिली याबद्दलचा जो वाद सध्यां सुरू आहे तो वाद या आम्ही वर दिलेल्या माहितीमुळें संपुष्टांत येईल अशी आम्हांला जबर आशा आहे. असो.

खादी वापरण्यासंबंधानें गणपतरावांचे जे काय विचार होते ते त्यांच्याच शद्वांत लिहून, त्या बाबतींत त्यांचीं मतें काय होतीं त्याची ओळख आतां करून देतों.

गणपतराव खादी वापरण्याच्या बाबतींत म्हणतात, " हिंदुस्तानांतील सर्वास जनतेस खादीचा पेहेराव वापरण्यास उद्युक्त करण्यांत महात्मा गांधींजींचे जरी मुख्य दोन उद्देश असले, तरी हिंदुस्तानचे लोक हे इंग्रजांची प्रजा या नात्यानें, ती कोठच्या थराला जाऊन पोंचली आहे व तिच्याकडे इंग्रजांचे डोळें कोणच्या भावनेनें बघत आहेत, हें तिच्या हृत्पटावर उत्तम तऱ्हेनें बिंबवण्याचाच त्यांचा खरा उद्देश असला पाहिजे असें मला वाटतें. हिंदुस्तान गेल्या शंभर वर्षांपूर्वीं कसा सधन होता, आणि सध्यां तो कसा निर्धन झाला आहे, त्याचें चित्र मूर्तिमंत जगाच्या दृष्टीसमोर उभें करणें, म्हणजे तुरुगांतील कैद्यांच्या साडेतीन वस्त्रांत हिंदुस्तानच्या जनतेनें खादीच्या पोशाखांतच व्यवहारांत वावरून स्वतःला ओळखणें होय असें महात्माजींचें हृद्गत असलें पाहिजें असें मला वाटतें. हिंदुस्तान देश हा एक जगद्विरहित प्रचंड तुरूंग असून, त्यांत परकीय सत्तेच्या कठोर श्रृंखलांत बद्ध झालेली जनता, ही इंग्रजांची कैदी आहे—ती गुलामाहूनही नोकरशाहीची गुलाम बनली गेली आहे, असें प्रत्येक अजाण हिंदू हृदयाला साक्षात् पटवून, प्रत्येक हिंदू म्हणविणाऱ्याच्याडोळ्यांत पारतंत्र्यांतल्या शिळ्या व कोरड्या भाकरीच्या तुकड्यांचें अंजन पाडण्यासाठीं, आणि आपले पूर्वज कोण होते व आपण कोण आहोंत—या दोन सजीव चित्रांची ओळख करून देण्याच्याच उद्देशानें गांधीजींनीं, अर्थशास्त्रांतील फक्त कार्यनिर्वाहाचीच गोष्ट

साधण्याची संवय लागावी म्हणून, खादीसारख्या निर्भेळ देशी वस्त्राचा प्रचार सुरू करण्याचा जो उपदेश केला, तो खरोखरच प्रशंसनीय आहे. हिंदूलोकांच्या संरक्षणाची हमी इंग्रजांनीं मोठ्या दिलदारपणानें कोणी न सांगतां आपण होऊनच स्वीकारल्यामुळें त्यांच्या सारख्या थोर हृदयाच्या राजकर्त्यांच्या भजनीं आमच्या पूर्वींच्या दोन तीन पिढ्या लागल्या व त्यांनीं तात्काळ स्वसरक्षणाचा हवाला परमेश्वराप्रमाणें इंग्रजांवर टाकून आपखुषीनें शस्त्रसंन्यास केला, असें जें सांगितलेलें ऐकण्यांत येतें, ती गोष्ट अत्यंत प्राचीन अशा प्रलयकालापासूनच्या उपलब्ध असलेल्या इतिसांत अत्यंत अपूर्व आणि अलौकिक आहे यांत तिळमात्र संशय नाहीं. जुन्या दोन तिन पिढ्यांनीं आमच्या परकीय अमलांतील शांततेचें सौख्य भोगलें ही गोष्ट परकीयांस मात्र हितावह झाली आणि आमच्या पिढीला मात्र कष्टप्रद झाली. याचें खरें चित्र नाटक रूपानें सध्यांच्या जनते पुढें उभें करण्याचें धारिष्ट कोणी कुशल नाटकलेखक जर करूं म्हणेल, तर लगेच, पिनलकोडाचें १२४ (अ) कलम त्याच्यापुढें आ पसरून त्याला गिळून टाकायला उभें राहील. अशा या कष्टमय निःशस्त्रावस्थेंतून पार पडून नैसर्गिक स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यास आम्ही ज्या मार्गानें सध्यां गेलें पाहिजे, त्या मार्गांतील वाटमाऱ्यांशीं झुंज करण्यासाठींच, निःशस्त्रप्रतिकार आणि असहकारिता या दोन अस्त्रांची महात्माजींनीं योजना केलेली आहे, असें माझें मत आहे. सध्यांच्या आमच्या अपमानित अशा कैदीवेषांतच हें युद्ध लढण्यानें आमच्यांतली दुही नाहींशीं होऊन, आम्ही समसमान भावानें युद्धाच्या आखाड्यांत लढूं शकूं हें निर्विवाद आहे. सर्वस्वी गांधीजींनीं दिलेली दीक्षाच या

युद्धाचा सोक्षमोक्ष करणार आहे. असें जरी नाहीं, तरी त्यांच्या पायांतील ही एक शृंखला आहे यांत संशय नाहीं.

‘ भिक्षा मागून राज्य मिळत नसतें ’ या दुर्योधनाच्या उक्तीकडे लक्ष्य देऊन, सर्वांनीं ऐक्यांत स्वदेशहित साधण्यासाठीं, अल्प खर्चानें होणाऱ्या, परंतु स्वावलंबनानें निर्माण झालेलें स्वदेशी वस्त्र वापरण्याच्या कामीं गांधींचा उपदेश शिरोधार्य असून, पुढचा मार्ग आक्रमावा हेंच यावेळीं योग्य आहे असें मला वाटतें. प्रत्येक वक्ता, लेखक, कवि, नाटकांतील पात्र—हे जनतेचे खरे शिक्षक आहेत; परंतु ही जनतेला शिक्षण देण्याची भावना एकाही नाटकपात्राच्या मनांत नसल्यानेंच उच्च दर्जाचें नाटक हलकट होऊन बसलें आहे; पण ही गोष्ट कृतीनें सुधारणें शक्य आहे. कोणच्याही गोष्टीचा अतिरेक म्हणजेच इच्छित फलप्राप्ति! परकीय कपड्यावरचा बहिष्कार आणि स्वदेशी धान्याच्या निर्गतीचा अवरोध, या गोष्टी प्रथम अमलांत आणण्याचा मोठ्या जारीनें पण अत्यंत शांततेनें उद्योग केला, तर तो चांगलाच फळास येईल असें मला वाटतें.”

याप्रमाणें गणपतरावांचे जरी उत्कट देशप्रेमाचे राजकीय बाबतींतले विचार होते, तरी तें जनतेपुढें एखाद्या व्याख्यात्याप्रमाणें येऊन त्यांनीं मांडलें नाहींत, याचें कारण ते व्याख्याते नव्हते असें नाहीं. थोडक्यांत, समयोचित आणि श्रोत्यांच्या हृदयाला पटण्यासारखें अस्खलित व जोरदार भाषण करण्याच्या कामांत ते मोठे पटाईत होते; पण तें काम त्यांनीं स्वीकारलेल्या धंद्याच्या कक्षेच्या बाहेरचें असून, ज्यानें जो मार्ग धरला त्याच मार्गांत राहून, देशहित साधण्याचें काम मनापासून करावें असें ते म्हणत असत व त्याप्रमाणें वर्तनांतही

करति असल्यामुळें, त्यांनीं अंगीकृत कार्याच्या कक्षेंत राहूनच देश-हिताचीं आपल्यापरीं कोणचीं कामें केलीं तें योग्य स्थलीं वाचकांस वाचायला मिळेलच.

नाशिक

श्रीसमर्थरामदास, तुकाराम वगैरे नाटकें रंगभूमिवर करण्यांत गणपतरावांचा हेतु जनतेला शिक्षण देण्याव्यतिरिक्त दुसरा कोण-चाच नव्हता. लेखक, कवि, आणि वक्ते यांप्रमाणें आपणही जनतेचे एक शिक्षकच आहोंत, ही भावना कोणचेंही सोंग रंगभूमिवर कर-तानां त्यांच्या मनांत जागृत असल्यानेंच त्यांच्याकडून हव्या त्या रसांतलीं अप्रतिम सोंगें रंगभूमीवर वठत असत. ही भावना किती नटांच्या हृदयांत असते, तें ज्याचें त्यानेंच ओळखावें. खरा नट कोणाला म्हणावा या बद्दल सुभाषितकारांनीं म्हटलें आहे:—

( मंदाक्रांता )

बाह्यज्ञाना विसरुनि जसा तापसी लीन होतो।
आत्मानंदीं गिरिविरि, तसा रंगभूमीवरी तो॥
स्वीकृत् पात्रीं समरस बने सत्य दावी जगाला।
बोधा देई, जगतिं नट तो साच जन्मास आला॥

गणपतरावांनीं ज्या ज्या भूमिका करून दाखविल्या त्या त्या भूमि-कांतून वरील सुभाषितकारांच्या उक्तीप्रमाणेंच गणपतराव समरस बनलेले अद्यापिही त्यांचे वेष बघितलेल्या प्रेक्षकांच्या दृष्टीसमोर असतील यांत संशय नाहीं.

रंगभूमिवर गणपतराव धीरवीर रसाचीं कामें जितकीं अद्वितीय-पणानें करून प्रेक्षकांचीं मनें उद्दीपित करीत, तितकेंच ते भित्र्या


स्वभावाचे आणि शालीन होते, हें येथें नमूद केल्यावांचून रहावत नाहीं. घरांत ते स्वतः मोठ्या मर्दांच्या गोष्टीं सांगत व त्या सांगणारांचे ते जरी कौतुक करीत, तरी त्याच मर्दुमकीच्या बाण्यानें समाजांतील व्यवहारांत वागण्याचें धैर्य त्यांनीं दाखविण्याचा कधींच प्रयत्न केला नाहीं. त्यांच्या हृदयांतील स्वदेशप्रेमाची प्रज्वलित ज्योत याचमुळें कोणाच्याहि दृष्टीस न पडतां, त्यांच्या जीवितांबरोबरच विझली गेली. असें जरी झालें, तरी स्वदेशाच्या कल्याणार्थ झटणाऱ्यांच्या किंवा ज्यांत स्वदेशहित आहे अशा चळवळींच्या बाबतींत आपणांकडून होईल तितकें द्रव्य-साहाय्य अगदीं निरपेक्ष बुद्धीनें करण्यास त्यानीं कोणचीही संधी कधींच वांया जाऊं दिली नांहीं.

इ. स. १८९७ सालापासून केसरीफंडासारख्या जितक्या देश कल्याणकारक सार्वजनिक चळवळी झाल्या, त्या सर्व चळवळींना गणपतरावांकडे कोणीही मागणी न करतां, आपण होऊन, ते ज्या मुक्कामीं असतील त्या मुक्कामावरून सबंध एकेका खेळाचें उत्पन्न शेंकड्यांच्या आंकड्यांनीं त्यांनीं धाडिलेलें आहे. इतर कांहीं संस्थाप्रमाणें खर्च 'वजा जातां' हे शब्द त्यांना स्वप्नांतही कधीं ऐकूं आले नाहींत. आपल्या पश्चात् आपला मृत्यूलेख मोठ्या गौरवानें केसरींसारख्या थोर कीर्तीच्या साप्ताहिकांत यावा या अंतिम इच्छेनें प्रेरित होऊन कांहीं गणपतरावांनीं केसरीच्या सर्व फंडांना कधींच मदत केलेली नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्या अभूतपूर्व आणि दिलदार गद्यनाट्याचार्यांच्या वर्तमानसारांतील दीड ओळींत प्रसिद्ध झालेल्या मृत्युवार्तेबद्दल परलोकवासी गणपतरावांचा आत्मा खरोखरच यत्किंचितही दुःखी होणार नाहीं, अशी आमची खात्री आहे. गणपतरावांचा मृत्युलेख

उळकपणें केसरीच्या रकान्यांत प्रमुखस्थानीं न आल्याबद्दल रा. अनंतराव वर्व्यांसारखे ‘ केसरीचीं परंपरा सुटत चालली,’ असें म्हणत असले तरी गणपतरावांचा स्वभाव आम्हांला चांगला माहित असल्यामुळें, व ते आल्पवयापासूनच गीताभक्त असल्यानें स्तुति, निंदा, मान, अपमान, गौरव लाभ वगैरे गोष्टींपासून नेहमींचेच एखाद्या योगी पुरुषाप्रमाणें अलिप्त असत, आणि म्हणूनच त्यांना त्या गोष्टाबद्दलची परलोकांत कवडीचीही किंमत वाटणार नाहीं, हें आम्ही खात्रीनें सांगतों. ‘ मरावें परी कीर्तिरूपें उरावें ’ या श्रीसमर्थोक्तीचे ते दासानुदास असल्यानें, त्यांची ऐतिहासिक कीर्ती केसरीच्या रकान्यांतील मृत्युलेखांत थोडीच गुंतून राहणारी आहे ! केसरीफंड, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, अनाथ-विद्यार्थीगृह, आण्णासाहेब पटवर्धनसमाधी फंड, भारतेतिहाससंशोधक मंडळ, श्रीराम मोफत वाचनालय, सज्जनगड श्रीरामदास समाधी जीर्णो-द्धार वगैरे सारख्या नानाविध संस्थांना त्यांनीं अगदीं निरेक्षपणानें आणि यदृच्छया मदत केली असल्यानें, ते आपल्या शक्त्यनुसार देशसेवेला हातभार लावण्यांतून मुक्त झालेले आहेत. रविचंद्रांचे अस्तोदय हे कांहीं कोणा मानवाच्या इच्छेचीं फळें नाहींत, आणि त्यांचीं वर्णनें जरी कोणी इतिहासकार करायला विसरला, तरी तीं सृष्टीच्या नैसर्गिक इतिहासांतून जशीं कधींच पुसून टाकतां यायची नाहींत, तशीच गोष्ट गणपतरावांच्या उदयास्तांची आहे, हें सर्वांनीं लक्षांत ठेवावें.

‘ केसरी ’ वर्तमानपत्रांत गणपतरावांचा मृत्युलेख कां आला नाहीं ही गोष्ट केसरीकर्त्यांस विचारली असतां, तें त्याचें समाधान-कारक उत्तर कां देऊं शकत नांहींत व त्यानीं त्या बाबतींत मौन कां स्वीकारलें आहे याचें उत्तर देण्यास मी असमर्थ असततांही, मला

कित्येकांनीं समक्ष तर कित्येकांनीं पत्रद्वारें या गोष्टीसंबंधानें खुलास करण्यास विचारलें; परंतु ज्या गोष्टीबद्दल मला कोणच्याही तऱ्हेचें उत्तर देतां येणें शक्यच नव्हतें, त्याबद्दल ' शोध करून कळवितों ' इतकेंच प्रत्येकाला उत्तर देण्यांवांचून गत्यंतर नव्हतें. केसरींत गणपतरावांचा मृत्युलेख कां आला नाहीं याबद्दल मला जी बाह्य चौकशीअंतीं बातमी लागली आहे तिचा येथें थोडक्यांत उल्लेख केला असतां पृच्छकांची शांती होईल असें वाटते. गणपतरावासंबं-धानें केसरीकार श्री. नरसोपंत केळकरांचें कधींही अप्रेम नव्हतें. ते गणपतरावांचे पूर्ण चाहाते होते व ते स्वतः मोठे रसिक आहेत. याबद्दल माझी खात्री आहे. गणपतरावासारख्या गुणी मनुष्याच्या खाजगी वर्तना-बद्दल तिटकाऱ्यानें नरसोपंतांनीं त्यांचा मृत्युलेख छापला नसावा असा आक्षेप घेणारांनीं तसा आक्षेप घेणें सर्वथा व्यर्थ आहे, असें मला वाटतें. नरसोपंत हे गुणग्राही असून कसाही थोर माणूस असला तरी त्याला नैसर्गिक बुगुंसाची बैठक असायचीच, हें तत्व ते कधींही विसर-णारे नसल्यानेंच त्यांनी प्रसिद्ध रहिमतखांसारख्या सर्वव्यसनसंपन्न परंतु अलौकिक गुणवान् गवय्याचा मृत्युलेख लिहिण्यास माघार घेत-लेली नाहीं. श्री. नरसोपंत गणपतरावांचा मृत्युलेख लिहिण्याच्या वेळीं निघणाऱ्या केसरीच्या अंकाच्या वेळीं येथें हजर नव्हते, असें जें म्हणण्यात येतें त्यावरून बाकीच्या पोरवडा आणि अरेरावी क्षुद्र लेखकांच्या तडाक्यांतून ती गोष्ट वर्तमानसारांत तरी आली हें केसरीचें भाग्यच! बाकी नरसोपंत जर त्यावेळीं पुण्यास हजर असते, तर त्यांच्यासारख्या सहृदय व पूर्ण सावध लेखकाकडून तशी गोष्ट कधींच झाली नसती, असें मानण्यास जागा नाहीं असें वाटत नाहीं. त्यांतून खरी गोष्ट ईश्वर जाणें!



स्कंध—एक तर मग !

चंद्रसेन—ऐकतों !

Photo by—R. N. Joshi

हॅम्लेट अं. १ प्र. ५

असें जरी आहे तरी दादाभाई नौरोजींचा मृत्युलेख त्यांच्या मरणापूर्वींच प्रसिद्ध करण्याइतकीच गणपतरावांचा मृत्युलेख न छापणें ही गोष्ट त्यांना लांछनास्पद आहे असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं

कांहीं असलें तरी गणपतराव हे एक अद्वितीय ऐतिहासिक गद्यनटवर्य होऊन गेले ही गोष्ट त्यांच्या शत्रूंनांही नाकारतां येणार नाहीं. थोर पुरुषांची कीर्ति दिगंतरीं गाजत असते. तिला केसरीकारांच्या किंवा इतरांच्या लेखांनीं अथवा शद्बांनीं तिळमात्रही भर पडण्याची अपेक्षा नसते. थोरांचीं चरित्रें लिहिणें हें एक प्रकारें त्यांच्याशीं समागम करणेंच आहे, असें जें म्हणण्यांत येतें तें अगदीं खरें आहे. त्यांचे आचारविचार, त्यांचीं मतें, त्यांची उद्योगशीलता, त्यांची सद्बुद्धी, त्यांची सरलता, त्यांचीं निष्ठा, त्यांचा स्वभाव इत्यादि त्यांच्या संबंधाच्या गोष्टींचें वर्णन करीत असतां, आणि त्यांविषयीं विचार करीत असतां, मन अगदीं तद्रूप होऊन जातें. हा एक प्रकारचा सत्संगसमाधियोगच आहे. सत्संगापासूनच सुविचार सुचतात. यासाठींच थोर पुरुषांच्या चरित्रांचें लेखन, वाचन आणि अवलोकन हें फार उत्तम हितसाधन मानिलेलें आहे.

येथपर्यंतचा हा सामान्य प्रास्ताविक विचार झाला. आतां, प्रस्तुत चरित्राच्या विषयप्रवेशासंबंधानें थोडें विशेष सांगितलें पाहिजे. प्रस्तुत चरित्राचे नायक नाट्याचार्य गणपतराव जोशी हे होत. हे थोर पुरुष आमच्या हिंदुस्तानदेशांतल्या कोणत्याहि उच्च वर्गांतल्या व्यक्तींच्या पंगतींत बसण्याच्या लायकीचे होऊन गेले. एका रसिक शाहिरानें नानाफडनवीसांसंबंधानें जें म्हटलें आहे—

'खूब शर्थीनें राज्य राखिलें येशवंत फडणीस नाना'—त्यांतच 'खूब

शर्थीनें नाट्य राखिलें येशवंत गणपतरावा' इतकाच फरक करून म्हटलें असतां, महाराष्ट्रनाट्यसाम्राज्यांत शोभण्यासारखें आहे. आमच्या आर्यावर्ताच्या नाट्यसृष्टींत पूर्वकालीन महान् विख्यात असे कोणचे नट होऊन गेले, त्यांचा नाटककारांप्रमाणें आज इतिहास उपलब्ध नाहीं व तो यापुढें उपलब्ध होण्याचीं चिन्हेंहि दिसत नाहींत, हें आमच्या रंगभूमीचें दुर्दैव होय! ज्याअर्थीं आमच्यांत अती पुरातन कालापासून नाट्यकला व तद्विषयक अनेक विस्तृत ग्रंथ रचले गेले आहेत, त्याअर्थीं आमच्यांत अनेक उत्कृष्ट नटही होऊन गेले असले पाहिजेत, असें मानण्यास जागा आहे. असो.


महाराष्ट्रांत गेल्या साठ पाऊणशें वर्षांत नाट्यकलेंत ज्या कांहीं नटांनीं आपलें प्राविण्य जनतेला पटविलें, असे शास्त्रसंमत नट फारच विरळा, किंबहुना एका हाताच्या बोटावरही मोजण्याइतके झाले नाहींत, असें स्पष्टपणें म्हणावें लागतें. आमच्या गेल्या पिढींत मात्र हातावरच्या बोटांवर मोजण्याइतके नट होऊन गेले असें आम्हांला स्वानुभवानें बोलायला हरकत वाटत नाहीं. त्या नटांत पहिल्या प्रतीचे कै. शं. आ. पाटकर हे होत व दुसऱ्या दर्जाचे कै. गो. ब. देवल हे होत. या दोन्हीं नटांत जर तेढ आली नसती, तर त्यांच्या आर्योद्धारक नांवाच्या नाटक मंडळीनें नाट्यशास्त्रांत बरेंच प्रावीण्य संपादून उत्तम नांव मिळविलें असतें यांत संशय नाहीं. या दोघांच्या आधींच्या पिढींत जे ज्ञाते नट म्हणून प्रसिध्दीस आले, त्यांतील फक्त रा. नीं. वि. ऊर्फ दादासाहेब छत्रे आणि नामदार गणेश श्रीकृष्ण ऊर्फ दादासाहेब खापर्डे असे दोघेच काय ते सध्यां हयात आहेत. यांच्याच पिढींतले नांव घेण्याजोगे जे ज्ञाते नट म्हणून नांवाजले गेले त्यांत फक्त एकच कै. नारायण गोपाळ ऊ

अण्णासाहेब फाटक हेच खरे नट असलेले व कांहीं बाबतींत आमच्या चरित्रनायकालाही रंगाच्या तालमींत नटवेषांतील हावभाव त्यांनीं करून दाखविलेले आमच्या खास माहितींतलें आहे. आतां आमच्या पिढींत नांवारूपास येऊन गेलेल्या नटांबद्दल जर बोलायचें तर त्यांतही एका हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच जरी नट होऊन गेले आहेत, तरी ते सर्वप्रकारें शास्त्रसंमत आणि सव्यसाची नव्हते, असें म्हणण्यास मात्र हरकत वाटत नाहीं.


पाश्चिमात्य रंगभूमीवर ज्याप्रमाणें आजपर्यंत—ग्यारिक, आयर्व्हिंग, कीन, ट्री, एलेन टेरी वगैरे सुप्रसिद्ध आणि तच्छास्त्रोक्त नट व नट्या होऊन गेल्या, त्यांच्याच तोडीचे नट आमच्या महाराष्ट्ररंगभूमीवर प्रत्येक रसाविर्भावाच्या आपापल्या कामांत फक्त एक गणेश कृष्ण जोशी आणि दुसरे कृष्णाजी महादेव ऊर्फ बाळाभाऊ जोग एवढेच काय ते दोघे आजपर्यंत होऊन गेले असें म्हणायला हरकत नाहीं. सदाशिव गणेश उर्फ बाबल्या प्रधान, गणपतराव भागवत, विनायकराव कवठेकर, गोपाळराव मराठे, माधवराव पाटणकर, बाळकोबा नाटेकर, शंकरराव मुजुमदार आणि दत्तोपंत हल्याळकर हे जरी चांगल्या नटांत नांव घेण्यासारखे नट होऊन गेले, तरी ते सर्वांगपूर्ण नट होते असें म्हणतां यायचें नाहीं. कोणांत कांहीं कोणांत कांहीं न्यूनता ही होतीच. गोपाळराव मराठे व विनायकराव कवठेकर यांच्या-सारखें सभ्य, घरगुती व श्रीमंती नखऱ्याचें सोंग जसें आम्हांला कधींच बघायला सांपडलें नाहीं, व सध्यां जें आमच्या रंगभूमीला छचोरपणाचें वळण एका प्रसिद्ध स्त्रीवेषधारी नटामुळें लागत चाललें आहे, त्यावरून तें असें पुढें कोणालाही बघायला सांपडेल असें वाटत नाहीं. याच सभ्य आणि

कुलीनपणाच्या नटवेषांच्या बाबतींत कै. भाऊराव कोल्हटकर आणि शंकरराव मुजूमदार यांचींही नांवें घेण्याला जरी हरकत नाहीं, तरी पण भाऊराव हे केव्हांही खरे नट या सदरांत येणें शक्य नाहीं. रंगभूमीवर नैसर्गिक पद्धतीचें भाषण करणें त्यांना केव्हांच साधलें नाहीं. ते फक्त आपल्या कंठमाधुर्यानें आपल्या वेषांत प्रेक्षकांना तल्लीन करून त्यांचीं हावभावाची सृष्टी विसरायला लावीत असत. आतां सध्यां हयात असलेल्या शंकरराव मुजुमदारांसंबंधानें बोलायचें, तर ते उत्तम कुळांतल्या सभ्य अशा श्रीमंत स्त्रीला लाजवील अशा तऱ्हेचे उत्तम स्त्रीवेष घेणारे एकांगी नट होते व त्यांना परमेश्वरनिर्मित स्वरूपाचीही उत्तम देणगी होती, इतकें सांगितलें म्हणजे पुरे होईल. सध्यां हयांत असलेल्या नट-वर्गांत, आपल्याला कै० गणपतराव जोशी यांचे चेले म्हणवून घेण्याचा अभिमान बाळगणारे असे फक्त दोनच नट रंगभूमिवर गाजत असलेले

( बाबूराव आठवले )



( नानबा गोखले )



दिसतात. यांपैकीं एकाचें नांव नारायण रामचंद्र उर्फ नानबा गोखले असें असून, दुसऱ्याचें नांव बाबूराव आठवले असें आहे.

बाबूराव आठवले यांनीं सध्यां गणपतरावांची शाहुनगरवासी नाटकमंडळी त्यांच्या पश्चात चालविली असून, ती सध्यां तरी बरी चालली आहे.

असें येथें नमूद करण्यास आनंद वाटतो. नानबा गोखले या गणपतरावांचा छात्र म्हणविणाऱ्या चेल्यानें स्वतःची लोकमान्य नाटकमंडळी या नांवाची संस्था चालविली असून, तीही बरी चालली आहे, असें म्हणायला हरकत नाहीं. गणपतरावांचे शिष्य म्हणविणाऱ्या या दोघांत गणपतरावांच्या अंगचे जरी सर्वच गुण उतरले असल्याचें निदर्शनास येत नसलें तरी दोघांना गणपतरावांप्रमाणें निसर्गाचें पूर्ण पाठबळ नसल्यानें, त्या दोघांची एक मूर्ति करून टाकण्याचें जर कोणाच्या हातचें असतें, तर गणपतरावांच्या पश्चात् त्यांची जागा कांहीं तरी अंशानें खास भरून निघाली असती, असें म्हणायला हरकत नाहीं. कोणच्याही पात्राचा वेष घेतला असतां शोभेल अशी अंगलट व मुखचर्या नानबांच्यापाशीं नाहीं, तर बाबूरावांपाशीं आवाजाची बरीच न्यूनता आहे. थोडक्यांत सांगायचें म्हणजे गोखले यांस जर आठवले यांची अंगलट असती आणि आठवले यांस जर गोखले यांचा अवाज असता, तर सध्यांची महाराष्ट्ररंगभूमी गणपतरावांसारख्या नटाच्या अभावीं अगदींच उघडी पडली नसती.

वर जें एका स्त्रीवेषधारी नटासंबंधानें सध्यांच्या महाराष्ट्रीय रंगभूमीला छचोरपणाचें वळण लागत चाललें आहे असें म्हटलें आहे, तें श्री. नारायण श्रीपाद राजहंस ऊर्फ बालगंधर्व यांच्या संबंधानेंच आम्हीं म्हटलें आहे, व तसें म्हणायला आमच्यापाशीं भरपूर पुरावाही आहे. बालगंधर्व हे खरे आणि अप्रतिम नट असून, सध्यांच्या मराठी संगीत रंगभूमीचे ते एक ललामभूत अवतंस आहेत, ही गोष्ट केव्हांही नाकबूल करतां यायची नाहीं; परंतु ते आपला दर्जा विसरून आपले नटवेष करूं लागले असल्यामुळें, आम्हांला त्यांच्याबद्दल अशा तऱ्हेची

टीका करावी लागते आहे, त्याला इलाज नाहीं. आपण समाजशिक्षक आहोंत, ही जाणीव जर त्यांनीं आपल्या प्रत्येक भिन्न वेषाच्या वेळीं वेषभूषणांत आजपर्यंत पूर्ववत् जागृत ठेवून, आपलें काम वेषाला साजेसें करून दाखवण्याचा आणि समाजाला वळण देण्याचा प्रयत्न सुरू ठेवला असता, तर सध्यां समाजांत जें त्यांचें छचोर अनुकरण होत असलेलें दिसतें आहे, तें खरोखर दिसलें नसतें. आपण समाजशिक्षक आहोंत, आपण जें चित्र रंगभूमीवर दाखवूं त्याचेंच वळण समाजाला लागून, तो नीतिमत्तेंत सभ्याचाररत राहील—हे जे खऱ्या नटाला शोभणारे विचार आणि ही जी त्याची कर्तव्यजागृति, ती बालगंधर्व साफ विसरले असून, समाजाचें उत्तम गुरुत्व आपल्या ठाईं घेण्याच्या ऐवजीं, समाजाला जें वळण देण्याचें त्यांनीं पतकरलेलें दिसलें आहे, तें अगदीं अनुचित आहे. समाजाला भुरळ पाडणारी खोटी आवड उत्पन्न करण्याचें उत्तान श्रृंगारिक स्वरूप नेहमीं धारण करून, नटानें समाजाला विषय-लोलूप करणें हें खऱ्या नटाचें कर्तव्य नसून, शिष्टसंमत अशा वेषानें समाजाला उत्तम वळण लावणें हें नटाचें काम असतें. बाजारांत विक्रीला मांडलेलीं त्यांचीं स्त्रीवेषाचीं चित्रें, जनतेच्या मनावर, आणि त्यांतल्या त्यांत तरुण पिढीच्या मनावर कोणच्या संस्काराचा परिणाम करतात, ही गोष्ट त्यांनीं आजमावली नसल्यानेंच, त्यांचे जे कांहीं छचोर वेषांचे फोटो बहुतेक सर्व तरुणांच्या हातांत असलेले दृष्टीस पडतात; हें कशाचें फळ आहे आणि त्यामुळें समाज कसा बहकत चालला आहे, ह्याकडे जर ते मनःपूर्वक पाहतील आणि अजूनही समाजाची पुरी न बिघडलेली घडी पुनरपि सुधारण्याचा प्रयत्न करतील, तर तें त्यांच्या हातून खास होण्यासारखें आहे असें आमचें मन आम्हांला

ग्वाही देतें आहे. नटाचा फोटो पाहिला असतां, त्याच्याबद्दल वास्तविक पूज्यबुद्धि उत्पन्न व्हायला पाहिजे. पण ती गंधर्वांचा फोटो पाहून किती जणांची होत असेल ? शेंकडा एकाची तरी होते काय ? या बाबतींत राजा रविवर्म्याच्या तसबिरींकडे बालगंधर्वांनीं कधीं पाहिलें आहे काय? रामराज्याभिषेकाच्या चित्रांत श्री. धुरंधरांनीं ज्या कांहीं अक्षम्य चुका केल्या आहेत, तशा चुका रविवर्म्यांच्या एका तरी तसबिरींत दाखवितां येतील काय ? फार कशाला ! त्यांचीं लक्ष्मी व सरस्वती यांचींच चित्रें पाहा ! आणि बालगंधर्वांचें रुक्मिणीचें चित्र पाहा ! लक्ष्मीसरस्वतींच्या चित्रांत सौंदर्यादि स्त्रीजातीला शोभणारें अद्भुत दृश्य जरी अप्रतीमपणें दाखविलें गेलें आहे, तरी गंधर्वांच्या फोटोप्रमाणें तीं चित्रें पाहून पूज्य भावाच्या ठिकाणीं भ्रष्ट मनोवृत्तीची दृष्टी कोणाच्या तरी मनांत उत्पन्न होते काय ? बालगंधर्वांसारख्या जात्या अप्रतिम नटानें आपल्या अंगचें कौशल्य दाखवून समाजाला आपलें सभ्य अनुकरण करायला लावण्याचा पूर्ववत् प्रयत्न केल्यास, त्यांनीं ज्या लुगड्याचा प्रथम पासूनच अंगिकार केला आहे, त्याचें सार्थक होईल या उद्देशानेंच हें आम्ही इतकें स्पष्टपणें लिहिलें आहे, व याबद्दल ते आपल्या मनांत निःपक्षपातीपणाची जागृती ठेवतील अशी आम्हांला आशा आहे.

एकंदरींत काय कीं, हे जे तीन नट सध्यां महाराष्ट्ररंगभूमीवर गणपतराव आणि बाळाभाऊ यांच्या पश्चात् प्रामुख्यानें दिसत आहेत, त्यांचेंच अनुयायित्व इतर नटांनीं स्वीकारल्याचें दिसत असल्यानें त्यांच्याबद्दल विशेष चर्चा करण्याचें कारण नाहीं. हीच या बाबतींत योग्य जागा असल्यानें येथेंच आणखी एक गोष्ट अशी नमूद करून टाकतों कीं, गणपतरावांनीं नाट्यसृष्टींत जशी एकप्रकारची क्रांती करून सोडली,

व त्याचेंच अनुकरण इतर मंडळ्या करूं लागल्या, तद्वतच बालगंधर्व आणि नानबा गोखले यांनींही निरनिराळ्या भिन्नदिशांची नाट्यसृष्टींत क्रांती करायला जी सुरवात केली, त्याचेंच अनुकरण सध्यां महाराष्ट्र रंगभूमीवर हरतऱ्हेनें होत असलेलें दिसतें आहे.

कै० नारायण बापूजी कानिटकर, भागवत, भट वगैरे नाट्यलेखकांनीं पंधरा वीस वर्षांपूर्वीं सामाजिक नाटकें रचून, तीं रंगभूमीवर आणण्याचा जरी प्रयत्न केलेला आहे, तरी तशीं नाटकें जीं तत्कालीन समाजाच्या पचनीं पडलीं नाहींत तीं सध्यांच्या मनूंत समाजाच्या पचनीं पाडण्याचा प्रारंभ जसा लोकमान्य कंपनीनें प्रथम केला, तद्वतच गृहिणींच्या वेषभूषांची गोवेंकरी छचोर पद्धति समाजांत रूढ करण्याची क्रांति बालगंधर्वांनीं प्रथम केली, आणि त्याचेंच अनुकरण होत असलेलें सध्यां जें सर्वत्र दिसतें आहे, त्यामुळें श्री. नरसोपंत केळकरांसारख्यांच्या श्रेष्ठतर अशा कांहीं आधुनिक नाट्यप्रयोगांची कवडी किंमत होऊन, सर्वशास्त्र-प्रवक्तार असे बृहस्पतीनांही जे वंद्य शुक्राचार्य, त्यांच्या आश्रमाला दारूचा गुत्ता बनवणाऱ्या खाडिलकरांच्या नाटकांचें बालगंधर्वांच्या वेषभूषामुळें कौतुक केलें जात आहे. 'जे कांहीं होत असतें तें चांगल्या करतांच होत असतें' अशी जी थोरांनीं एक म्हण करून ठेवली आहे, तिचा उपमर्द न करतां, ठेंच लागल्यानंतरच मनुष्य शाहाणा होतो हें लक्षांत ठेवून, यांतून कोणच्या चांगल्याची निष्पत्ती होणार आहे, तिकडे डोळे लावून बसल्यावांचून सध्यां तरी गत्यंतर नाहीं.

कांहीं असलें आणि कांहीं झालें, तरी आपण जो वेष घेतला, तो तत्कायाप्रवेश असून, ज्या रसाचा आविर्भाव करायचें पत्करिलें, त्या रसांत प्रेक्षकांस तन्मय करून सोडण्याची नाट्यसृष्टींत जर कोणी क्रांति

करून सोडली असेल, तर ती एकट्या गणपतरावांनींच असें म्हणायला मन कचरणें अशक्य आहे. हॅम्लेट नाटकांत म्हटल्याप्रमाणें ‘ नाटकांतील पात्रानें ’ भाषणाला सुरवात केल्या बरोबर आपली मनोवृत्ती अशी पालटून टाकावी कीं, अश्रु म्हटलें कीं, अश्रु, ग्लानी म्हटली कीं ग्लानी, गहिंवर म्हटला कीं गहिंवर, सारांश अर्थांतराप्रमाणें कपाळ, डोळे, भिंवया, तोंड आणि आवाज हीं त्याला वाटेल तशीं करावीं ! ’ याचप्रमाणें गणपतरावांनीं जें आपलें नाट्यकौशल्य दाखविलें, त्यामुळेंच त्यांचीं विलक्षण कीर्ति त्यांच्या मागें ‘ मरावें परी कीर्ति रूपें उरावें ’ या समर्थोक्तीप्रमाणें महाराष्ट्रीय नाट्यसृष्टींत अजरामर राहणार आहे. गणपतरावांचा आवाज एकाही पात्रापाशीं सध्यां असलेला दिसत नाहीं. ती त्यांना भाऊराव कोल्हटकरांप्रमाणें ईश्वरी प्रसादाची पूर्वजन्मार्जित देणगी होती असेंच म्हणावें लागतें. गणपतरावांनीं बुकिश अर्थात गद्य नाटकांच्या सृष्टींत जी आत्यंत चित्ताकर्षक क्रांति घडवून आंणिली, तिच्याचमुळें महाराष्ट्रनाटकमंडळी-प्रमाणें—सामाजिक, चित्ताकर्षक वगैरे जरी गद्यनाट्यमंडळ्या निघाल्या व निघत आहेत, तरी गणपतरावांच्या तोडीचा एकही नट त्यांत दिसत नाहीं, याचें कारण दुसरें तिसरें कांहीं नसून, एकासारखा एकच तेवढा प्राणी जन्माला घालण्याची जी निसर्गाची पद्धति, तिलाच अनुसरून सुभाषितकारानीं जें—

( शिखरिणी. )

करी शीलें बाला चरणरजसें यत्कुलज तो ।
असा सूर्य क्षोणीवरिल गिरिखंडां तुडवितो ॥

प्रतीवारीं नेमें परि युवति नाहींच घडली ।
असा जन्मा येतो पुरुष अवघा एकचि कुळीं ॥

असें म्हटलें आहे, तेंच योग्य आहे. ज्या कुळांत गणपतरावांनीं जन्म घेतला तें कुळ त्यांनीं खचीत आपल्या गुणसुगंधानें पावन करून सोडलें. गणपतरावांची आवाजी संगीताप्रमाणेंच गद्य भाषणांतही हवी-तशी लवचिकपणानें प्रसंगानुरूप रसाला योग्य अशी मोठ्या चमत्कृतीनें फिरत असल्यानेंच—

( मंदाक्रांता )

वाणी त्यांची तशिच सरसा रंजयित्री म्हणोनी ।
श्रोत्यांठायीं विनति न चले लेशही सावधानीं ॥
सांजीं फुल्ला मधुयुत अशा नूत्नशा मल्लिकांनां
कांहीं नोहे कृतिस करण्या सक्त त्या षट्पदांनां ॥

ही सुभाषितोक्ति त्यांच्या ठिकाणीं अगदीं योग्यप्रकारें लागू पडते. असो.

वसंतऋतूच्या प्रारंभींच्या वर्णनश्रवणानें रसिकांच्या अंतःकरणांनां मोठा आल्हाद होतो; याचें कारण इतकेंच कीं, त्यांत सृष्टीच्या रमणीय अशा अंगाचें पुनरुज्जीवन ज्ञानदृष्टीला गोचर होतें. याच कारणानें थोरांच्या कुळांच्या अभ्युदयाचें कथन त्यांना अत्यंत चित्तवेधक वाटतें. हीच गोष्ट गणपतराव जोशी यांच्या चरित्राची कांहीं अंशानें आहे असें म्हणायला हरकत नाहीं. कोणच्याही कुळांत एकादाच कोणी तरी दिव्य पुरुष निर्माण होतो आणि त्यामुळें त्याचें कुल उदयाला येतें. हाच दृष्टांत, रघुकुलावतंस सूर्यकुलोत्पन्न श्रीरामचंद्रासंबंधानें जो दगडाची स्त्री बनविल्या

बद्दलच्या सुभाषितांत मागें दिला आहे, तो वाचकांच्या लक्षांत असेलच.

राजापासून रंकापर्यंत मनुष्यें तेवढीं सारीं सारखींच असतात. त्यांच्या देहव्यवहारांत कांहीं एक अंतर नसतें. खाणेंपिणें, आळसनिद्रा, सुख-दुःख, भयखेद, आनंदशोक, वगैरे भावना त्यांच्या ठिकाणीं बहुतेक सारख्याच असतात. प्रथमारंभीं त्यासंबंधानें त्यांत कांहीं एक भेद नसतो; परंतु पुढें जो कांहीं श्रेष्ठत्वाचा आणि कनिष्ठत्वाचा भेद पडतो तो त्यांच्या बुद्धिसामर्थ्यावरून आणि करणीवरून पडतो. तो किती पडतो हें दाखविण्यासाठीं कबीर म्हणतात—

पशूकी होत पन्हय्या, नरका कच्छु नहिं होत ।
जब नर करणी करे तो नरका नारायण होत ॥

याचीं उदाहरणें इतिहासांत जरी आढळतात, तरी तीं फार थोडीं असतात. त्यांतलेंच आमच्या गणपतरावजींचें एक उदाहरण आहे.

कोंकणांत रत्नागिरी जिल्ह्यांतल्या चिपळूण तालुक्यांत राजापुर म्हणून जें एक प्रसिद्ध गांव आहे, तेंच गणपतरावांचें मूळ जन्मग्राम होय. गणपतरावांचे तीर्थरूप कृष्णाजीपंत हे कोंकणस्थ ऋग्वेदी वत्सगोत्री ब्राह्मण होते. त्यांच्या वडिलांच्या हयातींतच त्यांच्या घराण्यांतली खोती जाऊन, ते जरी गरीबींत दिवस कंठीत होते, तरी वडिलार्जित थोड्याशा अवशेष पुंजीवर त्यांनीं आपला संसार बालबोध आणि सभ्य घराण्याला शोभेल असाच चालविला होता. त्यांच्या वृद्ध मातोश्री, त्यांची पत्नी व ते स्वतः एवढेंच काय तें त्यांचें, ते राजापुरास येऊन राहिले तेव्हांचें कुटुंब होतें. त्यांच्या कुटुंबाचें नांव राधाबाई असें होतें. त्यांच्या पोटीं होणारी संतती


अल्पायु निपजे, म्हणून त्या आपल्या सास्वेच्या उपदेशाप्रमाणें रोज अश्वत्थसेवा करीत असत. याप्रमाणें त्यांनीं बारा वर्षे अश्वत्थसेवा केली, परंतु त्यांना संततीसौख्य न लाभतांच अखेरीस ईश्वरी संकेताप्रमाणें इहलोकीं देह ठेवून दिवंगत व्हावें लागलें. त्यानंतर कृष्णाजीपंतांचें दुसरें लग्न झालें. त्यांच्या द्वितीय पत्नीचें नांव त्यांच्या मातोश्रीनीं आनंदी असें ठेविलें. राजापुरापासून जवळच असलेल्या अष्ट विनायकांतील पुळ्याच्या गणपतीस दरसाल आनंदीबाईस पुत्रप्राप्त्यर्थ पायां पडण्यास नेण्याचा कृष्णाजीपंतांच्या मातेनें परिपाठ सुरू केला, व सुरुवातीला गणपतीलाच नातवंड जगविण्याचा नवसही केला. पहिलें नातवंड जगल्यास आणि तो मुलगा असल्यास त्याची मुंज तुझ्या दारीं येऊन करूं असाही त्यांनीं दुसऱ्या वर्षीच्या दर्शनप्रसंगीं नवस केला. श्रीगणपतीच्या कृपेनें कृष्णाजीपंतांच्या पत्नि आनंदीबाई योग्य काळीं गरोदर झाल्या व त्यांच्या पोटीं पूर्ण मास जाऊन प्रसवलेलें पुत्ररत्न पाहातांच आजीबाईचा आनंद गगनात मावेनासा झाला. गणपती आपल्या नवसास पावल्यानेंच पूर्णमास होऊन सूनबाईच्या पोटीं आलेल्या आपल्या नातवंडाचें मुख आपल्याला पाहायला सांपडलें अशी आजीबाईची पूर्ण खात्री झाली, व त्याच भावनेनें त्या वृद्धेनें आपल्या नातवाचें नांव गणपति असें ठेविलें. हाच त्या वृद्धेचा नवससायासांनीं झालेला नातू गणपति, आमचें चरित्र-नायक गणपतराव जोशी हे होत. बारश्याला नातवाचें नांव ठेवून आनंदमग्न झालेल्या आजीबाईनीं आपली मनीषा तृप्त झाली असें सांगून दुसऱ्याच दिवशीं आपली इहलोकची यात्रा संपविली. गणपतरावांचा जन्म राजापुरमुक्कामीं त्यांच्या चुलत्याच्या ज्या घरांत झाला, त्यांचें हें

छायाचित्र आहे. या घरांत गणपतराव शके १७८९ श्रावण शुद्ध १५



गणपतरावांचें राजापूर येथील जन्मगृह

सह पौर्णिमा म्हणजे बुधवार ता. १५ ऑगष्ट सन १८६७ सालीं सूर्योदयाच्या जरा आधीं जन्माला आले. त्यांनीं आपली निरयण मताची जी जन्मलग्नकुंडली स्वहस्तें मला इ. स. १९०३ सालीं दिली होती ती येणेंप्रमाणें:—



# अंक दुसरा

## बाळपण आणि नाट्यप्रवेश.

इतिहासलेखनांत तल्लिन झालेल्या विद्वज्जनांस आनंद होण्यास ज्या अनेक प्रकारच्या गोष्टी कारणीभूत होत असतात, त्या सर्वांत अत्यंत सुखप्रद गोष्ट म्हटली म्हणजे थोर माणसांच्या उन्नतीची कथा होय. तशी कथा या अंकांत गोंवण्याचा विचार केला आहे.

गणपतरावांच्या सगळ्या अभ्युदयाचा आणि कर्तृत्वाचा बहुतेक सगळा संबंध नाट्यसृष्टीशींच आहे, आणि त्या नाट्यसृष्टीची कथाही अत्यंत रमणीय आणि संस्मरणीय आहे. यास्तव यापुढें गणपतरावांच्या बालपणापासून त्यांच्या नाट्यसृष्टींतल्या अभ्युदयाच्या अरुणप्रकाशा-पर्यंत तिचें थोडक्यांत वर्णन करायला सुरुवात करितों.

मोठ्या नवससायासानें झालेल्या आपल्या द्वितीय पत्नीच्या गणपति नांवाच्या मुलाला कृष्णाजीपंत हे जीव कीं प्राण करूं लागले. गणपति हा बांधेसूत मुलगा असल्यानें त्याला रांगतां खेळतांना पाहून सर्व लोकांना मोठें कौतुक वाटत असे. त्याला दृष्ट पडूं नये म्हणून त्याच्या मातोश्री आनंदीबाई ह्यांनीं कोंकणी रिवाजाप्रमाणें मुलाच्या गळ्यांत दृष्टमणी बांधणें, दोन्ही मनगटांत डोंगळी पोतीचे सर अडकवणें, रोज संध्याकाळीं दृष्ट काढणें वगैरे गोष्टींत कधींच आळस आणि विसराळू-पणा केला नाहीं. शेजारी पाजारी गणूचें सुस्वरूप पाहून मोठ्या प्रेमानें त्याचें कौतुक करूं लागले. तो ज्याला त्याला उचलून घ्यावासा वाटे. तो तीन वर्षांचा झाला तेव्हां त्याच्या पाठीवर जो त्याला भाऊ

झाला त्याचें नांव विष्णु असें जरी ठेवण्यांत आलें होतें, तरी तो गणू-पेक्षांही देखणा आणि राजबिंडा असल्यानें त्याचें राजा असें लाडकें नांव ठेवण्यांत आलें होतें. तो मुलगा अल्पायुषी म्हणजे आपल्या वयाच्या सातव्या वर्षीं वारला. त्या आपल्या भावाच्या बाबतींतली आमचे गणपतराव जी एक मोठी सद्गदित अंतःकरणानें कधीं कधीं मातृप्रेमाचा प्रश्न निघाला असतां गोष्ट सांगत, त्या वेळीं बंधुप्रेमानें त्यांचे डोळे भरून येत. गणपतरावांच्या मातेनें त्या त्यांच्या राजा नांवाच्या धाकट्या भावाला एके दिवशीं एका कथलाच्या वाटींत खायला पोहे दिले असतां व तो ते खात बसला असतां त्याच्यापुढें एक कावळा येऊन बसला. त्या कावळ्यापुढें तो आपल्या चिमुकल्या हातानें मूठभर पोहे टाकी व आपल्या तोंडांतही एक मूठ टाकी. असें होतां होतां समोरचा खादाड कावळा याच्या तोंडांतले पोहे संपायच्या आधींच त्याच्या पुढचे टाकलेले पोहे तो झट्कन् मटकाऊन टाकी व पुन्हां कावकाव करून ओरडे. ही गम्मत गणूबाळ दूर उभें राहून आडून पहात होता. अखेरीस राजाच्या वाटींत जेव्हां फारच थोडे पोहे राहिलेले राजाच्या लक्षांत आले तेव्हां तो त्या कावळ्याला काव काव करतानां पाहून जणूं काय त्याला आपलें बोलणें समजतेंच आहे अशा भावनेनें व निष्कपटभावानें त्याला म्हणाला, "हें रे काय कावळ्या! आतां मला नकोत कायरे हे थोडे?" इतकें बोलूनही कावळा जेव्हां कावकाव करायचें थांबवीना तेव्हां राजानें सारेच पोहे कावळ्याच्या पुढें टाकले व आपलें बालपणचें रडण्याचें शस्त्र उपसलें. असो.

गणपतरावांचे वडील कृष्णाजीपंत हे मूळचे आडिवरें या गांवचे होत. त्यांचे वडील ते दोन वर्षांचे असतांच निवर्तले होते. त्यांच्या

घराण्यांतली खोती आधींच गेली होती. आडिवऱ्याहून त्यांच्या चुलत्यानें त्यांना बाळपणींच राजापुरास नेलें. ते वयांत आलें त्यावेळीं त्यांच्या चुलत्यानें आपला देह ठेवला. त्यांचा चुलता राजापुरांतल्या ज्या एका गुजराकडे नोकर होता, त्याच गुजराकडे कृष्णाजीपंत आपल्या चुलत्याच्या जागीं काम करून संसार चालवूं लागले. कृष्णाजीपंत हे स्वभावानें फार गरीब आणि मोठे सत्वस्थ होते. त्यांना आनंदीबाईच्या पोटीं एकंदर पांच आपत्यें झालीं. त्यापैकीं त्यांच्या पश्चात् आपल्या प्रौढावस्थेपर्यंत फक्त एक मुलगा आणि तीन मुली अशीं चारच जगलीं. त्या तीन मुलींपैकीं सध्यां जी शेवटची मुलगी हयात आहे, ती निपुत्रिक अशा वैधव्या-वस्थेंत असून आपल्या रंगु नांवाच्या भाचीजवळ, म्हणजे आमच्या चरित्रनायक गणपतरावांच्या मुलीजवळ आपल्या सर्वस्वासह तिचा सांभाळ करीत काळ कंठीत आहे. तिचें नांव अंबूताई असें आहे. गणपतरावांची मुलगी रंगु ही विवाहिता असून, गणपतरावांच्या देखत तिला दोन मुलगेही झालेले गणपतरावांनीं पाहिले. आपल्या त्या दोन्ही नातवंडांचीं नांवें गणपतरावांनीं जरी मोठ्या प्रेमानें राम आणि लक्ष्मण अशीं ठेविलीं होतीं, तरी धाकट्याला ते राजा या आपल्या भावाच्या स्मृतिकर प्रेमळ नांवानें संबोधित असत. हा त्यांचा नातू त्यांच्या पश्चात् नुकताच गेल्या ऑगष्ट महिन्यांत मुंबईस गणपत-रावांचा मृत्यु ज्या जागीं झाला, त्याच जागीं वारला. गणपतरावांचे जामात रा. माधवराव बापट हे तरुण असून चांगले सुविद्य आहेत. त्यांना पोष्ट खात्यांत मुंबईस शंभर रुपयांची नौकरी आहे.

गणपतरावांच्या वयास सात वर्षें संपून आठवें वर्ष लागलें त्या वेळीं कृष्णाजीपंत त्यांच्या मुंजीची तयारी करूं लागले. गणपतरावांची



चंद्रसेन—बकऱ्याच्या काळजापेक्षां देखील माझें काळीज भेकड, अं ?

Photo by—R. N. Joshi　　　　　　　　　　　　हॅम्लेट. अं २ प्र. २

मुंज पुळ्याच्या गणपतीच्या चरणाजवळ करण्याचा त्यांच्या आजीनें जो नवस केला होता, याची कृष्णाजीपंताना पुरी आठवण होती. कृष्णाजीपंतांचा संसार वाढत होता, पण त्या संसाराचें पोषण करण्याचें साधन मात्र उत्तरोतर कमी होत चाललें होतें. अशा प्रसंगीं कृष्णाजीपंतांच्या चुलत्याचा मुलगा, म्हणजे ज्या त्यांच्या चुलत्यानें त्यांचें बालपणापासून संगोपन केलें होतें, त्यांचा मुलगा वयांत आला होता, व तो पंतांच्या वाढत्या संसाराच्या खर्चाच्या बाबतींत कुरकूर करूं लागला होता. गुजराच्या घरची कारकुनाची नोकरी आपल्या बापाची होती व ती आपल्यालाच मिळाली पाहिजे असें जेव्हां तो म्हणूं लागला, तेव्हा कृष्णाजीपंतांनीं मोठ्या संतोषानें त्याला त्या नौकरीवर आपल्या जागीं रुजू करण्यास गुजराला सांगितलें व त्यानेंही तें ऐकलें. याप्रमाणें दरमहा घरांत प्रपंचसाह्यार्थ येणारे अकरा रुपयेही बंद झाले. अशा प्रसंगीं आपल्या गणूची मुंज आपल्या मातेच्या नवसाप्रमाणें कशी होणार, या गोष्टीची फिकीर कृष्णाजीपंतांना लागली. कृष्णाजीपंतांनीं जी कांहीं गरीबींतही आपल्याजवळ शेंपन्नासांची पुंजी मोठ्या काटकसरीनें केली होती, तीही यावेळीं संपून गेली होती.

कोंकणांत भाऊबंदकी कोणच्या तऱ्हेची असते, याबद्दलची माहिती सर्वप्रसिद्ध असल्यानें तिचें यथासांग वर्णन जरी येथें देण्याचें कारण नाहीं, तरी 'मी खाणार नाहीं आणि तुलाहि जेवूं देणार नाहीं, अखेरीस दोघेही भिक्षा मागूं.' अशा प्रकारचा त्या लोकांचा स्वभाव असल्यानें, म्हणजे ते लोक अत्यंत अधीऱ्या स्वभावाचे मोठे कज्जेदलाल, भारी भांडखोर आणि इंग्रज लोकांप्रमाणें कल्पनातीत असंतुष्ट असल्यानेंच आजपर्यंतच्या

Full well the busy whisper, circling round,
Yet he was kind, or if severe in aught,
The love he bore to learning was in fault.
The village all declared how much he knew,
'T was certain he could write and cipher too;
Lands he could measure, terms and tides pressage,
And even the story ran that he could guage.
In arguing too, the person owed his skill,
For e'en though vanquished, he could argue still;
While words of learned length and thundering sound
Amased the gazing rustic ranged round,
And still they gazed, and still the wonder grew
That one small head should carry all he knew.

हें वरील वर्णन आमच्या लहानग्या गणूच्या 'ओनामा' पंतोजीला अगदीं तंतोतंत लागू पडत असे. तो आपल्या काळीं आपल्या गांवांत महान् विद्वान म्हणवला जात असे. त्याचा आवाज फारच खणखणित होता. बाळबोध अगर मोडी वाचन, त्याला कोणी मिळमिळीत वाचलेलें आवडत नसें. खणखणित आणि आपण बोलतों तसें विद्यार्थ्यानें वाचलें असतां, त्याची तब्येत फारच खूष होई व तो लगेच चार मनुका, तसें वाचणाऱ्या आपल्या विद्यार्थ्याला बक्षीस देई. साधे तोंडचे हिशेब, तीसपर्यंत पाढे, बालबोधमोडी वाचन, आकरकी एकोत्रीपर्यंत उजळणी आणि त्रैराशिक पंचराशिकांपर्यंतचीं गणीतांचीं उदाहरणें करणें, इतकीच विद्या जरी त्याच्या शाळेंत तो शिकवीत असे, आणि त्याच्या पुढची विद्या शिकविण्याची जरी त्याची लायकी नसे, तरी तो त्या ठिकाणच्या गांवकऱ्यांकडून मोठा

विद्वान् असा मानला जात असे. गांवांतील देवळांत तो रोज रात्रीं एक पुरें झालें कीं दुसरें अशा अनुक्रमानें बारा महिनें पुराण वाचीत असे, व भाविक गांवकरी तें प्रेमानें ऐकायला जात असत. श्री समर्थ रामदासांची बखर, पांडवप्रताप, रामविजय, हरिविजय आणि भक्तलीलामृत या पांच पुराणांच्या बाहेर जरी त्याचें पुराण कधींच गेलें नाहीं, तरी तो मधून मधून हरिदासी नकला सांगून मोठा रंग आणीत असे, व केव्हां केव्हां स्वरचित अशाही कोटीबाज गोष्टी सांगून गांवकऱ्यांकडून वाहवा मिळवीत असे. पुराणांतील वीरश्रीचे प्रसंग ते पंतोजीबुवा फारच बहारीचे, म्हणजे एखाद्या अप्रतिम नटाप्रमाणें श्रोत्यांच्या हृदयांत स्फूर्ति उत्पन्न करून त्यांचीं शरीरें रोमांचित करून टाकण्यासारखे वठवीत.

बाल गणू या प्रकारच्या गोष्टी आपल्या पंतोजीप्रमाणें अल्पवयांतच म्हणजे आपल्या वयाच्या सातव्या आठव्या वर्षींच हुबेहुब वठवून गांवकऱ्यांना आनंदमग्न करूं लागला. गोविंदरावांना ही बातमी समजतांच ते त्याच्याकडून ग्रंथ वाचवून घेऊं लागले. रोजचा ठराविक भाग वाचून होतांच, ते गणूकडून वाचलेल्या भागाचें तात्पर्य त्याच्या भाषेंत वदवून घेत असत, व गणूहि मुद्दा न सोडतां आपल्या कोमल अवाजांत ज्या त्या रसाला योग्य असें वाचलेल्या गोष्टीचें तात्पर्य आपल्या पंतोजीला न अडखळतां बिनचूक सांगे, असें अद्यापीहीं त्या वेळची जी मंडळी जिवंत आहे ती मोठ्या कौतुकानें सांगतानां आम्हीं ऐकलें आहे. निरनिराळ्या चालींवर खड्या सुरांत रामदासी मनाचे श्लोक म्हणण्यांत रोडेमास्तरांच्या शिकवणीनें गणूनें जसा पहिला नंबर पटकावला, तसेंच त्याला जें पुराणांतील रसाविर्भावाचें

शिक्षण बालपणीं मिळालें, त्याचाच त्याला पुढें नाट्यकलेंत त्याच्या प्रौढ वयांत फार उपयोग होऊन तो पहिल्या प्रतीचा नट बनला.

तैलबुद्धीचा गणू याप्रमाणें आपल्या वयाच्या आठव्या वर्षीच शिंदे मास्तरांचा पट्ट छात्र बनला व त्याचें त्याच वर्षीं त्यांच्या शाळेंतलें अध्ययन पुरें झालें. गणूला आठवें वर्ष लागलें होतें, व त्याचे वडील पूर्वींच्या पिढींतल्या माणसांप्रमाणें पूर्ण श्रद्धाळु व धार्मिक असल्यानें त्याच्या व्रतबंधाचा विचार करूं लागले. गरीबींत जरी ब्राह्मणाच्या मुलाची मुंज करायची म्हटलें, तरी त्यावेळच्या सुकाळाच्या मानानें व गृहस्थि लौकिकाला शोभेल असें कार्य करण्यास कमींत कमी पन्नास रुपये खर्च लागणारच होता. त्यांतून गणूच्या आजीनें केलेल्या पूर्व नवसाला अनुसरून, मुलाचें मौंजीबंधन, तो ज्याच्या कृपेनें झाला त्या पुळ्याच्या गणपतीच्या पायांपाशीं व्हायचें होतें. कृष्णाजीपंत मोठ्या फिकीरींत पडले. जवळ कांहींच त्राण उरलेला नव्हता. मातेच्या नवसाचें कर्ज तर फेडलेंच पाहिजे होतें. मुलाचें वयहि व्रतबंधाला योग्य झालेलें टळलें तर दुर्लौकिक होणार. कसें करावें आणि काय करावें, अशा चमत्कारिक पेंचांत कृष्णाजीपंत सांपडले गेले. परंतु 'आलें देवाजीच्या मना, तेथें कोणाचें चालेना' या म्हणीप्रमाणें कर्मधर्मसंयोगानें म्हणा अथवा परमेश्वरी संकेतानें म्हणा, ज्या गुजराकडे पूर्वीं कृष्णाजीपंत आपल्या चुलत्याच्या जागीं वही लिहून कुटुंबपोषण करीत असत, व ज्या जागीं त्यांचा चुलत भाऊ सध्यां काम करूं लागला होता, त्याच्याकडून एके दिवशीं सकाळीं उजाडतांच अचानकपणें बोलावणें आलें. त्या गुजराचें देण्याघेण्याच्या व्यवहारांतलें मोठ्या जोखमीचें कोर्टांतलें एक काम होतें, व त्यांत त्याला कृष्णाजीपंतांच्या मदतीची

फार जरूर होती. कृष्णाजीपंत बोलावण्याप्रमाणें गेले व त्यांनीं त्याचें काम बिनबोभाटपणें पार पाडलें. त्या कामांत "बक्षीशीबद्दल काय देऊं?" म्हणून गुजरानें प्रश्न केला तेव्हां "गणूची मुंज पार पाडा म्हणजे झालें" इतकेंच कृष्णाजीपंतांनीं त्याला उत्तर दिलें. त्यानें लगेच रोकड पन्नास रुपये कृष्णाजीपंतांच्या हवालीं करून, ब्राह्मणसंतर्पणाला लागतील तेवढे तांदुळ पुरविण्याचें अभिवचन दिलें. गणपतीच्या कृपेचे अभार मानीत पंत घरीं आले. संकटविनाशक चिंतामणीनेंच आपला नवस फेडून घेण्याचें मनांत आणिलें आहे, तेव्हां तो आतां सर्व कार्य निर्विघ्नपणें पार पाडल्यावांचून राहणार नाहीं, अशी पंतांनीं आपल्या मनाशीं खूणगांठ बांधली व तें कार्य करण्याच्या उद्योगाला लागले.

आमच्यामध्यें जी एक 'वैरी चिंतित नाहीं तें मन चिंततें' अशी म्हण आहे, ती आतां पंतांच्या प्रत्ययाला येण्याची वेळ येऊन ठेपली. त्यांच्या चुलत भावाची छाती, त्यांच्याशीं समोर येऊन भाऊबंदकीचा तंटा उपस्थित करण्याची नव्हती आणि म्हणूनच तो आंतून भारी धुसपुस करीत असे. त्याच्या त्या धुसपुशीनें याच वेळीं पेट घेतली. त्यानें पंतांच्या घेणेदारांना, पंतांना गुजराकडून पन्नास रुपये मिळाल्याची बातमी देऊन उठविलें आणि पंतांवर फिर्यादी करण्यास उद्युक्त केलें. ही गोष्ट पंतांना समजल्यावर, त्यांनी आपण त्यावेळीं कसें वागायचें याचा दृढ निश्चय केला, व सावकाराच्या भीतीला त्यांनीं आपल्या हृदयांतून पार पिटाळून लाविली. गणूची मुंज तडीस नेण्याच्या प्रबल मनोविकारानें पंतांच्या मनांत ठाणें दिलें असल्यानें, त्यांनीं त्यावेळीं आपल्या शेंदोनशें रुपयांच्या घेणेकऱ्या सावकारांस दाद दिली नाहीं. शके १७९७ च्या फाल्गुन मासांत म्हणजे इ. स. १८७६ च्या मार्च महिन्यांत पंतांवर आलेला

हा प्रसंग त्यांनीं मोठ्या धैर्यानें पार पाडून व गांवांत किंवा स्वतःच्या घरांतील कुटुंबांतही आपल्या मनांतला उद्देश कोणच्याही प्रकारें कळूं न देतां, मनांत ठरविलेल्या तिथीवर मुंज करण्यासाठीं शके १७९८ ची वर्ष प्रतिपदा राजापुरास करून गुपचुपपणें एक्या रात्रीं आपल्या कुटुंबाला बैलगाड्यांत घालून पंत पुळ्याच्या गणपतीच्या दर्शनाला निघून गेले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ही बातमी गांवांत फुटली व पंत आपल्यास फसवून पळून गेले, अशा सबबीवर त्यांच्या दोघांतिघां सावकारांनीं फिर्यादीकरितां कोर्टाचा रस्ता सुधारला. ज्या गुजरानें पंतांना पन्नास रुपये दिले होते, त्यानें त्या सावकारांच्या देण्याची परस्परच हमी घेतली व त्यांना फिर्यादी करण्यापासून परांङ्मुख केलें. पुळें मुक्कामीं पंत सहकुटुंब जाऊन पोंचतांच मागाहून गुजरानें तांदुळाच्या गोण्या रवाना केल्या. मुंज यथासांग पार पडली व पंत परत राजापुरास आले.

पंत राजापुरास परत आल्यावर, त्यांच्या तिघी मुलींपैकीं थोरली मुलगी एकाएकीं वारली. तिचे दिवस झाल्यावर गुजरानें कृष्णाजीपंतांची गांठ घेऊन, त्यांच्या सावकारांची दोनशें रुपयांची हमी घेतली असल्याचें त्यांस सांगितलें. त्याचे दोनशें रुपये पंतांनीं नौकरी करून अगर अन्य मार्गानें बिनव्याजी जसजसे हातीं येतील तसतसे फेडावे असें ठरलें. कृष्णाजीपंत महत् संकटांतून पार पडले, व ही सारी गणपतीची कृपा असें समजून, गांवीं आलेल्या गंगेची कावड श्रीधोपेश्वराला नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें घालायला जाण्याची त्यांनीं तयारी केली.

राजापुरास बहुतेक एक वर्षाआड गंगा येते हें सर्वविश्रुतच आहे. कृष्णाजीपंतांची वहिवाट, गंगा आल्यावर तिची कावड श्रीधोपेश्वराला नेऊन घालायची अशी जी आजवर चालत आली होती, त्याला श्री

चोविसावें वर्ष होतें. म्हणजे ही त्यांची चोविसावी कावड होती असें म्हणायला हरकत नाहीं. त्यांच्या आयुष्यांत त्यांनीं श्रीधोपेश्वराला गंगेच्या एकंदर चोवीस वर्षे कावडी घातल्या व ही इ. स. १८७६ सालची त्यांची अखेरचीज कावड होती. कारण, कावड घालून आल्यावर, त्यांनीं जें अंथरूण धरलें, तें पुन्हां सोडलें नाहीं. विषमज्वराच्या दोषी तापानें त्यांचें देहावसान झालें, व त्यांचें कुटुंब उघडें पडलें.

ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा ।
ओम भवति या पक्षा । रक्षिलें पाहिजे ॥

या श्रीसमर्थोक्तिप्रमाणें, मुंज झाल्याबरोबर गणूच्या हातांत भिक्षेची झोळी आली. कुटुंबपोषणाचा भार त्या अल्पवयी बालकावर येऊन पडला. मातोश्री, पाठचा एक भाऊ आणि त्याच्याहून धाकट्या दोन बहिणी अशा चौघांचें पोट भरेल इतकी मधुकरी अथवा कोरान्न मागून आणिल्यावांचून आतां गणूला गत्यंतरच राहिलें नव्हतें. श्रीसमर्थांचे रोडे मास्तरांनीं शिकविलेले मनाचे श्लोक निरानिराळ्या चालींवर आणि खड्या आवाजांत गणू गांवांत म्हणत सणावारांच्या दिवशीं कोरान्नाची भिक्षा मागत हिंडूं लागला म्हणजे, श्रीसमर्थच बालब्रह्मचारीवेषानें भिक्षा मागायला आले आहेत असें भिक्षा घालणारांना वाटे.

रोज सकाळीं लवकर उठावें, शाळेंत जावें, शाळा सुटल्यावर घरीं येऊन स्नान करावें, देवपूजादि गृहकृत्यें उरकून मधुकरीला जावें, मधुकरी आणून पाठचीं भावंडें आणि मातोश्री यांच्यासह जेवावें, दुपारीं शाळेंत जावें आणि रात्रीं रोडे मास्तरांकडे देवळांत पोथी वाचायला जावें, असा गणूच्या नित्याच्या वागणुकीचा जो परिपाठ सुरू झाला होता, तो रामभाऊ कोल्हेकरांची नाटकमंडळी राजापुरांत येईपर्यंत

म्हणजे गणूचे वडील कृष्णाजीपंत वारल्यावर अदमासें दोनअडींच वर्षे अव्याहत चालला होता. वर सांगितलेली नाटकमंडळी राजापुरीं आल्यानंतर गणूच्या रोजच्या रात्रींच्या व्यवहारपद्धतींत फरक पडूं लागला-शिंदे मास्तरांकडे पोथी वाचायला म्हणून तो जो रोज घरून आईचा निरोप घेऊन निघे, तो त्या नाटकमंडळींत जाऊन नाटकाच्या तालमींत सामील होई. रामभाऊंच्या कानमंत्राप्रमाणें गणूचा हा क्रम अदमासें पंधरा दिवस बिनबोभाट पार पडला.

तो काळ सध्यांच्याहून फार भिन्न होता. वर्षानुवर्ष नाटकाचा धंदा करणारीं माणसें त्यावेळीं कोकणांत नव्हतींच असें म्हटल्यास हरकत नाहीं. त्यावेळीं कोंकणांत नाटकी धंदा फारसा लोकादराला पात्र झालेला नसल्यानें वर्षांतून दोनचार महिने कांहीं मंडळी जमून आपापल्या गांवांच्या आसपासच्या गांवांतून असणाऱ्या देवळांतून सरकपडद्यावर नाट्यप्रयोग करून आपला शौक पुरा करून घेत असे. अशा त्यावेळीं शिंदे मास्तरांच्या सांगण्यावरून गांवांतल्या एका उत्सवप्रसंगीं गणूनें वेणीसंहारनाटकांतल्या अश्वत्थाम्याचें वीररसप्रचुर असें जें सोंग मोठ्या धिटाईनें आणि उत्तम नटाला शोभेल असें करून दाखविलें, त्यामुळें त्याचा त्या कामाबद्दल आसपासच्या गांवांतून तेव्हांच लौकिक पसरला. हाच त्याचा लौकिक पुढें त्याला नाटकी बनविण्यास मूळ कारणभूत झाला, व रामभाऊ कोल्हेकरांनी आपल्या कंपनींत त्याला याच त्याच्या गुणावर लुब्ध होऊन नटवेष देण्याची अंतस्थ योजना केली. गणू त्यांच्या नादीं लागला हें वर सांगितलेंच आहे. घरची गरीबी आणि रोज मधुकरी मागण्याचा त्रास. या गोष्टींना गणू फारच कंटाळला असल्यानें, त्याला त्याच्या बालबुद्धीनें

नाटकांत जाण्याची व सुखानें पोट भरण्याची बुध्दि द्यावी हें साहजिकच होतें. आपण नाटकमंडळीबरोबर पळून गेलों असतां, आपल्या घरच्या मंडळीची अवस्था काय होईल, ही कल्पनाही गणूच्या मनाला त्यावेळीं शिवली नसल्यानें, अलीकडील नित्य नेमाप्रमाणें गणु जो एके रात्रीं बाहेर पडला तो राजापुरापासून जवळ असलेल्या अपल्या मामाच्या गांवीं नाटकमंडळीबरोबर निघून गेला. सकाळीं रोजच्या प्रमाणें गणूची घरीं येण्याची वेळ टळून गेल्यानें, त्याच्या आईनें त्याच्या एका बहिणीला त्याचा शोध करण्यासाठीं शिंदे मास्त-रांच्या शाळेंत धाडिलें. गणू अलीकडे रात्रीं पोथी वाचायला आणि शाळेंत शिकायला येत नसतो असें जें त्या शोध करायला गेलेल्या गणूच्या बहीणीला शिंडे मास्तरांनीं सांगितलें, तें तिनें आपल्या आईला येऊन सांगतांच, आनंदीबाईचा प्राण कंठीं आला. त्यांचें धाबें दणाणलें. त्यांना अन्नपाण्याचीही शुध्द राहिली नाहीं. गणूचा भाऊ राजा आपल्या दादाची आठवण काढून वारंवार रडूं लागला व बहिणी आपसांत रडूं लागल्या. इतक्यांत रामभाऊ कोल्हेकरांची नाटकमंडळी गणूच्या आजोळच्या गांवीं असून तींत गणू असल्याची बातमी आनंदी-बाईंना एकानें येऊन सांगितली. गांवांत गणूच्या मातोश्रींच्या बापाला म्हणजे गणूच्या अज्याला गणू नाटकमंडळींत असल्याचें समजलें. ते नाटकमंडळींत गेले व त्यांनीं त्याला धाकदपटशा देऊन परत राजा-पुरास पाठवून दिलें. गणू गांवीं परत आला. पण त्याची त्यालाच घरीं जाण्याची लाज वाटूं लागल्यामुळें, तो गांवांतल्या एका पिराच्या तक्यावर जाऊन सचिंतावस्थेंत बसला. कांहीं वेळानें तिनसांजच्या सुमारास एक फकीर तेथें आला व त्यानें त्याची ती चिंताक्रांत स्थिति पाहून, घरीं

जाण्याबद्दल गणूला थोडा उपदेश केला व केरवा मण्यांची एक माळ त्याला रोज जप करण्यास दिल्यावर एक काजूफळ खाण्यास दिलें व तो फकीर तेथून निघून गेला. गणूनें तें फळ खाल्लें व माळ खिशांत ठेवून देऊन तेथेंच रात्रभर निद्रा केली. ती माळ गणपतरावांजवळ, १९०३ सालीं त्यांची व शीलनाथांची ग्वाल्हेरनजीक गांठ पडेपर्यंत कायम होती.

माझ्याकडून 'श्रीसमर्थ रामदास' या नांवाचें जें नाटक त्यांनीं लिहविलें होतें व त्याचा पहिला प्रयोग पुणें मुक्कामीं आर्यभूषण थिएटरांत जो १९०४ सालीं झाला, त्यावेळीं समर्थांच्या पात्राच्या गळ्यांत माळ कोणची असावी, याबद्दलचा कुबडीच्या स्वरोदयाविषयांत प्रश्न निघाला असतां, ती फकीरानें त्यानां दिलेली माळ मोठ्या चमत्कारानें एक्या रात्रीं ग्वाल्हेरीस नापत्ता झाल्याचें त्यांनीं मला सांगितलें. तो फकीर त्यानंतर गणपतरावांना त्यांच्या ऐन भरभराटीच्या वेळीं फक्त एकदांच मबंध आयुष्यात पुन्हां कोंकणांत भेटल्याचें त्यांनीं सांगितलें. असो.

वर सांगितल्याप्रमाणें गणूनें रात्रींची वेळ पिराच्या थडग्यावर निजून काढल्यावर, सकाळीं तो उठला, व तेथेंच पुढें काय करावें या विचाराची तंद्री लावून बसला असतां, गांवच्या सरकारी शाळेंतल्या हेडमास्तरच्या दृष्टीस पडला. त्यानें गणूची समजूत करून त्याला आपल्या घरीं जेवण घालून शाळेंत नेलें व तिसऱ्या इयत्तेंत बसविलें. गणू घरीं गेला व पूर्ववत् जरी अभ्यासादि गोष्टी करूं लागला, तरी गणूनें आपली चौथींत बसण्याची जी इच्छा दर्शविली, त्याप्रमाणें त्याच्यावर प्रेम करणाऱ्या त्या हेडमास्तरांनीं त्याला दुसऱ्या दिवशीं जरी चवथ्या इयत्तेंत बसण्याची परवानगी दिली, तरी त्या इयत्तेवरचा मास्तर अत्यंत खाष्ट स्वभावाचा असल्यानें, तो गणूची हुषारी पाह

त्याच्यावर प्रेम करण्याच्या ऐवजी, त्याचा द्वेषच करूं लागला. मानी स्वभावाच्या गणूला तें न मानून तो पुण्यामुंबईकडे शिकण्यास जाण्याची तजवीज पाहूं लागला. वर्गावरच्या मास्तराचा फारच त्रास होतो आहे असें पाहून पुढील विद्याभ्यास करण्यासाठीं गणू आपल्या आईची परवानगी घेऊन आपल्या आजोळच्या गोळप नांवाच्या गांवीं आपल्या मामाच्या घरीं गेला. त्याला दोघे मामा होते. ते दोघेही इंदुराकडे नौकर होते. त्यांपैकीं धाकटा मामा त्यावेळीं गणूच्या थोरल्या मामीस इंदुरास घेऊन जाण्यासाठीं तेथें आला होता. त्याच्या बरोबर विद्याभ्यास करण्यासाठीं इंदुरास जाण्याची गणूनें इच्छा दर्शविली व त्यानेंहीं जरी त्याला कबूली दिली, तरी मोठ्या मामीनें त्याबद्दल नापसंती दर्शविल्यामुळें गणूचे मनोगत विचार जागच्या जागींच राहिले. पुढें मुंबईस त्या मामी गणपतरावजींच्या ऐन भरभराटीच्या काळीं, त्यांना भेटायला आल्या असतां, गणपतरावांनीं या गोष्टींची जेव्हां मोठ्या मार्मिकपणानें त्यांना आठवण दिली, त्यावेळीं त्या अत्यंत वरमल्याचें, या लेखकानें स्वतः पाहिलें आहे.

असो. अशा प्रकारें निराश झालेला गणू परत राजापुरास आला व शाळेंत शिकायला वगैरे कांहीं एक न जातां मिळेल तें खाऊन, फकीरानें दिलेल्या माळेवर जप करीत थडग्यावर बसूं लागला. महिना पंधरा दिवस अशा तऱ्हेनें गेल्यावर, त्याच्या मनानें पुन्हां नाटकमंडळींत जाण्याची उचल खाल्ली. त्यावेळीं कोल्हेकरांची नाटकमंडळी राजापुराच्या असपासच होती. एके दिवशीं सायंकाळीं भर तिन्हीसांजा गाईचें दूध काढण्यासाठीं घरीं गाईचें वांसरूं सोडून गणूनें "आई मी मी !" असे शब्द उच्चारले व एकदम तेथून पलायन केलें. कोंड्याची

लड म्हणून जें एक गाड्या सुटण्याचें ठिकाण आहे, तेथें त्यानें ती रात्र छपून काढली. पहाटेस गाड्या चालू लागल्या व आगाऊच ठरवून ठेवल्याप्रमाणें गणू त्या गाड्यांच्या सोबतीनें नाटकमंडळीच्या गांवीं जाऊन, मंडळींत दाखल झाला. कंपनीच्या मालकांच्या कडक स्वभावामुळें गणूचा त्या मंडळींत फारच थोडा मुक्काम झाला. पुन्हां गणू परत राजापुरास आल्यावर, त्याच्या विद्याभ्यासाची व्यवस्था लावण्याची योग्य तरतूद करण्यासाठीं, त्याची आई त्याला गोळपास आपल्या बापाकडे घेऊन गेली. त्यानें वठणीवर यावें म्हणून तेथें त्याच्या आजोबांनीं त्याला यथेच्छ चोप दिला. ती गोष्ट सहन न झाल्यानें, तो जो तेथून राजापुराला म्हणून जायला निघाला, तो परस्पर सौंदळास चालता झाला. गोरागोमटा बांधेसूत असलेल्या या निराश्रित मुलाला पाहून, त्या गांवच्या एका........नांवाच्या ब्राह्मणानें आपल्या घरीं त्याला आश्रय दिला व त्याच्याकडे घरांतील पूजावैश्वदेवाचें काम सोंपवून, रोज एक वेळ खाडीवर म्हशी नेऊन आणण्याची कामगिरी त्याला सांगितली. गणू त्या ठिकाणीं सुखासमाधानानें राहूं लागला. नित्य क्रम आटपून बाकीच्या वेळीं गीतापाठ करीत बसण्याचा जो त्यानें तेथें उपक्रम सुरू केला, तो पाहून त्या ब्राह्मणाला संतोष वाटला. तो ब्राह्मण घरचा सुखी होता, परंतु त्याला अपत्त्य नसल्यानें, परमेश्वरानेंच दयाभूत होऊन, हें आपल्याला पुत्ररत्न दिलें आहे, असें जरी तो मानूं लागला, तरी त्याची स्त्री मोठी उताणखाट असल्यानें, ‘ किती झालें तरी मातीचे कुल्ले! चिकटवून थोडेच राहणार आहेत. ’ अशा तऱ्हेच्या अनेक वेंचक शब्दांनीं जें ताडण करी, तें असह्य होऊन गणूनें एके दिवशीं आत्महत्या करण्याचें ठरविलें. त्या दिव

नित्यपाठाकडे गणूचें लक्ष्य नाहीं असें पाहून, त्या ब्राह्मणानें गणूला जवळ बोलावून त्यानें पाठ केलेल्या गीतेच्या सहा सात अध्यायांचा पाठ म्हणून घेतला. इतक्यांत ती खाष्ट स्त्री तेथें आली व "म्हशींना आधीं खाडीवर नेऊन आण, नि मग बस गीता म्हणत!" असें तिनें गणूला फर्माविलें. नवरोपंत तिच्या मुठींत असल्यानें, तिच्या हुकूमाची बजावणी करण्यास त्यांनीं गणूला सांगितलें. गणूचा त्याच दिवशीं आत्महत्या करण्याचा विचार ठरला असल्यामुळें, त्यानें 'पडत्या फळाची आज्ञा' म्हणून गोठ्यांतून म्हशी सोडल्या व त्यांच्यासह खाडीचा मार्ग सुधारला. खाडीवर म्हशींच्यासह जाऊन पोंचल्यावर, गणूनें कृतसंकल्पाप्रमाणें आत्महत्या करण्यासाठीं वैतागानें खाडींत धाडकन उडी मारली. गणू गटंगळ्या खाऊं लागला. तें दृश्य एका चाणाक्ष म्हशीच्या दृष्टीस पडतांच, ती मोठ्या वेगानें त्याच्या गटंगळ्या खाण्याच्या जागीं खाडींत जाऊन पोंचली. तिनें त्याला त्याच्या बेशुद्धावस्थेंत आपल्या शिंगांवर मोठ्या अचुकपणें झेलून घेऊन तेथून जी धूम ठोकली ती आपल्या घरांत येऊन उभी राहिली. तिनें त्या प्रेतवत् गणूला आपल्या घराच्या मालकापुढें अलगत उतरून अंगण्यांत ठेविलें. ब्राह्मणाला मोठा विस्मय वाटला व त्यानें लगेच औषधोपचार करून गणूला शुद्धीवर आणिलें. देवाच्या कृपेनें आपल्या कपाळचा अभिश्राप चुकला असें वाटून, त्या ब्राह्मणानें परिस्थितीचा विचार केला व पांच रुपये गणूला देऊन, देशांतराला जाण्याची परवानगी दिली व पुन्हां आत्महत्येचा प्रयत्न न करण्याबद्दल, त्याचें शपथप्रमाण करून घेतलें.

वास्तविक पाहिलें असतां, सौंदळच्या खाडींतच गणूची अवतारसमाप्ति होण्यास कांहींच अवकाश नव्हता; परंतु 'आले देवाजीच्या

मना । तेथें कोणाचें चालेना ' या प्रसिद्ध साधूक्तीप्रमाणें, गणूनें केलेल्या आत्महत्येचा निश्चय त्याच्याकडून पार पडला नाहीं. देवाची जी इच्छा गणूच्या हांतून पुढें महाराष्ट्ररंगभूमीला अगदीं स्वतंत्रपणाचें वळण लावून देण्याची होती ती पार पाडून, गणपतरावांसारखा अलौकिक नट मराठी रंगभूमीला ललामभूत करून सोडायचा होता, ती गोष्ट त्यावेळीं म्हशीकडून त्याचे प्राण वांचविण्यानें, त्यानें घडवून आणिली असेंच आतां म्हणण्यावांचून गत्यंतर नाहीं. असो.

गणू पांच रुपये घेऊन व ब्राह्मणाच्या पायांवर मस्तक ठेवून तेथून जो निघाला, तो थेट मालवणास येऊन पोंचला. तेथें जी एक नाटक मंडळी खेळ करीत असल्याची त्याला वाटेंत बातमी समजली होती, ती मंडळी गणू तेथें जाऊन पोंचण्याच्या आदल्या दिवशींच तेंथून परगांवीं निघून गेली असल्याचें गणूला आढळून आल्यामुळें, त्यानें आपला मुक्काम त्या गांवच्या मारुतीच्या देवळांत ठेविला व फकीरानें दिलेल्या माळेवर बजरंगनामाचा जप करण्याची सुरवात केली. तेथें कोणी एक अनोळखी बैरागी साधु त्याला तिसऱ्या दिवसापासून अनपेक्षितपणें शिधा आणून देऊं लागला व त्या साधूची वृद्ध पत्नि, त्याला प्रेमानें त्या शिध्याचा सैपाक करून खाऊं घालूं लागली. गणूच्या राजापुरच्या घरांत दहा बारा वर्षें भाड्यानें राहणारे एक गृहस्थ त्यावेळीं नौकरीच्या बदलीनें मालवणास बदलून आलेले होते. त्यांचा रोजचा मारुतिदर्शनावांचून अन्न न घेण्याचा नियम असल्यानें, ते त्या मारुतीच्या दर्शनाला येऊं लागले. ते गणूला चांगले ओळखीत असल्यानें, ते त्या मारुतीच्या दर्शनाला यायच्या वेळीं गणू मारुतीच्या मूर्तिच्या मागें अंधेरांत लपून बसत असे. या स्थलींहि



**चंद्रसेन**—चारुगात्री, तझ्या स्तवानं माझांहि पापक्षालन होवो !

**मल्लिका**—महाराज, अलीकडे आपलं कसं काय चाललं आहे ?

Photo by R. N. Joshi. हॅम्लेट-अं ३ प्र. १.

नाटकमंडळींत जाण्याचा आपला उद्देश सिद्धीस जात नाहीं असें पाहून गणू उदास झाला, व त्याला जेऊं घालणाऱ्या साधूचा व त्याच्या पत्नीचा निरोप घेऊन तो जेव्हां तेथून जाण्यास निघाला, तेव्हां त्या साधूनें गणूला रामनामाच्या जपाचा गुरुमंत्र देऊन, निरोप देतांना, 'तुझें भाग्य थोड्याच दिवसांत उघडेल' असा आशीर्वादहि दिला. गणू तेंथून जो निघाला तो थेट राजापुरास पुन्हां आपल्या घरीं येऊन आपल्या मातेला भेटला.

गोंवळच्या आपल्या अजोळून गणू आपल्या आजाचा मार खाण्याच्या धाकानें राजापुरास जाण्यास म्हणून जो निघून गेला तो, तो सौंदळास गेल्याचें जें मागें सांगितलें आहे, ती गोष्ट त्याच्या मातेस मुळींच ठाऊक नव्हती. गणू रागानें राजापुराला गेला असें समजून त्याची आई गोंवळहून राजापुराला जों येऊन पहाते, तों तेथें गणू नसल्याचें तिच्या निदर्शनाला आल्यानें, तिचें काळीज दुभंगून गेलें. ती अत्यंत हैराण झाली. तिच्या बापाला ती बातमी समजल्यामुळें तो गोंवळहून राजापुरास आला, व त्यानें तिच्या औषधपाण्याची व्यवस्था करून, "—गणू वारंवार पळून जातो. त्याच्या पुढें इलाज चालणें आतां शक्य नाहीं. तूं उगीच मनाचें रान करून घेऊं नकोस. त्याच्या जें नशीबीं असेल तें होईल. त्याला राहील तसा देव ठेवणार समर्थ आहे. आपल्या माणसाच्या काळजीनें काय होतें ? त्याचें नशीब त्याच्या बरोबर—" वगैरे प्रकारच्या शांतपणाच्या गोष्टी सांगून, ते जरी परत आपल्या गांवीं निघून गेले, तरी मातेचेंच हृदय तें ! त्याला उसंत कशी पडणार ? कोणी साधू अगर ज्योतीषी भेटतांच त्याला गणूचें पुढचें आयुष्य कसें जाईल म्हणून त्या माउलीनें मोठ्या उत्कंठित मनानें

विचारींत असावें. एका ज्योतिष्यानें तर त्या माउलीस गणूची कुंडली पाहून असें सांगितलें होतें कीं, "—बाई, कांहीं काळजी करूं नका. तो ज्या धंद्यांत पडेल त्यांत उत्तम नांवलौकिक मिळवून, पांचपन्नासांचा तो पोशिंदा व्हावा असे त्याचे ग्रह आहेत. पण तशी त्याची स्थिति यायला अजून पांच सात वर्षांचा अवकाश आहे—."

वर सांगितल्या प्रमाणें गणू मालवणच्या मारुतीच्या देवळांतील साधूचा आशीर्वाद घेऊन जेव्हां आपल्या मातेला घेऊन राजापुरास भेटला, तेव्हां त्याच्या वयाला चौदावें वर्ष लागलें होतें. त्या वेळीं कार्लेकर रामभाऊंची नाटकमंडळी फुटून त्यांतील जीं पात्रें भटकत फिरत होतीं, त्यांपैकीं एक कृष्णाजी बजाजी जोशी या नांवाचे साताराचे रहिवासी गृहस्थ राजापुरास आले होते. त्यांनीं रामभाऊंची कंपनी फुटल्यानंतर स्वतः 'श्रीशाहूनगरवासी नाटकमंडळी' या नांवाची संस्था काढिली होती. ते त्या वेळीं कोंकणांत जर कांहीं पात्रें मिळालीं तर पहावींत या उद्देशानें फिरत राजापुरास आले होते. गणूची व त्यांची तेथें सहज रस्त्यांत गांठ पडली व पूर्वींची ओळख पटून, "—आपल्या कंपनींत येतोस का ?—" म्हणून त्यांनीं त्याला प्रश्न केला. गणूची कीर्ति व सोंग करण्याची धाटणी पूर्वींच पांच चार वेळां जोशीबोवांनीं ऐकली व पाहिली होती. त्यामुळें तो आपल्या कंपनींत आल्यास, कंपनी चांगली चालेल अशी त्यांची खात्री होती. गणूला वरील प्रमाणें त्यांनी सवाल टाकण्यावर, "माझ्या आईची आणि भावंडांची पोटाची व्यवस्था होत असल्यास मी तुमच्या बरोबर नाटकमंडळींत येतों." असें त्यानें त्यांना सांगितलें. "—दरमहा पांच रुपये प्रमाणें सध्यां घरीं धाडीत जाईन," असें जोशीबोवांनीं गणूला सांगितलें.

च लगेच त्याच्या हातावर पांच रुपये त्यांनीं ठेवल्याबरोबर, गणूनें त्यांच्या मंडळींत जाण्याचा आपला निश्चय कायम केला. शाहूनगरवासी नाटकमंडळींचे पुढें जें पांच मालक म्हणून प्रसिद्धीस आले, त्यांच्यापैकीं जोशीबोवा या नांवानें जे प्रसिद्ध होते, तेच हे शाहूनगरवासी नाटकमंडळीचे आद्य संस्थापक होत. नाटकांत जाण्याची व दरमहा पांच रुपये घरीं पाठविण्याची गोष्ट आपल्या आईला संमत होणार नाहीं, ही गोष्ट गणूला पक्की माहीत असल्यानें, त्यानें जोशीबोवांजवळून घेतलेले पांच रुपये गुपचिपपणें आपल्या आईच्या उशागतीं एका चिंधींत बांधून ठेवून, रोजच्या प्रमाणें जेवण केलें व आगाऊ ठरल्याप्रमाणें जोशीबोवांचें खाणावळींतलें जेवण उरकल्यावर ती टुकल राजापुराहून मुंबईस जाण्यास निघाली. मुंबईस येऊन पोंचल्यावर जोशीबोवांच्या खिशांत अवघे सहा अण्यांचे पैसे शिल्लक होते व गणूच्या अंगात एक सद्रा, कमरेला एक धोतर व डोक्याला एक टोपी इतकीच काय ती संपत्ति होती. गणूला सहा आण्यांचे पैसे देऊन, जोशीबोवांनीं ठाण्यास जाण्यास सांगितलें, व तेथें असलेल्या आपल्या कंपनीचा राहण्याचा पत्ता त्याला लिहून देऊन, आपल्या नांवावर कंपनींत जाऊन उतरण्यास सांगितलें. गणू त्याप्रमाणें ठाण्यास जाण्यास आगगाडींत बसला व जोशीबोवा पैशांची जमवाजमव करण्यास मुंबईस निघून गेले. गणू त्या दिवसापर्यंत पूर्वीं कधींच आगगाडींत बसला नव्हता, त्यामुळें त्याला जो तेव्हां आनंद झाला, त्याचें वर्णन गणपत-



( जोशीबोवा. )

राव जेव्हां केव्हां करीत तेव्हां असत, तेव्हां मोठी मौज वाटे.. जोशीबोवांची कंपनी गेले दोन महिने द्रव्याच्या उत्पन्नाच्या आभावीं बंद पडून अगदीं जी मोडकळीस आली होती, ती जोशीबोवांनीं मुंबईहून द्रव्याची मदत आणून पुन्हां एका ब्रह्मचाऱ्याच्या हांतून नारळ फोडवून सुरू केली. कंपनीच्या नाटकांचे प्रयोग सुरू झाले. ही मंडळी ज्या ठिकाणीं स्थापन झाली व जेथें उपरिनिर्दिष्ट ब्रह्मचाऱ्याचे हातून पहिला नारळ फोडवून जोशीबोवांनीं नाटकाच्या प्रयोगाचा प्रारंभ केला, तें ठिकाण ठाणें येथें कोपनेश्वराचे देवळानजीक असून, तें आमच्यासारख्या मित्रमंडळीला गणपतरावांनीं मोठ्या कौतुकानें व प्रेमानें, आपलें कलेच्या सुरवातीचें आद्य स्थान म्हणून मुद्दाम नेऊन अभिमानपूर्वक दाखविलें आहे. ठाण्यास केव्हांहि जरी कंपनीला बेताबाताचेंच उत्पन्न होत असे, तरी त्या स्थानाचा गणपतरावांना अभिमान असल्यानें, ते आपली कंपनी नेहमी मुंबईच्या दौऱ्याच्या वेळीं तेथें नेत असत. पुढें या कंपनींत जरी अनेक होतकरू पात्रांचा भरणा होऊन ही मंडळी उदयाला येऊं लागली, तरी त्यांत पुढें जे कोणी नट नांवालौकिकाला येऊन मंडळीचे मालक म्हणून गाजूं लागले, ते मंडळीला कसे येऊन मिळाले त्यांचा अनुक्रम आतां सांगतों.

या नाटकमंडळीचे पहिले उत्पादक जे जोशीबोवा त्यांनीं गणूला मंडळींत आणिल्यावर, सांगलीचे गोविंद कृष्ण सुपेकर ऊर्फ बोवा त्यांस येऊन मिळाले. नंतर प्रसिद्ध स्त्रीवेषधारी कृष्णाजी महादेव ऊर्फ बाळाभाऊ जोग यांची त्यांना जोड मिळाल्यावर, सर्व्हेमध्यें नौकरी करीत असलेले रामचंद्र कृष्ण केळकर ऊर्फ शास्त्रीबोवा ह्यांनीं त्या मंडळींत आपला शिरकाव करून घेतला. हेच ते पांच गृहस्थ पुढें त

नाटकमंडळीचे कांहीं हिस्सेदारशीच्या प्रमाणानें मालक झाले. या पांची जणांच्या नांवांत जें एक कोणाच्या आद्यांत तर कोणाच्या मध्यांत कृष्ण हें नांव खेळलेलें वाचायला सांपडतें आहे, त्याच आद्यनटनायक श्रीकृष्णानें पंचमहाभूतात्मक प्रकृतिस्वरूप धारण करून, या नाटक-मंडळीला उत्कर्षाला चढविलें व गणपतरावांसारख्यांकडून हव्या त्या रसाचा पूर्ण परिपाक महाराष्ट्राच्या रंगभूमीवर उतरवून, त्यांना गद्यनाट्याचार्य म्हणून चिरंजीव करून सोडिलें, ही भावना मनांत उभी राहिली म्हणजे, त्या भगवंताच्या लीलाकौतुकानें जे आनंदाश्रु वाहूं लागतात ते अन्यथा नव्हेत असेंच वाटतें. असो.

याप्रमाणें आमच्या प्रस्तुत चरित्रनायकाचें बालपण आणि नाट्यप्रवेश यांचा जो इतिहास तो येथपर्यंत त्रोटकपणें सांगितला. आतां त्यांच्या पुढचा जो अंक महाराष्ट्ररंगभूमी त्याजकडे वळूं.

# अंक तिसरा.

## महाराष्ट्र–रंगभूमी.

### प्रवेश पहिला.

पाश्चात्य अविंधानीं आम्हांस दिलेल्या पूर्वकालीन 'हिंदू' या कुत्सित विशेषणानें शोभणाऱ्या आम्हां आर्यवंशजांच्या पूर्वज आचार्यांनीं ज्या कला व जीं शास्त्रें आपल्या संस्कृतीला शोभतील अशीं निर्माण केलीं, त्यांपैकींच नाट्यकला ही एक होय. या अखिल भूमंडलावरील आम्हां आर्यांचा सर्वश्रेष्ठ असा आद्यग्रंथ जो ऋग्वेद, त्यांत नाट्याचा वारंवार उल्लेख केलेला आसल्यानें, ही कला ऋग्वेदकालाइतकीच प्राचीनतम आहे असें सिद्ध झालें आहे. यजुर्वेदांतर्गत वाजसनेन संहितेंत कित्येक नट व नायक याजबद्दलचें विवेचन आलेलें आहे. ज्याला संस्कृतांत शैलूष म्हणजे नाटकाचा सूत्रधार असें म्हणतात, त्याची जशी त्यांत स्पष्टोक्ति आहे, तद्वतच शतपथब्राह्मणांतहि, नाट्य आणि नर्तन यांच्यासंबंधानें 'नटांच्या कृतीनें, नृत्यानें व भाषणानें युवतिजनांस अल्हाद होतो' वगैरे उल्लेख आलेले आढळतात. सामवेदांत तर–सामगेयगान, अरण्यगान, ऊहगान आणि ऊह्यगान अशीं नाट्य-विषयक चार प्रकारचीं गायनें सांगितलीं असून, तीं भिन्न पद्धतीनें केव्हां म्हणायचीं याचेंहि त्यांत विवेचन केलेलें आहे. अथर्ववेदांतहि याचें दिग्दर्शन झालेलें असून, कात्यायनसूत्रांतहि नटाचा उल्लेख

आलेला आहे. वैयाकरण पाणीनी तर नुसता नटांचा उल्लेख करूनच न राहतां, त्यानें नटसूत्रांचाच प्रत्यक्ष उल्लेख केलेला आहे. ही गोष्ट त्याच्या 'पाराशर्यशिलालिभ्यां भिक्षुवठ सूत्रयोः' या सूत्रावरूनच स्पष्ट होते. त्यानें 'शैलालिनो नटाः, 'शौलिनः, ' '—नटानां धर्म आम्नायो वा' इत्यादि नाटचविषयक असें जें जागोजागीं विवेचन केलेलें आढळतें, त्यावरून पाणिनीच्या काळीं नाट्यकला चांगल्याच भरभराटींत होती असें मानण्यास बलवत्तर कारण प्राप्त होतें.

या नटसूत्रांचे प्रवर्तक जे शिलाली व कुशाश्व त्यांच्या अनुयायांस त्यांच्याच नांवांवरून पुढें शैलाली आणि कुशाश्वी असें म्हणण्याचा प्रघात पडला. शांखायन ब्राह्मणांतहि या शिल्पाचे म्हणजे ललित कलेचे—नर्तन, वादन आणि गायन असे तीन प्रकार सांगितले असून, वधु सासरीं जाण्याच्या आदल्या दिवशीं तिच्या घरीं चार अथवा आठ सुवासिनींनीं नृत्यगायनादि प्रकार करण्याचा परिपाठ होता, असें त्यावरूनच सिद्ध होतें. नृत्य, वादन व गायन या कला रामायणकालींहि चांगल्याच प्रचारांत असून, नाटचशास्त्रांत आमच्या पूर्वज आचार्यांनीं उत्कृष्टपणानें प्रावीण्य मिळविलें होतें असें, '—नृत्यवादित्र कुशला राक्षसेंद्रभुजांकगा । का चिद् वीणां परिष्वज्य प्रसुप्ता संप्रकाशते ॥' या तत्कालीन उक्तीवरून स्पष्ट होतें. त्या नंतर महाभारतकालींहि ही नाट्यविद्या अगदीं पूर्णत्वाला पोंचली असल्याचें भागवत ग्रंथावरून प्रत्ययाला येतें. भागवताच्या दशम स्कंधांत, 'वृंदशो व्रजवृषामृगगावो। वेणुवाद्य हृतचेत स एत्य। दन्तदष्टकवला धृतकर्णा । निद्रिता लिखित चित्रमिवासन् ॥' असें नाट्याबद्दल वर्णन केलें असून, हरिवंशांत तर, यादवांनीं नटवेष धारण

करून इंद्रासारिख्या महान् बलवन्ताच्याहि पराक्रमाला ओहोटी लावण्यासारखीं अनेक नटांनीं केलेल्या कार्यांचीं वर्णनें वाचायला सांपडतात. भारतकालीं वज्रनाभ नांवाचा जो एक ऋषिमुनींकडून आशीर्वाद दिला गेलेला व वराची प्राप्ति झालेला आकाशगामी प्रसिद्ध नट असल्याचें हरिवंशाच्या विष्णुपर्वांतील ९२ व्या अध्यायांत सांगितलें आहे, तें वाचलें असतां, नटविद्येच्या तत्कालीन उत्कर्षासंबंधानें खात्री पटते. 'यं सदा देवि दृष्ट्वा हि स्रवन्ति जघनानि हि। आपीनानीव धेनूनां स्रोतांसि सरितामिव ॥' असें त्या नटाच्या नटवेषासंबंधानें तेथें म्हटलें आहे. तशा तऱ्हेच्या नटांचा उपयोग त्या काळीं शत्रुपक्षांत भेद करण्याचा व शत्रूला दांतीं तृण धरायला लावण्याच्या राजकारणाचा खेळ समरंगणांत खेळण्याकडे व राष्ट्ररक्षणाकडे करवीत असत, तर सध्यां तशा प्रकारचा उपयोग ज्या नटांकडून होण्यासारखा आहे अशा नटांचा खेळ, आमच्या मर्द होऊं पाहणाऱ्या सध्यांच्या महाराष्ट्रीय तरुण पिढीला नामर्द करण्यासारख्या नाट्यप्रबंधांची रचना करणारे कवि निर्माण होऊन करूं पाहाताहेत. जात्या पुरूष असून, राष्ट्रकाजासाठीं स्त्रियांचीं सोंगें घेऊन, प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णपरमात्म्यांनीं आपल्या पुत्रांकरवीं महान् बलाढ्य अशा दैत्यांना भूल पाडून त्यांचे कसे पराजय करविले व त्या काळीं तीं पुरुषांनीं घेतलेलीं स्त्रियांचीं सोंगें कशीं दिसलीं या संबंधानें त्याच विष्णुपर्वाच्या ९३ व्या अध्यायांत जें वर्णन केलें आहे तें येणेंप्रमाणें:--

एकैकस्य समारूप पुरुषाः पुरुषस्य ते ।
स्त्रीणां च सदृशाः सर्वे ते स्वरूपैर्नराधिपाः ॥

त्यावेळीं नट हेच कवि असत व कवी हेच नटांचीं कामें करित असत असें दिसतें. दैत्यांचा पराजय करण्याच्या कामीं एके प्रसंगीं रामायण

महाकाव्याला उद्देशून नाटक लिहिण्यांत आलें होतें, व त्याच्या प्रयोगसमयीं शत्रुनगरांत जाऊन श्रीकृष्णपुत्रांनीं कोणकोणचे वेष घेतले होते, त्याचें वर्णन येणेंप्रमाणें दिलेलें आढळतें:— प्रद्युम्न-नायक. सांब-विदूषक. गद-पारिपार्श्वक. शूर-रावण.

रामलक्ष्मणशत्रुघ्ना भरतश्चैव भारत ।
ऋष्यशृंगश्च शान्ता च तथा रूपैर्नटः कृताः ॥

पाहून:—

तत्काल जीविनो वृद्धा दानवा विस्मयं गताः ।
आचचक्षुश्च तेषां वै रूपतुल्यत्वमच्युत ॥
संस्काराभिनयौ तेषां प्रस्तावानां च धारणम् ।
दृष्ट्वा सर्वे प्रवेशां च दानवा विस्मयं गताः ॥

त्यानंतर काय झालें:—

ते रक्ता विस्मयं नेदुरसुराः परया मुदा ।
उत्थायोत्थाय नाट्यस्य विषयेषु पुनः पुनः ॥

इतकेंच करून ते दैत्यप्रेक्षक राहिले नाहींत, तर त्यांनीं पुढें काय केलें:-

ददुर्वस्त्राणि तुष्टाश्च यैवेयवलयानि च ।
हारान्मनोहरांश्चैव हेमवैडूर्यभूषितान् ॥

असो. पुरातनकालीन लेखांवरून गृहस्थ पुरुष जसे राष्ट्रकार्य साधण्यासाठीं स्त्री-वेष धारण करीत असल्याचे अनेक उल्लेख आम्हांला वाचायला सांपडतात तसे, गरती स्त्रियांनीं नाटकांत पुरुषवेष धारण केल्याचे मात्र फारसे उल्लेख आम्हांला कोठें वाचायला सांपडले नाहींत. स्त्रियांनीं स्त्रीवेषच धारण केल्याचे जे कांहीं उल्लेख वाचण्यांत आले, त्यांतील वरील नाट्यप्रसंगीं मनोवती वेश्येनें रंभेचा

वेष घेतल्याचें व हंसीनें दासीचा वेष घेतल्याचें मात्र वाचायला मिळालें- यावरून, आमच्या मतें एवढें ठरतें कीं, नाट्यकला ही मनोरंजनानें राष्ट्रकार्य साधण्यासाठींच मुख्यत्वें प्रचारांत आणिली गेली असली पाहिजे, व यामुळें तें नाट्यशास्त्र आणि ती नाट्यकला हीं वेदांगेंच आहेत असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. ब्रह्मदेवाला देखील या विद्येचें ज्ञान वेदांपासूनच प्राप्त झालें होतें असें धनंजयानें आपल्या दशरूपग्रंथांत लिहिलेलें आढळतें. संगीत रत्नाकराच्या सातव्या नर्तनाध्यायांत म्हटल्या- प्रमाणें, ही विद्या ब्रह्मदेवाला सकलज्ञाननिर्झर अशा वेदांपासून प्राप्त झाल्यावर त्यानें तिचें शिक्षण भरतमुनीला दिलें व त्यानें तिचा प्रसार भारतवर्षांत केला, अशी त्या विद्येची पूर्वपरंपरा मिळते. तत्कालीन नाटकांतून—नाट्य, नृत्य व नृत्त असे तीन प्रकार जरी असत, तरी यांशिवाय नाट्याचे लास्य व तांडव असेहि दोन प्रकार असत. ताण्डवाचा प्रचारक तण्डु नांवाचा एक शंकराचा परिचारक होता. लास्याची प्रचारिका पार्वति होती व तिनें तें प्रथम उषा नांवाच्या राजपुत्रीला शिकविलें. द्वारिकेंतल्या गोपींनां याच राजपुत्रीकडून तें शिक्षण मिळाल्याचा इतिहास आहे.

अशा प्रकारच्या हकीकती जरी वाचायला सांपडतात, तरी भरत- मुनीनें जो भारतीय नाट्यशास्त्र म्हणून लिहिलेला ग्रंथ सध्यां अर्धवट स्थितींत उपलब्ध आहे, त्यांतच जें ' नानारूपैः समायुक्ता गुणैरे- तैर्भवन्ति हि । बृहस्पतिमतादेषां गुणानां प्रविभावकम् ॥ ' असें म्हटलें आहे, त्यावरून त्याच्या आधीं बृहस्पतींनेंहि या विषयावर एक ग्रंथ लिहिला होता असें सिद्ध होतें. भरतानंतरचा नाट्यशास्त्रप्रणेता धनं- जय होय. तो आपल्याला मुंज राजाचा आश्रयी म्हणवितो. तो दशरू-

पकाचा कर्ता म्हणून मशहूर आहे. धनंजयाच्या दशरूपकावर धनिकानें वृत्ति लिहिलेली प्रसिद्धच आहे. नाट्यविषयावर यानंतर सरस्वतिकंठाभरण नांवाचा भोजदेवानें लिहिलेला एक ग्रंथ उपलब्ध झालेला आहे. या कृतीवर रत्नेश्वर महोपाध्यायांनीं सुंदर टीका लिहिलेली आहे. मम्मटानें जो काव्यप्रकाश नांवाचा ग्रंथ लिहिला आहे, तोहि या नाट्यशास्त्रासंबंधानें महत्वाचा आहे. या काश्मीरी ब्राह्मणाप्रमाणेंच विश्वनाथ नांवाच्या एका बंगाली पंडितानेंहि आपल्या साहित्यशास्त्र नांवाच्या ग्रंथांत या विषयासंबंधानें बराच चांगला विचार केलेला आहे. शार्ङ्गदेव नांवाचा जो संगीत रत्नाकराचा कर्ता, तो जातीचा काश्मीरी ब्राह्मण असतांहि त्याचा उदय दक्षिणेंतच झाला. तो ग्रंथ जरी मुख्यत्वेंकरून नृत्यगीतांबद्दलचाच आहे, तरी त्यांतहि नाट्यकलेचा थोडाफार विचार केलेला आढळून येतो. या ग्रंथावर टीका लिहिणारा जो कल्लिनाथ तो विजयानगरच्या प्रौढ (प्रतापदेव) राजाचा इ. स. १४५६ ते १४७० पर्यंतच्या काळांत आश्रित होता. याव्यतिरिक्त रुद्रभट्टकृत शृंगारतिलक, भानुदत्तकृत रसमंजरी व रसतरंगिणी वगैरे बरेच हावभावादिकांची माहिती देणारे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

साहित्यदर्पणाच्या पहिल्या परिच्छेदांत विश्वनाथानें जें ‘ वाक्यं रसात्मकं काव्यम् ’ आणि ‘ दोषास्तस्यापकर्षकाः ’ असें म्हटलें आहे, त्यावरून वचोविन्यास म्हणजे जी भाषासरणी, ती दोषरहित असून, रस हा काव्याचा अन्तरात्मा आणि जीवन असल्यानें, ती रसात्मकच असली पाहिजे असें जें सिद्ध होतें, तेंच हरघडी प्रत्ययाला येतें. ‘ वाग्वैदग्ध्यप्रधानेऽपि रस एवात्र जीवितम् ’ असें या बाबतींत अग्निपुराणांत स्पष्ट म्हटलें असून, ध्वनिकारांनींहि त्या बाबतींत ‘ अथः

हृदयश्लाघ्यः काव्यात्मा यो व्यवस्थितः' अशा तऱ्हेचे अनेक उद्गार काढिले आहेत. नटाचें भाषण प्रसंगानुरूप मधुर, आल्हाद्कारक, तीव्र, हृदयभेदक अशा मुख्यत्वें चार प्रकारचें असावें लागतें. म्हणजे त्यायोगें वर्ण आणि ध्वनि यांचें तादात्म्य होऊन, मनाला स्वयमेव गुदगुल्या होतात आणि तें अनायासेंच तल्लीन राहतें. वाक्सरणीला या चार गोष्टी जशा मूलभूत असाव्या लागतात असें नाट्यशास्त्रज्ञांनी सांगितलें आहे, त्याचप्रमाणें त्यांनीं भाषेचा उच्चार हा तिच्यांतील अर्थाचा केवळ प्रतिध्वनिच असेल अशी तिच्या उच्चारणेची सत्ता असावी, असेंहि जें स्पष्ट सांगितलें आहे, त्याकडे कोणच्याहि प्रसंगीं तोंडांतल्या तोंडांत लाडें लाडें बोलतांनां ओंठांच्या विनाकारण हालचाली करून तरुण प्रेक्षकांची दिशाभूल करणाऱ्या अलीकडील मूर्ख नटांनी लक्ष देणें जरूर आहे. या बाबतींत प्रसिद्ध पाश्चात्त्य कवि पोप यानें देखील आपल्या ( Essay on Criticism—गुणदोषप्रबंध ) नांवाच्या काव्यांत पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत:—

It is not enough no harshness gives offence,
The sound must seem an echo to the sense.

एकंदर जगाचा आजपर्यंत उपलब्ध असलेला इतिहास वाचणाऱ्याला या नाट्यविद्येसंबंधानें असें आढळून येईल कीं, भारतीय नाट्यविद्या ही त्यांची स्वयमेव आणि स्वकल्पित असून, तिचेंच ऋण इतर देशांनीं घेतलेलें आहे. ही विद्या वाङ्मयाची मोठ्या महत्वाची शाखा असून, हा लोकमनोरंजनाचा प्रियतम विषय ज्या आमच्या पूर्वज आचार्यांनी आपल्या अगाध बुद्धिमत्तेनें निर्माण केला त्याबद्दल, पाश्चात्यांत जो एक मोठा मि. होरेस हेमन विल्सन नांवाचा विद्वान आणि

संस्कृतज्ञ होऊन गेला व ज्याचे विचार सर्वमान्य झाले आहेत, तो आमच्या या नाट्यविद्येसंबंधानें '-आपल्या विल्सन्स हिंदू थिएटर-'नामक ग्रंथांत काय म्हणतो तें पाहा:—

Whatever may be the merits or defects of the Hindu drama, it may be safely asserted that they do not spring from the same parent, but are unmixedly its own. It is impossible that the Hindus should have borrowed their dramatic composition from the people, either by ancient or modern times. The natives of Europe possessed no dramatic literature, before the 14th or 15th century ( A. D. ) at which period, the Hindu drama had passed into decline. Mahamedan literature had ever been a stranger to theatrical writings, and the Musalman conquerors of India could not have communicated what they never possessed. There is no record that theatrical entertainments were ever nutaralised amongest the ancient Persians, Arabs or Egyptions. A perusal of the Hindu plays will show how little likely it is that they are indebted to either ( the Greeks or the Chines ) as with the exception of a few features in connection, which would not fail to occur, they present characteristic varieties of conduct and construction, which strangly evidence both original and design and natural development.

नाट्यवाङ्मयाच्या बाबतींत पाश्चात्यांत जे जे म्हणून आजपर्यंत लेखक प्रसिद्धीस आले आहेत, त्यांच्यापैकीं जे श्लेजेल, विल्यम जोन्स, वेबर वगैरे लोक त्यांनीं भारतीय नाट्यग्रंथसंपत्तीबद्दल

एकमतानें, तें वाङ्मय फार मोठें असल्याचें जें सिद्ध केलें आहे, तें कालिदासादिकांच्याहि वचनांवरून उत्तम प्रकारें निदर्शनाला येतें. ती आमची नाट्यग्रंथसंपत्ती जरीं विलुप्त झाली आहे, तरी हलके हलके तिचा शोध लागण्याचीं सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत, हीं गोष्ट कालिदासाच्या पूर्वीं होऊन गेलेल्या भास कवीच्या आलीकडे उपलब्ध झालेल्या तेरा नाट्यग्रंथांनींच सिद्ध केली आहे. भरतमुनीसारख्या फार पुरातन काळीं होऊन गेलेल्या व नाट्यविषयावर आद्यग्रंथ लेखक म्हणून प्रसिद्धीस आलेल्या लेखकाला नाट्यविषयासंबंधाच्या विवेचनाला त्याच्या आधीं उत्पन्न झाल्या असलेल्या नाट्यग्रंथांचें चागलेंच साह्य झालें असलें पाहिजे असें म्हणणें अप्रामाणिकपणाचें खास होणार नाहीं. कारण दृश्यावांचून सुसंबद्ध शास्त्ररचना होणें अशक्य असतें. आमची भारतीय अलौकिक गीर्वाणनाट्यसंपत्ती विलुप्त झाली असून सध्यां जी काय दिसते आहे, ती त्या संपत्तीचा एक अंश आहे असें जे प्रसिद्ध पाश्चिमात्त्य कॉवेन नामक लेखकानें लिहिलें आहे, त्याचाच प्रतिध्वनि राजस्थानचा इतिहास लिहिणाऱ्या टॉडच्या लेखांत जो उमटला आहे तो सत्य आहे.

हल्लीं उपलब्ध असलेलीं आमचीं संस्कृत नाटकें जरी थोडींच आहेत तरी त्यांतून गुणाधिक्याचा अंश पुष्कळच आहे. त्यांतील कित्येक तर निःसंशय अप्रतिम असून, पूर्ण प्रतिभासंपन्न असल्याबद्दल शंकाच घेतां येत नाहीं. त्यांतून नाना प्रकारच्या भूमिका नानाविध प्रकारच्या स्वभाववैचित्र्यांनीं नटवल्या गेल्या आहेत. त्यांतील पात्रांच्या अचुक सिद्धांतीय श्रेष्ठपणाच्या सर्व प्रकारच्या पोषाखांनीं तीं पात्रें सर्वादराला जीं पात्र झालीं आहेत तें रीतसरच आहे, आमच्या बहुतेक सर्व

पूर्वकालीन नीतीचें उदात्त तत्व आपल्या दृष्टीसमोर ठेवूनच लेखकांनीं आपले ते नाटकग्रंथ निर्माण केले असल्यानें, अपवित्र विचारांचा लोप होऊन, नीतिभ्रष्टतेनें होणाऱ्या पापसंचयाला सत्त्यापुढें अयशस्वी कसें व्हावें लागतें याचेंच सर्वत्र प्रदर्शन केलें असल्याचें जें दृष्टोत्पत्तीस येतें, त्यावरून नाट्यकला ही समाजाला नीतिशिक्षणाचा धडा शिकवणारी एक मनोरंजक संस्था होती असें म्हटल्यावांचून राहावत नाहीं.

सध्यां सर्व जगभर जी नाट्यकला प्रचारांत आली आहे, तिच्याकडे आणि आमच्या पूर्वींच्या सद्धेतुप्रेरित अशा निर्माण झालेल्या राष्ट्रकार्यप्रवर्तक नाट्यकलेकडे पाहिलें असतां, त्या दोहींत कसें—देव आणि दानव—यांच्या इतकें अंतर दिसतें हें विस्तृतपणें येथें कथन करण्याचें जरी कारण नसलें, तरी त्याबद्दल थोडक्यांत कांहीं गोष्टी सांगणें इष्ट आहे असें वाटतें म्हणून सांगतों.

कालवश झालेले आमचे चरित्रनायक पुरुषवेषधारी गणपतराव जोशी आणि सध्यां रंगभूमीवर अग्रेसरत्वानें नाट्याभिनयादि गुणांत समाजापुढें वावरत असलेले रा. राजहंस उर्फ स्त्रीवेषधारी बालगंधर्व या दोघांच्या कृतींवरून आमचें वरील म्हणणें कसें यथार्थ आहे तें येथ थोडक्यांत स्पष्ट करतों. इतर बहुतेक नट या दोघांच्या नकला असून, स्वयंभु असे नट कोणीच आमच्या नजरेला अद्यापी येत नाहींत, आणि त्यामुळें हीच जोडी वरील कोडें उलगडून दाखविण्यास आम्हीं हातीं घेतली आहे. या बाबतींत महाराष्ट्रनाटकमंडळीसंबंधानें येथें इतकेंच सांगतों कीं, ती मंडळी प्रथम शाहूमंडळीच्या नकलेची बतावणी करण्यास पुढें आल्यावर, तिच्यांत खाडीलकर आणि भानु यांच्या सारख्या त्या विषयांतील अनभिज्ञांचा संचार झाल्यानें, त्या मंडळीचा

कांहीं काल जो लौकिक झाल्यासारखा वाटला, तो जलपृष्ठावरील बुडबु-ड्यासारखाच क्षणैक मनोहर देखावा होता, हें म्हणणें अप्रस्तुत होणार नाहीं असें वाटतें. महाराष्ट्रमंडळींतलीं मूळचीं पात्रें चांगलीं होतकरू आणि पुढें उत्तम तऱ्हेच्या नांवालौकिकाला येण्यासारखीं असतां, त्यांना कृत्रिम कलेचें शिक्षण देणारे अदूरदर्शी आणि मोराच्या नाट्याचें अनु-करण करण्याची हांव बाळगणारे मोरपिसें लावलेले प्राणी मिळाल्यामुळें त्या चांगल्या माणसांची दिशाभूल होऊन, तीं अखेरीस आडरानांत शिरल्यानें पश्चात्तापपुनीत झालीं आहेत. असो.

गणपतराव आणि बालगंधर्व यांच्या भूमिकांतील विरोधात्मक असा जनतेवर होणारा जो परिणाम तो कोणच्या स्वरूपाचा झाला व होतो आहे, याचें येथें त्यांच्या खासगी वर्तनासंबंधानें लवमात्रहि न लिहितां थोडक्यांत दिग्दर्शन करतों. होऊन गेलेल्या, हयात असलेल्या आणि कविकाल्पनिक पात्रांच्या हुबेहूब नकला वठवणें हें जसें नटाचें खरें कर्तव्यकर्म, तसेंच तशा प्रकारच्या भूमिका आपल्या नाट्य-ग्रंथांत गुंफून, त्या नटांकडून आपल्या मनोदयाप्रमाणें वठविणें आणि नीतीचें समाजाला वळण देणें हें ग्रंथलेखकांचें खरें कर्तव्य होय. परंतु या बाबतींत सध्यांच्या आमच्या रंगभूमीकडे पाहिलें असतां, प्रासादिक लेखक आणि जन्मसिद्ध नटवर्ग यांच्या आभावीं ती छचोर वेश्येप्रमाणें क्षणैक जनमनलालसा पुरविणारी बनली आहे असें दिसतें. ' मराठी रंगभूमिवर स्वतेजानें तळपत असणारा नाट्याकाशांतला प्रतिसूर्य गणपतराव अस्तंगत झाल्याबरोबर, तिचा सौभाग्यतिलक पुसला जाऊन तिचें निटिल फटफटीत झालें. नाट्याकाशांत सतत चाळीस वर्षे आतपत राहून आपल्या दिव्य कांतीनें जनतेचे मनश्चक्षु दिपवून

ग्रंथालय



**मानाजीराव**— माझ्यापुढें हें काय बरें दिसतें आहे ? ही कटयार आहे काय !

फोटोग्रॅफर. म्यॅक्बेथ—अं. २ प्र. १

**रा. ना. जोशी.**

टाकणारा, तिच्या अंतःकरणांतील भावना उद्दीपित करून आपल्या गतीप्रमाणें तिला गति देणारा आणि आपल्या केवळ दर्शनानें तिचें हृदय आनंदानें उचंबळून सोडणाऱ्या नटसूर्याचा उदय जो मराठ्यांच्या राजधानीच्या शहरीं—पुण्यास—झाला तो अखेर इंग्रजांच्या राजधानीच्या शहरीं—मुंबईस—त्याचा अस्त झाला व त्याच्याबरोबरच महाराष्ट्ररंग-भूमीचें सौभाग्य लयाला गेलें.' असें गणपतरावासंबंधानें जें प्रो. टिपनीस यांनीं त्यांच्या मृत्युलेखांत म्हटलें आहे, तें खरोखरीच योग्य आहे, यांत संशय नाहीं. उपरी निर्दिष्ट जोडीपैकीं बालगंधर्व शिल्लक राहिले आहेत, व त्यांनीं नाट्यसृष्टीला आपल्या मनःपूत आणि स्वैर अशा कृत्रिम हावभावादि नटवेषांचें वळण देण्याचा जो क्रम प्रचारांत आणिला आहे, त्याचेंच छचोर वळण सध्यां बहुतेक नाटकी पोरें वळवीत असल्याचें दिसत असून, गृहबालिकांतूनहि तें वळण बरेंच घुसल्यानें, सच्चरिता म्हणून सर्व जगांत गाजलेल्या आमच्या आर्य स्त्रीभगिनी-वर्गाला जो छचोरपणाचा डाग लागूं लागला आहे तो पाहाणें कष्टदायक वाटतें. स्त्री ही जात्याच मोहकावतंस असून तिच्या तारुण्याचें सौंदर्य महान् तत्ववेत्त्यांचीहि जर गाळण उडवितें, तर हल्लींच्या काय किंवा केव्हांच्या काय, उल्लू तरुण पिढीला तशा मोहमायेनें लुब्ध करून सोडावें यांत आश्चर्य तें कोणचें? हीच स्थिति बालगंधर्वांच्या सध्यांच्या नटवेषानें समाजाची करून सोडली आहे. महाकवींच्या नाटकांतल्या नायिका ज्या श्रेष्ठ प्रतीच्या असतात, व ज्यांचा वेष पाहिला असतां प्रेक्षकांच्या मनांत पूज्यभाव उत्पन्न होतो, अशा वेषांतली याच गंधर्वांची पूर्वींची प्रसिद्ध असलेली सं. चंद्रहास नाटकांतली तसबीर पाहा आणि अलीकडील खाडीलकरी नाटकांतील रुक्मिणीची तसबीर

पाहा! कोणच्या तसबिरीच्या दृश्यानें समाजांत नीतितत्वाचीं बोध-जागृति होईल तें आम्ही सांगायला हवें असें नाहीं. 'सत्यभामा सौभाग्यश्रेष्ठा होती, पण रुक्मिणी कुटुंबाची ईश्वरी होती' या व्यास-महर्षींच्या वाक्याला, बालगंधर्वांचा छचोर आणि भ्रष्ट मनोवृत्ति जागृत करणारा स्त्री वेष पाहून हरताळ फांसायला नको, असें त्यांच्या पक्षपात्यांवांचून इतर कोणीहि सज्जन म्हणणार नाहींत अशी आमची खात्री आहे. गणपतराव जोशांच्या वेषधारणेंत—कृत्रिम, अश्लाध्य आणि छचोर वृत्ति कधीं तरी दृष्टीस पडल्याचें कोणी सांगेल काय? त्यांच्या नाटयवेषानें जर कांहीं समाजशिक्षणाचें कार्य केलें असेल, तर तें नामर्द होऊं घातलेल्या तरुणांच्या अंगांत जोम आणण्याचेंच राष्ट्रो-पयोगी काम केलेलें आहे, आणि बालगंधर्वांनीं मात्र आधींच नामर्द बनलेल्या तरुण पिढींत नामर्दाई आणि बाइलेपणा उत्पन्न करण्याचा—मुद्दाम नसला तरी पर्यायानें क्रम सुरू ठेवला आहे असें म्हणणें प्राप्त होतें.

अशा प्रकारची टीका करायला गणपतराव आणि बालगंधर्व याच जोडीची आम्ही निवड कां केली आणि एक गद्य पुरुषवेषधारी व दुसरा संगीत स्त्रीवेषधारी असे हे नट असतां, त्यांच्यांतल्याच विरोधाचें आम्ही स्पष्टीकरण कां केलें? असा येथें प्रश्न उद्भवणें जरी अगदीं साहजिक आहे, तरी त्या बाबतींत 'गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः' या न्यायानेंच सध्यां स्वकृतीनें उत्कर्ष पावलेल्या वरील जोडीवांचून इतर जे नट महाराष्ट्राच्या रंगभूमीवर वागडतांना दिसताहेत ते बहुतेक सारे, याच दोघां नटांचे नकली हावभाव करणारे दिसल[illegible] असून, त्यांच्यांत रंगभूमीवर निराळयाच दिशेची—वरील जोडीप्रमाणें—क्रांति करून सोडण्याचे नैसर्गिक गुण अद्यापि दिसत नसल्यानें [illegible]

कृत्रिमाला सोडून, आम्ही निसर्गानुकरणप्रिय अशांचेंच उदाहरण सोडवून दाखविलें आहे, इतकेंच सांगितलें असतां वाचकांचें समाधान होईल असें वाटतें. वेष, मुखराग आणि इतर अवयवांचे हावभाव या गोष्टींचें जें प्रदर्शन बालगंधर्व दाखवितात, त्यांपैकीं फक्त केशरचनादि वेषभूषांचेंच अनुकरण होत असलेलें जरी सध्यां सर्वत्र दिसत असलें, तरी ती गोष्ट नटाच्या वैभवोन्नतीला आणि गुणोत्कर्षाला प्रामुख्यानें संवर्धक होत नसल्यानें, त्या प्रकाराला उल्लूपणा आणि छचोरपणा असें आम्ही मागें म्हटलें आहे. हा उल्लूपणा अथवा ही छचोरी ढब त्रिकट अभिनयदर्शनाची नसल्यानें तिचा दर्जा केव्हांहि हलकाच म्हणजे—सायंकाळीं खिडकींत उभ्या दिसणाऱ्या क्षणैक मोहकतेप्रमाणें ठरतो हें निर्विवाद आहे. सच्छील गृहिणी, कुमारिका, भावी कांता, गरती, वेश्या आणि नायकीण यांचे पेहराव आणि हावभाव जसे एकमेकांपासून अगदीं भिन्न असायला हवेत, तद्वतच—गृहस्थ, सरदार, कुमार, भावी पति, मध्यम स्थितींतला पुरुष, छाकटा आणि कुलीन शौकी यांचेहि वेष परस्परांहून सर्वथैव भिन्नच असले पाहिजेत; परंतु सध्यांची रंगभूमी पाहिली, तर गरती आणि वेश्या यांच्या वेषभूषांतील जसा फरक दिसत नाहीं, तसाच सरदार आणि गृहस्थ यांच्यातहि दिसत नाहीं. गणपतरावांच्या नटवेषांत असला वाष्कळपणा कधींच झालेला नव्हता. देश तसा वेष किंवा पात्र तसा पोषाख असेंच त्यांचें नेहमी असे. तुकारामाच्या वेषांत त्याना उत्तम लफ्फेदार कंगणीच्या पिळाचें पागोटें घालतां आलें असतें, अथवा रामदासाच्या मस्तकावरील केशांत भांगहि त्यांनां दाखवितां आला असता; परंतु त्यायोगें त्यांची पहिल्या नटांत मात्र गणना न होतां, सध्यां रंगभूमीवर दिसत असलेल्या दामा-

जीपंताप्रमाणें संध्यांच्या तऱ्हेचें ऐटदार पगडबंदी पागोटें घालणाऱ्या मूर्ख-नटांतच त्यांची खात्रीनें विद्वज्जनांकडून पूजा बांधली गेली असती. असो. आतां पूर्वविषयाकडे वळूं.

सत्यनिष्ठा, शालीनता आणि धर्मिपणा हे तीन मुख्य गुण बाल-गंधर्वांच्या अंगीं असल्यानें, आमच्या म्हणण्याची सत्यता त्यांच्या अंतःकरणाला पटून, ते स्वभावसिद्ध नट असल्यानें, समाजाला बहकूं देण्यासारखें शिक्षण देण्याचें सोडून, मनांत आणिल्यास उच्च मनो-वृत्तींच्या गृहिणित्वाचें शिक्षण मनोभावानें समाजाला देऊं शकतील, या आशेनेंच आम्ही इतकें कडक आणि सत्य तें लिहिलें असल्यानें त्यांचा आमच्यावर राग होणार नाहीं अशी आम्हांला आशा आहे. बेअब्रु ही नेहमीं खरें बोलण्यानेंच होत असते, व खरें बोलण्यानेंच ढोंगी अशा असत्यमूर्तीवरचा बुरखा दूर होत असतो; पण या दोन्ही गोष्टींतली पहिली गोष्ट झटपट रंगाऱ्याप्रमाणें चटपट होते व दुसरी गोष्ट कालांतरानें निदर्शनाला येते, एवढाच काय तो त्या दोहोंत जरी फरक आहे, तरी अखेरीस सत्याचाच विजय होतो. सद्हेतूनें केलेल्या या टीकेचा अंशतः जरी परिणाम होऊन, आमची महाराष्ट्र-रंगभूमी पूर्वपदावर आणून सोडण्याचा प्रयत्न करण्याकडे बालगंधर्वांची प्रवृत्ति झाल्याचें निदर्शनास आलें, तरी गणपतरावांच्या व त्यांच्या नटत्वांतील विरोधाचें जें स्पष्टीकरण आम्ही येथें केलें आहे, त्याची अंशतः फलनिष्पत्ति झाल्याबद्दल महाराष्ट्र-रंगभूमी—आपल्याला राजहंस म्हणविणाऱ्या बालगंधर्वांना दुवा दिल्याखेरीज खचीत राहणार नाहीं.

आमच्या पूर्वापार नाट्यसृष्टींत—ऐतिहासिक, पौराणिक, काल्पनिक आणि मिश्र अशा चार प्रकारच्या जरी नाट्यग्रंथांची रचना झालेली

आहे, तरी त्यांतून नीतिभ्रष्ट करणारीं नाटकें मुळींच नसून, स्त्रियांच्या पातिव्रत्त्यविषयक विचारांसंबंधीं विलक्षण प्रकारें आदरबुद्धि राखिली गेली असल्यानें, भारतीय राष्ट्राचें शील, त्याची सभ्यता व त्याचें सदाचरण यांची तें वाङ्मय प्रत्यक्ष साक्षच देतें आहे. 'युवतिजनकथासूक्भावः परेषाम्' या अमच्या अपूर्व आणि पवित्र नीतितत्वाचें, आमच्या राष्ट्रीय नाट्यवाङ्मयांत उत्तम तऱ्हेनें संगोपन झालें असल्यानें, त्याचा परकीय पौरस्त्य आणि पाश्चात्त्य राष्ट्रांवर जो आश्चर्यकारक परिणाम होऊन त्यांना त्यानें साश्चर्यपणें जें तोंडांत बोटें घालवयास लाविलें आहे, तो सध्यांच्या कांहीं आधुनिक नाट्यकृतींनी त्यांचा समज खोडून काढण्याचाच जणूं काय विडा उचलला असल्याचें जें दृष्टीस पडतें आहे, तें पाहून आर्यसंस्कृतीच्या होत असलेल्या नाशाबद्दल दुःख वाटतें.

---

## प्रवेश दुसरा

भरतमुनींनें नाट्यशास्त्र नांवाचा जो एक स्वतंत्र व अद्वितीय असा ग्रंथ लिहिला आहे म्हणून मागें सांगितलें आहे, त्यासंबंधानें दुःखाची गोष्ट अशी आहे कीं, तो सध्यां साग्रावस्थेंत उपलब्ध झालेला नाहीं, व पुढेंहि होईल अशी अशा मानायला अद्यापी यत्किंचितहि आशेचा किरण दृग्गोचर झालेला दिसत नाहीं. या अपूर्व कृतीचे फक्त अठरा, एकोणीस, वीस आणि चौतीस असे चारच अध्याय उपलब्ध झालेले आहेत. अशा स्थितींतहि या फक्त चारच अध्यायांत नाटकासंबंधाची जी मार्मिक माहिती दिलेली आहे ती वाचून त्या ऋषिपुंगवाच्या ज्ञानानें केवढा अपूर्व समग्र

ग्रंथ निर्माण केला असला पाहिजे, याचें जेवढें कौतुक वाटतें, तेवढेंच तो नष्ट झाल्याचें दुःखहि होतें. सध्यां उपलब्ध असलेल्या चार अध्यायांत जेवढी माहिती वाचायला मिळते तेवढी सर्व नाटकशास्त्राच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाची व हव्या त्या काळीं उपयोगी पडणारी अशीच आहे, यांत संशय नाहीं.

भरतमुनींनी नाटकाची व्याख्या मोठ्या मार्मिकपणाची आणि थोडक्यांत जी दिली आहे ती अशी:—' नाटक म्हणजे अनेक भावांनीं युक्त आणि नानाविध रसांनीं भरलेलें असें जें सुखदुःखात्मक मानवी चरित्र तेंच नाटक;' म्हणजे सदैव दृष्टीस पडणारा व दृष्टीस पडणें शक्य असलेला जो प्रपंचादर्श तेंच नाटक होय.

वरील व्याख्येंत-लोकस्थिति, समाजावस्था, राष्ट्राची उन्नती व अवनती, धर्मस्थिति, विद्यावस्था, राजकीय परिस्थिति, साम्राज्यावस्था, शास्त्रीय गति, कलावस्था, नीतीची अवस्था, प्रजास्थिति, दुष्टदंडन, नास्तिकखंडन, शौर्यादिगुणमंडन वगैरे सर्व कांहीं अंतर्भूत झालेलें आहे, हें सहजीं ध्यानांत येण्यासारखें आहे. ज्या नाटक या शद्बाची ही व्याख्या भरतमुनीनें केली आहे, त्या नाटकग्रंथाचे—नाटक, प्रकरण, भाण, त्रोटक, नाटिका, सट्टक, व्यायोग, समवकार, डिम, व वीथी असे दहा प्रकार केलेले आहेत. नाटकलेखकानें नाटक कसें लिहावें व नटांनीं त्याचा प्रयोग कसा वठवावा याबद्दलच्या ज्या सूचना या ग्रंथांत केलेल्या आहेत, तें सर्व भारूड प्रकृत चरित्रविषयक ग्रंथाला सोडून असल्यानें तें येथें देतां येत नाहीं त्याला उपाय नाहीं. भरतानें नाटकाच्या नायकांचे जे चार वर्ग केले आहेत व ज्यांचा या चारित्राशीं संबंध येतो आहे, त्याचें येथें दिग्दर्शन करणें भागच आहे. धीरोद्धत, धीरललित, धीरोदात्त आणि

धीरप्रशान्त हे ते चार वर्ग होत. या चार वर्गांपैकीं पहिल्या वर्गांत देव आणि तद्रूप जे साधु ते येतात. दुसऱ्यांत नृपवर आणि सामंत येतात. तिसऱ्यांत सेनापति आणि अमात्य येऊन, चौथ्यात ब्राह्मण आणि वणिग्जन यांची गणना होते. या चारी प्रकारच्या भूमिका भिन्नरसांत किती अवर्णनीयपणें तद्रूप झालेल्या गणपतराव जोशी करीत असत याची साक्ष त्यांच्या प्रेक्षकांवांचून आतां पुढच्या पिढीला देतां येणें शक्य नाहीं. नायिकेचे सुद्धां असेच चार प्रकार केलेले आहेत. धीरा, ललिता, उदात्ता आणि निभृता या त्या चार प्रकारच्या नायिका होत. दिव्यांगनांचा यांतील पहिल्या प्रकारच्या नायिकेंत सामावेश होऊन, दुसऱ्या प्रकारांत नृपस्त्रियांची योजना होते. कुलवधु तिसऱ्या वर्गांत बसून, चौथ्यांत गणिकादिकांची योजना करण्यांत येते. गणपतरावजींचे जोडीदार जे बाळाभाऊ जोग ते या चारी प्रकारच्या नायिकांत गणपतरावांच्या तोडीचेच स्त्रीनटवेषधारी होऊन गेले. सध्यां बाळाभाऊंची नक्कल जर कोणास पाहायची असेल, तर पुण्यांतील सोशल क्लबच्या चिंतामणराव ऊर्फ आप्पा गोखल्यांच्या भूमिका पाहिल्यानें आमच्या म्हणण्याचें थोडेंसें प्रत्यंतर येणार आहे. वरील चारी प्रकारच्या भूमिकांत मनांत आणिल्यास बालगंधर्व जसे सध्यां सर्वांना थक्क करून सोडण्याच्या लायकीचे आहेत, तद्वत् पूर्वकाळीं पहिल्या तीन प्रकारच्या नायिकांच्या कामात—शंकरराव मुजूमदार, भाऊराव कोल्हटकर, दत्तोपंत हल्याळकर, विनायकराव कौठेकर, गोपाळराव मराठे व छबूराव इतकी मंडळी प्रसिद्धीस येऊन गेली आहे. नायकांच्या कामांत सध्यांच्या महाराष्ट्ररंगभूमीवर—प्रो. गो. गो. टीपनीस हे जसें कांहीं वर्षांपूर्वी आपल्या अभिनयनैपुण्यानें आणि छापदार भाषणपद्धतीनें

चमकले, तसेंच नानबा गोखले, बाबूराव आठवले, दत्तोपंत काळे वगैरे मंडळी जरी बरेपणानें चमकते आहे, तरी त्यांच्यांत कोणांत कांहीं तर कोणांत कांहीं अशीं व्यंगें असून, पूर्णांश असा एकांतहि नाहीं.

आमच्या देशांत नाटचकला जरी पूर्णावस्थेला गेलेली आहे व ती जरी शास्त्रबद्ध झालेली आहे, तरी तिच्यांत गद्यपद्यांचें प्रारंभापासूनच मिश्रण आहे. तात्त्विक विचारानें आणि कविकल्पनेनें विचार केला असतां, सर्व सृष्टी व तिचे सर्व व्यापार हे कवितामयच आहेत असें जरी कोणीहि सिद्ध करूं शकला, तरी कविता गद्यावांचून होणें कधींहि शक्य नाहीं असेंच कोणालाहि कबूल करणें भाग पडेल. कारण, ॐ या शब्दब्रह्मापासूनच स्वरोत्पत्ति झालेली आहे. असें असतां, आमच्याकडें जे नाटचग्रंथ झाले ते सारे गद्यपद्यमिश्रित का झाले? असा जर कोणी प्रश्न करील, तर त्याचें उत्तर असें आहे कीं, आमच्याकडे पूर्वापार सध्यांसारखी लेखनसामुग्री विपुलावस्थेंत नसल्यानें, लौकर व हुबेहुब ध्यानांत ठेवण्यास योग्य अशा कवित्वाच्या रचनेंतच प्रथम सर्व गोष्टींची शास्त्रें वगैरे ग्रंथ रचण्याचा जो संप्रदाय पडला, त्यालाच अनुसरून नाटचग्रंथहि जरी लिहिले गेले, तरी तें संसाराचें चित्र असल्यानें त्यांत वर्णनात्मक भाग तेवढेच पद्यांत गोंवून, बाकींचे भाग नैसर्गिक गद्यांत ठेवण्याचा प्रचार सुरू झाला. आमच्याकडे विजयानगरच्या नाशाबरोबर आमच्या नाटचकलेचाहि ऱ्हास झाला. तदनंतर मुसलमानीं अम्मल सुरू झाल्यामुळें, व त्यांच्यांत ही कला नसल्यानें, या कलेचा कोणीच वाली राहिला नाहीं. ही कला नाश पावल्यावर, तिची जी कांहीं करपलेलीं अवशेष बीजें जीव धरून राहिलीं होतीं, तीं कर्नाटकांत होतीं, व त्याच बीजांच्या जोमावर सध्यांची महाराष्ट्र-रंगभूमी रंगलेली दिसते आहे.

## गद्यनाट्याचार्य गणपतरावांचें चारित्र.

आमची महाराष्ट्र–रंगभूमि सध्यां ज्या स्वरूपांत दिसते आहे, तशा स्वरूपांत ती पुढें दिसेल असें साठ वर्षांपूर्वीच्या लोकांच्या ध्यानींहि आलें नसेल, मग स्वप्नीं तरी कोठून येणार? त्या वेळीं दशावतारी नाटकें व ललितें यांवांचून इतर कोणत्याहि नाटयप्रयोगाची माहीती संस्कृत नाटयग्रंथ वाचणाऱ्या विद्वानांवांचून इतर कोणाहि सामान्यजनांस नव्हती. विद्वान् लोक तरी काव्याभ्यासाच्या दृष्टीनेंच त्या काळीं नाटय-ग्रंथ वाचीत असत. ललितें बहूतकरून चैत्रवद्य आमावास्येच्या सुमारास होऊन, त्यांत रामाकडून रावणाचा वध करवून ललित संपवीत असत. दशावतारी नाटकें त्या काळीं कांहीं ठिकाणीं करीत असत; परंतु त्या प्रयोगांनां सध्यांसारख्या सामानाच्या संसाराची जरूर लागत नसे. एक सरकपडदा, दोनचार हिलाल, दोनचार धोतरें व लुगडीं, दोन तीन कागदी अथवा पानांचे किरीट आणि राळ व शेंदूर इतकी अल्प सामुग्री त्या दशावतारी नाटकांनां पुरेशी होई. त्या काळीं भानुदास-सांप्रदायी मंडळी जशी ललितें करण्यांत प्रसिद्ध होती, तद्वतच पुण्याजवळील चिंचवडकर मंडळीचाहि ललित करण्याचा लौकिक होता. या ललितांत संगतवार भाषणांचा पूर्ण आभाव असे. तो सर्व धांगड-धिंग्याचा व प्रेक्षकांत हास्य आणि अद्भुत या रसांचा उठाव करण्याचा प्रकार होता.

मुसलमानीं अमदानीबरोबर तमाशांचा प्रकार महाराष्ट्रांत सुरू झाला. बादशाही अमलानें ज्या कांहीं चैनींचे आणि करमणुकीचें प्रकार समाजांत रूढ झाले, त्यांपैकींच तमाशे हे होत. यांत अश्लील-पणा फार असे. याचेंच अनुकरण मराठेशाहींत प्रसार पावलें. तुणतुणें, डफ, नाच्या पोऱ्या व चाहाटळपणाची मधून मधून सोंगें

आणणें अशा प्रकारची या तमाशांची सामुग्री असून, यांत ज्या लावण्या म्हणण्यांत येत असत, त्यांतून श्रृंगाररसांतला विचकटपणा गोंविलेला असे, व बीभत्सरसाचा प्रवाह ओ येईतों प्राशन करायला सांपडे. रावबाजींच्या कारकीर्दींत या प्रकाराचा कळस झाला. त्या अमदानींत रामजोशांसारखे विद्वान् ब्राह्मणहि स्वतः लावण्या रचून नाच्या पोऱ्याच्या मागें तुणतुणें वाजवीत आणि डफ फडफडावीत लावण्या म्हणून द्रव्य कमावण्याला पुढें सरसावूं लागले होते. मयूर कवीच्या केकावलीचें स्पष्टीकरण छापणाऱ्या एका विद्वानानें त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत, या बाबतींतलें तत्कालीन फाल्गुनमासाचें जें वर्णन केलें आहे, तें वाचून मनाला खंतीच वाटते. पुण्याचा हा प्रकार पाहून वाई, सातारा, वगैरे प्रांतांतून लावण्या रचणारे व तमाशे करणारे जे लोक निर्माण झाले, त्यांपैकीं सांगलीजवळील कौलापुरकरांचा तमाशा बराच प्रख्यातीला आला होता. तेथें कृष्ण जोशी नांवाचे कोणी देशस्थ ब्राह्मण सोलापुरकर रामजोशांसारखेच जरी लावण्या रचणारे होऊन गेले, तरी पण त्या दोघां जोशांत रामजोशीच तत्कालीन जनतेला प्रिय झाले होते. रामजोशी स्वतः चांगले व्युत्पन्न व वेदांती असल्यानें, त्यांनीं प्रथम जरी श्रृंगारिक लावण्यांची बहार उडवून दिली होती, तरी अखेरीस लोकरंजनाबरोबर त्यांनीं आपल्या तमाशांतून समाजाला सदुपदेश देण्याचेंच काम चालविलें होतें. त्या वेळीं तमाशे प्रिय असल्यानें समाजांत नाट्यशिक्षकांच्या ऐवजीं तमासगीर शिक्षकच पैदा होऊं लागले होते, व त्यांतला पहिला नंबर रामजोशांनीं पटकावला होता. त्यांच्या खालचे नंबर—साळु, मैना, गणपतीबोवा लंबोदर वगैरेनीं मिळविले होते. या तमाशांबरोबरच गोंधळी लोकांच्या गोंधळांचाहि

त्या वेळीं उदय होऊन, त्यांत कांहीं नकला करणारे गोंधळी समाजप्रिय बनले होते. तमाशे, गोंधळ व ललितें हे तिन्ही प्रकार परस्परांहून अगदीं भिन्न होते. ललितांत पौराणिक कथांचा सामावेश होत असे व तमाशे आणि गोंधळ यांत तत्कालीन समाजस्थितीचें निदर्शन करण्यांत येत असें. सवाईमाधवराव आणि नाना फडनवीस यांचीं सोंगें निजामशाहीच्या दरबारांतील तमाशांत आणिलीं असल्याचा इतिहास प्रसिद्धच आहे. पेंढाऱ्यांच्या बंडावरील रामजोशांचा पोवाडा आणि पाटसकर सावजी मह्लापा यांच्या ललिती मंडळींतील रामा गोंधळीं जे म्हणत असे ते ऐतिहासिक पोवाडे त्या काळीं महाराष्ट्रांत फार प्रिय झाले होते. ललितवाले, तमासगीर आणि गोंधळी या त्रिपुटांत बहु-रूप्यांनीं आणखी आपली भरती करून घेऊन, भावी नाट्यसृष्टीच्या इमारतीच्या चौकोनी पायाचें काम पुरें केलें. या बहुरूप्यांनीं चांगलाच नांवलौकिक कमाविला होता; परंतु त्यांचीहि अवस्था सध्यां ललितें, तमाशे व गोंधळ यांच्याच प्रमाणें नामनिर्देशापुरती उरलेली आहे.

एकंदरींत काय कीं, रावबाजींच्या कारकीर्दींत जीं ललितें, जे तमाशे, जे गोंधळ व जे बहुरूपे उदयास आले, त्यांची अवनति इ. स. १८४१ पर्यंत होत होत, अखेरीस त्या चौकटीच्या पायावर इ. स. १८४३ मध्यें महाराष्ट्राच्या रंगभूमीवर प्रथम मराठी नाटकें होण्यास सुरवात झाली.

## प्रवेश तिसरा.

महाराष्ट्राच्या रंगभूमीवर पहिला नाट्यप्रयोग मराठी भाषेंत करणारे सांगलीचे विष्णुपंत भावे हे होत. उत्तर कानड्यांतली भागवत नांवाची जी नाटकमंडळी होती, तिचे जे दोन तीन प्रयोग तत्कालीन सांगलीसंस्थानाधिपति श्री. आप्पासाहेब पटवर्धन यांनीं सांगलीस करविले होते, ते कानडींतले पारिजातभौमासुर वगैरे खेळ पाहून मराठींत त्या धर्तीवर—परंतु संगतवार भाषणांचे व चांगल्या पोषाखांचे नाट्यप्रयोग करण्याची रा. भावे यांस जी इच्छा झाली ती, श्री. सांगलीकरांनीं आपला आश्रय देऊन पुढें तडीस नेली.

रा. भावे यांनीं प्रथम सीतास्वयंवराचें आख्यान स्वतः तयार करून त्याचा पहिला प्रयोग इ. स. १८४३ मध्यें सांगलीस श्रीमंतांना करून दाखविला, व तो त्यांस पसंतहि पडला. भावे हे आपल्या प्रयोगांत प्रथम सूत्रधार, गणपति, सरस्वती, विदूषक वगैरे जीं पात्रें आणीत, तो प्रकार त्यांनीं कर्नाटकी नाट्यसांप्रदायांतून घेतला होता. भाव्यांच्या नाटकांतला सूत्रधार हा सध्यांचा (प्रॉम्टर-वाग्सूचक) नक्कल सुचविणारा असे. तो सूत्रधार आपल्या पद्यांत पात्रांच्या भाषणाचा सारांश व संविधानक या गोष्टी हातांतील झांजेच्या तालावर म्हणून दाखवीत असे. या सर्व गोष्टींचें थोडक्यांत पण चटकदार असें वर्णन रा. कुळकर्णी यांनीं आपल्या 'मराठी रंगभूमी' या नांवाच्या पुस्तकांत चांगल्या प्रकारें केलें आहे.

भावे यांनीं पुढें आणखी कित्येक प्रयोग स्वतः पद्यें रचून बसविले व आपली नाटकमंडळी सांगलीकर या नांवानें बाहेरगांवीं खेळ करण्यास नेली.

त्यांनी आपली नाटकमंडळी प्रथम सांगलीहून कोल्हापुरास नेली व तेथून पुण्यास आणिली. भाव्यांच्या नाटकमंडळीचा दिग्विजय पाहून व पौराणिक नाटकें करण्याची हातोटी लक्षांत घेऊन, त्यांना प्रतिस्पर्धी अशा दुसऱ्या ज्या सांगलीकर, आळतेकर, इचलकरंजीकर, कोल्हापुरकर वगैरे नाटक मंडळ्या निघाल्या त्याहि त्या काळीं लौकिकाला पात्र झाल्या होत्या. नाटकमंडळ्या फुटून त्यांच्या शाखा उपशाखा होण्याची वहिवाट पूर्वापारचीच आहे. ती नवीन नाहीं. एका सांगलीकर मंडळीच्या ज्या चार सांगलीकर मंडळ्या बनल्या त्याच या गोष्टीची साक्ष होत. प्रथम जी रा. भावे यांनीं सांगलीकर नाटकमंडळी काढली व तिच्याच धर्तीवर पुढें ज्या सुमारें शें सवाशें नाटकमंडळ्या निघाल्या त्यांपैकींच रामभाऊ कोर्लेकरांची पौराणिक नाटकें करणारी एक मंडळी कोंकणांत गेली होती. तिच्यांतलिच शाहूनगरवासी नाटकमंडळीचे उत्पादक कृष्णाजी बजाजी जोशी ऊर्फ जोशीबोवा हे होत. त्यांनींच आमचे चरित्रनायक जे गणपतराव जोशी त्यांना बालपणांतच कोंकणांतून ठाण्यास कसे नेले तें मागें सांगितलेंच आहे. जोशीबोवांनीं ठाण्यास एका ब्रह्मचाऱ्याच्या हांतून नारळ फोडवून आपली श्रीशाहूनगरवासी या नांवाची नाटकमंडळी इ. स. १८८१ सालीं प्रथम जी सुरू केली, ती अद्यापी त्यांतलें श्री हें अक्षर गळून नुसत्या पुढच्याच नांवानें सुरू आहे. ही मंडळी इ. स. १८९० पर्यंत पौराणिक नाटकेंच जरी करीत असे, तरी मधून मधून बुकिश नाटकेंहि करी. पौराणिक नाटकें करण्याची पद्धति व त्यांचा सरंजाम याचें मनोरंजक वर्णन रा. कुळकर्णी यांनीं आपल्या ग्रंथांत जें केलें आहे, तें बहुतेक सर्व खरें असल्याचें गणपतरावांनीं कबूल केलें होतें. तत्कालीन नाटकमंडळ्यांचा इतिहास येथें


देण्यास सवड नसल्यानें, बुकिश नाटकांची उत्पत्ति महाराष्ट्र-रंगभूमीवर होईपर्यंतचा इतिहास वाचण्याची ज्यांना अपेक्षा असेल त्यांनीं ती रा. कुळकर्णी यांचा ग्रंथ वाचून पुरवून घ्यावी.

कृष्णाजी बजाजी जोशी हे मूळचे सातारचे रहिवासी असल्यानें त्यांनीं मोठ्या प्रेमानें आपल्या गांवचें म्हणजे शाहूनगरीचेंच नांव आपण स्थापिलेल्या नाटकमंडळीला ठेविलें हें सरळच झालें. जोशी-बोवांनीं ठाण्यास सुरू केलेल्या आपल्या कंपनीचा संबंध आमरण सोडला नाहीं. त्यांचें देहावसान त्यांच्या वयाच्या ६९ व्या वर्षी कोल्हापूर येथें इ. स. १९२० सालीं म्हणजे गणपतरावांच्या निधनाच्या आधीं फक्त दोनच वर्षे झालें. त्यांना पोटीं संतान नसल्यानें व गणपत-रावांना त्यांनीं पुत्रवत् मानिलें होतें म्हणून, गणपतरावांनीं त्यांचें मरणो-त्तर और्ध्वदेहिक शास्त्रोक्तविधीनें पुत्रवत् केलें व आमरण त्यांच्या पत्नीला आपल्या जवळ बहिणीप्रमाणें संभाळिली. जोशीबोवा हे नाट्यक-लेच्या निरुपयोगी झाले असतां व पुढें पुढें त्यांचें आणि गणपतरावांचें नीट पटतहि जरी नव्हतें तरी, शाहूनगरवासी नाटकमंडळीचे जोशीबोवा हे मुख्य मालक होते ही जाणीव मात्र गणपतरावजींच्या स्मरणांतून अखेर-पर्यंत गेली नव्हती याचें द्योतक हेंच होय कीं, त्यांनीं जें आपलें मृत्युपत्र केलें आहे, त्यांत जोशीबोवांच्या विधवा पत्नीस, तिच्या मृत्यू-पर्यंत दरमहा पंचवीस रुपये उदरनिर्वाहार्थ मिळण्याची व्यवस्था आपल्या इस्टेटीच्या ट्रस्टींच्या मार्फत करून ठेविली आहे. ठाण्यास जोशीबोवांचे खेळ सुरू झाले त्यावेळीं गोविंदबोवा सुपेकर यांजकडे जें सूत्रधाराचें प्रथम काम देण्यांत आलें, तें पौराणिक नाटकें करण्याचें त्या मंडळीनें बंद करीपर्यंत त्यांच्याचकडे कायम होतें. राक्षसकचेरीचें मुख्य काम

जोशीबोवांकडे आणि देवकचेरीचें मुख्य काम सदोबा म्हणून जे एक गृहस्थ त्यांच्या कंपनींत होते, त्यांच्याकडे असे. गणपतरावांकडे नेहमी देवसोंगांचींच कामें असत. गणपतरावांना जरी उत्तम तऱ्हेनें तालावर नाचतां येत असें, तरी त्यांना जात्या स्त्रीवेषाचा अत्यंत कंटाळा असे. ठाण्याहून मंडळी बाहेर पडल्यावर ती गोमांतकाच्या बाजूला गेली असतां, पेडणें मुक्कामीं एकदां गणपतरावांच्या इच्छेविरुद्ध त्यांस सरस्वतीचें सोंग देण्यांत आलें होतें; परंतु तसें सोंग पुन्हां आपणांस देण्यांत येऊं नये, एतदर्थ त्यांनीं त्या सरस्वतीच्या सोंगांत नाचतांना रंगभूमीवर मोठ्या खुबीनें जें ठेंच लागण्याचें निमित्त करून लोटांगण घातलें, त्या लोटांगणानें त्यांची तेव्हांपासून स्त्रीवेषांतून कायमचीच मुक्तता झाली व तें काम हरी म्हणून जो एक गणपतरावांचा समवयस्क मुलगा होता त्याच्याकडे गेलें. हाच हरि बाळाभाऊ जोगांचा आद्यगुरु होय. हा हरि मुलगा गणपतरावांच्या पेक्षांहि पुढें उत्तम नट बनला असता, असें जे जोशीबोवा केव्हां केव्हां मोठ्या प्रौढीनें उद्गार काढीत असत, त्या त्यांच्या बोलण्यांत बरीच सत्यता होती; कारण, तो आपल्याहून खात्रीनेंच पहिल्या प्रतिचा नट झाला असता असें गणपतरावहि कित्त्येकदां म्हणालेले आम्हांस आठवतें. हा हरि मुलगा एकाएकीं कॉलऱ्यानें मृत्युमुखीं पडला. तो गणतपरावांपेक्षां खुबसूरत असून, त्याच्या आवाजाची टीप गणपतरावांच्या आवाजाच्या वरच्या सप्तकांतली व अत्यंत कर्णमधुर असे, असें गणपतरावांनीं मोठ्या प्रेमानें आम्हांसारख्यांना अनेकदां सांगितलेलें आहे.

कोंकणांत जोगांची साखरवाडी म्हणून जें एक खाडीकांठचें खेडें आहे तेथील कृष्णाजी महादेव ऊर्फ बाळाभाऊ जोग हे मूळचे राहणारे होत. बाळाभाऊ जोग यांचे वडील नागपुराकडे सरकारी अंमलदार होते.

तेथेंच बाळाभाऊंचें इंग्रजी तिसऱ्या इयत्तेपर्यंत शिक्षण झालें होतें. बाळाभाऊंचें लग्न त्यांच्या वयाच्या तेराव्या वर्षी झालें व तेव्हांपासूनच त्यांची व विद्याभ्यासाची फारकत त्यांच्या वडिलांच्या मृत्यूमुळें झाली. बाळाभाऊ जोगांना जोशीबोवांच्या नाटकांत पळवून आणणारे एक त्यांच्याच गांवाजवळच्या गांवीं राहणारे व शाहूमंडळींत त्यावेळीं स्त्रीवेष धारण करणारे गोविंदराव या नांवाचे गृहस्थ परवां परवां पर्यंत मुंबईस एका फराळाच्या दुकानाचे मालक म्हणून हयात होते. हे गृहस्थ बाळाभाऊंचे लहानपणचे मित्र होते. यांनीं बाळाभाऊंचें मन नाटकांत जाण्याविषयीं जरी वळविलें, तरी घरून सांगूनसवरून नाटकांत जाण्याचें धाडस बाळाभाऊंना होईना, आणि म्हणून गोविंदरावांनीं त्यांना पळून जाण्याची जी एक अजब युक्ति सुचविली, तीच त्यांना अखेरीस पसंत पडली. रोजच्या परिपाठाप्रमाणें बाळाभाऊ आपल्या कोंकणच्या घराच्या पडवींतल्या ओसरीवर रात्रीं निजले. सर्वत्र सामसूम झाल्यावर, उजाडे पर्यंत आपण पळून गेल्याचा कोणाला थांग लागूं नये म्हणून त्यांनीं आधींच दिवसा एक अंब्याचा आपल्या उंचीचा बघून ठेविलेला ओणका, हलकेच अंधारांतून आणिला व तो अंथरुणावर ठेवून त्यावर पासोडी घातली आणि खाडीच्या बाजूला लपून बसलेल्या गोविंदाकडे प्रयाण केलें. त्या वेळीं गोविंदाचें वय विशीच्या सुमाराचें असून, तो बाळासारख्या नाजूक पोराला हनुमानाप्रमाणें खाडीपार नेण्याच्या ताकतीचा असल्यानें, बाळाला आलेला पाहातांच त्याला खांद्यावर घेऊन त्यानें खाडींत पाऊल टाकलें. पुढें एक होडकें आगाऊच तयार करून ठेविलें होतें, त्यांत ते दोघे जाऊन बसले व पलीकडच्या बंदराला रातोरात पोंचून, त्या दोघांनी गोंव्याच्या बोटीनें गोंव्याच्या बंदराकडे प्रयाण केलें.



**दासी**—मी खात्रीनें सांगते या अगदीं गाढ झोपेंत आहेत.
Photo by—R. N. Joshi मॅक्बेथ अं. ५ प्र. १

संग्रहाल

याप्रमाणें बाळाभाऊंचा प्रथम जो शाहूमंडळींत प्रवेश झाला तो अखेरपर्यंत कायम टिकला. त्या दोघांना आलेले पाहातांच जोशी-बोवांनां जरी फारच आनंद झाला, तरी बाळाभाऊंच्या दुःखी विधवा मातेची घरीं काय मनःस्थिति झाली असेल, याची कल्पना त्यांनां होणें शक्य नव्हतें. बाळाभाऊंच्या मातेनें अत्यंत शोकाकुल अंतःकरणानें आपल्याकडून हवा तेवढा शोध करण्याचा प्रयत्न केला, परंतु शाहू नाटकमंडळी गोंव्याकडून मुंबईच्या मुक्कामाला येईपर्यंत त्या माउलीला तिच्या बाळाचा पत्ता लागला नाहीं. बाळाभाऊंना जो एक धाकटा भाऊ होता त्याच्याकडे पाहून जरी तोंपर्यंत ती माउली दिवस कंठीत होती, तरी आठ वर्षांची सून म्हणजे बाळाभाऊंची पत्नी जी घरांत असे तिच्याकडे पाहून त्या बाईचें अंतःकरण भडभडून येत असे. असो.

बाळाभाऊ शाहूमंडळींत प्रविष्ट झाल्यानंतर पांच सहा महिन्यांनीं गोंव्याच्या मुक्कामींच वर सांगितलेल्या हरीला, नाटकप्रयोग सुरू असतां एकाएकी कॉलऱ्याची भावना झाली व त्यानें आपलें सोंग उतरून तें बाळास करावयास सांगितलें. तोंपर्यंत बाळा त्याच्या हाताखालचीं दुसऱ्या प्रतीचीं स्त्रीवेषांचीं सोंगें करूं लागला होता. बाळाभाऊ नाटकांत गेल्यावर त्यांच्याकडे प्रथम सरस्वतीचें सोंग आलें व तें त्यांचें सोंग प्रथम हरीनेंच सजविल्यामुळें, बाळाभाऊ मरेपर्यंत त्या हरीलाच आपल्या गुरु-पदाचा मान देत असत. हरीला कॉलऱ्याची भावना होऊन त्यानें आपलें देवयानीचें सोंग बाळाला करायला सांगितलें व त्या प्रमाणें त्यानें तें करण्याची तयारी केली असतां, उरोजांसाठीं त्याला चिंध्यांचे मनाजोगे बोळे मिळेनात म्हणून, हरीनें उरोजासाठीं जे आपले पायमोजे काढून त्याला दिले ते पायमोजे गुरुप्रसाद म्हणून बाळाभाऊंनीं अखेर-

पर्यंत मोठ्या भक्तिभावनेनें जपून ठेविले होते. त्याच गुरुप्रसादावर आपण इतक्या नांवालौकिकाला चढलों आहों असें सांगण्यांत बाळाभाऊंना मोठा आनंद वाटत असे, व ते पायमोजे त्यांच्या वेषधारणेच्या वेळीं जरा आजूबाजूलाहि झालेले त्यांना खपत नसत. पिंवडी लावतांना प्रथम त्या पायमोजांना नमन करून ते रंगण्यास सुरुवात करीत असत. हरीनें बाळाभाऊंना जें आपलें देवयानीचें म्हणजे मुख्य नायिकेचें सोंग गोंव्याच्या मुक्कामीं दिलें, तें नायिकेचें सोंग कोणच्याहि नाटकांत त्यांच्याकडे पुढें हरीच्या मृत्यूमुळें कायमचेंच राहिलें. गणु व बाळा ही नायक व नायिका अशी जी यावेळीं जोडी जमली, ती यावेळेपासून पुढें बाळाभाऊंच्या मरणापर्यंत कायमची टिकली. गोंव्याहून मंडळीचा मुक्काम हरीच्या मृत्यूनंतर हलला व ती मंडळी तेथून निघून पायरस्त्यानें गांवोगांव मुक्काम करीत, कोल्हापुरास येऊन थडकली. कोल्हापुरास त्यावेळीं कै. बळवंत नारायण जोशी या नांवाचे एक बी. ए. एल् एल्. बी. गृहस्थ राजपुत्राचे शिक्षक म्हणून जे होते त्यांचा त्या मंडळीला पाठिंबा मिळून, त्यांची पौराणिक नाटकें जरीं कोल्हापुरास होऊं लागलीं, तरीं पडावा तसा प्रकाश न पडल्यानें ती मंडळी पुन्हां कोंकणांत गेली व तेथून प्रारंभीच्या ठाणें मुक्कामीं आली. या मुक्कामांत त्या मंडळीनें प्रथम बुकिश असें ' स्वैरसकेशा ' नांवाचें नाटक बसवून त्याचे प्रयोग सुरू केले.

बुकिश नाटकें या वेळीं अस्तित्वांत येऊं लागून पौराणिक नाटकांच्या अवनतीचा काळ सुरू झाला होता. याचा इतिहास ' रंगभूमी ' नांवाच्या आपल्या ग्रंथांत रा. कुळकर्णी यानीं साद्यंत दिलेला आहे, सबब येथें त्याची द्विरुक्ती करण्याचें कारण नाहीं. बुकिश नाटकें

म्हणजे निव्वळ गद्य नाटकें जसजशीं अस्तित्वांत येऊं लागलीं, तसतसा मनु पालटत जाऊन पौराणिक नाटकांपेक्षां गद्य म्हणजे प्रोज नाटकांना जें उत्पन्नाचें मान वाढूं लागलें, त्याचें मुख्य कारण समाजांतील पाश्चिमात्त्य विद्येचा प्रसार हेंच होय. थोरले माधवराव, दुर्गा, जयपाळ, मृच्छकटिक, सिंबेलाईन–तारा, पद्मावती, शशिकला रत्नपाल, गुणोत्कर्ष वगैरे बुकिश नाटकांचे प्रयोग होऊं लागल्यानें, पौराणिक खेळ करणाऱ्या ज्या कांहीं नाटकमंडळ्या जीव धरून राहिल्या होत्या, त्यांची उपासमार होण्याची वेळ येऊं लागली, व हलके हलके एकेक मंडळीं आपली किरीटकुंडलें उतरून ठेवून, वानप्रस्थाश्रम स्वीकारूं लागली. शाहूमंडळीचीहि तीच अवस्था होण्याच्या पंथांत आली होती; परंतु ईश्वराची मर्जी तशी नसल्यानें त्या मंडळीला ज्या कांहीं नव्या पिढीच्या सुशिक्षित मंडळीनें हातीं धरून, नव्या दिशेला लाविलें, त्यापैकीं पुण्याचे कै. अनंत नरसो गोडबोले हे एक तत्कालीन मुंबईस डॉक्टरीचा अभ्यास करणारे विद्यार्थी पुढारी होते. हे पुण्याच्या हायस्कूलचे हेडमास्तर कै. महादेव मोरेश्वर कुंटे यांचे पट्ट छात्र होते व त्यांचें इंग्रजी भाषेवर चांगलेंच प्रभुत्व होतें हें आम्हांस माहीत आहे.

इ. स. १८८५–१८८६ सालापासून महाराष्ट्र–रंगभूमीची पडदे वगैरेच्या बाबतींत बरीच सुधारणा जरी होऊं लागली होती व बुकिश नाटकांना चांगलाच मान मिळूं लागला होता, तरी पण नाटकें करणें हा हलक्या प्रतीचा धंदा आहे, अशी जी सर्वसाधारण समजूत होती, ती नष्ट होण्याच्या पंथाला लागली नव्हती. नाट्यकलेसारखी अद्वितीय कला समाजांत इतक्या हीनदशेला पोंचण्याचें कारण, तिच्याबद्दलचें

अज्ञान, आणि तत्कालीन नाटकी लोकांचें स्वैरवर्तन याच गोष्टी मुख्यत्वें असाव्यात असें वाटतें. कॉलेज व शाळा यांतून सुशिक्षित मंडळी जेव्हां नाटकें करूं लागली व आर्योद्धारक मंडळीसारख्या मंडळीला जेव्हां तत्कालीन विद्वानांचा पाठिंबा मिळूं लागला, तेव्हां नाट्यकला ही एक चांगली व उपयोगी कला आहे असे उद्गार समाजांत निघण्यास प्रारंभ झाला. याच गोष्टीचा फायदा शाहुनगरवासी नाटक मंडळीला पुढें मिळाला. पुण्याच्या किंवा अखिल महाराष्ट्राच्या वातावरणांत ज्यांचा कीर्तिदुंदुभी प्रलयकालपर्यंत दुमदुमत राहणार आहे अशा कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांसारख्या विद्वद्रत्नांनीं व त्यांचे अनुयायी जे तेव्हांचे राजश्री व अलीकडील लोकमान्य टिळक, त्यांनीं या नाट्यकलेला उचलून धरल्यानेंच ही कला सद्यःस्थितीला येऊन पोंचली आहे, असें म्हणण्यास हरकत वाटत नाहीं. लो. बा. गं. टिळक हे आपल्या अमदानीच्या प्रारंभापासूनच नव्या व कौतुकास्पद अशा राष्ट्रीय कलादिकांच्या वडामोडींत भाग घेणारे असल्यानें, कै. आण्णासाहेब किर्लोस्करांनी काढिलेल्या आपल्या नांवाच्या नाटकमंडळीच्या नव्या संस्थेच्या हस्तपत्रकांवर, ती लोकमान्य व्हावी म्हणूनच जणूं काय प्रथम व्यवस्थापक म्हणून—टिळक, आगरकर आणि डॉक्टर गर्दे यांच्या सारख्या विद्वानांच्या सह्या छापिल्या जात असत, असें बिनधोक म्हणतां येतें; परंतु आतांच्या विद्वान म्हणवणारांना तसें करण्यास लाज वाटते, ही गोष्ट निराळी आहे.

शाहूनगरवासी मंडळीला तत्कालीन काहीं सुशिक्षित व तरुण मंडळीनें हातीं धरलें व त्यामुळेंच तिची पूर्वीची पौराणिक दिशा बदल-लिला जें नवें स्वरूप प्राप्त झालें असें मागें सांगितलें आहे, त्या

गोष्टीचा प्रारंभ इ. स. १८८६ सालीं प्रथम झाला. पुण्याची एक शेषासानी या नांवाची प्रसिद्ध नायकीण होती व तिनें एक नाटकमंडळी काढिलेली होती. ती मंडळी त्या सालीं मुंबईस होती व अगदीं मोडल्या-सारखींच झाली होती. वर जे अनंतराव गोडबोले म्हणून डॉक्टरी शिकणारे विद्यार्थी सांगितले आहेत, ते पुण्याच्या म्युनिसिपालिटीचे प्रसिद्ध सेक्रेटरी जे कै. नरसोपंत गोडबोले त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव होत. शेषासानी पुण्याची व तेहि पुणेकरच. त्यांनीं त्या बाईची गांठ घेऊन, तिच्या मोडकळीस आलेल्या नाटकमंडळीचें रंगभूमीला उपयोगी पडणारें पडदे वगैरे सामान, तिच्याकडून शाहूमंडळीला अल्प मोबदल्यानें देवविलें. शाहूमंडळीनें त्यावेळीं शेषासानीला प्रॉमिसरी नोट लिहून देऊन जें सामान मिळविलें, त्याला मुख्य कारण गणूबाळांची होतकरू गुणी जोडीच होय. अनंतराव गोडबोले हे स्वतः जरी नैसर्गिक नट नव्हते तरी ते शास्त्रोक्त बनलेले नट होते. पुण्याच्या हायस्कुलांत त्यांनी ज्युलियन सीझर नाटकांतलें ब्रूटसचें काम करून प्रो. वर्डस्वर्थचें बक्षीस मिळविलें होतें. गणू हा स्वभावजन्य नट असून, त्याला जर शास्त्रोक्त पद्धतीनें तयार केला, तर तो पुढें चांगल्या नांवालौकिकाला चढेल अशी अनंतरावांची अटकळ आल्यानें त्यांनी स्वेच्छेप्रमाणें त्याला हाताशीं धरून जें नाट्यशास्त्राचें प्राथमिक शिक्षण दिलें, त्याची अखेर गणूनें, त्यांच्या अटकळीप्रमाणेंच केली, हें सांगायला नको. नटाला शारीरशास्त्राचें शिक्षण प्रथमतः प्राप्त करून घेणें आवश्य असतें व तेंच गोडबोले यांनीं गणूला प्रथम मुंबईस देण्याचें सुरू केलें. या शास्त्रांत देहरचनेंतील अस्थिरचना आणि इंद्रियादि स्नायूरचना हे जे मुख्य दोन भाग, ते गणूला अनंतरावांनीं, कॉलेजांतील आपल्या शिक्षणक्रमां-



2230

तल्या प्रेतें फाडणें व त्यांतील रचनेचें शिक्षण घेणें याबद्दल नेमिलेल्या वेळीं मुद्दाम बरोबर नेऊन शिक्षण दिलें, आणि ज्या या शास्त्राच्याच पायावर हॅम्लेटची भूमिका नटाला उत्तम करतां येते असें तज्ज्ञांचें ठाम मत आहे तें हॅम्लेट नाटक, कै. कानीटकर यांच्या 'विरसेन' आणि 'विविधज्ञान'विस्तारांतून प्रसिद्ध झालेलें जे 'हिंमतबहार' त्या दोहोंवरून बसविण्यास शास्त्रोक्त पद्धतीनें सुरुवात केली. गणू व बाळा यांचीं लहान वयें, सुस्वरूपता आणि स्वभावसिद्ध नटांत असणारे जे गुण त्यांचा त्या उभयतांच्या अंगीं दिसणारा उदय यांवर लुब्ध होऊन शाहू मंडळीला नाटकी सामान देऊन तिची सावकारीण बनलेली जी शेषासानी नायकीण तिनें आपल्या कंपनींतले स्त्री व पुरुष या वेषधाऱ्यांस लागणारे खऱ्या जरतारीचे कपडे वगैरे त्यांनां बहाल केले. हॅम्लेटचे तीन अंक चांगले बसल्यावर शाहू मंडळी आपले नव्या पद्धतीचे प्रयोग करण्यासाठीं मुंबईहून प्रथमच बडोद्यास गेली व तेथें त्या मंडळीनें एक दोन खेळांव्यतिरिक्त पौराणिक खेळ न करितां या नव्या निघालेल्या पद्धतीच मोचनगड, स्वैरसकेशा, मंजुघोषा, वीरकांतवीरसेन, गुणोत्कर्ष, कचदेवयानी व हॅम्लेटचे तीन अंक—इतके खेळ करण्यास सुरुवात केली. याच वेळीं त्या मंडळीला कै. रामचंद्र कृष्ण केळकर ऊर्फ शास्त्रीबोवा या गृहस्थांची जोड मिळाली. हे गृहस्थ आपल्या सभ्यपणाच्या व विद्वत्प्रचुर विदूषकी कोट्यांत मोठे वाकब असल्यानें, यांच्या इतका सभ्यपणाचा व हास्यरसप्रधान असा नट झालाच नाहीं असें आम्हांस वाटतें; स्वतः न हसतां दुसऱ्यानां हांसून पोट दुखायला लावणारा आणि अश्लील कोट्या न करतां विद्वानानांहि कौतुक वाटण्यासारखीं खुबीचीं भाषणें करणारा सभ्य असा एवढाच काय तो विदूषक नट आम्हीं आजपर्यंत पाहिला

आहे. हे गृहस्थ मूळचे रेव्हिन्यु सर्व्हेमधले नोकर होते व संस्कृताचें त्यांनीं बरेंच अध्ययन केलें होतें. त्यांच्यापाशीं जी मंत्रविद्या होती तिचा उपयोग ते लोकोपकारार्थ करीत असत. त्यांच्या त्या गुणाचे दाखले वऱ्हाडांत बऱ्याच लोकांनां जसे आले आहेत, तसेच या पुस्तकाच्या लेखकालाहि आलेले आहेत. असो.

मंडळीचा मुक्काम बडोद्यास असतांना तिच्या अपेक्षेप्रमाणें तिला प्राप्ति न झाल्यानें, मंडळी तेथून निघून गांवोगांव नाटकें करीत सुरते-वरून खानदेशांत गेली व तिकडून नाशिकावरून परत मुंबईस आली. इतक्या अवधींत नवे नवे बुकिश खेळ बसविण्याचें तिचें काम सुरू असतांच मधून मधून ग्राहकऱ्यांच्या इच्छेनुरूप पौराणिक खेळहि तिला करावे लागत. ही नाटकमंडळी जशा अवस्थेंत यावी तशी अवस्थेंत येईना याबद्दल त्या मंडळीच्या स्नेह्यांना मोठें वाईट वाटे, व कंपनीच्या खर्चाच्या मानानें उत्पन्नाचें मान कमी असल्यानें कर्जाचा जो बोजा वाढत चालला होता, त्याचेंहि दुःख होई. या सर्व अडचणींतून पार होण्यासाठीं, बुकिश नाटकांचा प्रथम प्रचार सुरू करणाऱ्या कोल्हापुरकर विद्वान गृहस्थांकडे या मंडळीनें कोल्हापुरास जाऊन, आपलें भाग्य उदयास आलें तर पाहावें, नाहीं तर लाहा घेऊन मंडळी मोडून टाकावी, असा जो त्या मंडळीच्या मुंबापुरस्थ हितचिंतकांनीं तिला सल्ला दिला, तो तिला पटला व लगेच ती मंडळी पायवाटेनें गांवोगांव खेळ करीत करीत इ. स. १८९० सालीं कोल्हापुरास जाऊन पोंचली. मागें सांगितलेले कोल्हापुरच्या राजपुत्राचे अध्यापक रा. बळवंतराव जोशी हे या वेळीं, कोल्हापुर संस्था-नांत सर न्यायाधीश या पदावर आरूढ झालेले असून, त्यांचे परम

मित्र कै. रा. गणेश बळवंत जोशी हे तत्कालीन तेथील वकील-



( रा. ब. ब. ना. जोशी )

मंडळाचे अग्रणी म्हणून गाजूं लागले होते. हे दोघे गृहस्थ नाटचकलेचे चांगलेच शौकी होते व त्यामुळें त्यांनीं त्या मंडळीला जरी हातीं धरिलें, तरी कोल्हापुरांत त्या मंडळीचा उदय होण्याची जेव्हां चिन्हें दिसेनात, तेव्हां शेवटचा म्हणून पुण्यास जाऊन प्रयत्न करून पाहावा, नाहीं तर कंपनी मोडून टाकावी, असा त्या मंडळीचा व तिच्या कोल्हापुरस्थ आश्रदात्यांचा विचार ठरला व लागलीच त्या मंडळीनें आपला मुक्काम कोल्हापुराहून हालविला. कै. सर न्यायाधीश बळवंतराव जोशी आणि वकील गणपतराव जोशी यांचा व पुण्यांतील फर्ग्यूसन कॉलेजचे इंग्रजींचे माजी प्रोफेसर कै. वा. बा. केळकर यांचा बराच परिचय असल्यानें त्यांच्या नांवाचें पत्र घेऊन ती मंडळी इ. स. १८९१ च्या मार्च महिन्यांत प्रथमच पुण्यास आली व तिनें आपले खेळ गणेश पेठेंतील आर्यभूषण नाटकगृहांत करण्याची सुरवात केली. याच सालीं, मागें सांगितल्याप्रमाणें, फर्ग्यूसन कॉलेजच्या विद्यार्थ्यांचें संस्कृत वेणीसंहार नाटक बसत होतें, व पुढें त्याचे प्रयोग, याच शाहूमंडळीच्या मदतीनें आर्यभूषण नाटकगृहांत करण्यांत आले.

---

# अंक चौथा.

## प्रवेश पहिला.

### उत्कर्षारंभ.

कोल्हापुराहून अखेरचा प्रयत्न करून पाहाण्यास शाहूनगरवासी नाटकमंडळी कै. बळवंतराव जोशी यांचें पत्र कै. प्रो. केळकर यांना घेऊन पुण्यास आली, व केळकरांनीं त्याप्रमाणें मंडळीची व्यवस्था एक हजार रुपये रोख खर्चण्यास प्रथम देऊन आर्यभूषण थिएटरांत केली. मंडळीचा पहिला खेळ 'मोचनगड' व दुसरा 'कचदेवयानी' हे पाहून गणु व बाळा ही जोडी बिचवीं पोरें आहेत अशी प्रो. केळकरांची खात्री झाली. नंतर त्या मंडळीनें पूर्वींच बसविलेल्या हॅम्लेट नाटकाच्या तीन अंकांचा प्रयोग पाहून, शेक्सपियरचीं नाटकें करण्यास ही मंडळी सर्वथैव पात्र आहेत अशी प्रो. केळकरांची खात्री होऊन, त्यांनीं शेक्सपियरचें 'टेमिंग ऑफ दि श्रू' हें नाटक मराठींत करण्यास घेतलें.



( प्रो. केळकर )

फर्ग्यूसन कॉलेजच्या विद्यार्थ्यांचें संस्कृत वेणीसंहार नाटक याच वेळीं बसत असतां, त्यांतील अभिनयादि गोष्टी शिकविण्यासाठीं तत्कालीन नाट्यशास्त्रनिपुण अशी जी कै. ना. गो. फाटक, गो. ब. देवल वगैरे मंडळी ती गद्र्यांच्या वाड्यांत तालमी देण्यास जात असे. प्रो. केळकर हे स्वतः जरी लेखक व मार्मिक गृहस्थ होते, तरी ते नाट्याभिनयांतले फक्त ज्ञाते असून, अमूक गोष्टीचा अभिनय बरा किंवा वाईट झाला इतकेंच

सांगण्या पलीकडील त्यांना स्वतः अभिनय करून दाखविण्याचें ज्ञान नसल्यानें, नारायणराव फाटक आणि देवल यांच्यामध्यें ' मूर्च्छा येते ' या वेणीसंहार नाटकांतील धर्मभीमांच्या भेटीच्या प्रवेशांतील नाट्याभिनयसूचक वाक्यासंबंधाच्या अभिनयासंबंधानें जो वाद एके दिवशीं उत्पन्न झाला होता, त्याबद्दलचा निकाल दुसऱ्या दिवशीं लावण्याचें ठरलें होतें. प्रि. वा. शि. आपटे यानांहि त्या सूचक वाक्याचा अर्थ बरोबर सांगतां येईना व प्रो. पाटणकरहि त्या बाबतींत मुग्धच राहिलेले पाहून, प्रो. केळकर कांहीं एक न बोलतां नित्यनेमाप्रमाणें सायंकाळीं आर्यभूषण नाटकगृहांत शाहूंच्या बिऱ्हाडीं गेले व तेथें त्यांनीं तो प्रश्न सहजीं त्या मंडळींत सांगितला, आणि ' कोणाला सोडवितां येतो का? ' म्हणून प्रश्न केला. बाळाभाऊ जोगांच्या तरतरीत डोक्यांत त्या प्रश्नाचा उलगडा ताबडतोब आला व ते पुढें सरसावून, ' आपण हा प्रश्न सोडवतों ' असें त्यांनीं म्हटलें. केळकरांनीं लगेच त्यांच्याकडून त्या प्रश्नासंबंधीं आपल्या मनाचें समाधान करून घेतलें, व दुसऱ्या दिवशीं दुपारीं वेणीसंहाराच्या तालमीला गणुबाळांना येण्याचें आमंत्रण देऊन, बाळाच्या बुद्धिमत्तेची वाखाणणी करीत प्रोफेसर मजकूर आपल्या घरीं निघून गेले. ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं गणूबाळांची जोडी गद्र्यांच्या वाड्यांत नाटकाच्या तालमीच्या वेळीं हजर झाली. सर्व मंडळी जमल्यावर, आदल्या दिवशींच्या ' मूर्च्छायति ' या सूचक शब्दासंबंधानें वादविवाद सुरू झाला असतां, बाळाभाऊंस प्रो. केळकरांनीं नेत्रसंकेत करतांक्षणींच ते पुढें झाले व ' आपण याचा निकाल करतों,' असें त्यांनीं सांगितलें.—' हें कालचें स्त्रीपार्टी पोर काय सांगणार? '—असें जरी नाट्यकुशल म्हणविणाऱ्या देवलांनीं त्यावेळीं

म्हटलें, तरी शेवटीं आपली हार झाली असें पाहून, त्यांनीं बाळाभाऊंची पाठ थोपटली. तेव्हांपासून गणूबाळांच्या नाट्यनैपुण्याची विद्वानांमध्यें तारीफ होण्यास सुरवात झाली, व तोच क्षण त्या दोघांच्या उन्नतीच्या शुभदायक प्रारंभाचा असा ठरला.

मूर्च्छा—आनंदानें व दुःखानें अशा दोन प्रकारची येत असते व त्या प्रसंगीं योग्य असें आनंदाची मूर्च्छा आल्याचेंच अभिनयदर्शन कां केलें पाहिजे ही गोष्ट खुलासेवार अशीं साभिनयानें बाळाभाऊंनीं पुढें मांडिल्यावर, नैसर्गिक अभिनयानभिज्ञ अशा शाद्बार्थांचा दोन दिवस फुकट छल करण्याऱ्या तेथील सर्व विद्वानांची—भाषाशास्त्र आणि नाट्य-भाषाभिनयशास्त्र यांतील अंतराची समजून पटून, त्या सर्वांनीं बाळाभा-ऊंच्या नाट्याभिनयविषयक बुद्धीची मोठी तारीफ केली. अशा प्रकारची बुद्धिमत्ता पुढें बाळाभाऊंनीं जी अनेक प्रसंगीं दाखविली, त्याचें विवेचन यथाप्रसंगीं येणारच आहे. असो.

याप्रमाणें विद्वान् लोकांत मान संपादन केलेली गणूबाळांची जोडी परत घरीं गेल्यावर, प्रो. केळकरांच्या सांगण्यावरून, त्यांनीं पुढच्या शनिवारीं हॅम्लेट नाटकाच्या पांच अंकांचा प्रयोग लाविला. प्रो. केळकरांनीं आपल्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांना तो प्रयोग बघण्याची शिफारस केली, व त्या शनिवारपासून नाटकगृह प्रेक्षकांच्या गर्दीनें चिकार भरून जाऊं लागलें. हें सर्व झालें खरें, पण या मंडळीनें पूर्वी शेषासानी नांवाच्या ज्या एका वेश्येच्या नाटकमंडळीचें पडदे वगैरे सामान घेतलें होतें, तें यावेळीं अगदीं गचाळ होऊन गेलें अस-ल्यानें त्याकडे प्रो. केळकरांचें लक्ष गेलें, व त्यांनी पुणें न्यू इंग्लिश स्कूलचे तेव्हांचे व सध्यां सरकारी नौकरींत असलेले ड्रॉइंग मास्तर

रा. रामचंद्र नारायण जोशी यांना तात्पुरते जुने पडदे टच करण्यास व कांहीं नवें करून देण्यास सांगितलें त्याप्रमाणें त्यांनी तें काम मोठ्या आनंदानें अत्यल्प मोबदल्यावर करण्याचें कबूल करून, लगेच कामालाहि दुसऱ्या दिवसापासून सुरुवात केली. प्रो. केळकरांनी 'त्राटिका नाटक' लिहिण्याची सुरुवात करून, प्रवेशवारी मंडळीच्या अंगावर टाकण्यास



( रा. ना. जोशी )

सुरुवात केल्यावर, लांब शेंडीचा वीरसेन ( हॅम्लेट ) जो रंगभूमिवर येतो, त्याच्यांत समाजास्थितिप्रमाणें बदल करण्याचे विचार प्रोफेसरसाहेबांच्या मनांत नंतर येऊं लागले. केसरी व मराठा या दोन्ही पत्रांचें संपादकत्व जाऊन, कै. शंकर मोरो रानडे यांनी चालविलेल्या 'नाट्यकथार्णव' मासिकाचें संपादकत्व या वेळीं केळकरांच्याकडे आलें असल्यानें, 'त्राटिका नाटक' प्रथम 'प्रतापराव आणि त्राटिका' या मथळ्याखालीं त्या मासिकांतून प्रसिद्ध होऊं लागलें. अशा त्या संधींत पूर्वी 'आर्योद्धारक' मंडळीनें केलेल्या कोल्हटकरकृत मराठी 'ऑथेल्लो' नाटकाची देवलांनीं केलेली रंगावृत्ति शाहूमंडळीकडे बसविण्यास आली. त्राटिका नाटक बसून, त्याचे प्रयोग होऊं लागले व त्याबरोबरच गणूबाळांचे नाट्यनैपुण्य समाजाला आदरणीय होऊं लागून, नाट्यकलेसंबंधानें समाजरुचींत निराळीच चव उत्पन्न झाली. वर्तमानपत्रांतून शाहूंची वाहवा होऊं लागून, संगीताहून हें गद्यप्रकरण भिन्न असतांहि किर्लोस्कर मंडळीला

विरुद्ध दिशेचे प्रतिस्पर्धी उत्पन्न झाल्याची शंका येऊं लागली. शाहू-मंडळीनें झुंजारराव ( ऑथेल्लो ) नाटकाचा प्रयोग बसवून त्याचे खेळ करण्यास जरी सुरुवात केली, तरी हॅम्लेटपेक्षां ऑथेल्लोची ट्रॅजेडी अत्यंत हृदयभेदक असल्यानें व तसल्या ट्रॅजेडीला बघण्याइतकी तत्कालीन समाजाची मनें तयार झालेलीं नसल्यानें, त्या खेळाला इतर खेळांसारखें जरी उत्पन्न मिळण्याची मारामार होई, तरी त्यांतलें नाट्यनैपुण्य पाहून प्रेक्षकांकडून गणपतरावांदिकांची वाहवा होण्याचें कांहीं कमी झालें नाहीं.


कै. शंकरराव पाठकर आणि देवल यांनीं आर्योद्धारक नाटकमंडळींत, अनुक्रमें यागो व ऑथेल्लो यांचीं कामें केलीं असल्यानें त्या दोघांना त्या भूमिकांचा मोठा अभिमान असे. देवलांनी झुंजारराव म्हणून जी ऑथेल्लोची लिहिलेली रंगावृत्ति शाहूनीं करून दाखविली, तिच्या सुरुवातीच्या प्रवेशांत जो धनाजीरावांना म्हणजे नायिकेच्या बापाला मध्यान्ह रात्रीं हाका मारण्याचा प्रवेश आहे, त्या प्रवेशांतील जाधवरावाचें ( यागो ) काम बाळाभाऊंनीं केलें होतें. नाटकाच्या तालमीच्या प्रसंगीं धनाजीरावांना कोणी कोणच्या आवाजांत हांक मारावी हा प्रश्न उत्पन्न झाल्यावर, नाटकलेखक हे स्वतः अभिनयज्ञ असल्यानें, त्यांनीं जी हांक मारण्याची तऱ्हा बाळाभाऊंना स्वतः करून दाखविली, ती बाळाभाऊंना पसंत न पडल्यामुळें मोठा वाद उत्पन्न झाला व ऑथेल्लोंतील त्या प्रवेशांतल्या हांका किती प्रकारांनीं निरनिराळ्या आवाजांत मारतां येतील असा प्रश्न उत्पन्न झाला. रा. देवल हे एकदां मननपूर्वक बसविलेल्या अभिनयावरच ठाम बसणारे असल्यानें व शंकरराव पाठकरांप्रमाणें एकच अभिनय अनेक प्रकारांनीं करून दाखविण्याचें कौशल्य बाळाभाऊंच्या अंगीं पूर्ण असल्यानें त्या दोघांत

जो वाद माजला त्यांत अखेरीस बाळाभाऊंनी निरनिराळ्या सहा प्रकारांनीं माडीच्या खालीं जाऊन चौकांतून हाका मारून दाखविल्यावर देवलांची हार झाल्यानें तो वाद मिटला. गणपतरावांची गोष्ट मात्र ह्या बाबतींत नेहमीच अगदीं भिन्न प्रकारची असे. ‘ सबका सुन्ना और दिल्का करना ’ या मताचे ते असल्यानें बाळाभाऊंच्या सारखे ते वादांत न पडतां, लेखक सांगेल त्याप्रमाणें तालमींत करून रंगभूमिवर नाट्यप्रयोगांत मात्र स्वमतानें ठरविलेलाच अभिनय ते करीत असत. याचें प्रत्यक्ष प्रमाण झुंजारराव नाटकांतच सर्वांच्या प्रत्ययाला आलें. कै. नारायणराव फाटक, देवल, केळकर वगैरे मंडळी रंगपटांत गप्पा मारीत बसली असतां, बाहेर झुंजाररावाचा प्रयोग सुरू होता. त्यांत झुंजाररावाचा वेष घेऊन गणपतरावानीं रंगभूमिवर प्रवेश करतांना नेहमींचा आवाज सोडून आपल्या वेषाला साजेल असा घोग्रा आणि शांततेचा पण गंभीर आवाज ‘ नाहीं भोंसकलीत हेंच बरं केलंत, ’ या प्रारंभींच्या वाक्यापासून कधीं कोणी न ऐकलेला असा काढला, तो आंतील मंडळीच्या कानांत शिरतांच सर्व मंडळी मोठ्या लगबगीनें रंगपटांतून बाहेर आली व गणपतरावांचें बदललेल्या सवानींतलें भाषण ऐकून आश्चर्यविमूढ होऊन गेली. त्या वेळेपासून, गणपतराव आणि बाळाभाऊ हे दोघे अद्वितीय रंगपटवीर आहेत अशी मनाची खात्री करून घेऊन, ते दोघे जो जो म्हणून अभिनय करीत, त्यांत ‘ अशाच्या ऐवजीं जरा अशा प्रकारचा अभिनय केला तर बरा दिसेल असें वाटतें ’ या वाक्यापेक्षां फारसें अधिक असें त्यांच्या बाबतींत कोणी पुढें विशेषसें बोलल्याचें मला तरी निदान स्मरत नाहीं.

त्राटिका, झुंजारराव, हॅम्लेट व महाजनीकृत तारा ही शेक्सपियरचीं नाटकें या वर्षांच्या मुक्कामांत ही मंडळी पुण्यास मुख्यत्वें करूं लागून, मधून मधून मंजुघोषा, मोचनगड, वीरकांत व वीरसेन हीं जुनीं नाटकें आणि झोंपी गेलेला जागा झाला हा फार्स इतके खेळ करूं लागली. इ. स. १८९१ च्या जुलै महिन्यांत ही मंडळी पुण्याहून सोलापुरास गेली व तेथून गणपतराव कोंकणांत जाऊन लग्न करून आले. या वेळीं गणपतरावांच्या वयाला चोविसावें वर्ष लागून बाळाभाऊस तेवीसावें लागलें होतें. सोलापुरास दोन महिने मुक्काम करून ही मंडळी मागें परतली व बेळगांव धारवाडाकडे गेली. त्या स्वारींत त्यांनीं तिकडील एका मास्तरानें समजावून दिल्याप्रमाणें शेक्सपियरच्या ‘ टू जंटलमन ऑफ व्हेरोना—’ या नाटकाधारें ‘कान्तीपुरचे दोन गृहस्थ’ या नांवाचें नाटक बसवून त्याचे प्रयोग करणें सुरू केलें. मंडळीच्या उत्पन्नाचेंहि मान बऱ्याप्रकारें वाढूं लागून, लौकिकहि चांगला होऊं लागला. याप्रमाणें दरसाल आठ महिने बाहेरगांवीं नाटकें करून शाहू मंडळी पावसाळ्यांत पुढें आपला मुक्काम पुण्यांत चार महिने करूं लागली. सन १८९२ सालीं मंडळी पुण्यास आल्यावर, पुण्यांत स्थापन झालेल्या नाइटक्लबाचें ‘राणा-भीमदेव’ नाटक कंपनीकडे बसविण्यास आलें. या नाटकाचे लेखक क. वा. रं. शिरवळकर व रा. विनायक त्रिंबक मोडक हे दोघे होत. या नाटकानें महाराष्ट्राच्या रंगभूमीला एका अगदीं नवीन प्रकारचेंच वळण लाविलें. हें नाटक ऐतिहासिक या सदराखालीं रंगभूमीवर जरी पहिल्यानेंच असें आलें नाहीं, तरीं यांतील वीररसप्रधान भाषेनें महाराष्ट्रांतल्या लेखकांची मनें जशीं आकर्षण करून, तशा प्रकारचीं नवीं नाटकें लिहिण्याची लेखकांत स्फूर्ति उत्पन्न केली, तसा परिणाम याच्या

## अंक चौथा.

आधीं रंगभूमीवर आलेल्या खरेशास्त्रिकृत गुणोत्कर्षानें किंवा कानीटकरकृत बाजीराव आणि मस्तानी वगैरे इतर नाटकांनीं केला नाहीं ही गोष्ट निर्विवाद आहे. राणा भीमदेव नाटकांत—गणपतरावांच्या वीररसान्वित गगनभेदी पहाडी आवाजाच्या टीपेचा कस लागून, प्रेक्षकांचीं मनें वीररसानें जशीं थरारून सोडलीं, तद्वतच बाळाभाऊंनीं करुणरस कसा असतो याची उत्तम साक्ष चंपावतीच्या स्त्रीवेषांतील अभिनयानें प्रेक्षकांच्या नेत्रांत अश्रु उभे करून पटविली. या नाटकानें गणपतरावांच्या नाट्यनैपुण्याच्या लौकिकांत बरीच भर पाडून, त्यांचा व बाळाभाऊंचा कीर्तिदुंदुभी जो सर्वत्र दुमदुमूं लागला त्यानें शाहूमंडळीवर १८९३ सालीं वऱ्हाडांत व खानदेशांत द्रव्याचा पाऊस पाडला. बडोदा संस्थानाधीशांचें या गुणी नटांच्या जोडीकडे याचसालीं लक्ष वेधलें गेल्यानें, त्यांनां त्यांच्याकडून बोलावणें आलें. राजाश्रयाच्या आशेनें मंडळीनें बडोद्याची पुण्याहून स्वारी काढली व बडोद्यास दोन महिने राहून परत खानदेश आणि वऱ्हाड यांकडे त्यांनीं आपला मोर्चा वळविला. कंपनी बडोद्यास आली म्हणजे, श्री. सयाजीराव गायकवाडांनीं तिचे तीन खेळ पाहून पांच हजार रुपये इनाम देण्याचा १८९२ सालापासून जो परिपाठ सुरूं केला, तो गणपतरावांच्या निधनापर्यंत कायम होता. आतां पुढें काय होतें तें पाहावें. असो. अशा प्रकारचा बडोदेसरकारचा आश्रय मिळण्याच्या आधीं कुरुंदवाडाधिपति श्री० बाळासाहेब यांचा या मंडळीस आश्रय मिळाला होता. पुण्यास त्राटिका नाटक बसवून ही मंडळी सोलापुराहून दक्षिण महाराष्ट्राच्या बाजूला जेव्हां वळली, तेव्हां श्री. बाळासाहेब कुरुंदवाडकरांनीं या मंडळीस मुद्दाम बोलावणें धाडून कुरुंदवाडास नेली होती. या मंडळीचा मुक्काम



दर्याबाई—जा–जा. अरे मेल्या डागा जा आतां !

Photo by—R. N. Joshi

म्यॅकबेथ अं ५ प्र. १

कुरुंदवाडास एक महिनाभर होता. त्या प्रसंगीं मंडळीजवळ कपड्यांची बरीच वाण आहे ही गोष्ट लक्षांत येऊन, श्रीमंतांनी कमींत कमी दोन अडीच हजार रुपयांपर्यंत किंमतीचे जरीचे कपडे तिला बहाल केले. त्यांत दोन शालू, दोन शेले, एक भरजरी तुमान, एक जरीचें काम केलेला प्रताप-रावाला शोभण्यासारखा नकली मोत्यांची झालर लावलेला कोट व एक भरगच्ची टोपी इतक्या वस्तु होत्या.

सुरू केलेल्या गेल्या दोन सालच्या वहिवाटीप्रमाणें शाहूमंडळी बडोदें, वऱ्हाड व खानदेश येथील आपला आठ महिन्यांचा दौरा संपवून पुण्यास स. १८९३ सालच्या मार्च महिन्यांत येऊन हजर झाली. या सालीं मंडळीच्या त्राटिका नाटकाला व भीमदेवाला फारच बहार आला होता. शनिवारीं रात्रीं नाटक करून पुन्हां रविवारीं दिवसां नाटक कर-ण्याचा प्रोजकंपनी या नात्यानें प्रथम परिपाठ याच मंडळीनें सुरू केला. त्राटिका नाटकाला आर्यभूषण थिएटरचा सबंद दुसरा मजला स्त्रियां-साठीं जरी मुद्दाम राखून ठेवण्यांत येत असे, तरी बऱ्याच स्त्रियांना स्थलसंकोचामुळें पुन्हां खेळ लागेपर्यंत वाट बघत राहण्यासाठीं विन्मुख होऊन परत जावें लागत असें. त्या सालचा मंडळीचा पुण्यांतील चार महिन्यांचा मुक्काम मोठ्या अबादानीचा गेला. मंडळीजवळ कपडे, पडदे सीन वगैरे मध्यम स्थितींतला सरंजाम तयार होऊन, डोक्यावर चढलेलें दहा हजारांचें कर्ज एक्या रकमेनें फेडण्याची मंडळीची तयारी झालेली पाहून, प्रो. केळकरांना आपण हातीं धरलेल्या मंडळीनें आपल्याला यश दिलें असें वाटून, त्यांनीं आपल्या हातानें मंडळीच्या सावकारांच्या रकमा देऊन टाकून कर्जरोखे फाडून घेतले, व नंतर शेक्सपियरच्या 'ॲन्टनी ॲन्ड क्लियोपॅट्रा' नाटकाधारें नवीन रचलेल्या 'वरिमाणि

आणि श्रृंगारसुंदरी ' या आपल्या नव्या नाटकाच्या तालमी घेण्यास सुरुवात केली. कै. नारायण बापूजी कानीटकर यांनी रचिलेल्या ' बाजी देशपांडे ' या ऐतिहासिक नाटकाचा प्रयोग याच सालीं या मंडळीनें बसवून पुण्याच्या रंगभूमीवर त्याचा प्रथम प्रयोग केला. नव्या नाटकांत कांहीं नव्या पडद्यांची व सीनांची भरती करण्याचें काम रा. जोशी ड्रॉइंग मास्तरांकडून करविण्याचा मंडळीनें पुण्याच्या मुक्कामीं दरसाल परिपाठ ठेवलाच होता, व रा. जोशी मास्तरहि वरगुती प्रेमाप्रमाणेंच या मंडळीशीं प्रेमभावानें वागून, तिचें काम अत्यंत मनोभावानें करून देतच असत. केसरी वर्तमानपत्राच्या आंतल्या पानावर शाहूंच्या नाटकाची जाहिरात न घेण्याचा रा. टिळक व आर्यभूषण प्रेसचे तत्कालीन मॅनेजर रा. गोखले यांच्यामध्यें बोलाचाली झाल्याची जी हकीकत पुढें आली आहे, ती गोष्ट याच सालच्या आधींच्या सालीं पुण्याच्या मुक्कामीं घडली.

' बाजी देशपांडे ' नाटकाचा प्रयोग जरी बरा वठला व त्याच्या दोन चार प्रयोगांत जरी नुकसान न येणारें उत्पन्न झालें, तरी तो खेळ गणपतरावांनीं अपशकुनी या सदरांत अखेरपर्यंत काढिला होता. तो खेळ लाविला असतां त्या दिवशीं कांहीं तरी दुश्चिन्हाचें वृत्त घडतें ही जी गणपतरावांची समजूत झाली होती, ती इंदूरच्या थिएटरांत त्याच खेळाच्या दिवशीं त्यांचा पाय मोडून ते जन्माचे अधु झाल्यानें १९०७ सालीं अधीकच दृढ झाली, व ती आमरण तशीच कायम राहिली. ' वीरमणि आणि श्रृंगारसुंदरी ' या नाटकाचे पुण्यास या वर्षी दोन तीन खेळ झाले, परंतु त्याचे लेखक प्रो. केळकर असतांहि त्यांत त्यांना त्राटिकेसारखें यश मिळालें नाहीं, असें म्हणण्यापेक्षां, तें नाटक—त्यांतील कथाभाग समाजाला न आवड

त्यामुळें पडलें असेंच म्हटलेलें शोभेल. हें नाटक करुण आणि शृंगार या रसांत वीररसानें संमिश्रित झालेलें असल्यानें, गणपतरावांना पंडित जगन्नाथरायांच्या भामिनीविलासांतील श्लोकाची आठवण होऊन, तालीम अटपल्यावर एके दिवशीं त्यांनीं वासुदेवराव केळकरानां असा एक प्रश्न केला कीं, "मधाच्या प्राशनांत भुंगा तन्मय झाला असतां, रवीच्या अस्ताची आठवण न राहिल्यानें अचानकपणें तो कमल–गर्भांत आडकल्यानें पश्चात्ताप पावल्यावर त्याचे नेत्र आणि मुखश्री हीं कशी असूं शकतील व त्याचें दृश्य काय असूं शकेल?" वासुदेवरावांनीं उत्तर केलें, "शृंगारसुंदरीच्या अनंगपाशांत आडकलेल्या वीरमणीला, त्याचा सेनापति दौलतसिंग उपदेशाच्या चार गोष्टीं सांगत असतां, वीरमणीची दृष्टी ज्या रंगाची असूं शकेल व त्याची मुखश्री जशीं दिसेल तशीच त्या भुंग्याची स्थिति असूं शकेल, आणि खरा नट तीच रंगभूमीवर दाखवूं शकेल." झालें. यावर आपली वीरमणीच्या अभिनयाची कल्पना बरोबर जमल्याचें गणपतरावांनीं सांगितल्यावर, 'उद्यांच ही गोष्ट तालमीच्या वेळीं करून दाखीव' असें त्यांस वासुदेवरावांनीं सांगून दुसऱ्या दिवशीं, ती त्यांनीं बरोबर करून दाखविल्याबरोबर वासुदेवरावजी त्यांच्यावर फारच सुप्रसन्न झाले.

रोज सायंकाळीं चार ते सहा वाजेपर्यंत नाटकाची तालीम घेण्याचा त्यावेळीं शाहूंत प्रघात असे. वासुदेवराव केळकर रोज तीन वाजतां कॉलेजचें शिक्षण अटोपून तालमीला जात असत, त्याप्रमाणें ते एके दिवशीं आल्यावर देवलांच्या दुर्गा नाटकाचा प्रयोग बसविण्या-संबंधानें त्यांनीं प्रश्न काढला व बाळाभाऊ जोगांकडून दुर्गेचें काम करवायचें होतें, सबब त्यांना त्या बाबतींतलें त्यांचें मत विचारण्यांत आलें.

कै. ना. गो. ऊर्फ आण्णासाहेब फाटक हे कोल्हापुर मुक्कामीं कांहीं



( ना. गो. फाटक. )

काळ स्पेशल मॅजिस्ट्रेटच्या हुद्यावर होते व तशी त्यांची त्या संस्थानांत नौकरी करण्याची वडिलार्जित वहिवाटच होती. त्यांचे वडील गोपाळराव हे त्या संस्थानांतील सर न्यायाधीशाच्या जागीं पूर्वी होते, व नारायणरावजी ज्या वेळीं स्पेशल म्यॅजिस्ट्रेटचें काम तेथें करीत होते, त्यावेळीं नरहरबोवा सवाशे यांची पौराणिक नाटकमंडळी कोल्हापुरास दुर्गा नाटक बसवीत होती. आण्णासाहेब फाटक यांचा लौकिक, त्या वेळपूर्वीच उत्तम नाट्यकलाभिनयशिक्षक या नात्यानें झाला असल्यानें, दुर्गेच्या पात्राला अभिनय शिकविण्याचें काम त्यांच्याकडे आलें होतें, व तें त्यांनीं हौसेनें शिकवून, विनायकराव कौठेकरांकडून उत्तम तऱ्हेनें वठवूनहि दाखविलें. विनायकाला दुर्गेचें काम अण्णासाहेब फाटकांनीं इतकें अप्रतिम शिकविलें होतें कीं, तसें काम त्या वेळीं कोणच्याहि इतर नाटकमंडळींत झालेलें कोणी पाहिलें नव्हतें. त्या मुलाचें सोंग अगदीं हुबेहुब-म्हणजे आधुनिक वेश्यावेषधारी गरत्या स्त्रीप्रमाणें नव्हे तर-तत्कालीन सभ्य मानल्या गेलेल्या मराठा गरती स्त्रीप्रमाणें होत असे व तें शिकविण्याचें सर्व श्रेय देवलांचे परममित्र अण्णासाहेब फाटक यांनांच मिळालेलें होतें. वेणीसंहार नाटकाच्या तालमीच्या वेळीं एकदां आणि झुंजारराव नाटक बसत असतां दुसऱ्यांदा, अशी दोन वेळां देवलांना बाळाभाऊंच्या अभिनयकौशल्यज्ञानामुळें हार खावी लागली असल्यानें, त्यांच्या

मनाला ती गोष्ट डिंवचत होती, आणि म्हणूनच बाळाभाऊंच्या कडून दुर्गेचें काम करवून, त्यांची टर उडविण्याची जी त्यांची अंतस्थ इच्छा, ती फलद्रूप करून घेण्यासाठीं आण्णासाहेबांच्या मार्फत वासुदेवरावजीकडून शाहूमंडळींत दुर्गा बसविण्याचा त्यांनी उपक्रम केला; परंतु तो १८९३ सालीं फलद्रूप न होतां १८९४ सालीं झाला. शाहूमंडळीनें दुर्गा नाटक जरी रंगभूमीवर आणिलें, तरी बाळाभाऊंची फजीती करण्याची देवलांची इच्छा तडीस गेली नाहीं. विनायकाच्या दुर्गेचें काम बाळाभाऊंनी पूर्वीं पाहिलेलें असल्यानें, आपल्या दुर्गेच्या कामांत कांहीं तरी नावीन्य दाखविण्याचें त्यांनीं मनांत योजिलें, व तालमींत लोक सांगतील त्याप्रमाणें अभिनय करण्यांत त्यांनी केव्हांच कसूर केली नाहीं.

या सालचा पुण्याचा मुक्काम हालून मंडळी कोल्हापुरास गेली. वासुदेवराव केळकरहि तेथें गेले होते. या वेळीं कोल्हापुरास एक मोठा मौजेचा प्रकार घडला. लांब शेंडीचा हॅम्लेट जो पूर्वीं रंगभूवीवर दिसत असे, तो या कोल्हापुरच्या मुक्कामापासून पुढें १९२२ च्या फेब्रुएॅरी पर्यंत मस्तकावरील इंग्रजी फॅशनच्या केसांत जो दिसूं लागला त्याची हकीकत अशी आहे. वासुदेवराव केळकरांचीं इच्छा गणूची शेंडी उडविण्याची प्रथमपासूनच होती, परंतु तात्कालीन रूढीला ते जरा वचकत होते. त्यांनी आपल्या मित्रमंडळीच्या सल्यानें ती भीति झुगारून देऊन, स्वतःच्या हातांत कात्री घेतली व गणू हजामापुढें बसला असतां, त्याच्या शेंडीची चटकन एक मोठी बट कापून टाकली. गणूच्याहि मनांत ती गोष्ट होतीच, परंतु तो जोशीबोवांना भीत असे. आतां दोषाला कारण वासुदेवराव झालेले पाहून, व त्यांच्यापुढें जोशीबोवा नम्र असतात हीं गोष्ट गणूनें ध्यानांत आणून, न्हाव्याकडून आपल्या

मस्तकावरील लांबलचक शिखंड ऊर्फ—शेंडीचा भार उतरविला व इंग्लिश कट राखिला. त्या दिवशीं रात्रीं प्रतापराव भांग काढून प्रथमच जेवण्याच्या प्रवेशांत रंगभूमीवर बोडका आला. ब्राह्मण, ऋषी व गोसावी यांवांचून कोणीहि रंगभूमीवर बोडकें येतां कामां नये, असा जो त्या वेळेपर्यंत प्रतिबंध होता, तो गणूच्या बोडकें येण्यानें व त्यांतल्या त्यात इंग्लिश कटाचा भांग काढून येण्यानें मोडला जाऊन, नाट्यसृष्टींत ती एक मोठी क्रांती घडून आली. पाश्चिमात्य पद्धतीचें बुकिश नाटकाचें वळण महाराष्ट्र-रंगभूमीला उत्तम स्वरूपांत देण्यानें जी एक क्रांती नाट्यसृष्टींत घडून आली तिचें व या केस ठेंवणाचें आशा या दोन्ही क्रांत्यांचें श्रेय गणपतरावजींनांच देणें इष्ट व सार्थ आहे. पूर्वींच्या पुरुषनटवेषधाऱ्यांच्या पोषाखांतहि या मंडळीनें नव्या तऱ्हेची व समाजाला रुचेल अशी तिसरी क्रांती घडवून आणिली, व या तिन्ही क्रांत्यांचें वळण जें ९२ सालीं कोल्हापुरांतून शाहूंनी बाहेर आणिलें व पुण्यांतून भीमदेवादी ऐतिहासिक नाटकांचें पुण्याबाहेर नेलें, त्याचाच कित्ता जरी अद्यापी सर्वत्र गिरविला जातो आहे खरा, तरी त्या नटद्वयांसारखी जोडी अद्यापि पैदा होत नाहीं हेंच दुर्दैव होय. याच सालीं कोल्हापुरांत दुसरी एक मौजेची गोष्ट दोन नाटक-मंडळ्यांच्या साम्न्याची घडून आली.

किर्लोस्कर संगीत मंडळीचा याच वेळीं कोल्हापुरांत मुक्काम होता. शंकरराव मुजूमदार हे त्या मंडळीचे म्यानेजर होते व भाऊराव कोल्हटकर हे मालक होते. तेथील दोन थिएटरांपैकीं एक थिएटर, तें नादुरुस्त असल्यानें सरकारी हुकुमानें बंद होतें व दुसऱ्यांत किर्लोस्करमंडळी होती. मुजूमदार म्यानेजरसाहेबांनीं शाहूंना आडवारीं खेळ करण्यास थिएटर देण्याचें आगाऊ कबूल केलें असतां, मंडळी तेथें गेल्यावर थिएटर देण्याचें

त्यांनीं साफ नाकारिलें. मंडळी मोठ्या पंचायतींत पडली; परंतु परमेश्वर तिचा वाली असल्यानें, व रा. ब. ब. ना. जोशी हे तिचे पुरस्कर्ते आणि पक्षपाति असल्यानें, बंद असलेल्या थिएटराच्या मालकाला त्यांनीं बोलावून आणून अर्ज देण्यास सांगितलें व अर्ज येतांच अमुक अमुक सुधारणा करून ताबडतोब थिएटर सुरू करावें, असा त्यावर शेरा मारून, लगेच थिएटर पासहि करून टाकिलें. यांपैकीं भाऊराव कोल्हटकरांना कोणच्याच गोष्टीची माहिती, शाहूंचा त्राटिका नाटकाचा पहिला प्रयोग त्या खुल्या झालेल्या थिएटरांत लागेपर्यंत समजली नव्हती. किर्लोस्करांचें शाकुंतल आणि शाहूंचें त्राटिका अशीं दोन नाटकें समोरासमोरच्या थिएटरांत एकाच रात्रीं झालीं. त्राटिका नाटकाला म्हणण्यासारखें उत्पन्न झालें नाहीं. त्यामुळें मंडळीला खिन्नता प्राप्त झाली, आणि त्याबरोबरच अहमहमिकेची जिगीषा उत्पन्न होऊन, श्रृंगारिक करमणुकीला वीररसाचे चपेटे मारून चीत करण्यासाठीं पुढील वारीं रात्रीं सौभद्राच्या जोडीला राणा भीमदेव साम्ने उभा राहिला. वीररसाला श्रृंगाररस चीत करून आपल्या कह्यांत ठेवतो, असा जो त्या रसाचा लौकिक, तो त्या रात्रीं नष्ट झाला. भाऊरावांच्या कर्णमधुर आणि अद्वितीय तानेच्या ललकारीला, रणचंडीचें तांडव करायला तत्पर करणाऱ्या भीमदेवाच्या गगनभेदी आवाजानें सुरवात करतांच, किर्लोस्करांचें थिएटर दुसऱ्या अंकापासून मोकळें होऊं लागून, मेघांच्या गडगडाटांशीं स्पर्धा करणाऱ्या भीमदेवाच्या रणोत्साही गर्जना ऐकायला शाहूंच्या थिएटरांत उसन्या घाईनें प्रेक्षकांची गर्दी उसळूं लागली, आणि त्या दिवसापासून खऱ्या नटांच्या कर्तबगारीपुढें, फक्त मधुर तानेच्या जोरावर कृत्रिम नट बनलेल्या भाऊरावांच्या ताना ऐकण्यास सरावलेले प्रेक्षक, शाहूंच्या थिएटरांत बसण्यास जागा न मिळा-

ल्यास किर्लोस्करांच्या नाटकगृहांत जाऊं लागले. एकंदरींत काय कीं, नव्या उदयोन्मुख झालेल्या या गद्य नाटकानें पहिल्याच झडपेंत नांवाजलेल्या संगीत किर्लोस्करी नाट्याचा जो बदरंग करून टाकला, तो पुन्हां केव्हांहि शाहूंच्यापुढें वर मान करूं शकला नाहीं. भाऊरावांना ही गोष्ट लागली व त्यांनी खरा प्रकार समजावून घेऊन, मुजूमदारांना त्यांच्या मूर्खपणाच्या चुकीच्या वर्तनाबद्दल ठपका दिला, आणि शाहूमंडळीशीं समेट केला. पुढें हा समेट शेवटपर्यंत भाऊरावांनी कायम ठेविला होता. या समेटांत परस्पर कंपन्यांनी परस्परांच्या मुक्कामाच्या गांवीं एकाच वेळीं न जाण्याचें जें भाऊरावांनीं ठरविलें, तें त्यांच्या मृत्यूपर्यंतच काय तें कायमचें टिकलें.

पुरुषनटानें शेंडीला चाट देऊन मस्तकावर पाश्चिमात्य पद्धतीचे केंस ठेवणें व बोडक्यानें रंगभूमीवर घरगुति प्रवेशांत अवतरणें ही गोष्ट शाहूमंडळीनें सर्वमान्य करून सोडल्यामुळें तिचा कित्ता—संगीत व प्रोज—दोन्हीं कंपन्यांनीं जसा उचलला, तद्वतच ऐतिहासीक नाटकें ज्या त्या ऐतिहासिक काळाला शोभतील अशाच परिस्थितींत रंगभूमीवर आणण्याचा जो कित्ता त्या मंडळीनें महाराष्ट्रापुढें मांडिला त्याचेंच वळण अद्यापि महाराष्ट्राची रंगभूमी वळवीत आहे.

ऐतिहासिक नाटकें रंगभूमिवर प्रथमतः आणण्यास शाहू मंडळीनेंच सुरवात केली असें जरी म्हणतां येणार नाहीं, तरी तिनें तशीं नवीं नाटकें नव्या स्वरूपांत रंगभूमीवर आणून, त्रिलोकेकरांच्या संगीताला जसें आण्णानीं मूर्त स्वरूप दिलें, तद्वत् शाहूंनीं आपल्या अतुल कर्तबगारीनें पाश्चिमात्त्य वळणाची जोड देऊन, महाराष्ट्र—रंगभूमीवर प्रोज नाटकाला देव्हाऱ्यांतील पूजनीय प्रतिमा करून ठेविलें, हें मात्र विसरतां येणार

नाहीं. शाहूनगरवासी नाटकमंडळी जरी बुकिश म्हणजे प्रोज नाटकांनां मूर्त स्वरूप देण्यास कारणीभूत झाली, तरी तिच्या पूर्वी सांगलीकर, इचलकरंजीकर, कोल्हापुरकर, राजेबाक्सर वगैरे पांच चार कंपन्या तशीं नाटकें, कॉलेजादिकांतील विद्यार्थ्यांनीं केलेले प्रयोग पाहून करूं लागल्या होत्या. त्या कंपन्यांच्या अंगीं पौराणिक नाटकांचीं भाषा बोलण्याची एकप्रकारची कृत्रिम संवय खिळली असल्यानें, त्यांच्याकडून नैसर्गिक भाषण प्रोज नाटकांत होत नसे. त्यांतल्या त्यांत राजेबाक्सर मंडळीला कै. भटांनीं बरीच तरवेज केली होती, व नरहरबोवांच्या कंपनींत आण्णासाहेब फाटकांनीं दुर्गेच्या भूमिकेला आधुनिक रंगभूमीवरील नायिकेप्रमाणें उत्तम शिक्षण देऊन तयार केलें होतें. दुर्गा नाटक जेव्हां शाहूंनीं ९४ सालीं बसविलें तेव्हां त्यांतल्या इतर पात्रांनीं आपापलीं कामें जरी चांगलीं केलीं, तरी बाळाभाऊंनीं जें दुर्गेचें काम केलें, त्याबद्दल विनायकराव कौठेकरांना अप्रतिम गरत्या मराठा स्त्रीचें काम शिकविणाऱ्या कै. आण्णासाहेब फाटकांनीं त्यांची पाठ थोपटून, "शाबास बाळा! मीं विनायकाला शिकवलं, पण गोशा आणि मराठमोळा या गोष्टीं त्या वेळीं माझ्या आणि ग्रंथकार देवलांच्या ध्यानांतहि आलेल्या नव्हत्या. आमच्या पुढें जी शेक्सपियरच्या हिरॉइनची कल्पना होती, तिला अनुसरून आम्ही मराठा सभ्य स्त्रीचें काम दुर्गेच्या पात्राला शिकविलें होतें. पण तूं आमच्यावर ताण केलीस," असे उद्गार काढलेले आम्ही स्वतः ऐकले आहेत. इचलकरंजीकर मंडळी शेक्सपियरचीं—तारा (सिंबेलाईन) आणि भ्रांतिकृत चमत्कार (कॉमेडी ऑफ एरर्स) हीं नाटकें करूं लागली हें पाहूनच रा. गोपाळ अनंत भट या नांवाचे जे एक मुन्सफ पुण्याचे रहिवाशी होते, ते काल्पनिक प्रोज नाटकें रचून तीं राजेबाक्सर

मंडळीकडून करवूं लागले. त्या नाटकांत—रमा, तारा, पद्मावती वगैरे पांच चार नाटकें बरीं होतीं व त्यांचे प्रयोगहि बरे होत असत. पुण्याच्या नेटिव्ह इन्स्टिट्यूशननें नंतर कै. कानिटकरकृत 'शशिकला आणि रत्नपाल' (रोमियो ॲन्ड ज्यूलियेट) या नाटकाचा जो प्रयोग केला, तो मूळांतलें तथ्य त्या भाषांतरांत उतरलें नसल्यानें मुलींच्या भातुकलीसारखा तत्कालीन अप्रौढ विद्यार्थ्यांना साजेसाच झाला.

हा काल नाट्यकलेंत क्रांती होण्याचा होता असें म्हटलें असता हरकत नाहीं. किर्लोस्करमंडळी एकदमच सुधारणेच्या तत्वानें संगीतांत जगापुढें चांगलेपणानें आली व शाहू मंडळी समयोचित भाषणें करण्यास शिकविणाऱ्या पौराणिक नाटकांच्या पायावर उभी राहून प्रोजमध्यें आस्ते आस्ते संस्मरणीय झाली. या दोन्ही पद्य व गद्य मंडळ्यांच्या स्थापनेच्या काळांत वर्ष दीड वर्षाचें जरी अंतर होतें, जरी शाहूमंडळीला किर्लोस्करांप्रमाणें झपाट्यासरशी उच्ची मिळाली नाहीं. ती मंडळी आस्ते आस्तेच पुढें आली. शाहू मंडळीचा उदय आस्ते आस्ते होत होता, व त्याला लागणारी सामुग्रीहि आस्ते आस्तेच तिच्या भोंवतीं जमत चालली होती.

या प्रोज व संगीत कंपन्यांच्या सुरुवातीच्या सुमारासच पुण्यास आर्योद्धारक मंडळीनें बुकिश नाटकें करून सार्वजनिक कामास हातभार लावण्याचा परिपाठ सुरू केला होता. कोल्हापुरप्रकरणांत या मंडळीनें केसरीफंडाला प्रथमच मदत केली. ही मंडळी—ऑथेल्लो, किंग लियर, तारा, वेणीसंहार वगैरे जीं नाटकें करी, तीं नाट्यकला सुधारण्याच्या उद्देशानें आणि स्वजनहिताच्या सार्वजनिक गोष्टींस हातभार लावण्याच्या उद्देशानें करी. या मंडळींतील प्रमुख नट कै. देवल आणि पाठकर

होते. ही मंडळी या दोघां नटांच्या आपसांतील चुरशीच्या भांडणांत फार दिवस टिकली नाहीं. याच मंडळीच्या तत्वावर, पण शाहूमंडळीचें वळण वळविणारी वीसबावीस वर्षांपूर्वी म्हणजे इ. स. १८९९ सालीं पुण्यास जी ' स्टूडंट्स् सोशल क्लब ' या नांवाची संस्था स्थापन झाली, तिच्यांतीलहि सर्व नट, नाटकी पेशाचे नसून, घरंदाज आणि गृहस्थी बाण्याचे होते व आहेत. ही संस्था अद्यापि जिवंत असून, तिनें आपलें ध्येय व वळण कायम ठेविलें आहे. या संस्थेंतील रा. दत्तात्रय आत्माराम फाटक वकील, हे स्वतः स्त्रीवेषापासून पुरुषवेषापर्यंतच्या आपल्या भूमिकांत महाराष्ट्राला आवडते झाले आहेत. त्यांचा त्या कलेंतील मार्मिकपणा व शाहूंच्या वळणाचें नैसर्गिक शिक्षण आपल्या संस्थेंतील मंडळीला देण्याचीं हतोटी, याच गोष्टी मुख्यत्वें त्यांच्या लौकिक होण्यास कारणीभूत झाल्या आहेत. त्यांनीं आजपर्यंत जीं अनेक पात्रें शिकवून तयार केली त्यांपैकी, शाहूंच्या बाळाभाऊंच्या वळणाचें बरेंचसें प्रदर्शन करणारें असें जें एक पात्र अद्यापि रंगभूमींवर वाहावा मिळवतें आहे, ते गृहस्थ चिंतामण गणेश ऊर्फ आप्पा गोखले या नांवानें प्रसिद्ध आहेत. येथें एक गोष्ट प्रसंग नसतां मध्येंच नमूद करून ठेवतों. ही गोष्ट इ. स. १९०२ सालांतील होय.

शाहूमंडळींत पिल्याचें काम करण्यांत प्रसिद्धीस आलेले सुपेकर बोवा हे कांहीं अंतस्थ भांडणानें मंडळी सोडून गेले व त्यांनीं सांगली कडील कांहीं हौशी तरुणांच्या साह्यानें ' सामाजिक नाटकमंडळी ' या नांवाची एक संस्था काढून, शाहूंतून निघून जातांना कोणाला न कळत जी त्या मंडळीच्या रंगावृत्तींचीं पुस्तकें बरोबर नेलीं होतीं, त्यांच्या वर नाट्यप्रयोग करण्यास सुरवात केली, परंतु—अस्सल—जातीवंत

असें भांडवल जवळ नसून, येर गबाळाचेंच सारें असल्यानें, शिरवळकरांसारखे द्रव्यलोभी ग्रंथकार जरी शाहूरूप मूळाला सोडून त्यांना जाऊन मिळाले, तरी शाहूंनीं स. १९०१ मध्यें पुण्यास प्रथम केलेल्या 'तुकाराम' नाटकानें मिळालेल्या लौकिकाच्या बदलीं, त्या मंडळीकडून करविलेल्या 'एकनाथ' नाटकाच्या प्रयोगानें आपल्या पदरीं दुर्लौकिक आणि द्रव्याभाव या दोन पोंकळ मोटल्या बांधून घेऊनच त्यांस परत यावें लागलें, व पुन्हां शाहूंच्या पुढें लोटांगण घालून, 'कृपा करून माझा एकनाथ करा' असें म्हणावें लागलें. पुण्याच्या आर्यभूषण थिएटरांत रा. जोशीकृत 'श्री समर्थ रामदास' नाटकाचा दुसरा प्रयोग संपल्यावर, शिरवळकरांनीं मुद्दाम तिसऱ्या मजल्यावर आगाऊच बसवून ठेविलेल्या मंडळीनें, गणपतरावांनीं पुण्याचा मुक्काम हालविण्याबद्दल भाषण केल्यानंतर त्यांना आकाशवाणीप्रमाणें तिसऱ्या मजल्यावरून 'एकनाथ नाटक करून मुक्काम हलवा' असा गोंगाट जेव्हां ऐकूं आला तेव्हां, पूर्वींचें शिरवळकरांचें वर्तन गणपतराव विसरले नसल्यानें, त्यांनीं लगेच 'एकनाथ स्वामी हे एकनाथच असल्यानें, त्यांना आतां दुसऱ्या नाथाची जरूर नाहीं.' असें जें व्याजोक्तीचें पण खुबीदार उपरोधिक भाषण केलें, त्यामुळें तिसऱ्या मजल्यावरून ओरड करणारा शिकविलेल्या बुद्धीचा प्रेक्षकसमुदाय स्तब्ध होऊन, गणपतरावांच्या समयसूचकतेचीच तारीफ करीत नाटकगृहाबाहेर पडला. असो.

आर्योद्धारक मंडळीनें ज्या उद्देशानें गद्य नाटकें प्रचारांत आणण्याचा उपक्रम केला, तो तिचा उद्देश शाहूमंडळीनें शेवटास नेऊन, हिंदुस्तानांतील गद्यपद्यात्मक नाटकाच्या पूर्वापार पद्धतींत क्रांतीं करून सोडली. या क्रांतीबरोबरच गद्यनाट्यभूमीचा देखावाहि पौरा

नाट्यभूमीपेक्षां निराळ्या रूपांत दिसूं लागला. शाहूमंडळी—काल्पनिक, भाषांतरित व ऐतिहासिक अशा तीन प्रकारच्याच नाटकांचे प्रयोग करूं लागली व सामाजिक नाटकांपासून ती अलिप्त राहिली. सामाजिक नाटकांच्या प्रदर्शनानें समाजाला सुधारणेच्या मार्गाचें पाऊल आक्रमण करण्याची बुद्धी न होतां, सीनेमानें जसें दुराचरणाकडे मन वळतें, तद्वत् त्यानें वळण मिळणारें असल्यानें, रेनॉल्डनें जो समाजाच्या दोषविष्कर-णाचा उच्च हेतु मनांत धरून, अनेक कादंबऱ्या लिहिल्या, परंतु त्याचा जसा उलट परिणाम झाला, तद्वत् सामाजिक नाट्यदर्शनानें होईल अशी समजूत असल्यानें, आपल्या समाजाला देण्याच्या शिक्षणाच्या ध्येयांत सामाजिक नाटकांनां शाहूंनीं हातांशीं धरिलें नाहीं, व त्यांच्या या उच्च मनोरथाला उचलून धरणाऱ्या त्यांच्या केळकरादि विद्वान् हितैषींनींहि त्यांना तसें करण्यास आग्रहाचें अनुमोदन दिलें नाहीं. शाहूनगरवासी मंडळी पुण्यास येण्याच्या आधीं, बुकिश नाटकें करणाऱ्या ज्या दोन चार मंडळ्या येथें येऊन गेल्या होत्या, त्यांत 'परांजपे संगीत मंडळी' ही सव्यसाची म्हणजे—संगीत व गद्य नाटकें करणारी होती. ही मंडळी गद्यांत—ऐतिहासिक व सामाजिक नाटकें करीत असे. या मंळळींत रा. स. ग. प्रधान या नांवाचे जे एक प्रभुज्ञातीचे अप्रतिम नट होते, त्यांचाहि त्यावेळीं नटवर्य गणपतरावांच्या खालोंखाल जरी लौकिक झाला होता, तरी गणपतरावांचा उदय व त्यांचा अस्त हे एकाच कांळीं महाराष्ट्र—रंगभूवीला पाहावे लागले. स. १८९३ सालानंतर प्रधानांनीं पुन्हां पुण्याच्या रंगभूमीवर नटवेष धारण केलेला दिसला नाहीं. रा. प्रधान हास्य आणि शृंगार या दोन रसांच्या खालोंखाल जरी वीररसाचें काम करीत असत, तरी त्यांच्या सुमेरसिंहाच्या सोंगाचें प्रदर्शन, गोपा-

ऊराव दाते आणि शंकरराव लोखंडे यांच्या अलल डुर्च्या सांप्रदाया-पेक्षां जरा अधिक असें मानवी स्वभावाचें चित्र दाखविणारें वठत असे. सामाजिक नाटकांत मात्र ते प्रेक्षकांत उत्तान हास्यरस उत्पन्न करणारें नाट्य करीत असत. कानिटकरकृत 'बाजीराव आणि मस्तानीं' या अर्धवट ऐतिहासिक नाटकांत ते बाजीरावाची भूमिका चांगली करीत. रा. प्रधान आणि गणपतराव व बाळाभाऊ यांची पनत्रेलीस त्यांच्या घरीं घरगुती नात्यानें जी स. १९०१ सालीं मीं भेट घडवून आणिली होती, त्या प्रसंगीं शाहूमंडळीचा जीर्णोद्धार होत होता. या भेटींत त्या तिघां नटाचें आपसांत जें श्रृंगार आणि करूण या दोनच रसांच्या नाट्याभिनयासंबंधानें आत्मप्रत्ययाचें संभाषण आणि हावभाव यांचें दृश्य मला बघायला मिळालें, तें खरोखर अप्रतिमच होतें. अनेक निरनिराळ्या नाटकमंडळ्यांतील नटांचीं जर अशा तऱ्हेचीं आपसांतलीं संम्मेलनें वारंवार होतील, तर सध्यां जी महाराष्ट्रीय नाट्यकला बहकत जाऊन तिला एका प्रकारच्या छचोर नाट्याचें आन्यथा वळण लागूं लागलें आहे, ती पुष्कळशी पूर्वस्थितीवर येईल असें वाटतें.

इ. स. १८९९ सालीं प्रो. केळकर हे पुण्यास कैलासवासी झाले. त्या वर्षी त्यांच्या फर्ग्यूसन कॉलेजला सेकंड बी. ए. च्या वर्गाची युनिव्हर्सिटीनें परवानगि दिली असल्यानें, बी. ए. च्या वर्गाला त्या सालीं नेमलेलें 'किंग लियर' नाटक शिकविण्याचें काम केळकरांच्याकडे आलें होतें. शाहूंच्या कडून हॅम्लेटच्या नंतर 'किंग लियरचाच' प्रयोग प्रथम करवायचा असा ९४ सालीं केळकरांनीं बेत केला होता व त्याप्रमाणें त्यांनीं त्या नाटकाचे जे दोन अंक मराठींत दुरुस्तहि केले होते, ते

अद्यापि मजपाशीं आहेत. 'किंग लियर'च्या आधीं 'रोमियो ॲण्ड ज्यूलियेट' या नाटकाचा मराठींत प्रयोग करावा अशी बाळाभाऊंची इच्छादिसल्यामुळें तेंहि नाटक मराठींत करण्यास केळकरांनीं हातीं घेतलें होतें. कानिटकरांचें 'शशिकला आणि रत्नपाल' हें नाटक अत्यंत चुकीचें असल्यानें, मूळ कल्पनेचा त्यांत विपर्यास झालेला आहे. प्रो. केळकरांनीं बाळाभाऊंच्या म्हणण्याप्रमाणें 'रोमियो ॲण्ड ज्यूलियेट' नाटक मराठींत लिहायला घेऊन, त्याचें नांव 'मोहन आणि तारा' असें जें ठेविलें होते तेंच नांव, पुढें सुपेकरबोवा शाहूंतून फुटून गेल्यावर त्यांनीं सांगलीचे रा. छापखाने या नांवाच्या गृहस्थांस सांगून, त्यांच्याकडून जरी—रोमियो ॲण्ड ज्यूलिएट—च्या आधारें 'मोहन आणि तारा' या नांवाचें नाटक लिहून घेतलें, तरी केळकरांची सर त्याला आली नाहीं. कारण, त्या दोघांच्या उपनांवां इतकाच त्या दोघांत ज्ञानाचा फरक होता. मजपाशीं केळकरांनीं लिहिलेले जे-रोमियो ॲण्ड ज्यूलियेट-चे सुमारें दोन अंक आहेत, व मूळांत भर न घालतां ट्रॅजेडी कशी करायची याचा जो आराखडा त्यांनीं लिहिलेला आहे, तेंच सर्व याचा पुरावा करीत आहे. यावरून, नांव चोरण्यानें दुर्गुण लपत नसतात हें म्हणणें वास्तविक ठरतें. फार कशाला? केळकरांनीं-मर्कटजीचा सूड—म्हणून जें एक असेंच अर्धवट हास्यरसप्रधान नाटक लिहिलें होतें, तें त्यांचे स्नेही रा. श्री. भि. सरदेसाई यांनीं पुरें करून त्याचाहि शाहूंनीं पुण्यास, केळकरांच्या मृत्यूनंतर प्रयोग केला, परंतु त्याला जितकें यश मिळालें, त्यापेक्षां जरा अधिक 'मोहन आणि तारा' यालाहि 'सामाजिक नाटकमंडळींत' मिळालें. एकंदरींत काय कीं, प्रो. केळकर मृत्यूमुखीं पडल्यानें शाहूंची जी अपरिहार्य हानी झाली ती पुनरपि भरून निघाली नाहीं,

व केळकरांच्या मदतीच्या आभावीं त्या मंडळीला आपल्या रंगभूमीचा रंगहि त्यामुळें बदलावा लागला. प्रोफेसर केळकर यांचीं संगती शाहू मंडळीला जरी अवघीं पांचच वर्षें लाधली, तरी त्या संगतीच्या संगमांतून अनेक गोष्टींचा उगम झाला आणि महाराष्ट्राच्या रंगभूमीला अगदीं निराळें वळण मिळालें. स. १८९२ सालीं राणा भीमदेव नाटक बसविल्यानंतर नाइट क्लबाच्या लेखकांत तंटा होऊन तो क्लब मोडला व शिरवळकर आणि मोडक या उभय लेखकांची तोंडें भिन्न दिशांना वळली. शिरवळकरांनीं 'पानिपतचा मोकाब्ला' हें नवें नाटक स्वतंत्रपणें लिहिलें व तें प्रो. केळकरांच्या देखरेखीखालीं बसविण्यांत येऊन त्याचा प्रयोगहि स. १८९३ सालीं जो प्रथम पुण्यास झाला तो चांगलाच वठला. गणपतरावांची वीररसाचीं कामें आतां महाराष्ट्र–रंगभूमीवर हरघडीं होऊं लागून, समाजांतील लेखकांना तसलींच नाटकें लिहिण्याचें स्फुरण चढलें. कै. गोविंद वासुदेव कानिटकर यांनीं हॅम्लेटच्या आधारें रचिलेल्या 'वीरसेन' नाटकाची शाहूंतून हकालपट्टी होण्याचा हाच काळ होय. पूर्वीं तीनशें रुपये प्रयोग करण्याच्या हक्काबद्दल एकदां दिले असतां, हॅम्लेटच्या प्रयोगाला उत्पन्न चांगलें होतें असें पाहून, आणखी सातशें रुपयांचा शाहूमंडळीकडे त्यांनीं गोरक्षणाला मदत करण्याची सबब पुढें करून मागणी केली. केळकरांनीं दोनशें रुपये देण्याचें कबूल केले असतांहि ते जेव्हां ऐकेनात, तेव्हां पूर्वींच 'विकारविलसित' या नांवानें प्रि. अगरकरांनीं भाषांतर केलेल्या हॅम्लेटमध्यें रंगभूमीला साजेल अशा भाषणादिकांची सुधारणा करून, केळकरांनीं आगरकरांचे पडलेलें नाटक जें अस्सल स्वरूपांत शाहूंच्याकडून पुढें आणिलें आणि कानिटकरांचा नक्षा उतरून त्यांचें नाटक पाडिलें, तें अखेरचेंच पडलें, व आगरकरांचें पड-



त्रिवार गणपतराव—Photo by कुसुमाकर कोल्हटकर.

लेलें अक्षर्यींचें जिवंत झालें. आगरकरांच्या छापील पुस्तकांत व गणपतराव करीत असत त्या हॅम्लेटच्या नकलेंत जें जमीन अस्मानाचें अंतर असें, त्याचें सर्व श्रेय गणपतरावांचें नाट्यचातुर्य आणि प्रो. केळकरांना त्या पुस्तकांत केलेल्या सुधारणा यांनांच देणें योग्य आहे.

प्रो. केळकर पुण्यास वारले त्यावेळीं शाहूमंडळीचा मुक्काम बडोद्यास होता. प्रो. केळकरांचा शाहूमंडळीवर उत्तम प्रकारचा वचक असल्यानें, ती त्या वेळीं ऋणमुक्त होऊन आपल्या अंगच्या गुणप्रदर्शनानें जी वैभवशिखराकडे आपला मार्ग आक्रमण करीत चालली होती, ती केळकरांच्या मृत्यूमुळें स्वतंत्र होऊन, दावें सुटलेल्या प्राण्याप्रमाणें स्वैरवृत्तीची बनण्याकडे १८९६ सालापासून धांव घेऊं लागली. उत्पन्न चांगलें होत असल्यानें मंडळीची सांपत्तिक स्थितिहि चांगली झाली होती, पण तिच्यांत चैनीचा प्रादुर्भाव झालेला होता. गणपतराव आणि बाळाभाऊ यांच्या चैनीच्या वर्तनासंबंधानें जी लोकवार्ता आहे, ती किती खोटी आहे, व त्यांच्या चैनबाजीचे प्रो. केळकर हे आद्य गुरु नव्हेत, याबलद्‌ची गोष्ट येथेंच थोडक्यांत नमूद करणें इष्ट आहे.

गणपतराव आणि बाळाभाऊ यांना चैनीचे विलास करण्यास प्रो. केळकरांचीच संगति मुख्यत्वें कारणीभूत झाली असा जो जनप्रवाद आहे, त्या बाबतींत प्रश्न करतां, गणपतरावांनीं जें त्याचें स्पष्टीकरण केलें तें असें आहे कीं, 'ठाणें मुक्कामीं शाहूमंडळीचा १८९० सालीं मुक्काम असतां, तेथें एक मास्तर या नांवानें प्रसिद्ध असलेले जे अबकारी इन्स्पेक्टर होते, त्यांनीं प्रथम गणपतराव आणि बाळाभाऊ यांना चैनीच्या वस्तूंचा उपभोग घेण्याची दीक्षा दिली व नंतर त्या

चैनीचा चोरून मारून उपभोग घेण्यास त्यांची सुरुवात होतां होतां, पुढें ती चैन अंगवळणी झाल्यासारखी झाल्यानें तिच्यावांचून इ. स. १८९७ पासून त्या दोघांनां चैनच पडेनासें झालें. आंतून उसळी मारणाऱ्या पाण्यावरचें दडपण दूर केलें गेलें असतां, तें जसें उसळी मारून जोरानें बाहेर येतें, तद्वत् ठाण्यास प्रारंभ झालेल्या चैनीनें केळकरांच्या मृत्यूमुळें अधिकाराचें दडपण दूर होतांच—दोन वर्षांनीं कसें तुफान केलें तें सर्वांना महशूर असल्यानें त्याचें स्पष्टीकरण करण्याचें कारणच नाहीं. हें सांगण्याचा फक्त उद्देश हाच कीं, कै. प्रो. केळकरांवर जो जनापवाद आहे, तो सर्वथैव दूर व्हावा.

हॅम्लेट, ऑथेल्लो, टेमिंग ऑफ दि श्रयू, सिंबेलाईन, हीं शेक्सपिरयचीं नाटकें आणि राणा भीमदेव हें पुण्याच्या नाइट क्लबनें लिहिलेलें नाटक, इतकीं मुख्यत्वें पांच नाटकें व इतर—मोचनगड, वीरकांत-वीरसेन, मंजुघोषा वगैरे नाटकांचा संच उत्कृष्टपणें बनलेल्या स्थितींत शाहूमंडळी स. १८९२ सालीं पुण्याहून मुंबईस गेली तेव्हां, तेथील मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रकारांनीं त्या मंडळीचे प्रयोग पाहून तिचे गुणानुवाद गाण्याची जी सुरुवात केली, त्या बाबतींतला तेथील 'ऍड्व्होकेट' पत्राचा एकच उतारा वाचकांपुढें मांडिल्यानें वाचकांची तद्विषयक गोष्टींबद्दलची खात्री होईल. 'ऍड्व्होकेट' आपल्या तारीख २६ नोव्हेंबर स. १८९२ च्या अंकांत म्हणतोः—

**The Shahu Nagarwasi Dramatic Co.**—

Appreciators of drama and acting will do to witness the performance of Shahu Nagarwasi Dramatic Company which has been in Bombay some weeks. The Company puts on the stage some of the

Marathi plays and provides the spectators with four hours genuine amusement. Professor Agarkar's translation of Hamlet makes a decided impression. Professor Kelkar's rendering of "Taming of the shrew" is a master piece of adaptation and a most delicious *Frandise.* From start to finish the spectator enjoys it to the heart's content and it is difficult for the most morose man to keep his face and avoid holding his sides. The Company also performs adaptations of "Othello" and other plays of Shakespeare. For to-night it announces for the first time "Rana Bhimdeo" a historical play, to the dramatic excellence of which the thrilling heart, throbbing brow and the wet eyelashes of the spectators will bear witness.

व्याण्णव सालचा मुंबईचा मुक्काम उत्तम तऱ्हेचा झाला व नंतर तेथून ती मंडळी पुढें कोठें गेली व तिचा इतिहास काय घडला वगैरे गोष्टींचें वर्णन जें मागें पंच्याण्णव सालीं प्रो. केळकर पुण्यास वारल्या पर्यंतचें दिलें आहे, तें वाचल्याचें वाचकांना स्मरत असेलच. आतां यापुढें अठ्याण्णव सालाच्या अखेरीपर्यंतचा व मागील पांच सालांत घडलेल्या ज्या कांही गोष्टीं सांगण्याचें बाकी राहिलें आहे, त्याची हकीकत आतां यापुढें देतों.

समाजांतील कांहीं व्यक्ति संशयपिशाचिकेनें झपाटल्या असतां, त्यांची मनःस्थिति कशी होते, आणि त्यामुळें संसाराच्या चालत्या गाड्याला खीळ पडण्याचे प्रसंग डोकावूं लागले असतां, संशयपिशाचास मूठमाती देणारा बुद्धिमान मांत्रिक मिळाल्यानें अखेरीस यांशयनिरसन होऊन, सांसारिक व्यक्ति आपला व्यवहार सुरळीत-

पणें कसा चालवूं लागतात, याचें प्रदर्शन जगापुढें खुषमौजेच्या प्रसंगांत गुंतागुंत केलेलें मांडण्यासाठीं रा. गो. ब. देवल यांनीं एका अप्रसिद्ध अशा इंग्रजी पुस्तकाच्या आधारें 'फाल्गुनराव अथवा तसबिरीचा घोंटाळा' या नांवाचें कांहीं अंशीं सामाजिक वळणाचें नाटक, प्रो. केळकरांच्या मदतीनें मराठींत नवीन पद्धतीनें लिहून, तें शाहूमंडळीकडून प्रथम पुण्याच्या आर्यभूषण थिएटरच्या रंगभूमिवर ज्यावेळी आणविलें, त्यावेळी 'त्राटिका' नाटकाच्या प्रयोगाची फारच हुल्लड होऊन तें समाजाला अत्यंत प्रिय झालें होतें.

महाराष्ट्राच्या रंगभूमींत ज्या चार क्रांत्या शाहूनीं केल्याचें मागें सांगितलेलें वाचकांनी वाचलें आहे, त्यांसारखीच पांचवी क्रांती म्हणजे प्रत्येक नाटकांत कशा तऱ्हेच्या कथेची हकीकत गोंविली आहे, त्याचें थोडक्यांत पण चटकदार वर्णन—नाटकाच्या हस्तपत्रकांत—हँडबिलांत छापण्याची नवींन पद्धत इंग्रजी धर्तीवर प्रो. केळकरांनीं शाहूमंडळीकडून सुरू करवून घडवून आणिली हेंहि येथें नमूद करून ठेवण अप्रासंगिक होणार नाहीं. त्या हस्तकपत्रकांपैकीं कांहीं मासले पुढील प्रमाणें होतः—

**मोचनगड**—या नाटकांत—मुख्यत्वेंकरून दुष्ठ लोक स्वतःचे हेतु साध्य होण्याकरितां सज्जनांचा कसा छळ करितात, किंवा प्रसंगविशेषीं त्यांच्या जीवावरहि कसे उदार होतात, नीतिमान, शूर व खऱ्या मुत्सद्यांशीं गांठ पडली असतां कर्तव्यशून्य अधिकाऱ्यांची कशी तारांबळ उडते व परमेश्वर सज्जनांचा संकटसमयीं कसा पाठीराखा होतो वगैरे गोष्टी बोध घेण्यासारख्या होतात.

**वीरकांत—वीरसेन**– ( आरबी भाषेंती सुरस व चमत्कारिक गोष्टी पैकीं आंग्राद व आसाद या आधारें तयार केलेलें ) आरबी भाषेंतील चटकदार गोष्टींपैकीं विशेषतः मनोवेधक अशी ही गोष्ट आहे. यांतील कांहीं भाग तर

फारच हृदयद्रावक होतात. कथाभाग सुप्रसिद्ध असल्यामुळें त्याचा सारांश देण्याची जरूर नाहीं. तरी हें नाटक पाहाण्याची संधि येथील रसिक लोक दवडणार नाहींत अशी आशा आहे.

**त्राटिका**—( या नाटकाचीं कमींत कमीं आठ नऊ तऱ्हांचीं हस्तपत्रकें आहेत. त्यांतील दोनच तऱ्हा यापुढें दिल्या आहेत ).

( १. ) खरोखरी सद्गुणी असून, परिस्थितीच्या योगानें हट्टी, बेमुरवतखोर आणि द्वाष्ट बनलेल्या स्त्रीला शेरास सव्वाशेर या न्यायानें खंबीर मनाचा, निग्रही आणि धूर्त नवरा मिळाला असतां तिच्या दुष्ट खोडी मोडून तिच्या अंगच्या चांगुलपणाचें चीज करून संसार सुखप्रद कसा करता येतो हें या नाटकांत फार मजेनें दाखविलें आहे. शिवाय बापाच्या घरीं नम्रपणानें वागणारी मुलगी पुढें तशीच निपजेल हा कांहीं भरंवसा नाहीं हेंहि या नाटकांतील कमळा नांवाच्या पात्रावरून चांगलें दिसतें. राणोजीची विचित्र भाषा व नानाप्रकारचीं सोंगें व शेवटीं प्रतापरावी मात्रा आपल्या बायकोवर चालविण्याच्या कामीं झालेली फटफजीती यांच्यामुळें प्रेक्षकांची हंसतां हंसतां मुरकुंडी वळते. नवरा आणि बायको अशा जोडप्यांनी हा खेळ पाहाण्यांत विशेष मजा येते.

(२.) नवराबायकोंत खरें प्रेम असून आपापल्या अधिकारांप्रमाणें दोघेही वागत असलीं तरच संसारांत सुख; पण या जगांत अशीं जोडपीं फारच थोडीं. बहुशः एकाचें पारडें जड होऊन दुसऱ्याला संसारयात्रा फार त्रासदायक होते. अशाच प्रकारचा एक प्रसंग कल्पून शेक्सपियरनें हें नाटक रचिलें आहे. त्राटिका नांवाची एक अतिशय कजाग पण सुस्वरूप आणि श्रीमंत अशी कुमारी होती. तिच्याशीं लग्न लावायला कोणी धजेना. शेवटीं प्रतापराव नांवाच्या एका हुशार, चतुर आणि प्रतापी पुरुषानें लग्न लावावयाचा निश्चय केला, आणि तिला ताळ्यावर आणण्यासाठीं सूळ मागणी करण्याच्या विचित्र तऱ्हेपासूनच त्यानें विलक्षण मार्गाचा स्वीकार केला. तोंडांत नुसते प्रेमाचे शब्द पण कृति निष्ठुर अशा रीतीनें त्यानें तिला आपल्या कह्यांत आणिलीं; पण एकच युक्ति सर्व ठिकाणीं सारखी लागू पडत नाहीं हें दाखविण्याकरितां मूर्ख राणोजी व त्याची पाटाची बायको सारजा यांचा प्रवेश घातला आहे. राणोजीची विचित्र भाषा, पिल्या [ प्रतापरावाचा रडी ] याचें अडदांड व कुणबी बोलणें वगैरेनीं हें नाटक फार चटकदार झालें असून अव्वलपासून अखेरपर्यंत हंसून हंसून पोट दुखून येतें. या कष्टमय

संसारयात्रेंत जितके आनंद करून घेण्याचे प्रसंग येतील तितक्यांचा पुरा अनुभव घेण्यांत कधीं कसर करूं नये. कारण आनंदानें आयुष्य वाढतें.

हॅम्लेट—( या नाटकाचींहि वेगवेगळया गोषवाऱ्यांत छापलेलीं अशीं जरी आठ दहा प्रकारचीं हस्तपत्रकें आहेत, तरी त्यांपैकीं मासल्यासाठीं यापुढें फक्त तीनच प्रकारचीं दिलीं आहेत. )

(१) हॅम्लेट नाटक म्हणजे संसाराचें लहान प्रमाणाचें पण खुबीदार चित्र आहे. यांतील पात्रें म्हणजे संसारांत सामान्यतः आढळणाऱ्या प्रकृती होत. संसारांतलि अनेकविध प्रसंगांचा उल्लेख व त्यावर सत्यद्रष्टया कवीचे मार्मिक विचार या नाटकांत गोंविले आहेत. संसारांत हंसून दिवस घालविणाऱ्यापासून तों थेट मनुष्यसृष्टीचें पुढें कसें होईल या गहन विचारांखालीं ज्याचें अंतःकरण चूर होऊन गेलें आहे अशा तत्वज्ञान्यापर्यंत सर्वांना हें नाटक मनोरंजक आणि बोधपर वाटतें.

( १ ). या नाटकांत कवीनें आपल्या कल्पनाशक्तीचे अत्यंत जोरदार व मोहक स्वरूप आविष्कृत केलें आहे. नायक हॅम्लेट ( चंद्रसेन ) च्या अंतःकरणांत उदात्त विचार व सूड घेण्याची इच्छा यांची जी सारखी लढाई चालू होती तिचें चित्र कवीनें फारच मार्मिकतेनें उठऊन दिलें आहे. नाटक पाहात असतां प्रत्येक सहृदयप्रेक्षकाला असें वाटत असतें कीं, आपण नायकाच्या त्या त्या स्थितींत आहों व त्याच्या प्रमाणें आपल्याहि मनोवृत्ती क्षणोक्षणी क्षुब्ध होत आहेत. हॅम्लेटच्या तोंडांत कवीनें संसारांतील निरनिराळया प्रसंगांसंबंधी जे फार खोल, सत्यपूरीत व मार्मिक विचार घातले आहेत त्यांची साक्ष मनाला पटून प्रेक्षकांचीं मनें आनंदसागरांत डुलूं लागतात. भोळी व प्रेमळ मल्लिका, दुष्ट राजा, मूढ राणी, कारस्थानी व खटपटी शालेय, तापट पण रागाचा झटका गेल्याबरोबर उदार होणारा तीव्रजव वगैरे निरनिराळ्या स्वभावांच्या पात्रांच्या योगें हें नाटक म्हणजे संसाराचें हुबेहूब चित्र बनून राहिलें आहे.

( ३ ). अगोदर शेक्सपियर कविवृंदाचा मुकुटमणि, त्यांत त्याच्या नाटकांत हॅम्लेट हें अनेक रसांच्या परिपाकानें रसिकजनांच्या चमत्कारिक गोष्टी लावणारें व संसारांतील सुखदुःखांच्या मिश्रणानें भरलेल्या भाषेंतील चटकदार चित्र यांत वठविलें असल्यानें मार्मिक लोकांच्या पसंतीच्यातील कांहीं भाग तर

स्वभाववैशिष्टय मोठ्या शिताफीनें आणि उत्तम रीतीनें विशद करून सुज्ञ व अनुभवशीर जनांच्या बुद्धीस रुचणारें असें असल्यामुळें, आबालवृद्धांस, विद्वान आणि अविद्वान दोघांसहि प्रिय झालेलें आहे. उलाढाल्या आणि फाजील कारस्थानी शालय, मुग्ध आणि प्रेमळ मनाची मालिका, तापट पण न्यायी तीव्रजव, कपटी आणि खुनशी राजा, भोळी राणी आणि बुद्धिमान, सरळ अंतःकरणाचा, पापभीरु चंद्रसेन, अशीं निरनिराळ्या स्वभावांचीं माणसें यांच्या साधनानें कवीनें सुबक आणि मनोहर इमारत उठविली आहे. ती कितीदां पाहिली तरी प्रेक्षकांची तृप्तीच होत नाहीं. या नाटकाचा प्रयोग येथील सहृदय प्रेक्षकांच्या अत्यंत प्रीतींतला होऊन बसला आहे व त्यांच्याकडून या खेळास उदार आश्रय मिळेल अशी आजपर्यंतच्या अनुभवावरून आम्हीं उमेद धरतों.

**राणा भीमदेव**—हल्लीं आमच्या हिंदुस्तान देशांत शांततेचें साम्राज्य सर्वत्र अव्याहत रीतीनें स्थापित झालें असल्यामुळें व परचक्रापासून किंवा देशांतल्या देशांत प्रसंगोपात उभें राहणाऱ्या अरिष्टापासून आमचें संरक्षण करण्याचा पत्कर आमच्या दयाळू सार्वभौम सरकारानें घेतल्यामुळें अशी स्थिति येत चालली आहे कीं, शौर्य, पराक्रम, कट्टा देशाभिमान, जिवावर उदार होऊन आपला देश आपलें वैभव, आपला धर्म यांचें संरक्षण करण्याची बुद्धि इत्यादि गुणांची रु आमची फारकत होते कीं काय अशी धास्ती वाटूं लागली आहे. हे गुण जागृत राखण्यास एकच उपाय आपल्या हातीं राहिला आहे, आणि तो हाच कीं, आमच्या पूर्वजांच्या अंगीं गुण कसे वास करीत होते हें त्या काळाचे इतिहास वाचून, विशेषतः तेव्हांच्या प्रसंगाचें चित्र रंगभूमीवर हुबेहुब वठविलेलें पाहून, या गुणांची ओळख बुजूं द्यावयाची नाहीं; म्हणून आम्ही येथील चाणाक्ष प्रेक्षकांस विनयपूर्वक अशी शिफारस करितों कीं त्यांनीं 'राणा भीमदेव' हें नाटक अवश्य पहावें. या नाटकांत राजभक्ति, प्रजावात्सल्य, इत्यादिकांचें हुबेहूब वठविलेलें चित्र पाहून प्रेक्षकांचीं अंतःकरणें उचंबळून आल्याशिवाय राहात नाहींत. 'राणा भीमदेवा'च्या अंगांतील, वीरश्रीचा संचार, त्याचें 'जयसिंह' व 'चंपा-लागू पडे' यांचे वरील अलौकिक प्रेम व त्यांच्या सुखाकरितां सर्वस्व अर्पण करण्याची सारजा यांचा प्रेमाच्या असह्य दुःखानें वेडया झालेल्या 'चंपावतीं'ची दीनस्थिति, वाचा [..डी ] यार्द व स्वदेश यांकरितां केलेली मर्दुमकीची शिकस्त पाहून प्रेक्षकांच्या झालें असून अव्वलपासून, आनंद, इत्यादि मनोवृत्ति कालवाकालव करून सोडतात.

# अंक चौथा.

**झुंजारराव**—या जगांत दुष्ट, कपटी व अधमाधम लोकांच्या कृतीनें निरपराधी, सदाचरणी आणि सच्छील पण भोळ्या लोकांवर दुःखांचे डोंगर कसे कोसळतात याचें सर्वोत्कृष्ट चित्र एका जगमान्य कविश्रेष्ठानें या नाटकांत आपल्या अंगची सर्व करामत खर्च करून उतरविलें आहे. अधमाधम नरपशूंचे लोकांत जे मासले आढळतात त्या सर्वांचा मुकुटमणी अयागो ( जाधवराव ) होय. नाटक-प्रयोग चालू असतां या पात्राची कृति पाहून ज्याच्या तळव्याची आग मस्तकाला जाऊन पोंहोंचत नाहीं असा सहृदय प्रेक्षक क्वचित् आढळेल. **झुंजारराव, कमळजा, पिलाजीराव, व रंभाजीराव,** या चार प्रकारच्या चार भोळ्या माणसांच्या स्वभावतः निर्दोष अशा अगदीं लहानसान कृत्यांवर आपल्या अजब दुर्मतीनें भलतेच रंग चढवून त्यांचा पाश वनवून त्या पाशांत त्यांस गुंतवून शेवटीं आपल्यासुद्धां बहुतेकांस यमपुरीस धाडणाऱ्या **जाधवरावाचें** चरित्र कितीदां पाहिलें तरी त्यांतील भयंकर मोहकपणा कमी होत नाहीं.

**फाल्गुनराव** अथवा **तसबिरीचा घोंटाळा**—मनुष्य संशयरूपी राक्षसाच्या स्वाधीन आपली बुद्धि करून बसला म्हणजे तसबिरीसारखी यःकश्चित वस्तु देखील केवढा प्रमाद दाखविते, व कुटुंबांतील सुख आणि स्वास्थ्य नाहींसें करण्यास ती कशी कारणीभूत होते—याचें चटकदार चित्र या नाटकांत वठविलें आहे. त्याप्रमाणेंच अशा रीतीनें उत्पन्न झालेला घोंटाळा एखादें शहाणें माणूस भेटलें म्हणजे किती थोडक्यांत काढून टाकतें हेंही या नाटकांत स्पष्ट दर्शविलें आहे.

**दुर्गा**—हॅम्लेट नाटकांतील राजानें म्हटल्या प्रमाणें या खेपेस आनंद आणि खेद यांचें अश्रुतपूर्वक आणि अलौकिक संमिश्रण हे दोन भाग एकत्र जोडल्यानें होणार आहे. तर असा अपूर्व योग पाहाण्याची संधि रसिकजनांनीं दवडूं नये. पति वारला अशी खात्री असतांहि एकनिष्ठपणें पातिव्रत्यधर्म पाळणाऱ्या बिचाऱ्या दुर्गेवर दुदैवानें वाईट प्रसंग आणून, शेवटीं तिच्या पुत्रवात्सल्याच्या भरांत तिच्या मताविरुद्ध तिच्या कडून आनंदरावांशीं लग्न कसें लाविलें आणि मागून दैन्याप्रमाणें पाहिल्या पतीला तिच्या समोर उभें कसें केलें व अशा पेंचांत तिच्या पतीचा घात कसा केला—इत्यादि प्रकार हृदयाला चटका लावून टाकणारे या दुर्गानाटकांत गोंविले आहेत.

**पानिपतचा मुकाबला**—( याचे दोन नमुने दिले आहेत. )

## गद्यनाट्याचार्य गणपतरावांचें चरित्र.

( १ )—भारतीय युद्धाची जी समरभूमि सोनपतपानपत तेथें उत्तरेकडील दुराणी उर्फ गिलचे लोक आणि दाक्षिणेकडचे मराठे लोक यांच्यामध्यें जें घनघोर रणकंदन झालें, त्याची खरी कल्पना कोणास करणें असल्यास त्यानें एकवार हें नाटक अगत्य पहावें अशी आम्ही शिफारस करतों. यांत ब्राह्मणवीरशिरोरत्न श्रीमंत भाऊसाहेब पेशवे, बालयोद्धे केवळ अभिमन्यूप्रमाणें पराक्रमी असे श्रीमंत विश्वासराव व रणशूर जनकोजी शिंदे, वृद्ध भीष्माचार्य मल्हारराव होळकर व दुसरे अनेक लढवय्ये सरदार मेहेंदळे, इब्राहिमखान गारदी वगैरे बहाद्दरांनीं कस कसे पराक्रम करून प्राणांत होईपावेतों शस्त्र जमीनीवर ठेविलें नाहीं याचें यथार्थ दिग्दर्शन केलें आहे.

( २ )—प्रस्तुत नाटक म्हणजे पानपतच्या लढाईचें रंगभूमीवर आणलेलें एक हुबेहूब चित्र असून ज्या आमच्या तेजस्वी पूर्वजांनीं **श्री शिवछत्रपतींचा** भगवा झेंडा अटकेवर फडकावयास लावला, त्यांच्या मर्दानी वाण्याचें पूर्ण द्योतक आहे; इतकेंच काय पण सांप्रत तर निस्तेज किंबहुना शून्यवत् झालेल्या आमच्या वीरवृत्तीला क्षणभर तरी जागृत करणारें असून आमच्यांतील **नेपोलियन बोनापार्टाशीं** ईर्षेनें स्पर्धा करणारा **भाऊसाहेब पेशवा** व वीररत्न स्वामीभक्त सरदार **जानकोजी शिंदे**, सुभेदार **मल्हारराव होळकर** यांचीं रणमैदानांतलीं शूर मराठ्यांना त्वेष उत्पन्न करणारीं हृदयद्रावक आणि आवेशोत्पादक भाषणें ऐकून अस्सल हिंदूंच्या मनोवृत्ति थरारून सोडणारें असें हें नाटक आहे. यांत घातलेल्या वीर श्रृंगार, करुणा, शोक, भयानक रसांचें वर्गम उदात्त आहे.

**कांतिपुरचे दोन गृहस्थ**--प्रतापराव व मित्रचंद्र हे दोघे कांतिपूरचे तरुण गृहस्थ असून याचा चांगला स्नेह होता. पैकीं प्रतापराव दूर देशीं जाऊन एका राजाच्या दरबारीं राहतो आणि आपल्या गुणांवरून राजाची प्रीति संपादन करतो. त्याचे गुणांमुळें राजाच्या मुलीचें मन त्याच्यावर बसतें. दोघांचीं मनें प्रेमपाशानें बद्ध होतात. प्रतापरावाचा उत्कर्ष, झालेला पाहून मित्रचंद्राचा बाप त्याची आळशीपणाबद्दल निर्भर्त्सना करून त्यालाही तिकडे पाठवितो. आपली प्रिया सारजा हिला मी आपलें प्रेम कायम राखीन असें सांगून मित्रचंद्र व प्रतापराव यांची गांठ पडल्यावर प्रतापराव स्नेहधर्मानें राजकन्ये ( कमळे ) वर

आपलें मन कसें बसलें आहे, तिच्या बापाच्या मनांतून तिचें लग्न सर्जेराव नांवाच्या एका महामूर्खाशीं लावण्याचें आहे, तेव्हां पळून जाण्याचा आपणां दोघांचा बेत झाला आहे वगैरे हकीकत त्याला सांगतो. कमळेच्या स्वरूपावर लुब्ध होऊन मित्रचंद्र प्रतापरावाचा बेत राजाला कळवितो. कमळा व प्रतापराव यांची ताटातूट होते. सारजा पुरुषवेशानें राजदरबारीं येते. प्रतापराव चोरांचा नाईक होतो, कमळेला मित्रचंद्राच्या छळवादापासून सोडवितो वगैरे कथाभाग निरनिराळ्या वीर, शृंगार, इ. उदात्त रसांनीं भरलेला आहे.

**मंजुघोषा**—या नाटकांतील मधुर व सभ्य शृंगारांइतके बहारीचे प्रवेश इतर नाटकांतून क्वचितच पाहायला सांपडतात. विरहानलांत सांपडलेल्या पति-पत्नींच्या हृदयांत जी कालवाकालव होत असते, त्याचें प्रदर्शन या नाटकायां-चून इतरत्र कोठें पाहायला सांपडेल किंवा नाहीं याची शंकाच आहे! दुःख-शोकांना विरंघळा देणाऱ्या सभ्य अशा हास्यरसाची परमावधी याच नाटकांत प्रेक्षकांना मनसोक्त मेजवानी देणारी असल्यानें, पतिपत्नींनी दर्शनसुख घेण्याच्या लायकीचें जें हें संसारांतील सर्वसामान्य परंतु अद्भुत देखाव्यांचें संसारचित्र तें प्रत्येक स्त्री-पुरुषांनीं बघण्याच्या लायकीचें आहे.

**बाजी देशपांडे**—अत्यंत बिकट अशा पेंचांत सांपडलेल्या आपल्या धन्यासाठीं स्वतःचें शिरकमल निधड्या छातीनें तळहातावर घेऊन सेवाधर्माचा उत्कर्ष ज्यांनीं ज्यांनीं म्हणून आजपर्यंत दाखविल्याचीं महाराष्ट्राच्या मराठ्यांच्या इतिहासांत जीं जीं उज्वल उदाहरणें आहेत, त्यांतीलच बाजी देशपांडे यांचें एक अतुल व संस्मरणीय उदाहरण आहे. मातृभूमीला शत्रूच्या कठोर शृंखलेंतून सोडविण्यासाठीं छत्रपति शिवरायांनीं हातीं समशेर धरली असतां, परदास्यावर लाथ मारून व स्वसुखाला तिलांजुली देऊन जे नरवीर आपल्या मूठभर साहा-य्यकांसह शत्रूच्या सेनासागराला आमरण बांध होऊन राहून, आपल्या धन्याचा प्राण वांचवायला कारणीभूत झाले, अशांपैकींच एका नरव्याघ्राच्या उदात्त कृतीचें यांत मनोहर चित्र बघायला सांपडणार आहे.

येणेंप्रमाणें नाटकांच्या प्रयोगांचीं हॅन्डबिलें काढण्याची प्रो. केळ-करांनी जीं नवीनच पद्धति आपल्या हयातींत सुरू केली, ती शाहूमंड-ळीनें कायम ठेविली होती. मंजुघोषा व बाजीदेपांडे या दोन नाटकांच्या

हँडबिलांव्यातिरिक्त जीं नमुनेदार हँडबिलें या मागें दिलीं आहेत, तीं सर्व प्रो. केळकर यांनीं लिहिलेलीं असून, रा. कुळकर्णी यांच्या 'रंग-भूमी' पुस्तकांत जो 'मंजुघोषा' नाटकाच्या हँडबिलाचा नमुना दिला आहे तो व या पुस्तकांतील वरचीं 'बाजीदेशपांडे' आणि 'मंजुघोषा' या दोन नाटकांचीं हँडबिलें प्रकृत पुस्तकलेखकाच्या हातचीं आहेत.

इ.स. १८९४ सालीं शाहुमंडळी कोंकणांत गेलीं असतां, रत्नागिरीस तिचे नाट्यप्रयोग पाहून तेथील ज्या तिघां वड्या इंग्रज अधिकारी गृहस्थांनी तिला प्रेमप्रमाणपत्रकें दिलीं तीं येणेंप्रमाणें:—

मि. ई. एच् ऑटकिन्–(रत्नागिरी, ता. ४ डिसेंबर स. १८९४)

It gives me much pleasure to testify to the excellant acting of the Shahu Nagarwasi Dramatic Co.

I went first to hear "Hamlet" more from curiosity than any other motive. I was quite taken by surprise. The translation was so faithful that one would follow the play in every scene and recognize all the familiar passages, while the acting was a good throughout and in some parts really powerful.

It is very gratifying to know that Shakespear's greatest works are being so effectively presented to thousands in the Country who know no English.

मि. एच्. हार्वे —( रत्नागिरी,' ता. ४ डिसेंबर. सन १८९४)

I was present at the representation of "Hamlet" by the Shahu Nagarwasi Dramatic Co., and spent a very enjoyable evening. Much of the acting was really good: certainly far beyond what I excepted to see.

मि. ए. एस्. मोरॅर्टि( — रत्नागिरी, ता. ५ डिसेंबर, १८९४ )

I was very pleased with the acting of the Shahu Nagarwasi Dramatic Company in the play of "Hamlet" translated very faithfully into Marathi by Mr. Agarkar M. A. of Poona. Many of the actors, notably those who took the parts of 'Hamlet' had appreciation of the motives of the play.

I wish the Dramatic Company all the success they so well deserve.

'तसविरीचा घोंटाळा' हें नाटक प्रथम पुण्याच्या रंगभूमीवर चौऱ्याण्णव सालीं शाहूनीं जरीं केलें, तरी बाळाभाऊंनी आगाऊ सांगितल्याप्रमाणें-च त्याचें फारसें तेज पडलें नाहीं. वास्तविक तें नाटक देवलांनी त्राटि-का नाटकाच्या तोडीस तोड म्हणून मोठया अहमहमिकेनें जरीं लिहिलें होतें, आणि बाळाभाऊंना वेश्येचें त्या नाटकांतील सोंग करायला लावून, त्यांचा नक्षा उतरण्याची जरीं देवलांची अंतस्थ इच्छा होती, तरी त्या दोन्ही त्यांच्या मनोगत वासना अखेरीस निष्फल ठरल्या. कारण, तें नाटक तत्कालीन समाजाला बऱ्याच अंशीं आवडलें नाहीं. तत्कालीन समाज तसलीं नाटकें पचनीं उतरविण्या इतका उघडपणें सध्यां-सारख्या नीतिमत्तेच्या भावांत बहकलेला नसल्यानें, बाळाभाऊंनी त्या नाट-कांतील वेश्यारूप नायिकेचें म्हणजे शास्त्रोक्त असें जें निभृता नायिके-चें वेषधारण आणि कृती त्यांचें अलौकिक प्रदर्शन समाजापुढें मांडिलें तें जरी नाट्यगुणाच्या आणि कलेच्या दृष्टीनें समाजाला आवडलें तरी तें नाटक केव्हांहि त्राटिका नाटकाशीं सामना बांधूं शकलें नाहीं. अशा प्रकारें देवलांची चौथ्यांदा शाहूमंडळींत चौथ्या प्रकारची कच्ची झाल्यानें, देवलांची व त्या मंडळींचीं त्याच सालीं रामरामीची जी सलामी झाली ती अखेरचीच होय.

च्या

केसरी वर्तमानपत्रासंबंधानेंहि अशाच प्रकारची आपसांतल्या चुरसेची गोष्ट आहे. ऍक्टिंग शिकवितांना 'हिशेबांत-अजून उतरत नाहीं, उतरलें नाहीं आणि आलें नाहीं, अशा प्रकारचें भिन्न प्रयोगाचें वाक्य जसें देवलांच्या तोंडीं असे, तद्वतच रा. टिळक आणि प्रो. केळकर यांच्या मतभिन्नतेमुळें त्या दोघांतील मतांच्या हिशेबाचा ताळा जो जमत नव्हता किंवा हिशेबांत उतरत नव्हता, त्याचाच परिणाम कांहीं अंशानें शाहूमंडळीवर घडला. न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्यूसन कॉलेज यांचा आणि टिळकांचा संबंध नव्वद सालीं तुटल्याचें प्रसिद्धच आहे. त्यावेळीं आर्य भूषण छापखान्याचे मालक प्रो. केळकर हे होते आणि केसरी व मराठा या दोन पत्रांवर कर्जाचा बोजा होता. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी तीं पत्रें ज्या धोरणाचीं आणि ध्येयाचीं म्हणन काढिलीं होतीं, तें धोरण आणि तें ध्येय त्यावेळीं—कट्टे सुधारक जे प्रो. केळकर व आगरकर त्यांच्या लेखांमुळें डळमळूं लागलें असल्यानें वरील त्रयींत वाद माजला. बळवंतराव टिळक हे जात्या जरी पुरे सुधारक होते, तरी तत्कालीन समाज तसा बनलेला नसल्यानें व देशस्थितिहि तसें वळण पतकरण्यास अनुकूलतेची नव्हती हें नाडीज्ञान टिळकांना पूर्णपणें झालें होतें व त्यामुळें केळकर व आगरकर यांच्या मतांचा पगडा समाजावर एकदम बसणें अशक्य आहे. असें जें निदान टिळकांनी ठरविलें होतें, त्या बाबतींत बरीच भवति न भवति होऊन अखेरीस खर्चाच्या बोजासह टिळकांनी उपरिनिर्दिष्ट पत्रें आपल्या मालकीचीं करून घेतलीं व तंटा मिटविला. दोन्ही पत्रांवर असलेला कर्जाचा बोजा आर्यभूषण प्रेसरूप सावकाराcer' असल्यानें, त्या दोन्ही पत्रांवरील कर्ज, तो प्रेस' तीं पत्रें छापून ड्रून घेऊं लागला होता. हीच वेळ शाहूंचा उदयकाल सुरू होण्याची

होय. टिळक हे कायदेपंडित असल्यानें, दोन्ही पत्रांवरील आपली मालकी सर्व बाजूंनीं आपल्या हातीं ठेवण्याची वहिवाट करूं लागण्याचा जो डाव पूर्वपरिचित आगरकर व केळकर यांशीं ते खेळूं लागले होते, त्यांतीलच आपल्या हुकुमाप्रमाणेंच पत्रांतील मजकुराची व्यवस्था झाली पाहिजे या बाबतींतील शाहूंच्या जाहिरातीच्या झगड्याचें उदाहरण होय. तो, आपसांतला लढा असून सुसंस्कृत आणि विद्वानांतला तो असल्यानें, त्यांच्या शीलाला व योग्यतेला शोभेल अशाच प्रकारें ताब-डतोब संपुष्टांत आला. कारण ती गोष्ट म्हणजे कांहीं विशेष महत्वाची होती असें नव्हतें. 'शाहूमंडळीची जाहिरात केव्हांहि बाहेरच्या बाजूस घेत जावी,' असा एक हुकूम टिळकांनीं एकदां दिला असतां, प्रो. केळक-रांना प्रेसमध्यें कोणी ती गोष्ट सांगितली नाहीं. ते सहजीं प्रेसमध्यें गेले होते व जाहिरात बाहेर आलेली पाहून फोरमनकडून आंतल्या बाजूस त्यांनीं ती घेवविली व तसा केसरी छापून निघाला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं केसरीचा अंक हातीं पडतांच रा. टिळक संतापून प्रेसमध्यें गेले व त्यांनीं जाहिराती बद्दल चौकशी केली. रा. केळकरांनीं स्वतः ती गोष्ट तेथें येऊन केल्याचें जेव्हां त्यांना समजलें, तेव्हां ते जरी बाह्यात्कारें स्वस्थ बसले, तरी 'पुन्हां माझा हुकूम मोडला गेला तर केसरी सबंद नवा छापून काढावा लागेल' असें फर्मावूत निघून गेले. ही गोष्ट केळकरांना समजल्यावर, त्यांनीं पुन्हां केसरींत जाहिरातच द्यायची नाहीं अशी जी प्रतिज्ञा केली, ती स्वतः स्वर्गस्थ होईतों पाळिली.

प्रो. केळकरांचा पुण्यास अंत झाल्यावर शाहुमंडळी बडोद्याहून मुंबईस आली व नंतर वऱ्हाडांत गेली. श्री. दादासाहेब खापर्डे यांचा व त्यांचा त्या वर्षी जो फार परिचय झाला, तो मंडळीला अत्यंत लाभ-

दायक झाला. दादासाहेब हे स्वतः नाट्यप्रेमी आणि तज्ज्ञ असल्यानें, त्यांनी मंडळीला आपल्या गुणग्राहकतेचा उत्तम मोबदला दिला. मुद्राभिनयादिकांसंबंधानें दादासाहेबांनीं मंडळीला मोठ्या मार्मिकपणाच्या अशा अनेक सूचना आपल्या अर्थपूर्ण आणि विद्वन्मान्य अशा अलंकारी संभाषणानें देऊन, जन्माची ऋणी करून ठेविली. त्या वेळीं त्या मंडळीला श्री. दादासाहेबांनीं नाट्यकलेंतील नट आणि कवि यांच्या परस्परसंबंधाचें जें रहस्य सांगितलें, तेंच त्यांनीं बऱ्याच वर्षांनीं पुढें आपल्या एका नाट्यसंम्मेलनप्रसंगाच्या आणि इतर एक्या भाषणांत प्रतिपादिलें. त्याचा त्रोटक उतारा इतरत्र जो प्रसिद्ध झाला आहे तो जराशा फरकानें येथें दिल्यास, नट आणि कवि यांना बोधप्रद होणार असल्यानें, तो देण्यास हें स्थळ वावगें होईल असें वाटत नाहीं.



( नामदार खापर्डे )

श्री. गणेश श्रीकृष्ण खापर्डे बी. ए. एल् एल् बी, हे या वेळीं वऱ्हाडांत जरी वकीली करणारे असे अगदीं साधे गृहस्थ होते, तरी ते आपल्या औदार्यादि गुणांनीं त्या वेळीं त्या प्रांतांत 'प्रिन्स ऑफ बिरार्स' म्हणजे वऱ्हाडचे नबाब या विशेषणानें प्रसिद्धीस आले होते व ते सध्यां कौन्सिल ऑफ स्टेटचे नामदार मेंबर आहेत. असले हे थोर गृहस्थ मोठे नाट्यकलाप्रेमी आणि विद्वन्मान्य विद्वान असल्यानें त्यांचे नट आणि कवि या उभयतांसंबंधाचे विचार पुढीलप्रमाणें थोडक्यांत नमूद करतों.

श्री. दादासाहेब खापर्डे नटस्वरूपासंबंधानें म्हणतातः—कवींची योग्यता वस्तुतः मोठीच आहे. सृष्टिनिर्माणकर्त्या ब्रह्मदेवाशीं सुद्धां

त्यांची स्पर्धा आहे. ब्रह्मदेवानें काय ते सहाच रस उत्पन्न केले आहेत; पण कवींनीं नऊ रस उत्पन्न केले आहेत! अर्थात् कवि आपली योग्यता नटापेक्षां अधिक मानतात हें ठीक आहे. पण नटाचेंहि कार्य विचारांत घेण्यासारखेंच आहे. कवि एकांतीं वाटेल तेथें बसून आपल्या कल्पनांच्या भराऱ्या स्वतंत्रतेनें मारूं शकतात; पण नटांना तशी स्वतंत्रता नसून कवींच्या कल्पनांशी अगदी बरोबर रीतीनें आपली बुद्धि नेऊन त्यांनां भिडवावी लागते. यांत परतंत्रता आहे आणि तीच मोठी अवघड आहे. एखाद्यानें कोठें तरी एक दगड फेंकून मारावा आणि त्याचा तो दगड ज्या ठिकाणीं लागला असेल त्याच ठिकाणीं दुसऱ्याला आपला दगड नेमका मारण्याचें काम यावें, त्याचप्रमाणें हें आहे. अर्थात् यांत मोठी परीक्षा आहे. तथापी नाट्यप्रणेत्या कवींचीहि योग्यता मोठी आहेच याबद्दल वाद नाहीं. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, कवीपेक्षांहि नटाचें काम अवघड आहे, तरी तें पुष्कळ अंशीं परावलंबी आहे. कवीला हवा तो प्रसंग, वाटेल त्या भूमिका, किंवा इच्छेस येईल तो काळ व तें स्थळ हीं नुसत्या कल्पनांनीं उभारतां येतात; पण नटाजवळ तशी स्वयंसिद्धि फार थोडी असते. त्याला चित्रकार, शिल्पकार, गायनवादनकार इतरांचें साहाय्य मिळवावें लागतें. शिवाय कवींच्या कल्पना आपल्या अंगांत भिनवून घेऊन त्या आपल्या शरीराच्या सर्व अवयवांनीं प्रगट कराव्या लागतात. या दृष्टीनें पाहातां नट म्हणजे एकप्रकारें अष्टावधानी असावा लागतो!

आतां उत्तम नट म्हणजे काय हें समजलें पाहिजे. शरीरसौष्ठव हें नटाचें प्रथम लक्षण आहे. नटानें सुंदर दिसलें पाहिजे. सुंदरपणासंबंधानें सामान्य कल्पना नुसत्या नाकाडोळ्यांसंबंधानेंच असतात; परंतु तो अर्थ



श्री. सरदार बाबासाहेब इचलकरंजीकर घोरपडे.



श्री. सरदार बाळासाहेब कुरुंदवाडकर.

नटाच्या बाबतींत येथें घ्यायचा नाहीं. सौंदर्य हें उच्च मनोवृत्तीवर अवलंबून असतें; आणि या वृत्तींच्या आश्रयानें व प्रदर्शनानें प्रत्येक मनुष्याला सुंदर दिसतां येतें. हें आपापलें सौंदर्य आरशांत पाहून नटानें ठरवून ठेवावें आणि अभ्यासानें तें दृढ करावें हें बरें. नटाला अंगभूषा हवी असते. या कामासाठीं त्याला चित्रकलेचें ज्ञान अवश्य आहे. गाणें, बोलणें आणि या पेक्षांहि महत्वाचा भाग म्हणजे अभिनय हेहि त्याला शिकायचे असतात. अभिनयांत स्वाभाविकपणा असावा, पण तो वास्तविकपेक्षां थोडा अधिक अशाच अर्थानें समजावा लागतो. नुसता स्वाभाविक अभिनय हा स्वार्थी होतो; तो परार्थी होत नाहीं, आणि रंगभूमीवरील नटाच्या सव क्रिया विशेषें करून परार्थीच असतात हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. नटाला नाट्यविद्या शिकवितांना जे विचार सांगायचे असतील ते त्याला समजावून उत्पन्न करण्यापेक्षां त्याचे त्याला समजून उत्पन्न होतील अशा विषयीं नाट्यशिक्षकानें दक्षता ठेवावी. असे विचार त्याच्यांत उत्पन्न करून त्यांतील सुंदर व आवश्यक असतील तेवढेच ठेवून बाकीचे त्याला विसरविण्यास लाविलें पाहिजे. वारंवार अभिनयामध्यें पालट उपयोगी नाहीं. एकदांच योग्य अभिनय ठरवून तो शिकवून कायम करावा. वस्त्रें धारण करणें यांत सुद्धां शिक्षण आहे. कामी, संभावित पुरुष, दुःखित मनुष्य अथवा आनंदित मनुष्य या सर्वांच्या वेषांत जो वेगवेगळेपणा असतो, तो नटास माहीत पाहिजे. अभिनयाचें काम रस उत्पन्न करण्याचें आहे; तसेंच ज्याला श्रवणेंद्रियें नाहींत अशा प्रसंगीं बहिऱ्या प्रेक्षकासहि नटाचा सर्व भाव व भाषा हीं अभिनयानेंच समजलीं पाहिजेत."

वऱ्हाडचा मुक्काम आटपून शाहूमंडळीं मेहमींप्रमाणें ९६ साला पुण्यास आली व तेथून पुढें दक्षिण महाराष्ट्रांत उतरल्यावर कोल्हापुराहून कोंकणांत गेली. कोंकणच्या त्या सालच्या सफरींत रत्नागिरीचे तत्कालीन जे प्रतिद्ध युरोपियन सिव्हिल सर्जन त्यांनीं शाहूंची नाटक पाहून त्यांना जें एक शिफारसपत्र दिलें तें येणें प्रमाणें:—

आर. डब्ल्यु लियॉन्स—सिव्हिल सर्जन—( रत्नागिरी, तारीख ४ डिसेंबर सन १८९६ )

It gives me much pleasure to testify to the excellent acting of the Shahu Nagarwasi Dramatic Company.

I saw them in the "Taming of the Shrew" and was surprised and delighted with the quality of the acting. The way in which the attention of the house was held from the rise to the fall of the curtain would alone have indicated how thoroughly the play was enjoyed by the audience.

The Marathi adaptation follows Shakespeare's play closely, and the capital acting of the principal characters brought out the meaning in a way I would not have believed possible had I not seen it.

रत्नागिरीस मंडळीचा मुक्काम एक महिना होता. इतक्या अवधींत गणपतरावजींच्या तीर्थरूपांच्या वेळच्या भाऊबंदकीचें भांडण पुन्हां जरी इतक्या वर्षांनी उपस्थित झालें, तरी गणपतरावांनी त तात्रडतोब विजवून टाकलें. राजापुर येथील ज्या घरांत गणपतरावांचे वडील लहानपणापासून वाढले व स्वर्गस्थ झाले व ज्यांत गणपतराव जन्माला आले तें घर, गणपतरावांच्या वडिलांच्या चुलत्याचें होतें, व

तेथें सध्यां वस्ती त्यांच्याच वंशजांची म्हणजे गणपतरावांच्या चुलत चुलत्याची असून, गणपतरावांच्या मातोश्रीहि अद्यापि त्याच घरात होत्या. गणूचा काळ चालता होऊन त्याचा बराच लैकिक झाल्याचें त्याच्या त्या चुलत चुलत्याच्या कानीं अर्थातच गेलेलें होतें. गण कदाचित द्रव्यबलाच्या जोरावर आपल्या घरांत हरप्रयत्नानें हिस्सा मागेल असें गणूच्या चुलत्याच्या मनांत कपट येऊन, त्यानें गणूच्या स्वभावाची परीक्षा पाहाण्यासाठीं, त्याच्या जवळ एक हजार रुपयांची रत्नागिरीस येऊन मागणी केली. गणूनें ती रक्कम देण्याचें नाकारिल्यानें आर्थातच भांडणाची संधी उत्पन्न झाली, व लगेच त्या चुलत्यानें गणूला " नसतील रुपये द्यायचे तर इस्टेटीवरचा हक्क सोडल्याची फारकत लिहून दे " असें बेफामपणानें सांगितलें. वास्तविक पाहिलें असतां, गणूचा त्या इस्टेटीवर कांहींच हक्कसंबंध नव्हता; परंतु फार वर्षें एकत्र राहिल्यानें तें सर्व कुटुंब एकच आहे, असेंच सर्व म्हणत असत, त्यामुळें किंवा फारा दिवसांच्या वहिवाटीमुळें गणपतरावांचा हक्क शाबीद होईल अशी जरी त्यांच्या त्या चुलत्याला भीती पडली होती, तरी गणपतरावांच्या निस्पृही स्वभावाची त्याला पारख झालेली नसल्यानें, आणि चुलत्याच्या इस्टेटीवर आपला कोणत्याही प्रकारें मालकी हक्कसंबंध नाहीं ही जी जाणीव पूर्णपणें गणपतरावांच्या हृदयांत होती, तिची त्याला ओळख पटली नसल्यानें, त्यानें गणपतरावांशीं व्यर्थ वाद उपस्थित केला होता. फारकत लिहून मागतांच गणपतरावांनीं ती ताबडतोब दिली व लगेच आपल्या मातेला आपल्या मंडळींत आणून ठेविली. त्या वेळेपासून पुढें गणपतराव जरी अनेक वेळां आपली नाटक मंडळी घेऊन कोंकणांत गेले तरी त्यांनीं राजपुरगांवाच्या सीमेचेंहि आमरण दर्शन घेतलें नाहीं.

या सालापासून शाहूमंडळी म्हणजे एकत्र असें एक टुमदार चांगलें कुटुंबच बनलें. कृष्णाजी बजाजी जोशी, गणेश कृष्ण जोशी, कृष्णाजी महादेव जोग, गोविंद कृष्ण सुपेकर आणि रामचंद्र कृष्ण केळकर हे ज त्या शाहूमंडळींचे पांच मालक, ते मंडळींत यापुढें सहकुटुंब राहूं लागले. बाळाभाऊ जोगांची मातोश्री आणि केळकर शास्त्रीबोवांचें कुटुंब या दोन स्त्रिया मात्र जाऊन येऊन असत. जोशीबोवांचें कुटुंब प्रथमपासूनच अर्धवट स्वभावाचें जसें होतें, तसेंच तें मुंबईस गेल्या ता. ४-१-२३ स्वर्गवासी होईपर्यंत असल्यानें आणि त्याचेकडून गैर वर्तन कधींच घडलें नसल्यानें, सर्वांत त्या बाई एक अर्धवट याच नात्यानें सामावल्या गेल्या. बाळाभाऊंचें कुटुंब निगर्वि आणि शांत स्वभावाचें होतें. बाळाभाऊंस या कुटुंबापासून पुढें जीं मुलें झालीं त्यां पैकीं सध्यां एक पांडुरंग या नांवाचा मुलगा हयात असून तो नागपुरास आपल्या एका नातेवाईकाजवळ विद्याभ्यास करीत आहे. बाळाभाऊंच्या पश्चात् गणपतराव त्याचा केव्हां केव्हां परामर्ष घेत असत. गोविंदबोवा सुपेकर यांचें कुटुंब सांगलीच्या कृष्णातटाकाच्या स्त्रियांना जसें साजेसें होतें, तद्वतच शास्त्रीबोवांचें कुटुंब अस्सल कोंकणीं ब्राह्मणाच्या स्त्रीवर्गांतलें होतें. शास्त्रीबोवांचा अंत झाल्याला सुमारें सात आठ वर्षें झालीं. त्यांच्या पश्चात् त्यांचे दोघे मुलगे कर्तेसवर्ते झालेले असून ते आपलें आचरें गांवचें कोंकणांतील वडिलार्जित संभाळून आहेत. जोशीबोवांना मूलबाळ कांहीं नसून त्यांच्या पश्चात् परवांपर्यंत हयात असलेल्या जोशीण वहिनींची व्यवस्था गणपतरावांनी आपल्या पश्चात् कशी काय करून ठेवली होती, त्याची हकीगत मागें आलेलीच आहे. मंडळींत असतांना त्या होतें, व

बोवा सुपेकरांना एक मुलगी होती; परंतु १९०३ सालीं त्यांची व शाहूमंडळीची फारकत झाल्यापासून, त्याचें पुढील वृत्त कांहीं समजलें नाहीं.

गणपतरावांच्या कुटुंबाचें नांव मथुराबाई असें होतें. हें त्यांचे प्रथम कुटुंब मोठें कुरेंबाज आणि तापट स्वभावाचें होतें. या कुटुंबापासून गणपतरावांना दोन आपत्यें झालीं. त्यांपैकीं थोरली मुलगी सौ० रंगुबाई ही हयात असून तिचा एक थोरला रामचंद्र ऊर्फ रामु या नांवाचा मुलगा हयात आहे. धाकटा लक्ष्मण ऊर्फ राजा हा गणपतरावांच्या निधनानंतर दोन महिन्यांनी दिवंगत झाला. रंगूच्या पाठीवर तीन वर्षांनी चिंगु या नांवाची एक मुलगी याच कुटुंबापासून गणपतरावांना झाली होती; परंतु गणपतरावांच्या कुटुंबाला बाळंतरोग जडल्यानें, त्यांतच त्यांचा अंत १९०४ सालीं पुण्यास झाल्यावर अल्पावधींतच ती दुसरी मुलगी मुंबईंत मृत्युमुखीं पडली. त्यावेळीं गणपतरावांचें वय ३२ वर्षांचें होतें. यापुढें याच सालीं गणपतरावांचें दुसरें लग्न मुंबईस कोंकणांतल्या एका केळशीच्या मुलीबरोबर झालें. ती मुलगी अनेकांनी जरी पसंत केली होती तरी बाळाभाऊ जोगांना तिच्यांत वेडेपणाचें व्यंग असावें असा संशय आल्यानें, मी व ते असे दोघे ती मुलगी बघायला गेलों. बाळाभाऊंचा संशय खरा ठरला. आम्ही दोघांनीं ती मुलगी न करण्याबद्दल गणपतरावांनां परोपरीनें सांगितलें; परंतु गणपतरावांसारख्या समजूतदार पुरुषाच्या बुद्धीला त्यावेळीं विधिघटनेनुसार भ्रंश होऊन, " माझें लग्न व्हावें अशी तुम्हां दोघांची [illegible]ाच नाहीं, आणि म्हणूनच तुम्ही त्या मुलीच्या वेडगळपणाच्या [illegible]चें कांहीं तरी बनावट सोंग माझ्यापुढें मांडतां आहांत " असें

जेव्हां ते स्पष्ट बोलले, तेव्हां आम्ही दोघें स्वस्थ बसलों व त्यांचा त्यांच्या इच्छेप्रमाणें विवाह होऊं दिला. पुढें थोड्याच दिवसांत गणपतरावांना त्यांच्या नूतन पत्नीच्या वेडगळ वागणुकीचा अनुभव आल्यावर ते कर्माला हात लावून नामधारी संसारी गृहस्थ या नात्यानें काळ कंठूं लागले व अदृष्टांतलें लिखित चुकायचें नाहीं, अशा तत्वज्ञानाच्या गोष्टी बोलूं लागले. हिचें नांव लक्ष्मी असें आहे.

शाहू मंडळीनें आपला ९६ सालचा रत्नागिरीचा मुक्काम हालवून, त्याच्या पुढच्या सालीं नेहमींप्रमाणें पुण्यास मुक्काम केला. त्या सालीं गणपतरावांस एकदम कॉलऱ्याची भावना होऊन, ते मृत्यूशीं झुंज खेळूं लागले. शेवटीं ते त्या भयंकर दुखण्यांतून जरी बरे झाले, तरीं त्याच सालीं त्यांना जी अंतर्गळाची व्यथा जडली, ती आमरण कायम राहिली. पुढें पुढें तर ही व्यथा त्यांना दोन्ही बाजूनें अत्यंत कष्टप्रद व असह्य अशी भासूं लागली. त्या व्यथेकरितां ते अंतर्गळाच्या पट्याचा नेहमीं उपयोग करीत असत. आपण नट असून आपली शरीरप्रकृति व अंगलट नटाला नेहमीं उपयोगी पडेल अशी रक्षण करण्याच्या कामीं गणपतराव जरी नेहमीं फार काळजी घेत असत, तरी रंगभूमीवर वीररसाची भूमिका करतांना चढ्या आवाजांत बोलण्याच्या वेळीं हा अंतर्गळाचा विकार त्यांना पुढें पुढें चांगलाच भेडावूं लागला होता. गणपतरावांनी आपली अंगलट नटाला साजेल अशी बाळसेदार जरी राखिली होती तरीं त्यांच्या छातीचा व खांद्यांचा हे दोन भाग स्वभावतःच अरुंद असल्यानें आवाज बिघडेल या भीतीनें तो जोर काढून विस्तृत करण्याचें त्याचें कधींच धारिष्ट झालें नाहीं, ही गोष्ट त्यांनी प्रांजलपणें कबूल केली होती. गणपतरावांची उंची पांच फूट तीन इंच इतकीच

असल्यानें ते रंगभूमिवर एखाद्या मनोहर चित्रपटांतील बाळसेदार चित्रासारखे रंगभूमीवरील हव्या त्या नटवेषांत शोभून जात असत. अशा प्रकारचें पात्र गद्यनाटकमंडळ्यांत जरी कोणचेंच अद्यापि गणपतरावांवांचून झालेलें दिसलें नाहीं, तरी किर्लोस्करसंगीत मंडळींतील—मोरोबा वाघुलीकर, भाऊराव कोल्हाटकर आणि बाळकोबा नाटेकर हीं पात्रें दिसण्यांत तशा प्रकारचीं होऊन गेलीं आहेत. असो. गणपतराव कॉलऱ्याच्या आजारांतून बरे होऊन हिंडूं फिरूं लागले असतां, एके दिवशीं जेवण करून आर्यभूषण थिएटरच्या रस्त्यावरील गॅलरींत उभे होते. तशा प्रसंगीं—तो महिना पंढरपुरच्या आषाढीच्या यात्रेचा असल्यानें— दोघे वारकरी गॅलरींच्या खालीं येऊन गणपतरावांजवळ जेवण मागूं लागले. गणपतराव जात्या मोठे दयार्द्र असल्यानें त्यांना त्या पताकवाल्या वारकऱ्यांची कींव येऊन, त्यांनी त्यांनां "तुम्ही दोघेच आहांत काय?" असा प्रश्न केला. 'आमचा मेळा चाळीसपन्नासांचा आहे.' असा त्या पंढरीभक्तांनीं जबाब दिल्यावर गणपतरावांनीं अंतःकरणांतील दयाभूत स्फूर्तीनें "जा त्या साऱ्यांनां जेवणास घेऊन या" असें सांगितलें व ते आनंदानें आपल्या संवगड्यांनां बोलावायला गेलेले पाहून गणपतरावांनीं मंडळींतल्या आचाऱ्यांना शंभर पानांचा साधा चुट्याचुरम्याचा सैंपाक तावडतोब करण्यास सांगितलें. अर्धापाऊण तासांत विठ्ठलभक्त वारकऱ्यांची आर्यभूषण थिएटरांत गर्दी उसळून गेली. त्यांचें अभंगाचें भजन सुरू झालें. जमतां जमतां टाळवाले सुमारें सवाशें जमले. सैंपाक तयार झाला व "पुंडलीकवरदे," च्या जयघोषांत ती संतमंडळी आनंदानें जेवायला बसली. जेवणें आटोपल्यावर, पंढरपुरच्या श्रीविठ्ठलापुढें ठेवण्यासाठीं

गणपतरावांनी त्या मंडळीच्या म्होरक्याजवळ खण नारळ वगैरे देऊन त्यांची सुखासमाधानानें बोळवणूक केली.

गणपतरावांची प्रकृती सुधारून त्यांच्या मंडळीचे बंद पडलेले प्रयोग सुरू झाले. नंतर ती मंडळी नेहमी प्रमाणें पुणें सोडून बाहेरच्या मुक्कामावर गेली. याच वेळीं पुण्यांत नाट्यकलाप्रवर्तक संगीत नाटक मंडळीचा जीर्णोद्धार होण्यास सुरुवात झाली. प्रसिद्ध नट आणि नाट्यकलाभिज्ञ कै. शंकरराव पाठकर यांनी त्या मंडळीला हाताशीं धरून, 'ताजी नाहीं तर शिळी कां होईना' या त्राटिका नाटकांतलि पाटाची बायको करणाऱ्या 'राणूजी' च्या न्यायानें त्या मंडळीकडून शेक्सपियरच्या नाटकांना महाराष्ट्राच्या रंगभूमीवर संगीतांत आणण्याचें श्रेय घेण्याचें योजिलें. शेक्सपियरच्या 'वुइंटर्स टेल्स' या नाटकाधारें श्री. महाजनींनीं रचिलेल्या नाटकाची प्रतिकृति प्रथम पुण्याच्या रंगभूमीवर 'विकल्प-विमोचन' या नांवानें नाट्यकलाप्रवर्तक संगीत मंडळीकडून जशी आणविली तद्वतच, तिच्या नंतर 'मेझर फॉर मेझर' च्या आधारें 'समान शासन' आणि त्या नंतर 'ॲज यू लाइक इट' च्या आधारें 'जें हवें तेंच' अशा प्रतिकृति रंगभूमीवर आणविल्या. पाठकर हे जात्या 'ट्रेजेडी' चे म्हणजे शोकपर्यवसायी नाटकाचे भोक्ते असतां त्यांनीं जी वरील तीन आनंदपर्यवसायी नाटकें पसंत करून संगीतांत बसविलीं, त्यायोगें त्यांच्या अंगच्या नाट्यशिक्षक या गुणाला अभिनयशिक्षणाच्या कामीं जरी थोरपणा मिळाला, तरी त्यांच्याकडे नाटकाच्या निवडणुकीच्या बाबतींत आणि शेक्सपियर सारख्या आपल्या हृदयप्रिय कवीला संगीताचा वेष देण्यांत, गाजरपारखेपणा मात्र पूर्णपणें आला. कोणची नवलपणी टूम दुनियेपुढें आली असतां, कांहीं काळ तिचा गाजावाजा झाल्या नंतर

असें तिच्या खऱ्या स्वरूपाचें आविष्करण झाल्यावर तिची खरी परीक्षा होते, तद्वतच पाठकरांनीं हातीं धरलेल्या उद्योगाची जरी स्थिति झाली, तरी पण तो त्यांचा उद्योग दोन वर्षे चांगला सफल झाला होता, आणि त्या मुळें, सूर्याला जसें अल्पकाळ ग्रहण लागावें, त्याप्रमाणें गद्यनाटकरूपी सूर्याला आंशिक ग्रहण लागलें होतें यांत संशय नाहीं. गोपाळराव मराठे याचवेळीं आपल्या स्त्रीवेषधारणेनें उदयाला आले. गोपाळराव हे आपल्या भूमिकेचा अर्थ समजून वेष वठविणारे असल्यानें, त्यांच्या तोडीला संगीतांत त्यावेळीं फक्त काय ते एक दत्तोपंत हल्याळकरच जरी होते, तरी दत्तोपंत स्त्रीवेष जितका समजून करीत तितकाच ते पुरुषवेषहि करीत, यामुळें आजपर्यंत संगीतांत किंवा गद्यांत दत्तोपंतांच्या तोडिचें दुअंगीं असें सव्यसाची पात्र झालेंच नाहीं व पुढें तरी होईल किंवा नाहीं याची वा न वा च आहे.

वर निर्दिष्ट केलेल्या शेक्सपिअरी संगीताचा शाहूमंडळीवर सत्त्याण्णव आणि अठ्याण्णव खालीं बराच हानीकारक परिणाम झाला. बऱ्याच मुक्कामांवर त्या दोन्ही मंडळ्यांचे मुकाबले होऊं लागले. अठ्याण्णवाच्या मे महिन्यांत तर शाहूमंडळी पुण्यास अगदीं टेंकीस आली. उत्पन्नाच्या अभावामुळें मंडळीचें कर्ज वाढूं लागले. द्रव्यलाभ देणारीं नाट्यप्रयोगांची जी संपत्ति जवळ होती तिच्यावर पुढें कसें निभेल याची धास्ती पडली. नवें नाटक बसवून चालू ग्रहस्थितींतून मुक्त होण्यावांचून गत्यंतर उरलें नाहीं. नवें नाटकहि मंडळींत बसविण्याच्या लायकीचें असें हाताशीं नव्हतें. अशा आपत्तींत पुण्यास शाहूमंडळी [illegible] पडली असतां, एकसमयावच्छेदेंकरून शेक्सपियरच्या एकाच म्हणजे [illegible]बेथ' नाटकाधारें दोघां भिन्न गृहस्थांनीं एक 'डाकिनीविलास' व

दुसरें ‘ मानाजीराव ’ या नांवांचीं हस्तलिखितें शाहूमंडळीकडे प्रयोग बसविण्यास आणून दिलीं. ‘ डाकिनीविलास’चा कर्ता म्हणजे प्रकृत पुस्तकाचा लेखक ल. ना. जोशी हा त्यावेळीं मुंबईचा कॉलेज—स्टूडंट होता व ‘मानाजीराव’ चे कर्ते प्रो. शिवराम महादेव परांजपे हे ‘ काळ ’ पत्राचे संपादक होते. अर्थात त्यांच्या एकंदर परिस्थितीचें सहाजिक-पणेंच वजन पडून, त्यांचे ‘ मानाजीराव ’ नाटक बसविण्यास घेतलें गेलें. हें नाटक बसविण्यास घेण्याच्या आधीं श्री. नरसोपंत केळकरांनीं लिहिलेलें ‘ नवरदेवाची जोडगोळी ’ हें नाटक—दुःस्थितींतून सुस्थितींत येण्यास लागणाऱ्या आडचणींतून पार पडण्याच्या उद्देशानें पादपूरणा-र्थकाप्रमाणें जरी शाहूंनीं हातीं धरलें होतें, तरी त्या बाबतींत केळ-करांच्या नवरदेवाची जोडगोळी जी दबली गेली ती अक्षयचीच ठरली.

या सालच्या मे महिन्यांत श्री. दादासाहेब खापर्डे यांचा मुक्काम पुण्यास होता. ते ‘ मानाजीराव ’ नाटकाच्या तालमी घेण्यास आर्य-भषण नाटकगृहांत येत असत. रा. परांजपे यांनी मूळ लिहिलेल्या नाटकासंबंधानें विचार करतां, त्यांतील बराच भाग दादासाहेब खापर्डे यांनी भाषेसंबंधानें नाटकांत उपयोगी पडणाऱ्या भाषेसारखा जरी बनविला, तरी त्यांत जशी नाटकी भाषा हवी तशी उतरली नाहीं. दादासाहेबांनीं तें सर्वच जर पुन्हां लिहिलें असतें, तर गोष्ट निराळी होती; परंतु तसें करण्यास अवकाश नसल्यानें कांहीं योग्य सुधा-रणा मात्र तेवढ्या त्यांनीं केल्या.

ऑथेल्लो नाटकांतील काहीं भागांचें, हॅम्लेटमधील कांहीं भागांचें व सिंबेलाईनतारेमधील कांहीं भागांचें ऍक्टिंग जसें कै. नारायणराव फाटक यांनीं स्वतः करून दाखवून, गणपतरावाना तसें ऍक्टिंग कां करायचें

याचें शास्त्रोक्त विवेचन सांगितलें होतें, तद्वतच या 'मॅक्बेथ' नाटकाच्या तालमींच्या वेळीं दादासाहेब यांनीं, गणपतराव आणि बाळाभाऊ यांना आपल्या वक्तृत्वपूर्ण रसाळ भाषेनें बऱ्याच प्रसंगांचें ऍक्टिंग समजावून दिलें, आणि नंतर त्या नाटकाचा पहिला प्रयोग पुण्याच्या आर्यभूषण नाटकगृहांत जो झाला तो अप्रतीमच झाला. या नाटकांतील नायिका जी दर्याबाई ( लेडी मॅक्बेथ ) तिचा एक पांचव्या अंकांत जो झोंपेंत चालत जाण्याचा आणि जागृतावस्थेंत केलेलीं भयंकर कृत्यें त्या अवस्थेंत बडबडण्याचा प्रवेश आहे, तो प्रवेश बाळाभाऊंनी इतक्या अद्भुतपणें करून दाखविला कीं, तसा प्रवेश तत्पूर्वकालीन कोणच्याहि नाटकांत करण्याचा प्रसंग कोणाहि इतर नटाला आला नसल्यानेंच तो बाळाभाऊंच्या हांतून उत्तम वठला असेंच कांहीं केवळ म्हणतां यायचें नाहीं; तर तसा प्रवेश वठणिणारा बाळाभाऊंच्या तोडीचा नट पूर्वी झालाच नव्हता असेंच म्हटलें पाहिजे.

नंतर पुण्याचा मुक्काम हालवून शाहूमंडळी मुंबईस ग्रॅन्टरोडवरील एल्फिन्स्टन थिएटरांत जेव्हां प्रयोग करूं लागली तेव्हां, तेथें ज्या दिवशीं प्रथमच मॅक्बेथ नाटकाचा प्रयोग लागला, त्या दिवशीं पुण्यांतील बाळाभाऊंच्या अद्वितीय ऍक्टिंगची कीर्ति आगाऊच ऐकली गेली असल्यानें, प्रेक्षकसमुदाय नाटकगृहांत इतका अनावर भरला कीं, सांगतां सोय नाहीं. त्या रात्रिंच्या प्रयोगांतील बाळाभाऊंचें झोंपेंतल्या प्रवेशाचें काम इतकें अलौकिक, संस्मरणीय व परिणामकारक वठलें कीं, तो प्रवेश पुन्हां करून दाखविण्यासाठीं प्रेक्षकवृंदानें टाळ्यांचा कडकडाट आणि शिट्यांचा शिटशिटाट एकवाक्यतेचें करीत राहून, तोंडानें एकसारखा 'वन्स मोअर' चा कलकालाट सुरू ठेविला होता. बॉक्समध्यें उभें

राहून रावसाहेब पावगीसारख्यांनीं प्रेक्षकांस निनंती दाखल भाषण केलें असतांहि ॲडियम्स जेव्हां ऐकेना व रंगभूमी पंधरा मिनिटांपेक्षां अधिक वेळ मोकळी पडलेली जेव्हां अधिक वेळ ठेवणें इष्ट वाटेना तेव्हां गणपतरावांनीं नटवेष उतरला व ते साध्या वेषांत रंगभूमीवर येऊन जेव्हां उभे राहिले, तेव्हां ॲडियन्स आश्चर्यचकित होऊन एकदम शांतरसात निमग्न झालें. या वेळची गणपतरावांची समयसूचकता तारीफ करण्यासारखीं झाली यांत संशय नाहीं.

गणपतराव साध्या नेहमींच्या पोशाखांत रंगभूमीवर येऊन उभे राहून प्रेक्षकांना सविनय म्हणाले, " मी साध्या पोषाखांत या रात्रीं मॅक्बेथ नाटकाचा प्रयोग सुरू होण्याच्या आधीं जसा नाटकगृहांत आलों तशाच पोषाखांत आतां आपल्या पुढें येऊन उभा राहण्याचें कारण असें आहे कीं, मी आतां आपल्या परवानगीनें पडद्यांत जाऊन, या मॅक्बेथ नाटकाचा प्रयोग पुन्हां प्रथमपासून सुरू करण्याच्या व्यवस्थेला लागणार आहें. याचें कारण असें कीं, जी गोष्ट ब्रह्मदेवाच्याहि हातून आजपर्यंत कधीं घडल्याचें ऐकिवांत नाहीं ती गोष्ट आमच्यासारख्या नटांकडून घडणें शक्य नाहीं. कोणचीहि गोष्ट प्रत्येक वेळीं जशीं संसारांत एकदांच घडत असते, तद्वतच बाळाभाऊंच्या ॲक्टिंगची या चालू नाटकाच्या संसारांत जी एकदां घडली ती पुन्हां संसाराचें पहिल्यापासून प्रदर्शन करायला सुरुवात केल्यावांचून आतां मध्येंच पुन्हां कशी करतां येणार! संगीतांतलें 'वन्स मोअर' हें संगीत मंडळयांना जरीं खपत असलें तरी तें निसर्गविरुद्ध असल्यानें अक्षम्यच आहे. आम्ही नट म्हणजे संसारांत घडलेल्या गोष्टींचें हुबेहुब प्रदर्शन करणारे आहोंत. संसारांत एकदां मनुष्य मेला असतां, त्याला

पुन्हां एकदां मरूल दाखीव म्हणून त्याच्यापाशीं जरी कंठशोष केला तरी त्याच्या कलेवरावर त्याचा काय परिणाम होणार! तसेंच दर्याबाईचें आहे. ती जर झोंपेंतल्या प्रवेशानंतर मृत्युमुखीं पडली आहे, तर तिचा आतां ती जिवंत झाल्यावांचून झोंपेंतला प्रवेश पुन्हां कसा होणार! मृत्युमुखीं पडत असलेला माणूस उत्तम तऱ्हेच्या सजीवावस्थेंतल्या माणसाप्रमाणें सुरेल तालबद्ध ताना मारीत गात गात मरण पावल्याचें अनैसर्गिक कृत्य संगीत नाटकांत जरी 'वन्स मोअर' च्या गजरांत पचनीं पडलें, तरी तें आमच्या निसर्गाच्या प्रतिसृष्टीच्या गद्यनाटकरूप सृष्टींत पचनीं पडण्या इतकें अद्यापि बाष्कळ झालेलें नाहीं, आणि तसें अनैसर्गिक होऊं देण्याचा जर आम्ही प्रयत्न पाडला, तर समाजाला निसर्गशिक्षण देण्याचा जो अधिकार आम्हांला मिळाला आहे, तो आम्ही संगीत नटांप्रमाणे गमावूं आणि फक्त समाजाचें मनोरंजन करणारे दासानुदास भाट बनूं. आम्हांला तो दर्जा नको आहे, आणि समाजाला अनैसर्गिक वळण देण्याची आमची इच्छा नाही! म्हणून मी आपल्याला अशी विनंती करायला आलों आहें कीं, आपली जी खरी इच्छा—बाळाभाऊंचा दर्याबाईच्या झोंपेंतल्या ॲक्टिंगचा प्रवेश बघण्याची—ती मी पार पाडण्यासाठीं, हें मक्बेथ नाटक पुन्हां पहिल्यापासून करून दाखविण्याची आपल्यापाशीं परवानगी मागतों. आतां एक वाजून गेला आहे. संपूर्ण नाटकाच्या प्रयोगाला तीन तास लागतात. पोलीसची परवानगी आणवितों म्हणजे झालें. आपली मात्र पुन्हां पहिल्यापासून नाटक बघण्याची तयारी असावी म्हणजे झालें."

वरील आशयाचें गणपतरावांचें भाषण ऐकून प्रेक्षकसमुदाय शांतचित्त झाला व त्यानें पुढें नाटक चालू करण्यास परवानगी

दिल्यामर नाटक सुरू होऊन पुरें झालें व गणपतरावांच्या समयसूचकतचा आणि निसर्गाच्या सत्यतेचें प्रदर्शन दाखविणाऱ्या शाहूमंडळीची तारीफ करीत प्रेक्षकवृंद नाटकगृहाबाहेर पडला.

याच महिन्यांत बाळाभाऊ जोग मुंबईच्या मुक्कामींच विषमज्वराच्या आजारानें भयंकर आजारी पडले व त्यामुळें खेळ बंद पडले. येथें पुन्हां कंपनीच्या आर्थिक दुर्दैवानें धांव घेतली. पांच मालकांपैकीं रामचंद्र कृष्ण केळकर ऊर्फ शास्त्रीबोवा यांचा इतर मालकांशीं तंटा होऊन ते कंपनी सोडून जे गेले ते पुन्हां यावन्मरण कंपनींत आले नाहींत. वास्तविकपणें म्हटलें तर सांगलीचे गोविंद कृष्ण सुपेकरबोवाहि याच वर्षापासून कंपनींशीं आपल्या मालकी हक्काचा संबंध सोडण्याच्या तयारीस लागले होते असें म्हणायला हरकत नाहीं. तेहि बाळाभाऊंच्या आजारांत कंपनी बंद असल्यामुळें आपल्या घरीं सांगलीस रजेवर निघून गेले. अशाप्रकारें दोन मालक गेल्यावर तिघेजण जे शिल्लक राहिले, त्यांतील बाळाभाऊ जोगहि गच्छंतीच्याच बेतांत आले होते; परंतु औषधोपचार आणि देवदेवक यांच्या जोरावर त्यांचे दोन तीन महिन्यांनी जमीनविर पाय लागले. बाळाभाऊंना औषधोपचार सुरू होते तद्वतच देवतांचे साह्यहि त्यांच्या आयुरारोग्यासाठीं करण्यांत गणपतराव मग्न झाले होते. रोज रात्रीं बारा वाजतां उठून गार पाण्याचें स्नान करावें, ताम्रवस्त्र परिधान करून तांबड्या फुलांच्या माळा अंगावर धारण कराव्या आणि पहाटच्या तीन वाजेपर्यंत कालीमातेच्या अनुष्ठानाला बसावें; याप्रमाणें गणपतरावांनीं बेचाळीस दिवस श्रीकालिकेचें अनुष्ठान केल्यावर तिसऱ्या दिवशीं बाळाभाऊंचा डावा घुणघुणा पहाटेस एकाएकीं फुटून त्यातून रक्त स्राव झाला, व त्याच दिवसापासून त्यांच्या

प्रकृतीला आराम पडूं लागला. दोन महिन्यांनीं ते साफ बरे झाले, व सोंग करण्याची त्यांच्या अंगीं हिंमत आली. तीन चार महिने मुंबई-सारख्या महागाईच्या ठिकाणीं उत्पन्नाच्या धंद्यावांचून अंगावर खर्च सोसून काढावे लागल्यामुळें मंडळीच्या अफाट खर्चाचें मंडळीवर बऱ्याच कर्जाचें ओझें वाढलें. त्यांतून पार पडण्यासाठीं कंत्राटानें खेळ देण्याची युक्ति निघाली व मंडळी कशीबशी १८९९ च्या आरंभीं मुंबईचा मुक्काम हालवून वऱ्हाडांत निघून गेली.

नागपुरास मंडळीचा मुक्काम असतां तेथील गाजुद्दीन वली वाकी नांवाच्या एका फकीर महंताची व गणपतरावांची गांठ पडली. साधु संत फकीर, अवलिया वगैरे सत्पुरुषांच्या भेटी घेण्याचा गणपतरावांना जसा नाद असे, तसा बाळाभाऊंना नसे, आणि त्यामुळेंच ते त्यांना नेहमी धार्मिक गोष्टींतले 'चार्वाक' असें म्हणत असत. आणि वास्तविक म्हटलें तर गणपतरावांचें जितकें लक्ष स्वधर्माचरणाकडे असें व ते जसे परमेश्वराची भीती वळगून वेळोवेळीं आपल्या हातून होणाऱ्या चुका सुधारण्याचें मनांत आणीत असत त्याच्या शतांशहि बाळाभाऊंना पश्चात्ताप किंवा ईश्वराची भीती वाटत नसे, इतके ते नास्तिक होते. नाहीं म्हणायला नगरचे गणपतिबोवा आणि ग्वाल्हेरचे शीलनाथ महाराज या दोन साधूंच्या भेटी गणपतरावांच्या आग्रहावरून जरी त्यांनीं घेतल्या होत्या, तरी त्याचा त्यांच्या मनावर कांहीं विशेषसा परिणाम झालेला नव्हता. नागपुरास वली साहेबांची व गणपतरावांची जी भेट झाली तिचा परिणाम गणपतरावांच्या मनावर फारच मोठा झाला. वलींनीं त्यांना जी एक पोंवळ्यांच्या १०८ मण्यांची माळ प्रसाद म्हणून दिली होती, ती मध्यंतरीं १९०४ सालापासून १९११ सालपर्यंत जरी मजपाशीं होती,

तरी अखेरीस ती माळ, गणपतरावांना नेहमी होणाऱ्या दृष्टांतांमुळें मजपासून मागून घेऊन त्यांनी आमरण आपल्यापाशींच ठेविली व अखेरीस आपल्या शवाबरोबरच तिचेंहि दहन व्हावें अशी जी त्यांनी आपली इच्छा प्रगट केली होती, त्याप्रमाणें त्यांच्या जावयानें ती पूर्ण केली.

शाहूमंडळीचे दिवस यापुढें वर्ष दीड वर्षें अदमासें दुःस्थितींतच गेलें. त्या मंडळीवर अनेक आपातांचे प्रसंग मधून मधून येतच होते. ९८ सालापासून श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांचीं त्या मंडळीला वरचेवर आर्थिक मदत होत गेल्याकारणानेंच ती मंडळी पुढें पुन्हां १९०१ सालापासून नाट्यसृष्टीच्या क्षितीजावर आपल्या नाट्याच्या कतबगारीने झळकूं लागली व तिनें त्याच सालापासून माहाराष्ट्र—रंगभूमीला एका नव्याच प्रकारच्या क्रांतिकारक नाट्यप्रयोगांचें वळण लाविलें असे म्हणायला हरकत नाहीं. मध्यंतरीं १८९९ सालच्या अखेरीस शाहूमंडळी मोडली होती असेंहि म्हटले असतां चालेल. पगार वेळेवर मिळत नसल्यानें एकेक पात्र सोडून जातां जातां पन्नास साठ माणसांपैकीं पांच दहा माणसें शिल्लक राहिलीं होतीं, आणि सावकारांच्या ऋणाचे तगादे हात धुऊन पाठीस लागले होते. अशा संकटसमयीं गणपतरावादि मंडळी अगदीं अज्ञानदशेंत अशीच मुंबईस पांच चहा महिने खितपत पडली असल्याची बातमी मला हुबळी मुक्कामीं समजली. ती वेळ १९०० सालच्या अखेरची होती.

---



शाहूनगरवासी नाटकमंडळीचे प्रेमा आश्रयदाते.

Photo by—R. N. Joshi

श्री. आप्पासाहेब पटवर्धन सांगलीकर हे स्वतः चांगले नट असून, त्यांची अभिनय करण्याची दिशा शाहूमंडळीच्या अनुयायित्वाचेंच असे. त्यानीं 'पटवर्धन—नाटकमंडळी' या नांवाची संस्था काढून, तिच्या द्वारें ते—गद्य, संगीत, पौराणिक आणि सामाजिक नाटकें करवीत असत. ते स्वतः गद्य नाटकांतील नायकांच्या भूमिका ज्या करीत, त्या ते चांगल्याच वठवीत. त्यांची कंपनी त्या सालीं दक्षिण महाराष्ट्रांत फिरत असतां, मी त्यांचे बरोबर त्या कंपनीला एक 'संगीत कुंदमाला' या नांवाचें नाटक लिहून देण्यासाठीं गेलों होतों, व आमचा हुबळीस मुक्काम असतां, तेथें शाहूमंडळीची—वर सांगितलेल्या दुर्दशेची बातमी मला समजली. मीं लगेच आपल्या शक्त्यनुसार त्यांना मदत करण्याच्या उद्देशानें एक पत्र लिहिलें व त्यांचेकडूनहि ताबडतोब तारेनें त्या पत्राचें मला उत्तर आलें.

---

## प्रवेश दुसरा.

स्त्रियेला जसें पुरुष व्हावेंसें वाटतें, तसें पुरुषाला कधींहि स्त्री व्हावेंसें वाटत नाहीं याचे दाखले नाट्यसृष्टींत हरघडी प्रत्ययाला येतात. पुरुषाला जो स्त्रीचा नटवेष नाटकांतून देण्यांत येतो, त्याची त्याला मनापासून अशी खरोखर कधींच आवड नसते. तृतीय प्रकृती असल्यास मात्र सांगवत नाहीं. तो स्त्रीवेष करकरून, त्याला जग समजूं लागलें म्हणजे पुरुषवेषांत येण्याची तो अत्यंत धडपड करीत असतो, ही गोष्ट नाटकी

स्त्रीवेषधारीं पुरुषांसंबंधानें जशी प्रत्ययाला येते, तद्वतच स्त्रियांनाहि पुरुषवेष धारण करण्याची फार हौस वाटते याचें प्रत्यंतर अनेकवार तज्ज्ञांस आजपर्यंत आलेलेंच आहे, आणि म्हणून या अल्प पृष्ठांच्या पुस्तकांत त्याचें स्पष्टीकरण करण्यानें प्रस्तुत विषयाची जागा आडविल्यासारखें होणार आहे. हें पुस्तक मुख्यत्वें करून पुरुष नटवेषधाऱ्याचें चरित्ररूप असल्यानें स्त्रीवेषासंबंधानें यांत विशेष वाच्यता करतां येत नाहीं. रंगभूमीवर कोणचें सोंग कसें करावें, आणि कोणचा रस कोणच्या हावभावादि पोषाखांसह प्रेक्षकवृंदापुढें कशा प्रकारच्या आवाजांत साहजिकपणें अवतीर्ण करावा याबद्दल गणपतराव आणि बाळाभाऊ यांनीं वेळोंवेळीं जीं स्पष्टीकरणें केलेलीं टिप्पणें मीं लिहून ठेवलीं आहेत, तीं नटांनां योग्य अशीं मार्गदर्शक असल्यानें, स्वतंत्र ग्रंथरूपानें प्रसिद्ध करणार आहें, तेव्हां त्यांत तें सर्व वाचायला मिळणार आहे; म्हणून त्याबाबतींत येथें अधीक ऊहापोह करीत नाहीं. फक्त भाषणच ज्या नाटकांत असतें असें जें गद्य नाटक, त्यांतहि संगीतांतील पद्यांप्रमाणेंच भाषण आणि तें करीत असतां तत्पोषणार्थ—गाण्याप्रमाणेंच उच्च, नीच, मध्यम वगैरे सुरांची रचना उत्तम तऱ्हेची तालबद्ध कशी असते ही गोष्ट जी गणपतरावांनीं आपल्या भाषणशैलीनें आणि हावभावांनीं सिद्ध करून दाखविली, तेवढीच येथें नमूद करून चालू विषयाकडे वळतों.

मागें सांगितल्या प्रमाणें मुंबईहून बाळाभाऊंची तार मला हुबळीस आल्यानंतर, मी त्यांना आधीं पात्रें कशी पुरवावीत याचा विचार करूं लागलों. पठवर्धनमंडळी त्या वेळीं जरी चार प्रकारचीं नाटकें करीत होती, तरी अप्पासाहेबानां केवळ लुटण्यासाठींच त्यांच्या मंडळींतील पात्रें त्यांच्या भोंवतीं जमा झालेलीं होतीं ही

गोष्ट अगाऊच माझ्या निदर्शनास आलेली असल्या कारणानें, त्या मंडळींतील कोणचीं कोणचीं पात्रें शाहूंत गेलीं असतां त्यांचा बस चांगला जमेल याचा मी मनाशीं खल करूं लागलों. प्रथम आमचे आळीकर गणपतराव गद्रे यांना मीं त्या बाबतींत प्रश्न करतां, त्यांनीं मोठ्या आनंदानें मला रुकार दिला. गणपतराव गद्रे हे जुन्या तऱ्हेचे स्त्रीवेषधारी व समजूतदार नट होते. त्यांच्याकडे जें काम येई तें काम ते समजून घेऊन मनापासून करीत; परंतु त्यांच्या गुणाचें जसें चीज व्हावें तसें तेथें होत नसल्यानें तेहि तेथें राहण्यास कंटाळले होते. शिवाय नाटक कंपन्यांच्या सांप्रदायाप्रमाणें ते कोणाच्याहि पुढ्यांत जाण्यासारखे नसल्यानें त्यांच्यावर मालकापासून खालपर्यंत कोणाचेंहि विशेष प्रेम व लक्षहि नव्हतें. यामुळें आपलें नांव होण्यासारखी आयति आलेली संधी दवडणें त्यानां इष्ट न वाटून, ते माझ्या संमतीनें एक महिन्याची रजा घेऊन पुण्यास निघून गेले. हेच गृहस्थ पुढें शाहूंच्या तुकाराम नाटकांत तुकारामाची कजाग परंतु भोळी स्त्री जी जिजाई तिचें अप्रतिम काम करण्यांत जगापुढें आले. बाळाभऊंच्या आधींच यांचा अंत झाल्यानें बाळाभाऊंच्या पश्चात् त्यांच्या जागीं यांचा गणपतरावानां जो चांगलाच उपयोग झाला असता, तो दुर्दैवानें झाला नाहीं तेथें इलाज नाहीं. हे गृहस्थ हॅम्लेटमध्यें मदनिकेचें व ऑथेल्लोंत जाधवरावांच्या स्त्रीचें—अशी कामें फारच नामी करीत.

गद्रे यांच्या शिवाय आणखी दोन मुलें—एक सदाशिवराव दाते व दुसरा भालेबा काणे अशीं मी निरनिराळ्या योजनांनीं त्या मंडळींतून पुण्यास माझ्या घरीं रवाना केलीं. अनंता लिमये या नांवाचा एक चांगला स्त्रीवेषधारी नट मुलगा आमच्या पुण्याचाच जरी त्या मंड-

पूर्वीचा सुशिक्षित असल्यानें सरकारी नोकरींत असून आपला संसार करून आहे. भालु काणे हा पुढें संगीत नट बनला व त्यानें सध्यां आपली एक स्वतंत्र नाटकमंडळी चालविली आहे.

गणपतराव आणि बाळाभाऊ यांनीं नंतर लगेच उपरीनिर्दिष्ट तिघां मुलांसह पुण्याहून पनवेलीस प्रयाण केलें व तेथें आपल्या नाटकांचे प्रयोग सुरू केले. सदाशिवराव प्रधानांची व गणपतराव बाळाभाऊंची नट या नात्यानें भेट झाल्याचें जें मागें सांगितलें आहे ती हीच १९००सालच्या मे व जून या महिन्यांतील वेळ होय. नवीन मिळालेल्या स्त्रीवेषधारी मुलांना बाळाभाऊंनी नटवेषाचें शिक्षण देऊन आपल्या कंपनीस योग्य असे चार सहा महिन्यांत त्यांस तयार केल्यावर, शाहूमंडळी—मुंबई, बडोदा, वऱ्हाड, खानदेश, नाशिक, वगैरे ठिकाणची स्वारी उरकून पुण्यास १९०१ च्या मार्च महिन्यांत नव्या थाटानें जरी आली व तिचे खेळहि जरी आर्यभूषण थिएटरांत होऊं लागले, तरी तिचा जम जसा बसावा तसा नव्या नाटकाच्या अभावीं बसला नाहीं, आणि त्यामुळें आर्थिक आपत्तीनें तिला गांजून सोडिलें हें सांगणें नकोच.

कै. रा. शिरवळकर यांनीं नवें लिहिलेलें व मंडळीपाशीं सुमारें एक वर्ष येऊन पडलेलें ‘श्रीतुकाराम’ नाटक बाहेर आणण्याचा आतां मंडळीच्या मनाचा कल झुकूं लागला. याच्या आधीं खाडीलकरांची ‘कांचनगडची मोहना’ जरी त्यांनीं रंगभूमीवर आणिली होती तरी मंडळीचा संच पाहून नाटक लिहिण्याचें काम आण्णासाहेब किर्लोस्करांप्रमाणें त्यांनीं केलें नसल्यामुळें व वास्तविक म्हटलें तर तिसऱ्या अंकाच्या शेवटीं गड पडल्यावर तें नाटक पूर्ण होत असल्यानें म्हणा अथवा चौथा व पांचवा हे दोन अंक चांगले झाले नसल्यानें म्हणा

तें नाटक शाहूमंडळीस धनोत्पादक झालें नाहीं एवढें मात्र खरें. जें शाहूंना वठवितां आलें नाहीं तें ' मोहना ' नाटक महाराष्ट्रनाटक मंडळीनें उत्तम तऱ्हेनें वठवून दाखविलें असा या बाबतींत खाडील-करांच्या चरित्राचें दहापंधरा पानांचें एक चोंपडें लिहिणाऱ्या एका गृहस्थानें शाहूमंडळीवर कुत्सितपणाचा शिंतोडा उडविला आहे; पण तो किति फोल आहे, हें त्या लेखकाला नाट्यसृष्टीचें अल्पांशाहि ज्ञान नसल्याचें परस्परच सिद्ध करतो आहे.

तुकाराम नाटक आजपर्यंत करीत असलेल्या नाटकांच्या दिशे-हून अगदीं भिन्न दिशेचें असल्यानें व जी गोष्ट मराठी रंगभूमीला आजपर्यंत परिचयाची नाहीं तिचा तिला परिचय करून देण्याचें धारिष्ट करण्याचें तें काम असल्यानें, आपल्या हातून तुकारामाची भूमिका कशी काय वठेल याबद्दल गणपतरावांना मोठी शंका होती, व तें नाटक हातीं आल्यापासून सुमारें एक वर्षभर ते त्यांतील मजकुराचें मनन करून आपल्या वेषधारणेची नक्कल वठविण्याची तयारी करीत होते. इतक्यांत रा. विनायक त्रिंबक मोडक यांनीं लिहिलेलें ' प्रणयविवाह ' नाटक मंडळी-पुढें आलें व त्याच्या तालमी होऊं लागल्या. तें नाटक बसविण्यास जितकें सोपें होतें तित-केंच त्यांतील मतलबानुसारें तें प्रेक्षकांच्या पचनीं पडण्यास त्या काळीं अशक्य असें ठरल्यानें, तें पडलें व मंडळीचा विरस झाल्यानें काय होईल तें होवो म्हणून तुकाराम नाटक रंगभूमीवर आणण्याचा तिनें निश्चय केला.



( मोडक )

भाऊराव कोल्हटकर व शाहूमंडळी यांचा कोल्हापुरमुक्कामीं जो तहनामा झाल्याचें मागें वाचलेलें वाचकांस स्मरतच असेल, तो तहनामा यावर्षी भाऊराव दिवंगत झाले असल्यानें मोडण्याचें धारिष्ट शंकरराव मुजुमदारांनीं करून किर्लोस्कर मंडळीला त्यांनीं, शाहूमंडळीच्याच थिएटरांत पुण्यास खेळ करण्यास आणिली. जोगळेकर व बालगंधर्व यांच्या जोडीचा लाभ त्या मंडळीला झाला असल्यानें तिचे खेळ चांगले धनोत्पादक होऊं लागले व शाहूमंडळीची अत्यंत हीनस्थिति दृग्गोचर होऊं लागली. आर्थिक निकृष्ठावस्था आणि त्यामुळें उत्पन्न होणारें दैन्य यांमध्यें शाहू बुडत चाललेले पाहून मुजूमदारांच्या हृदयांतील आनंदसरोवरावरला हर्षाच्या उकळ्या फुटूं लागून मागील कोल्हापुरचा सूड उगविल्याचें पुण्य पदरीं पडणारसें वाटूं लागल्याचा भास जों होऊं लागतो आहे, तोंच रा. वासुदेव रंगनाथ शिरवळकर यांचें तुकाराम नाटक रंगभूमीवर आणण्याची नकला पाठ होऊन शाहूंचीं तयारी झाली. मंडळीजवळ नेहमींच्या तऱ्हेचेच तात्पुरते पडदे वगैरे होते, परंतु तुकारामाला लागणाऱ्या स्वर्गारोहणाच्या विमानाचा सीन नसल्यानें शंकररावानीं तो मोठ्या मिनतवारीनें शाहूंस दिला व नाटकाचा प्रयोग आडवारीं लागून नाटक जरी झालें तरी अवघे २४ रुपये पहिल्या खेळाला उत्पन्न झाले. नाटकाची नवी दिशा, प्रेक्षकांनीं कधींच अननुभवलेला नाट्यरस आणि नाट्यसृष्टीचें अकल्पनीय क्रांति होण्याचा समय—अशा तिंहेरी पेंचांत प्रेक्षकगणा


( वा. रं. शिरवळकर )

एकदम सांपडल्यानें पहिल्या तुकारामास अत्यंत अल्प असें मोडकांच्या ‘ प्रणयविवाह ’ नाटकाप्रमाणेंच जरी उत्पन्न झालें, तरी मंडळीच्या नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें, तिनें तुकारामाचा जो दुसरा प्रयोग प्रणयविवाहाप्रमाणेंच लाविला, तो त्याच्याप्रमाणें न थांबतां, चांगल्याच उत्पन्नाचा झाला. प्रेक्षकजनांची नाटकगृहांत कच्चाकच्चीची गर्दी भरल्याचें पाहून तो त्यांच्या पचनीं पडल्याचें निदर्शनास आलें; पण त्यामुळें शंकरराव मुजुमदारांचे डोळे एकदम फांटून गेले. तिसऱ्या खेळाला विमानाचा सीन देण्याच्या बाबतींत त्यांची लटपटपंची दिसूं लागतांच शाहूमंडळीनें एकदम त्यांचे जुने पेन्टर जे रा. जोशी मास्तर त्यांस मुंबईस ते एलफिन्स्टन मिडल स्कूलमध्यें ड्रॉइंग मास्तर असल्यानें निघून येण्याची अर्जंट तार केल्यामुळें ते मुंबईहून पुण्यास निघून आले व त्यांच्या नेहमींच्या तडफीच्या स्वभावाच्या कार्यकर्तृत्वाप्रमाणें त्यांनीं मंडळीला विठोबारखुमाईसह देऊळ आणि विमान असे दोन सीन अवघ्या चोवीस तासांच्या आंत अत्यंत उत्तम असे करून देऊन आपलें पूर्वापार मैत्रीचें सख्य आणि प्रेम यांची उत्तम कसोटी उतरबून दाखविली व शंकरराव मुजूमदारांचा नक्षा उतरविला.

तुकाराम नाटकाचा लौकिक फारच झपाट्यानें वाढला. जें नाटक प्रेक्षकांच्या पचनीं पडेल किंवा कसें याचा संशय होता व ज्याच्यावर एक वर्षानंतर विचार करूनही गणपतरावांना ज्याच्या यशःसिद्धीबद्दल खात्री नव्हती तें नाटक इतकें उत्तम वठलें कीं, त्याच्या खेळाचें पुढें पुढें तर प्रमाणच राहीनासें झालें. पुणें व नगर या दोन्हा ठिकाणीं एकाच आठवड्यांत मंडळीचे प्रयोग एकसारखे होऊं लागले यामुळें शिरवळकरांना प्रयोग करण्याच्या हक्काच्या स्वामित्वाची

रक्कम मंडळीकडून घेण्याची अत्यंत घाईकूत झाली. मंडळी पुण्याहून नगरास खेळ करण्यास गेली असतां, शिरवळकरानीं त्यानां एकदम खेळ बंद करण्याची तार ऐन खेळ सुरूं होण्याच्या वेळीं पोंचेल अशा बेतानें धाडिली. खेळ बंद न ठेवतां गणपतराव आणि बाळाभाऊ प्रयोग संपल्यावर जी पहिली गाडी मिळाली तिनें पुण्यास निघून आले व जोशी ड्रॉइंग मास्तरांच्या मार्फत प्रयोगाच्या स्वामित्वाची रक्कम ठरवून निम्मीशिम्मी रक्कम शिरवळकरांच्या पदरांत टाकून ते मोकळे झाले. शिरवळकर हे लेखक उत्तम असल्याबद्दल सांगण्याचें किंवा सिद्ध करण्याचें आमच्या दाखल्याचें जसें कारण नाहीं, तद्वतच खरा लेखक वर्ग हा नेहेमी दरिद्री असतो या स्वाभाविक गोष्टीप्रमाणेंच तेहि होते ही गोष्ट मुद्दाम जरी येथें सांगण्याचें कारण नाहीं, तरी त्यांच्याइतका द्रव्यासाठीं हपापलेला चांगला लेखक आमच्या अजूनपर्यंत पाहाण्यांत येत नाहीं याचें नवल वाटतें! तुकाराम नाटकाच्या पूर्वी जरी शिरवळकरांनीं दोन नाटकें लिहिलीं होतीं, तरी त्यांचे प्रयोग करण्यास वाटेल त्या नाटकमंडळीस अगर क्लबांस त्यांनी दहा वीस रुपयांवर तुकारामाप्रमाणें प्रयोग करण्याची परवानगी दिल्याचें ऐकिवांत नाहीं. जें नाटक अत्यंत परिश्रमानें ज्या मंडळीनें बाहेर काढिलें त्या मंडळीपासून योग्य मोबदला मिळाला असतां, त्या मंडळीला कांहीं दिवस त्या नाटकावर द्रव्यार्जन करूं देण्याच्या उदारतेला बाजूला ठेवून शिरवळकरांनीं जो पैशा पासरीचा तुकाराम नाटकाचा एक धंदाच केला त्यांत त्यांना तशी श्रीमंत होण्यासारखी किफायत तरी झाली काय? किफायतीच्या नांवानें अंगठाच होऊन नाटकाचा विचका मात्र झालेला पदरीं पडला, आणि शाहूमंडळीची गैरमर्जी झाली ती निराळीच. नव्या फायद्याची गोष्ट पश्चात्तापाला कारण

झाली. बाजारांत 'केळें म्हणून गाजर एखादे वेळींच विकलें जातें,' या न्यायानें शिरवळकरांच्या श्रीतुकाराम नाटकाच्या प्रयोगाला पुढें आणण्याला शाहूमंडळी सारखी गुणी मंडळी आणि त्यांतल्यात्यांत गणपतरावांसारखा अद्वितिय नट यांची जोड लाभल्यामुळेंच तें नाटक अगदीं नव्या दिशेनें मराटी रंगभूमीची क्रांती करून सोडणाऱ्या स्वरूपांत पुढें आलें व त्यामुळें मराठी रंगभूमीचा जुना रंग एकदम पालटला, ही गोष्ट कधींहि नाकबूल करतां यायची नाहीं. तुकारामनाटकाचे प्रयोग करण्याचे हक्क जसे पैशा पासरी देण्याचा सपाटा शिरवळकरांनीं लावला, तद्वतच साधूंचीं चरित्रें ही एक खाणच आपल्या हातीं लागली असें वाटून एकनाथ व नामदेव हीं नाटकें त्यांनीं जितक्या घाईनें लिहून, दुसरें कोणी लिहील या भीतीनें कमाल आणि कबीर यांच्या चरित्राच्या नाटकाची जाहीरात देण्यांत जी घाई प्रगट केली, त्या सर्वांबद्दल त्यांना मिळालें काय, तर तुकारामानें ज कमवून दिलें, त्याच्या निम्यानेंहि नाहीं. रा. मोडकांचें प्रणयविवाह नाटक तुकारामानें मागें टाकलें म्हणून मोडकांनां पुढें आणण्यासाठीं बाळाभाऊंनी त्यांना कबीर व कमाल हें नाटक लिहिण्यास सांगितलेलें कानांवर येतांच शिरवळकरांनीं तें नाटक आपण लिहित असल्याबद्दलची जाहीरांत केसरी पत्रांत कोणाला न कळवतां एकदम प्रसिद्ध केलेली बाळाभाऊंच्या वाचण्यांत आल्याबरोबर त्यांची व शिरवळकरांची त्या बाबतींत बरीच बोलाचाली होऊन त्यांनीं शिरवळकरांच्या देखत मोडकांस श्रीज्ञानेश्वर नाटक लिहायला सांगितलें, व अशा तऱ्हेनें खट्टू झालेलें मोडकांचें मन त्यांनीं पुन्हां उद्दीपित केलें. पुढें ज्ञानेश्वर नाटकाचा प्रयोग कांहीं कारणांनी म्हणण्यापेक्षां, गणपतरावांना

तें सोंग करणें पसंत नसल्यानें आणि त्यांच्या मनाप्रमाणें तें नाटक नसल्यानें, त्यांचीच ज्ञानदेवाची भूमिका जेथें त्यांनी कशी तरी मारून मुटकून रंगभूमीवर आणिली तेथें बिचारे मोडक तरी काय करणार! रा. शिरवळकर व मोडक हे पुण्यांतील 'महाराष्ट्रभाषासंवर्धक' म्हणजेच जी 'नाइट क्लब' या नांवाची संस्था तिचे मुख्य लेखक होते. या दोघां लेखकांनीं मिळून लिहिलेले ग्रंथ व स्वतंत्रपणें लिहिलेले ग्रंथ आज जगापुढें आलेले असल्याकारणानें व त्या दोघांच्या लेखनकलेसंबंधानें टीका करण्याचें हें स्थान नसल्यानें कै. शिरवळकर व सध्यां अर्धांगानें अजारी असलेले मोडक हे लेखक या नात्यानें कसे काय जगापुढें आले त्याची परीक्षा जग करीलच. असो.

पुण्याचा मुक्काम हालवून शाहू मंडळी मुंबईस जाण्याचें ठरलें व त्याप्रमाणें वर्तमानपत्रांतून प्रसिद्धी करण्यासाठीं बाळाभाऊ पुढें एकटेच मुंबईस आले. त्यावेळीं मी दैनिक 'गुराखी' वर्तमानपत्राचा संपादक होतों. ज्या दिवशीं बाळाभाऊ मुंबईस आले, त्याच्या दुसऱ्या दिवशीं मुंबईच्या एका क्लबानें तुकाराम नाटकाच्या प्रयोगाच्या जाहिराती भिंतीला लावलेल्या पाहून बाळाभाऊंनीं त्याबद्दल मजपाशीं आश्चर्योद्गार काढिल्यामुळें, मला 'गुराखी' मध्यें त्या बाबतींत त्यांच्या मर्जीस्तव त्यांच्या तर्फेचें लिहिणें भाग होऊन, मीं तशा तऱ्हेनें 'तुकारामाचा तोतया' या मथळ्याखालीं एक लेख प्रसिद्ध केला व शिरवळकरांना तार करून क्लबचा तुकारामाचा प्रयोग बंद करवला. त्या क्लबनें शिरवळकरांना प्रयोगाच्या स्वामित्वाबद्दल पांच रुपयांच्या हप्त्यानें वीस रुपये देण्याचें कबूल करून आगाऊ कांहींच दिलें नव्हतें म्हणून आम्हांला तो प्रयोग जाहिरातीचा खर्च देऊन बंद करतां आला होता. तो महिना आषाढाचा

असल्यानें तुकाराम नाटकाच्या प्रयोगांना मुंबईस फारच ऊत आला. याच सालीं ल. ना. जोशीकृत पद्यात्मक प्रशंसापर सुवर्णपत्रिका गणपतराव आणि बाळाभाऊ यांस रिपन थिएटरांत एका तुकारामाच्या प्रयोगाच्या रात्रीं मुंबईकरांतर्फे अर्पण करण्यांत आली. दिवसां व रात्रीं असे एक आठवडाभर अविश्रांतपणें रोज तुकारामाचे खेळ होऊन, अखेरीस शाहूमंडळीं मुंबईहून तीन चार महिन्यांनीं सुव्यवस्थितपणें बडोद्यास गेली, व येथून नेहमींच्या परिपाठाप्राणें वऱ्हाड, खानदेश, नाशिक, वगैरे कडील सफर मारून १९०२ सालीं पुण्यास आली व पुण्याहून मुंबईस जाऊन तेथून तिनें १९०३ चें सबंद साल उत्तर हिंदुस्तानचा प्रवास केला. त्या प्रवासांत तिनें मुख्यत्वें इंदूर आणि ग्वाल्हेर या दोन मराठीं रियासतींना आपलें नाट्यकौशल्य दाखविलें. इंदूरप्रमाणें ग्वाल्हे-रचा मुक्काम मंडळीला यशस्कर झाला नाहीं. ग्वाल्हेरीस तर मंडळीची अत्यंत हलाखी झाली. सुदैवानें श्रीशीलनाथ महाराजांसारख्या सत्पु-रुषाच्या दर्शनाचा लाभ त्या वेळीं ग्वाल्हेर नजीकच्या जंगलांत मंड-ळीला झाला व याच १९०३ सालच्या ग्वाल्हेरच्या मुक्कामीं माझ्या 'श्रीरामदास' नाटकाच्या पांच अंकांचें हस्तलिखीत बाड गणपतराव आणि बाळाभाऊ यांना स्वस्थपणें वाचून रामदास व शिवाजी यांच्या भूमिका कशा वठवाव्या यासंबंधानें विचार करण्यास स्वस्थता मिळाली.

वास्तविक बोलायचें तर १९०२ सालीं रामदासनाटक मला लिहिण्याची स्फूर्ति प्रथम कै. दत्तोपंत हल्याळकरांनीं खुद्द आपल्या स्वतःच्या श्री लक्ष्मीप्रासादिक नाटकमंडळीकरितां केली होती. ही गोष्ट गणपतरावांना समजल्यानें त्यांनीं रामदासाचे मीं संगीत केलेले दोन अंक वाचण्यास मजपासून मागून घेऊन मला तें नाटक त्यांनी

आपल्या मंडळींसाठीं गद्यांत लिहिण्यास सांगितलें व मीं ती त्यांची गोष्ट पूर्वस्नेहाखातर कबूल केल्यानें दत्तोपंत हल्याळकरांच्या दोषास पात्र झालें, ही गोष्ट मला नाकबूल करतां येणार नाहीं.

शाहूमंडळी इंदूरास आपले खेळ करीत असतां, तेथील रेसीडेन्सी मधले युरोपियन लोक त्यांचे शेक्सपियरचे खेळ बघण्यास इतके जमूं लागले कीं, अखेरीस त्यांना इंदूर शहरांत खेळ बघण्यास रात्रीं यावें लागून अपरात्रीं रेसिडेन्सीमध्यें परत जाण्याची गैरसोय होऊं लागल्यानें या मंडळींचे शेक्सपियरचे खेळ ते रेसिडेन्सींत रंगभूमी तयार करवून करवूं लागले. मंडळीला युरोपियन लोकांनीं सुवर्णपदकें देऊन जीं सर्टि-फिकिटें दिलीं त्यांतील मोठाल्या विद्वान अधिकाऱ्यांची अशीं दोन तीनच यापुढें दिल्यानें शाहूमंडळीचा युरोपियन लोकहि त्यांच्या गुणा-संबंधानें कसा गौरव करीत असत हें ध्यानांत येईल.

इंदूर रेसिडेन्सी सर्जन मि. जे. आर. रॉबर्टस्, आय्. एम्. एस. हे आपल्या ता. २४ आगस्ट सन १९०२ च्या सर्टिफिके-टांत म्हणतातः—

I have much pleasure in testifying to the very fine rendering of Shakespere's plays in Marathi by the Shahanagarwasi Dramatic Company.

It has been a revalation to me as I was unaware that the dramatic art had attained to so high a pitch in India as that displayed by the Company.

Ganpatrao's rendering of the great characters of Shakespeare is beyond surprise. He is a finished actor of the highest quality and of marvellous talent. I would

say the same of Mr. Balabhau who does the first female parts.

In addition what has strnck me is the fact that on one and all of the cast of the play produce exquisite pieces of finished acting.

I can most earnestly recommend any Englishman going to the performances refreshing his memory by means of a copy of Shakespeare to assist him in following the play and I feel certain he will come away as delighted as I have seen.

इंदूरचे सुप्रसिद्ध एजंट टु धि गव्हर्नर जनरल मि. सी. एस्. बेली यांनीं जें मोठ्या प्रेमानें शाहूमंडळीकडे ता. २० ऑगस्ट सन १९०२ रोजीं एक शिफारस–पत्र धाडून दिलें त्यांत ते म्हणतात:–

The Shahunagarwasi Dramatic Company gave a performance at the residancy yesterday. The piece selected was 'Othello' and there was only one openion among the large audiance of Europeans and Indian gentlemen as to the excellence of the representation. All the parts were well sustained. Those of " Othello, Iago, Cassio and Desdimona " (the last by a young man Mr Date ) being especially well acted. One very noticeable feature of the performance was the wonderful memory of the performance, who disposed entirely with the aid of a promptor and were as far as it was possible for me to judge, absolutely word-perfect

The Company have I believed, done well at Indore and I trust that so long as they keep up their present

standard of excellence they will continue to receive the full measure of encouragement that they undoubtedly deserve.

लॉर्ड कर्झनचे विश्वासपात्र आणि इंदूरचे प्रेसिडेन्ट मेजर एफ्. बी. यंगहजबंड हे आपल्या ता. १ सप्टेंबर सन १९०२ च्या पत्रांत म्हणतात:—

I have seen Shahunagarwasi Dramatic Company act "Othello, Macbeth and Hamlet" in Marathi and I have been astonished at the ability and talent which they have shown. Ganapatrao & Balvantrao were especially good, but all acted very well, and it was a pleasure to me to hear them. My friends also were greatly pleased with their performances. I trust the Company will have much success in the future.

तुकारामबोवा हे महाराष्ट्राचे अत्यंत प्रिय असे संत असल्या-कारणानें आणि त्यांची भूमिका वठविण्याचें अत्यंत अवघड काम गणपतरावांनीं अत्यंत परिश्रमानें शांतरसांत फारच बिनतोड वठविल्यानें संतकवींनीं परमार्थप्रवण बनविलेल्या आमच्या महाराष्ट्राच्या पूर्वीच्या पिढ्यांतील आनुवंशिक रक्त आमच्या बऱ्याच भोळ्या भाबड्या पिढींत अद्यापि खेळत आहे म्हणून गणपतरावांच्या तुकारामाच्या भूमिकेंतील तद्रूपावस्थेंत रंगभूमीवर असा भास होत असे कीं, प्रत्यक्ष तुकारामबोवाच क्रोधाला जिंकून सध्यांच्या पिढीच्या दुर्वृत्त वर्तनावर आपल्या अभंगवाणीच्या विद्युल्लतेचें तेज जनमनांत ओतण्यासाठीं पुनरावतरणाच्या शास्त्रानुरोधें अवतीर्ण झाले आहेत. तेव्हां अशा सत्पुरु-षाचें सही सही दर्शन देणाऱ्या गणपतरावांच्या तुकाराममय मूर्तीपुढें



गणपतरावांची कन्या चि. सौ. रंगुताई तिची दोन मुले रामु व राजा आणि जामात माधवराव बापट.

Photo by—R. N. Joshi

भाविक विठ्ठलभक्तांनीं नाटकगृहांतील भर समाजांत स्वतःला विसरून जाऊन लोटांगणें घालायला व अबीर गुलाल उधळायला तयार व्हावें व तें पाहाण्याचें सौख्य आमच्यासारख्यांनां मिळावें, या पेक्षां अशा सर्वोत्तम नटाचा लौकिक आम्ही अधिक तो काय गावा! खरोखर लोकमान्यांची कर्तबगारी ज्या काळीं मनापासून चालली होती अशा काळीं परमेश्वरानें आमच्यासारख्यांना प्रौढावस्थेंत, ती सर्व बारकाईनें अवलोकन करण्यास जिवंत ठेवल्याचें जितकें पुण्यप्रद वाटतें, तितकेंच गणपतरावांसारख्या नटाचें नटकौशल्य ज्या काळीं महाराष्ट्राच्या रंगभूमीला ललामभूत झालें होतें अशा काळीं आमच्यासारखे जे सज्ञानावस्थेंत त्यांचें नाट्यदर्शन बघायला जिवंत राहिले ते धन्य होत.

बाळाभाऊ तुकाराम नाटकांत शिवाजीची भूमिका करीत असत. झुंजाररावांत ते जाधवरावाची भूमिका प्रथमच स्त्रीवेषांतून बाहेर येऊन पुरुषवेषाची करूं लागले. याच प्रवेशाच्या मथळयावर जें ' स्त्रीपाटर्यांना पुरुषपार्ट्यांच्या भूमिका करण्याची व स्त्रियांनां पुरुषपार्टांच्या भूमिका करण्याची हौस वाटते ' या बाबतींत विवेचन केलें आहे, त्याचेंच हें बाळाभाऊंच्या संबंधाचें उदाहरण होय. संगीतांत भाऊराव कोल्हटकर जितक्या अवसानानें प्रथमच कोदंडाच्या भूमिकेंत पुरुषवेष धरून रंगभूमीवर आले तितक्याच तऱ्हेनें जरी बाळाभाऊहि जाधवरावाच्या वेषांत रंगभूमीवर फडकले, तरी त्या दोहोंत अंतर होतें. भाऊरावांचा आवाज सणसणीत असून त्यांची तडफ बाजवीपेक्षां फाजील होती आणि बाळाभाऊंची सवान स्त्रीपार्टाला साजेशी कोमल व हलक्या सुरांतली असून, त्यांच्यांत अंगीकृत सोंगाला रंगविण्याचा अभिनय करण्याची कुशलता व साहाजिक प्रचारांतलें आणि रंगभूमीला साजेसें भाषण

करण्याची जरीं धमक उत्तम होती, तरी त्यांचा आवाज त्यांना पुरुषवेषांत नेहमीं दगा देऊन स्त्रीत्व प्रकट करीत असे. भाऊरावांनी तर स्वाभाविक भाषण कसें करावें ही गोष्ट विचाराबाहेर गुंडाळूनच ठेविली असल्यानें ते आपल्या पुरुषांच्या भूमिकांचीं कामें आपल्या कंठ-माधुर्याच्या जोरावरच सर्वांगांनीं दडपून नेत असत. हे दोघे रंगवीर स्त्रीपार्टांतून पुरुषपार्टांत हौसेनें जरी आले होते, तरी बालपणापासून अंगांतील रोमरोमांत मुरलेल्या स्त्रीविषयक हावभावांची छटा, त्या दोघांच्याहि पुरुषवेषांतील, उसन्या आणिलेल्या अभिनयवैभवांतून मधून मधून डोकावून, अद्यापी आमचें स्त्रीत्व नाहींसें झालेलें नाहीं असें दर्शविण्यास अखेरपर्यंत माघार घेत नव्हती. बालगंधर्वांना इतकेंहि आतां साधणें अशक्य आहे.हवा तर प्रयत्न करून पाहावा!

श्रीतुकाराम नाटकाचें वैभव नागपुरच्या पलीकडे इंदूर वगैरे ठिकाणीं विशेषसेंच नव्हें तर मुळींच दिसलें नाहीं. महाराष्ट्रांतच त्याला काय ती भरती आली. शाहूमंडळी ग्वाल्हेरीस कोणच्या अवस्थेंत पडून राहिली होती याची हकीकत थोडक्यांत वर आलीच आहे. तेथून मंडळी पुण्यास कशी येऊन पोंचणार, व येण्यास लागणारा खर्च कोण देणार, या विषयांत मंडळीचा व माझा पत्रव्यवहार सुरू होऊन पुण्याच्या एका त्रिंबकराव नांवाच्या सराफाला मीं गांठला व त्याला नऊ खेळांचें कंत्राट पंधराशें रुपयांस देऊन कागद केला आणि सहाशें रुपये ग्वाल्हेरीस तारेनें धाडून मंडळीला पुण्यास आणविलें. पुण्यास मंडळी मार्च महिन्यांत येऊन पोंचली व तिचे नेहमींचे खेळ कंत्राटदाराच्या इच्छेप्रमाणें आर्यभूषणमध्यें सुरू होऊन नव्या 'श्रीरामदास' नाटकाच्या तालमी वगैरे होण्यास सुरुवात झाली. कंसाला सर्वत्र कृष्ण दिसत असल्याप्र-

माणें ही वेळ सरकारला सर्वत्र राजद्रोह पसरला असल्याची दिसत असल्यानें व सरकारच्या घरीं बातमी नेऊन पोंचविणाऱ्या बारिक कामांतील आमच्या देशबंधूंच्या उदरीं शनी आला असल्या कारणानें 'रामदास' नाटक हेंहि राजद्रोही वाङ्मयाच्या सदरांत निघेल कीं काय याची धास्ती वाटूं लागली. नाटक बसतें आहे ही बातमी सहजीं बाजारांत पसरून म्हणा किंवा कंत्राटदार त्रिंबकराव यानें आपला पुढें फायदा करून घेण्याच्या लालसेनें त्या नाटकासंबंधानें गुणगौरपर त्याची स्तुति गांवांत चालविल्यानें म्हणा, पोलीसचे लोक थिएटरांत रोज हेलपाटे मारूं लागले. इतक्यांत नाटकाची छापील प्रत तयार होऊन मुंबईहून पुण्यास आली व ती परीक्षणार्थ पोलीसच्या ताब्यांत दिली गेली. नाटकप्रयोग अमुक वाजेपर्यंत करूं देणें व जो करूं नका म्हणून पोलीस सांगेल तो न करणें, अशा तऱ्हेच्या अधिकाराचें कोलीत सरकारनें त्या वेळीं पोलीसच्या हातांत नुकतेंच दिलें असल्यानें, वाङ्मय म्हणजे काय याची ज्यांना कल्पना देखील नाहीं, अशा पोलिस–विद्वद्रत्नांनीं आपल्या ज्ञानाप्रमाणेंच अधिकाराचा सोटा फिरवीत राहण्याचा जो क्रम सुरू ठेविला होता, त्याला अनुसरूनच पोलीसकडून ( Corrected copy ) म्हणून 'रामदास' नाटकाची दुरुस्त प्रत पंधरा दिवसांनीं हातीं आली. त्याच्या आधीं मला व गणपतरावांना पोलीस सुपरिंटेंडेंटच्या बंगल्यावर उगीच्याच उगीच फुकट फाकड्या पोलीसच्या बोलावण्यावरून दोन चार हेलपाटे घालावे लागले. अमुक शनिवारीं खेळ होणार असें वर्तमानपत्रांत दोनदां प्रसिद्ध केलें असतांहि त्या तारखा पोलीसच्या अनिश्चित वर्तनामुळें गाळाव्या लागल्या व अखेरीस, पोलीसनें पुस्तकांतील खोडलेला मजकूर रंगभूमीवर पात्रांनीं बोलायचा नाहीं अशा पोलीसचा मजाव करून

करून नाटकाचा प्रयोग करण्याचें आम्ही कबूल केल्यावर पोलीसची परवानगी मिळाली व प्रयोग एकदांचा लागला.

स्वराज्यस्थापना आणि रामदास व शिवाजी यांची कारकीर्द—या विषयांच्या इतिहासावर तें नाटक लिहिलें गेलें असल्यानें त्यांत 'मराठा तितुका मेळवावा' या समर्थांच्या ब्रीदवाक्याला अनुसरू जो उपदेश जागोजागीं येणें साहजिकच होतें, तीं वाक्यें ध्यानांत धरून प्रेक्षकसमुदाय कदाचित्—समर्थांच्या आज्ञेप्रमाणें शिवाजीनें जें केलें तें करून—परकीय सत्ता उलथून पाडील कीं काय असा संशय आमच्याच देशबांधव परंतु इंग्रजांची इमानें इतबारें नौकरी करण्याचा आव घालणाऱ्या आणि चहाड्या करून स्वतःचें उदरंभरण करणाऱ्या पोलिस लोकांनीं त्या वेळीं जें थैमान केलें त्या बाबतींतला त्यांचा मूढपणा—पुढें युरोपांतील महायुद्धाच्या वेळीं मराठ्यांचीं चित्रें काढून त्यांवर समर्थांचीं जीं दहा वर्षांपूर्वीं राजद्रोही ठरलेलीं वाक्यें अखिल भरतखंडाला 'मराठ्यांचें ब्रीद' म्हणून वाचायला सरकारनें दिलीं त्यानेंच सिद्ध केला. पोलीसच्या या कारवाईचा उत्तम फायदा त्रिंबकराव कंत्राटदाराला फारच चांगला झाला. गांवांत 'रामदास' नाटकासंबंधानें पोलीसच्या चर्चेची भयंकर आणि जागत्या ज्योतीची जिवंत जाहीरात फारच झपाट्यानें प्रसिद्ध झाल्यामुळें त्या नाटकाचा प्रयोग बघण्यास जाण्याची प्रेक्षकांस अत्यंत उत्कंठा उत्पन्न झाली. कंत्राट देऊं नका असें मी म्हणत असतांहि सवापांचशें रुपयांचें कंत्राट पहिल्या प्रयोगाचें दिलें गेलें, आणि त्रिंबकरावानें त्यावर दर वाढवून चारपांचशें रुपये फायदा मिळविला. गणपतराव हे जात्या धाडसी नसल्यानें, त्यांनीं पोलीसच्या भीतीनें आधींच सवापांचशें रुपये पदरांत ओतून घेतले. खेळ होण्याचा अथवा पोलीसकडून ऐन वेळीं तो बंद पड-

ल्यास त्याचा यांची जबाबदारी कंत्राटदारावर टाकण्याचा घाट घालूनच वरील कंत्राट देण्यांत आलें होतें. सीन, पडदे, कपडे वगैरे सर्व प्रकारची शाहूंनां साजेल अशी त्यांच्या वहिवाटीप्रमाणें त्या खेळाला गणपतरावांनीं चांगली तयारी केली होती व नाटकाचा प्रयोगहि उत्तम वठला. वर्तमानपत्रांतून त्याची स्तुति लगेच सर्वत्र पसरल्यानें दुसरा प्रयोग बघायला मुंबईची जी कांहीं मंडळी पुण्यास पुढील शनिवारीं आली होती, त्या मंडळींत राजापुरकर नाटकमंडळीचे मालक कै. बाबाजीराव राणे माझ्या एका मित्राबरोबर येऊन शाहूमंडळींतच उतरले होते. राजापुरकर नाटकमंडळीची ती वेळ नुकतीच अंड्यांतून बाहेर पडण्याची होती व बाबाजीराव हे गद्य नाटकाचे मूळचे शोकी असतां, त्यांनीं आपली मंडळी पार्शी तऱ्हेच्या उर्दू नाटकाप्रमाणें मराठी संगीतांत कशी बशी धंदा या नात्यानें अगदीं शेवटच्या पायरीच्या वाङ्मयाच्या तोडीचीं नाटकें हाताशीं धरून चालू केली होती.

या वेळेपर्यंत बाबाजीराव व गणपतराव हे एकमेकांना फक्त नांवानेंच ओळखीत होते. रामदासाचा दुसरा प्रयोग संपल्यावर गणपतराव, बाळाभाऊ, मी व आणिक दोनचार स्नेही असे रंगभूमीवर गमतीच्या गप्पा मारीत बसलों असतां, त्या प्रसंगीं बाबाजीरावांशीं गणपतरावांबरोबरच माझीहि ओळख झाली. माझें रामदास नाटक पाहून बाबाजीराव खूष झाले असल्यानें त्यांनीं आपल्या नाटकी भाषेला अनुसरून गणपतरावांना असें म्हटलें कीं, " तुमच्या या जोशी कवींच्याकडून आमच्यासाठीं असेंच एखाद्या सच्चरित साधूचें नाटक लिहवून द्याल काय?" त्यावर गणपतराव त्यांना म्हणाले " बहुतेक महाराष्ट्रीय प्रसिद्ध साधूंना आमच्या शिरवळकरांनीं आपल्या कांखोटीला मारले आहेत; तरी

अद्यापि 'दामाजीपंत' त्यांच्या नजरेआड राहिले आहेत हें आश्चर्य आहे! त्यांच्या चरित्रावर आमच्या बळवंतरावांना लिहून द्यायला हवें तर सांगतों. त्यांना योग्य मोबदला द्या म्हणजे झालें." बाबाजीरावांनीं यावर योग्य मोबदल्यासंबंधानें विचारतां, गणपतरावांनीं त्यांस पांचशेंचा आंकडा सांगितला व तो त्यांना पसंत असल्याबद्दल लागलीच त्यांनीं आपली संमति दर्शवून पंचवीस रुपये मला ते अगाऊ सचकाराचा बयाणाहि देऊं लागले; परंतु मी त्याचा स्वीकार करावा असें गणपतरावांची दृष्टी मला सांगू शकली नाहीं, आणि त्यामुळें मी बाबाजीरावांना 'संगीत दामाजी' नाटक लिहून देण्याचें अभिवचन देऊन, सर्व रक्कम एकदमच प्रयोगानंतर घेईन असें सांगितले, आणि ते देत असलेले पंचवीस रुपये घेण्याचें नाकारिलें. ठरल्याप्रमाणें योग्य मुदतींत चार अंक लिहून देऊन मुंबईस त्यांच्या तालमीहि सुरू झाल्या व मीं पांचवा अंक लिहिण्यास सुरवात केली. येथपर्यंत सर्व गोष्टी सुरळीत चालल्या असतां, बाबाजीरावांच्या प्रेमांत नव्यानेंच शिरूं पाहणाऱ्या एका विघ्नसंतोषी व्यक्तीनें माझ्यासंबंधानें अनेक खोट्यानाट्या गोष्टींचें विष त्यांच्या कानांत ओतिलें व तेहि हलक्याच कानांचे असल्यानें, त्यांनीं माझ्या विरुद्ध बराच उठाव केला, तरी अखेरीस मजकडून पांचवा अंक लिहून घेऊन तो बसविल्यावर प्रयोग लाविला. प्रयोगास उत्पन्न वगैरे चांगलें झालें असतां आणि तो लोकप्रिय होण्याचीं सुचिन्हें स्पष्ट दिसत असतां, धंदेवाला या दृष्टीनें—आपणांला तो प्रयोग आवडला नाहीं, या सबबीवर त्यांनीं शाहूमंडळींतील शास्त्रीबोवांच्या बरोबर प्रयोगाच्या स्वामित्वाबद्दल म्हणून पूर्वी ठरलेल्या पांचशांच्या ऐवजीं

शंभरच रुपये मजकडे धाडून दिले व भांडणांत अर्थ नाहीं अशी मीं आपल्या मनाची समजूत करून घेऊन रुपये पावल्याची पावती धाडून दिली. बाबाजीरावांनीं माझ्याशीं असें निंद्य वर्तन केलें हे ऐकून गणपतरावांस अत्यंत वाईट वाटलें. आगट्यांच्याकडून तोच प्रयोग पुन्हां मूळच्याच इमारतींत कांहीं कांहीं फरक करून लिहून घेतल्याचा भुर्दंड परमेश्वरानें बाबाजीरावांच्या चांगलाच पुढें पदरीं बांधला.पांचशांच्याठिकाणीं त्यांना पांच हजारांच्या गोत्यांत जेव्हां आगट्यांनी दामाजीपंतांच्या कामीं आणिलें तेव्हां त्यांचे डोळे उघडून पुन्हां त्यांनी मला मुद्दाम बोलावून नेऊन मजकडून 'अनुसूया' व 'प्रल्हाद'या दोन नाटकांचे तीन तीन अंकांचे प्लॉट्स लिहून घेतले. पुढें तीं नाटकें मजकडूनच लिहविण्याचा त्यांचा इरादा होता, परंतु त्यांच्या अकाली मृत्यूनें तो त्यांचे कडून पार पडला नाहीं, ही गोष्ट निराळी. असो. वाचकांना समजण्यासाठीं नाटकी व्यवहाराच्या अनेक मासल्यांपैकीं हा एक मासला मुद्दाम वाचकांपुढें मांडून आतां चालू विषयाकडे पुन्हां वळतों.

गणपतरावांनी रामदासाची भूमिका तुकारामप्रमाणेंच फारच बहारीची आणि परिणामकारक अशी वठविली. ते कांहीं कांहीं श्लोक म्हणण्यांत तर आगाऊ सांगून ठेविलेल्या नेमक्याच ठिकाणीं टाळ्या घेण्याचा प्रत्यक्ष अनुभव आणून देऊं लागले. बालपणीं बाप वारल्यावर ज्या रामदासी मनाच्या श्लोकांवर गणपतरावांनीं आपल्या भावंडांचें व मातेचें कांहीं काल पोषण केलें, त्याचें अखेरीस प्रत्यक्ष रामदासाची भूमिका केल्यानें सार्थक झालें असें जें त्यांस वाटलें, तें त्यांनी शद्बांनींहि उच्चारून दाखविलें. एणेंप्रमाणें पुण्यास रामदास नाटकाचा लौकिक झाल्यावर मंडळी मुंबईस गेली व तेथें खेळ करूं लागली. रामदासा-

चाहि प्रयोग होण्याचा दिवस ओळीनेंच ठरविण्यांत आला; परंतु पुन्हा माशी शिंकली. 'गणपतरावांना शारीरशास्त्राची उत्तम माहिती असल्यानें ते आपला चेहेरा जितक्या त्वरेनें क्रोधसंतप्त करूं शकतात, तितक्याच त्वरेनें भीतिग्रस्ततेंतील फटफटीतपणाहि ते आपल्य चेहेऱ्यावर प्रेक्षकांस दाखवूं शकतात,' अशा प्रकारचें माझें व माझ्या एका ओळखीच्या माणसाचें भाषण चाललें असतां; तें त्याला अशक्यतेच्या कोटींतलें वाटून, आमची बोलाचाली अगदीं हमरीतुमरीवर आली. आम्हां दोघांपैकीं कोणीच अखेरपर्यंत पड खाल्ली नाहीं. पण त्याचा परिणाम शाहूमंडळीवर होण्याची वेळ येऊन ठेपली. ते गृहस्थ पो. कमिशनरच्या परिचयाचे असल्या कारणानें, त्यांनीं आपल्या अकरमाशा स्वभावास उचित असाच आमच्या भांडणाचा सूड उगविण्याच्या इच्छेनें रामदास नाटक राजद्रोहानें भरलेलें आहे असें त्यांस जाऊन सांगितलें व त्यामुळें पोलीसचा ससेमिरा गणपतरावांच्या मागें लागला. मला ही गोष्ट समजल्यावर, सरकारमध्यें मराठीभाषाकोविद म्हणन मान्य असलेल्या माझ्या तीर्थरूपांचें स्नेही कै. वि. कों. ओक यांचेकडे मी गेलों व त्यांस पुस्तकाची एक प्रत अभिप्रायार्थ देऊन, त्यांचेकडून रामदासाच्या पहिल्या प्रयोगाचें त्यांच्या शिफारशीचें हस्तपत्रक ( हॅन्डबिल ) लिहून घेऊन, तें खेळाच्या आदल्या दिवशीं छापून प्रसिद्ध केलें व त्यामुळें जरी पोलीसचा बाऊ कमीं होऊन नाट्यप्रयोग उत्तम पैदाशीचा झाला, तरी सुरुवातीपासून अखेरपर्यंत युरोपियन आणि नेटिव्ह पोलिस अधिकारी नाटकगृहांत डोळ्यांत तेल घालून प्रयोगाचें निरीक्षण व श्रवण करीत असलेले चिकार प्रेक्षकांत बसलेले दिसत होते. सूड उगवूं पाहाणाऱ्या गृहस्थांचीं अशा तऱ्हेनें नाटकप्रयोग

झाल्यानें निराशा झाल्यावर त्यांनी तें पुस्तक सरकारजमा होईल अशी खटपट करण्यास सुरुवात केली; परंतु रा. ब. का. ना. साने हे त्यावेळीं पुरे विचारी असे सरकारी अधिकारी असल्यानें, त्यांनी त्या पुस्तकासंबंधानें सरकारांत चांगला रिपोर्ट केला म्हणूनच तें पुस्तक बचावलें गेलें, व पुढील नाटकप्रयोगांस अडथळा झाला नाहीं. शाहूमंडळीनें या नाटकावर द्रव्याचा बहर-वऱ्हाड, खानदेश व दक्षिण महाराष्ट्र यांत जसा मारला तसा तिला पुण्यामुंबईकडे तुकारामाप्रमाणें मारतां आला नाहीं. या नाटकांत व तुकारामांत बाळाभाऊ शिवाजीची भूमिका करीत असत; पण ती त्यांना चांगली साधत नसे. बाळाभाऊंना पुरुषवेषांतील भूमिका कधींच चांगल्या साधल्या नाहींत हें येथें नमूद करण्यानें त्यांचा बदलौकिक होतो आहे असें आम्हांस वाटत नाहीं. 'बाळा, मी तुझें सोंग उत्तम करीन पण तुला मात्र माझें कधींच करतां यायचें नाहीं,' असें जें गणपतराव त्यांना नेहमी म्हणत असत, तें त्यांचें म्हणणें लटकें करण्यासाठीं म्हणून 'मी हॅम्लेटचें सोंग करून तुझी पच्ची करणार' असें जरी बाळाभाऊ मोठ्या वीरश्रीनें गणपतरावांना म्हणत असत, तरी तें त्यांचें म्हणणें व्यर्थ होतें. कारण, त्यांचा देह आणि आवाज या गोष्टी पुरुषाच्या भूमिकेला साजण्यासारख्या उत्पन्नच झालेल्या नव्हत्या आणि वयाच्या चौदाव्या वर्षापासून बेचाळीस वर्षांपर्यंत त्यांच्या रोमरोमांत स्त्रीविषयक नाट्य भरलें असल्यानें, तें अंगीं मुरलेलें वळण त्यांच्या पुरुषवेषांत भाऊराव कोल्हटकरांप्रमाणें त्यांचा ऐनवेळीं अवसानघात करी. खरें म्हटलें तर ते गणपतरावांपेक्षां नाट्यकलेंत बरेच वरच्या दर्जाचे मर्मज्ञ होते यांत शंका नाहीं. ते गणपतरावांच्या नेहमीं चुका दाखवीत व त्यांची समजूत पाडीत; परंतु त्यांना तें सर्व

त्यांची फार दिवसांची स्त्रीवेषाची संवय आणि अभ्यास यांमुळें स्वतः करूं म्हटलें तर कोत्या स्त्रीविषयक आवाजामुळें साधत नसे. ते पुरुष आणि स्त्री अशीं दोन्ही सोंगें उत्तम तऱ्हेनें शिकवून तयार करीत. गणपतरावांपाशीं तसा शिक्षकपणाचा बराच अभाव होता. नाट्यपरीक्षणांत आणि नाटकांतील मजकुरासंबंधानें चर्चा करण्यांत बाळाभाऊ जसे उपजत हुषार होते तसे गणपतराव नव्हते असें नाहीं; पण ते त्यांत त्यांच्या खालच्या दर्जाचे होते. लेखक पुस्तकांत लिहून जातो, पण वेळीं त्याचें त्यालाच कांहीं प्रसंगीं आपल्या लेखाचें समर्थन करणें जड जातें, ही गोष्ट पुरातन काळापासून चालत आलेली असल्यानेंच टीकाकारांना जन्म घ्यावा लागतो. नाटकी नटाला कवीचें हृदय सजीवतेच्या दृश्यांत दाखवावयाचें असल्यानें, टीकाकारांपेक्षां ते उच्च दर्जाचेच होत. बाळाभाऊ अशांपैकींच होते. नाटकांतील भाषणांचा ते नेहमीं खल करून नाटक बसवीत असत व त्याचमुळें त्यांचीं नाटकें लोकादरास पात्र होत होतीं. या बाबतींतलें मासल्यासाठीं म्हणून एकच उदाहरण येथें देतों. कै. देवल हे उत्तम नट व उत्कृष्ट नाटकलेखक म्हणून महाराष्ट्रांत गाजले गेले आहेत ही गोष्ट सर्वविश्रुत आहे. शाहू मंडळींत जेव्हां त्यांचें ' दुर्गा ' नाटक बसत होतें त्या वेळीं बाळाभाऊ आपल्या नेहमींच्या स्वभावाप्रमाणें त्यांतील भाषणांसंबंधानें चर्चा करून हावभावांसंबंधानें चिकित्सा करीत असतां, त्या नाटकांतील पांचव्या अंकाच्या तिसऱ्या प्रवेशाच्या सुरवातीलाच दुर्गेच्या भाषणांत खंजीर उपसून चंद्ररावाला ठार मारण्यास जाण्याच्या वेळीं, ' नवरे जर स्वर्गांत जातात तर त्यांना स्वर्गांत पाठविणारे कुठें जातात हे मला पहायचें आहे ' असें जें दुर्गेचें स्वगत भाषण आहे, त्याचा

अर्थ काय व त्याचा हावभाव कसा असावा याबद्दल वादविवाद सुरू झाला असतां, कै. देवल हे पुस्तकलेखक असूनहि जसे गोंधळांत पडल्याचें दिसूं लागलें तद्वत् इतरहि विद्वान् लोक जरी भांबावल्याचा भास होऊं लागला होता, तरी कै. नारायणराव फाटकांनीं बाळाभाऊंना विचारपूर्वक उत्तर देऊन ॲक्टिंगहि स्वतः करून दाखविलें आणि म्हटलें, "बाळा, विनायक जर तुझ्यासारखा वाक्यानुवाक्याच्या चिंधड्या उडविणारा असता तर मीं त्याला दुर्गेचें काम शिकविलें त्यापेक्षां त्याच्या बुद्धिवर्चस्वाच्या मदतीनें अधिक चांगलें खास शिकविलें असतें." याच कै० फाटकांचा एक बापु या नांवाचा नातु सध्यां मुंबईस ललितकला संगीत नाटक मंडळींत नुकताच हौसेनें नाट्यप्रवीण होण्यासाठीं शिरलेला आहे. आनुवंशिक गुणानेंच त्याच्यांत ही हौस उत्पन्न झाली आहे ही गोष्ट कांहीं वावगी नाहीं; परंतु त्यानें आपल्या आजाचा या कलेंतील नांवलौकिक रक्षण करण्याची खबरदारी फारच चांगली घेतली पाहिजे. तारुण्यांतील स्वेच्छाचारी उसन्या घाईच्या ऐटीनें जर तो आपला नांवलौकिक होण्याच्या आधींच जगाला तुच्छ मानून स्वमताशीं आपण ॲक्टर आहोंत अशी घमेंड मारण्याची हांव इतक्यांतच मारूं लागण्याचीं चिन्हें दिसूं लागतील, तर नैसर्गिक न्यायानें त्याचा लौकिक ऐन खिंडीच्या वाटेंत सूर्य मावळल्याच्या सबबीवर मट्कन्खालीं बसेल, याकडे त्यानें लक्ष्य देणें जरूर आहे. त्यानें आमरण विद्यार्थी दशेंत [ राहून अंगीकृत कार्यांत गणपतरावांप्रमाणें आपला लौकिक करून घ्यावा अशी आमची इच्छा आहे. मात्र त्यानें सध्यां जें वेषधारणाचें हलक्या प्रतीचें काम करणें अंगिकारिलें आहे, त्यांतून पुढें सरसावून रंगभूमीची क्रांती करून सोडणारीं अशीं गणपतरावांप्रमाणें उदात्त व उत्तानस्वरूपाचीं कामें

करण्यास एव्हांपासूनच जर प्रारंभ केला, तर तो पुढें चांगलें नांव मिळवील असें आम्हांस वाटतें. रा. चाफेकरांनाहि आमचें हेंच सांगणें आहे. त्यांच्यासारख्या विद्वानांनीं नाट्यकलेंत आपला प्रवेश करून घेऊन नाट्यसृष्टीचा दर्जा वाढविण्याचें व्रत जर उत्तरोत्तर अधिकाधिक प्रचारांत आणिलें, तर कमी दर्जाच्या माणसांनीं नाटयकलेला जो हीनपणा आणिला आहे, तो खात्रीनें नष्ट होणार आहे. विद्वानांनीं आपला नाटयकलेंतला जनशिक्षकाचा अधिकार संभाळून जर आपल्या वर्तनानें जनतेंत सुधारणा घडवून आणण्यासारखी नव्या राष्ट्रीय स्वरूपाची स्वाभाविक क्रांती नाटयसृष्टींत घडवून आणिली, तरच त्यांच्या विद्वत्तेचें चीज झालें असें होणार आहे. नाहीं तर अंगीं विद्वत्ता असतांहि निसर्गशिक्षण घेऊन स्वतःचा शोध म्हणून कांहीं जगापुढें नवें मांडण्याच्या ऐवजीं, जनतेला ज्या योगें वाईट वळण लागतें आहे अशाच पूर्वपरिचित नटवेषांची सुधारलेली आवृत्ति चांफेकरांच्याकडून करण्याचें काम सध्यांसारखेंच पुढेंहि जर होत राहील तर त्यांच्या विद्वत्तेचें खोबरें नासकें आहे असेंच म्हणण्याचा प्रसंग दुर्दैवानें ओढवेल. एवढ्यासाठीं चांफेकरांनीं सध्यां अंगिकारिलेल्या इमिटेशनच्या भरीस न पडतां, आपल्या विद्वत्तेला शोभेल असें कांहीं तरी नवीन करून दाखवून देशोद्धारार्थ आपलें नांव पुढें आणावें अशी त्यांस व फाटकांस आमची जी अगत्याची सूचना आहे, तिला ते मान देवोत.

गणपतराव आणि बाळाभाऊ या दोहोंत वाचनाची अभिरुचि, गणपतरावांनाच अधीक असे. त्यांच्या मंडळींत बहुतेक सर्व नामांकित वर्तमानपत्रें वर्गण्या भरून ते मुद्दाम घेत असत, आणि इतर पुस्तकेंहि वाचीत असत. पुण्याचा नाईट क्लब मोडला तेव्हां त्याची सर्व टुमदार

लायब्ररी शाहूमंडळीनें मुद्दाम विकत घेतली होती. गणपतराव आणि बाळाभाऊ यांच्या स्वभावांत जसें बरेंच अंतर असे, तद्वतच त्यांच्या स्मरणशक्तींतहि बरेंच अंतर असे. बरेच दिवस ज्याचा प्रयोग करण्याचा प्रसंग आला नाहीं असें एखादें नाटक करण्याचा एकाएकीं प्रसंग उद्भवल्यास त्यांतील पात्रांची यादी व त्यांतील प्रवेशावारीसह पात्रांच्या भाषणांच्या गोषवाऱ्याचें कथानक या गोष्टी गणपतराव जसे हवे तेव्हां बिनचूकपणें सांगत असत अथवा एखाद्या संस्मरणीय गोष्टीसंबंधानें ती केव्हां व कोठें घडली याची स्मृतिपूर्वक आठवण देत असत, तसें बाळाभाऊंना करतां येत नसे. गणपतरावांची मुखश्री जशी एखाद्या विद्वद्रत्नाला शोभण्यासारख्या भव्य कपालप्रदेशाची होती, तद्वतच त्यांच्या डोक्याची आकृति बरीच मोठी, जरा लांबट व मेंदूचा पार्श्वभाग उन्नत झालेला असल्यानेंच बाळाभाऊ त्यांची केव्हां केव्हां 'फुकटे फिलॉजफर' म्हणून जी थट्टा करीत असत तींतहि अर्थ नव्हता असें नाहीं. पूर्वजन्मांच्या संस्कारानें अंगीं बहुश्रुतपणा आल्यानें गणपतरावांना विनोदात्मक तत्त्वज्ञानांत वादविवाद करण्याची जरी मोठी हौस वाटत असे, तरी वेदान्तपर असे गीतेवांचून इतर फारसे ग्रंथ त्यांनीं वाचलेले नव्हते. ते जसे स्वाभाविक नट होते, तसेच ते तार्किक तत्त्वज्ञ होते. बाळाभाऊंना त्यांच्या नाट्यविषयक भौतिक तत्त्वज्ञानापेक्षां आधिभौतिकांतील तत्त्वज्ञानाचें आकलन करण्याची अपेक्षा कधींच वाटली नाहीं. त्या दोघांना एखादें उत्तम नाटक लिहितां आलें नसतें असें नाहीं; परंतु तिकडे त्यांचें लक्षच नव्हतें. मंडळीचा १९०२ सालीं इंदूरास मुक्काम असतां, मीं मुंबईस पूर्वीं 'गुराखी' वर्तमानपत्रांतून 'ही सारी भाऊबंदकी' या मथळ्याखालीं जे ऐतिहासिक

चर्चेचे अग्रलेख प्रसिद्ध केले होते, ते एकत्र करून पुस्तकरूपानें जेव्हां प्रसिद्ध केलें, तेव्हां त्या पुस्तकाला या नटद्वयांनीं मोठ्या प्रेमानें दोन पानांची जी एक प्रस्तावना लिहिली ती त्यांच्या लेखनकर्तबगारींतील पहिली व अखेरचीच कर्तबगारी होय. तें पुस्तक सरकारच्या अनुदारतेच्या कटाक्षानें १९११ सालीं जरी सरकारजमा झालें, तरी त्या प्रस्तावनेचें हस्तलिखित जें अद्यापी मजपाशीं आहे त्यावरून त्याचा उतारा यापुढें त्या नटद्वयांच्या लेखनकौशल्याचा मासला म्हणून जशाचा तसाच देतों.

## मित्रांचे दोन शब्द

आपल्या दृष्टीला दिसणारें क्षितिज, आपल्या चालण्याचा गतीप्रमाणेंच जसें आपल्यापासून दूर दूर पळत असतें, तद्वतच एखाद्या घडून गेलेल्या गोष्टीचा काळही नेहमी आपल्यापासून लांबलांबच धांवत असतो. तो क्षितीजाप्रमाणें आपल्या नजरेला मानवी बुद्धीच्या कारागिरींतल्या लेखनकलेच्या द्वारें दिसतो व आपल्याशीं बोलतो. त्यालाच इतिहास म्हणतात. सध्याचें पुस्तक तरी त्यांतलाच अठराव्या शतकांत घडलेल्या एका मळकट गोष्टीचा आरसा आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं आम्ही 'पानिपतचा मुकाबला' म्हणून जें नाटक करितों, त्यांत त्याच्या कर्त्यानें जीं कांहीं संदिग्ध वाक्यें ठेविलीं आहेत, त्यांचेंच स्पष्टीकरण ह्या पुस्तकांतील पानिपतच्या लढाईच्या प्रकरणानें केलें आहे, हें वरवर इतिहास चाळणाऱ्यांना व टीकाकार ह्या शब्दाचा अर्थ न समजणाऱ्यांना समजणें फारच दुर्घट आहे शोधक बुद्धि, शांत स्वभाव आणि मत्सरा सारख्या दुष्ट स्वभावाला हद्दपारीची शिक्षा झाल्यामुळें शांत महोदधीप्रमाणें झालेलें हृदय, इतक्या गोष्टी जेथें आहेत, तेथेंच मात्र टीकाकार हें विशेषण शोभतें. असो.

प्रस्तुत पुस्तकांत वादग्रस्त असे आमच्यामतें पांचच मुद्दे असून तीं प्रकृत पुस्तकाच्या रंगभूमीवरील निरनिराळीं पांच पात्रेंच आहेत असें म्हणावें लागतें. त्यांतलें पहिलें पात्र गोपिकाबाई, दुसरें मल्हारराव होळकर, तिसरें सखाराम बापु, चौथें नागपूरकर भोसले आणि पांचवें नाना फडणीस. ह्या सर्व पात्रांच्या संबंधानें जर विचार केला तर आणि सध्यां उपलब्ध असलेला मराठ्यांचा सर्व इतिहास जर शोधक नजरेनें चाळून पाहिला तर पहिलीं तीन पात्रें आणि शेवटचें

एक पात्र ह्यांसंबंधानें प्रकृत पुस्तकांतील मुद्यांचा बराच मेळ जरी पडतो, तरी ते मुद्दे अद्यापि बड्या इतिहासकारांकडून पुरते शोधिले जाऊन त्यांचा विद्वानांच्या कडून ठाममतांचा किल्ला बांधला गेला नसल्या कारणानें प्रस्तुत पुस्तकाचे लेखक आमचे मित्र रा. ल. ना. जोशी हे उच्छृंखल टीकेस आणि दोषास पात्र होणार आहेत यांत शंका नाहीं. परंतु त्यांनीं आपलीं इतिहासपरिशीलनाचीं मतें जगापुढें मांडण्याचें जे धारिष्ट केलें आहे तें जगाच्या आरंभापासूनच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणेंच जोरदार मतभेदांचे रणकंदन होण्यास जरी कारणीभूत होणार आहे, तरी त्यापासून आमच्या गतवैभवाच्या इतिहासाचें उत्कृष्ट मंथन करण्यास इतिहासभक्तांस जोर येणार असून, अखेर समूद्रमंथनांतील शिवधनुष्याप्रमाणें सत्यतेचा टणत्कार करणारी हकीगत बाहेर पडणार आहे यांत शंका नाहीं.

आतां भोंसले या पात्राच्या संबंधानें आम्हीं कधींच न ऐकलेली अशी श्री. नारायणराव पेशव्यांच्या खूनासंबंधानें जी हकीगत ह्या पुस्तकांत दिली आहे, तिच्या सत्यासत्यतेविषयीं विचार करून पाहिलें असतां, पुस्तककाराचें 'सुमेरसिंहाचे वंशज अद्याप त्या बद्दलचें बक्षीस खात आहेत' हे वाक्य आणि कै. 'फाटकांच्या जवळचा वाचावयास मिळालेला खरडा' ह्या बद्दल उत्तम तऱ्हेची इतिहासजिज्ञासूंनीं चौकशी केल्यास खात्री होणार आहे. बाकी नानाफडणोस आणि सखारामबापु ह्यांच्या संबंधानें जीं विधानें ह्या पुस्तकांत दिलीं आहेत तीं असत्य असतीलच असें म्हणतां येणार नाहीं. असो.

अशा तऱ्हेच्या ऐतिहासिक विषयावर, आमच्या देशांत ज्या कलेची फारशी थोरवी सद्यःकालीं गणली जात नाहीं अशा नाटयकलेंतल्या आमच्या सारख्यांना रा. जोशी यानीं लिहिण्याचा प्रसंग आणून दिला हें त्यांनीं मोठें छातीचें जरी काम केलें आहे, तरी आमच्या देशबांधवांस आम्हीं सविनय पाश्चिमात्यांकडे नजर फेकण्यास सांगून आम्हीं येथवर जे काय म्हटलें त्याचा सुविचार करण्यास विनंति करून वाचकांची रजा घेतों.

हिंदुस्तानचे इतिहासभक्त नट,

इंदूर, ता. १५।९।०२ इ. }
गणेश कृष्ण जोशी.
कृष्णाजी महादेव जोग.
शा. न. ना मं.

मागें निर्दिष्ट केल्याप्रमाणें रामदास नाटकाच्या प्रयोगामुळें सर्व प्रकारच्या आर्थिक आडचणींचें निवारण होऊन शाहूमंडळी नाताळचा सण मुंबईत मजेंत घालवून १९०५ च्या प्रारंभीं बडोद्यास निघून गेली. बडोद्यास जाण्याच्या आधीं मुंबईच्या ' टाइम्स ' व ' बॉम्बे गॅझेट ' या दोन वर्तमानपत्रांनी शाहू मंडळीची जी आपापल्या दैनिकांतून प्रशंसा केली ती येणेंप्रमाणें;—

" THE TIMES OF INDIA ", dated 24th December 1904:—Adaptation of Shakesper's " Hamlet "– A very good Marathi adaptation of Shakesper's Hamlet by the late Mr. Gopal G. Agarkar, M. A. Principal of the Fergusson College at Poona was presented last evening in Bombay on the Boards of the New Elphinstone Theatre at Grant Road, by the Shahu Nagarwasi Dramatic Company. This adaptation is designated the " Vikaravilasita" and in it Hamalet becomes Chandrasen; Ophelia, Mallika; Polonius, Shaleya; and Gertrude, Madanika. The Chief actors in this troupe are Ganapatrao Joshi and Balabhaow Jog, who perform the parts of Chandrasen, and Mallika, respectively, the other actors also do their best to supplement their endeavours in making the representation a success. Mr. Joshi acted during the celebrated ghost Scene with much feeling and apparent agitation at seeing the unearthly apparition of his beloved parent, and throughout the play won frequent applause from an appriciative audience. This popular play which is one of the most difficult of the Shakespher's tragedies to render adequately in a foreign tongue is likely to be repeated in the theatre shortly.

[library stamp]

" THE BOMBAY GAZETTE ", dated 27th December 1904–The Shahu Nagarwasi Dramatic Company–Last week at the Grant Road New Elphinstone Theatre Vicaravilasita a Marathi rendering of " Hamlet " was staged before a crowded house. It was a prose Drama and had all the characteristic features of an excellently well managed performance and as a result the members of the Company who were in their best form were encouraged again and again and the repeated cheers given to them were spontaneous. The hero of the play was " Chandrasen " ( Hamlet ) who gained the applause of every one present, his acting being impressive and touching. The other memders of the Company " Shaleya " ( Polonius ), " Madanika " ( Gertrude ), and " Mallika " ( Ophelia ) played their parts very well and the performance was, therefore, warmly received by the spectators.

मुंबईचा मुक्काम हालवून बडोद्यास जाण्याच्या आधीं पुण्याहून मंडळी मुंबईस गेली त्या वेळीं पुण्यास जे ‘ रामदास ’ नाटकाचे दोन प्रयोग झाले त्याच्या आधीं अदमासें पंधरावीस दिवस उमरावतीचे श्री. दादासाहेब खापर्डे यांची स्वारी पुण्यास आली होती. त्या वेळीं ‘रामदास’ नाटक बसत होतें. श्रीमंतांच्या मताप्रमाणें त्या नाटकांत एका प्रवेशाची उणीव होती. शिवरायाला रायगडावर राज्याभिषेक होण्याच्या प्रवेशाच्या आधीं समर्थांनीं आपल्या शिष्यवर्गाची जी निरवानरव केली त्यामध्यें त्यांच्या परमप्रीतींतले शिष्य जे कल्याणस्वामी त्यांच्या हातीं डोंबगांवची त्यांनीं सनद दिली तेव्हां त्या गुरुशिष्यांत

जो करुणरसाश्रित संभाषणचमत्कार झाल्याचा प्रवेश मीं त्या नाटक-पुस्तकांत घातला आहे, तो घालण्यास श्री. खापर्डे यांचीच सूचना मला मुख्यत्वें कारणीभूत झाली असल्यानें, तो प्रवेश जो मोठ्या बहारीचा गणपतराव वठवीत असत, त्याचें सर्व श्रेय श्री. खापर्डे यांचेकडेच आहे असें मी समजतों. याच वेळीं एके रात्रीं सुमारें बारा एक वाजण्याच्या सुमारास आर्यभूषण नाटकगृहांत रामदासाची तालीम संपल्यावर श्री. दादासाहेब सहज म्हणाले कीं, " कायरे बोवा, कांहीं चमचमींत असें खायला आहे काय? " अपरात्र असल्यानें एवढ्या थोरास आपण खायला काय द्यावें या विचारांत गणपतराव आणि बाळाभाऊ पडल्याच पाहून श्री. दादासाहेब म्हणाले, " अरे, असे विचारांत काय पडलांत ? हा खापर्डे जिथें असेल तिथे जगदंबेच्या कृपेनें कधींच कांहीं कमी पडायचें नाहीं. खालीं स्वयंपाकघरांत जाऊन तर पाहा! कांहीं नसल्यास जरूर नाहीं." यावर गणपतराव म्हणाले, "नसेल कांहीं तर तात्याबाला ( आचाऱ्याचें नांव ) उठवतों म्हणजे तो इतक्यांत कांहीं तरी करून देईल. " बाळाभाऊ लगेच उठून खालीं गेले व त्यांनीं प्रथम सैंपाकघरांतील फडताळ उघडून जों पाहिलें तों तेथें त्यांस पांच चार माणसांना पुरतील इतके लाडू, कडबोळीं, करंज्या व शंकरपाळे एका जस्ती डब्यांत भरून ठेविलेले सांपडले. त्यांनीं लगेच तो डबा वर आणून मंडळीपुढें ठेविला. तो प्रकार पाहून दादासाहेब म्हणाले, " पाहिलेंस गणु ! मी जें म्हणतों तें हेंच ! माझ्या बापानें आपल्या नांवाच्या मागें आणि माझ्या नांवाच्या पुढें जी ' श्री ' ठेविली आहे ती हीच. मी जिथें कुठें असेन तिथें ही आमच्या बापलेकांच्या नावांत मध्यें बसलेली ' श्री ' कधीं कमी पडूं देत नाहीं. शिवाय हा

छंबा वर आणणारा बाळाभाऊहि कृष्णाजी महादेव जोग असें जें आपल्याला म्हणतो, तेंहि तो आपल्या नटवेषालाच अनुसरून करीत असल्यामुळें हें फराळाचें सामान आमच्या श्रीनें कृष्णाजीच्या हातूनच इथें आणविलें तेंहि योग्यच झालें. तुझ्या माझ्यांत फरक आहे तो हाच-तूं नुसताच गणेश कृष्ण असून मी गणेश श्रीकृष्ण आहें." अशा तऱ्हेच्या अनेक कोटयांवर कोटया मग तेथें सुरू होऊन फराळ उरकले व दादासाहेब आपल्या बंगल्यावर निघून गेले. याच प्रसंगीं श्रीशाहूनगरवासी नाटकमंडळी या नावाच्या प्रारंभींचें 'श्री' हें जें अक्षर होतें त्याच्या संबंधानें कै. प्रो. केळकरांनीं 'श्री' हें अक्षर उडविल्याबद्दलची दादासाहेबांनीं जी कोटी केली ती मोठी मार्मिक होती. वास्तविक पाहिलें तर प्रो. केळकर हे कट्टे सुधारक असल्यानें व इंग्रजी फॅशनचा त्यांच्या मनावर पूर्ण संस्कार झालेला होता म्हणून, ते जरी बाह्यात्कारें समाजरचनेच्या पद्धतीनेंच वागत असत, तरी त्यांना खुळचट रूढींचा तिरस्कार वाटत असे. समाजांत रूढ झालेला ओबडधोबडपणा काढून टाकून, सरळ नीटनेटकेपणांतील सर्व व्यवहार—काळाला अनुसरून करण्याकडे त्यांची प्रवृत्ति असल्यामुळें, वेळ पडेल तसे वागणारे जरी ते होते, तरी ते मनाचे कर्मठ नव्हते व त्यामुळेंच त्यांनीं नाटकमंडळीच्या नांवांत फेरफार करून त्या नांवांतील—'प्रासादीक, कर, श्री—वगैरेंना प्रारंभींच चाट देऊन फक्त शाहूनगरवासी नाटकमंडळी—एवढेंच मूळचें छोटेंसें टुमदार नांव कायम ठेविलें, आणि 'श्री—श्री' करीत बसलें म्हणजे ती 'श्री': —

आशानाम मनुष्याणां काचिदाश्चर्य शृंखला
यया बद्धाः प्रधावन्ति मुक्तास्तिष्ठन्ति पंगुवत् ॥

या सुभाषितप्रमाणें होतें. इतकेंच नव्हे, तर ज्या शाहुपुरीचें नांव आपण धारण करायचें त्या शाहूच्या वंशजांना जशी सध्यां श्री सोडून गेली आहे, तद्वतच त्या शाहूचें राज्य वाढविणाऱ्या कोंकणांतल्या श्रीवर्धनकर पेशव्यांचाहि जर पत्ता नाहीं, तर त्यांचें नांव धारण करणाऱ्या तुम्हां नाटकवाल्यांना तरी विनाकारण चिकटावून घेतलेल्या श्रीचें व्यर्थ लोढणें कशाला हवें? शिवाय श्री जरी मिळाली तरी तिच्या अभिमानानें ती दुसऱ्यांनीं आपल्याला लावायच्या ऐवजीं तुम्ही आपण होऊन आपल्या नांवाला लावणें बरें नाहीं. वगैरे गोष्टी सांगून प्रो. केळकरांनीं शाहूंच्या नांवाच्या प्रारंभींची 'ब्रह्मचारीप्रासादिक श्री' एवढीं नऊ अक्षरें काढून टाकून बावीस अक्षरांपैकीं तेरा ह्या विषम संख्येचींच अक्षरें कायम ठेविलीं आणि पाश्चिमात्त्यांत 'तेरा' हा आंकडा अपशकुनी मानला गेला असतां, तोच तेराचा आंकडा आमच्या पौर्वात्त्यांत कसा शुभ आणि विजयी करून दाखवितां येतो हें सिद्ध करून दाखविलें.

'शाहूनगरवासी नाटकमंडळी' एवढेंच टुमदार आणि नमुन्याचें नांव कायम करण्यांत जी प्रो. केळकरांनीं युक्ति योजिली तिच्यावरच श्री. दादासाहेब खापर्डे यांनीं वरील प्रसंगीं अशी कोटी केली कीं, "प्रो. केळकरांनीं शाहू मंडळीच्या 'श्री' ह्या अद्याक्षराला जें उडविलें त्यांत त्यांचा फारच धूर्तपणा होता यांत संशय नाहीं. तुकारामरामदासांसारख्या श्रीला तुच्छ लेखणाऱ्या साधुसंतांच्या वेषात तद्रूपावस्थेच्या कृत्ताच शिक्षण जर पुढें या मंडळीला समाजाला देण्याची वेळ कदाचित् आली तर मंडळीच्या नांवावर टीका करण्यास टीकाकारांना जागा राहूं नये म्हणून प्रो. केळकरांनीं दूरदृष्टीनेंच त्या नावांतली 'श्री' जी गाळली त्याबद्दल त्यांना धन्यताच दिली पाहिजे." याप्रमाणें माझ्या समक्ष घड-

लेल्या या 'श्री' संबंधाचीं जी हकीकत आहे, तिचीं मूळ गोष्ट परंपरेनें बदलली जाऊन ती जी निराळ्याच स्वरूपांत प्रो. टिपणीस यांनीं 'नवयुग' मासिकांत छापिली आहे तिला दंतकथेवांचून दुसरा आधार नाहीं. असो.

शाहूमंडळी मुंबईहून पांचच्या जानेवारींत बडोद्यास गेली व तेथून पुन्हां मार्च महिन्यांत कंत्राटाचे प्रयोग ठरवून पुण्यास आली. याच सालीं माझें 'कपिध्वज' नाटक मंडळीनें बसवून त्याचा प्रयोग केला, व मे महिन्याच्या अखेरीस मंडळी बेळगांवास निघून गेली. बेळगांवचा मुक्काम आटपल्यावर मंडळी धारवाडास गेली. तेथें गेल्यावर गणपतरावांच्या मातोश्री गं. भा. आनंदीबाई जोशी या नवज्वरानें परलोकवासी



( आनंदीबाई जोशी. )

झाल्यावर गणपतरावांपाशीं त्यांचें आप्त अशी त्यांची एकुलती एक कन्या रंगु हीच काय ती राहिली. गणपतरावांचीं नवी पत्नि सौ. लक्ष्मीबाई हिची हकीकत मागें सांगितलीच आहे. ती त्या वेळीं बरोबरच होती. वृत्ति अर्धवटपणाची आणि त्यामुळें शहाणपणाचा अंगीं अभाव. या दुर्गुणांमुळें गणपतरावांनीं तिला तिच्या नांवावर गहाण घेतलेल्या केळशीच्या जमीनीकडे तिला नेण्यास आलेल्या तिच्या बापाबरोबर धाडून देण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें लक्ष्मीबाईच्या बापानें तिच्या सोबतीला म्हणून रंगूलाहि बरोबर नेलें. गणपतराव एणेंप्रमाणें मातेच्या पाशांतून मुक्त होऊन फक्त कन्येच्याच पाशांत आतां काय ते राहिले. याच सालीं दक्षिण महाराष्ट्रांतील एका विद्वानानें शेक्सपियरच्या 'टायमन ऑफ ऍथेन्स' च्या आधारें लिहिलेल्या 'विश्वामित्र' या नाटकाचा प्रयोग शाहूनीं केला.

## प्रवेश तिसरा.

मागें सांगितल्याप्रमाणें येथवर कैलासवासी गणपतरावांच्या नाटकमंडळीच्या उत्कर्षाची परमावधि होऊन भाग्याचा सूर्य मध्यान्हीस येऊन ठेपला. त्यांच्या अभिनयाचें अनुकरण करण्याची इच्छा जिकडे तिकडे दिसूं लागून, जो उठला तो हॅम्लेटसारखे हातवारे वेळीं अवेळीं प्रसंगाचा भेद मनांत न आणतां करूं लागला. ज्या मानानें कंपनीस पैसा मिळूं लागला त्या मानानें कंपनीचें अनुकरण करण्याची इच्छाहि निरनिराळ्या रूपांनीं दिसूं लागली. एका काळीं आपल्या रावणराज महाराजी अभिनयकौशल्यानें सर्वांस दिपवून टाकणारे कै० गोपाळराव दाते व शंकरराव लोखंडे हे सुद्धां मधून मधून रंगभूमीवर चमकून आपल्या मूळच्या वेषाला दूर सारून अलल डुरच्या सुमेरसिंगी अभिनयानें व भाषेनें लोकांकडून वाहवा मिळविण्याची इच्छा करूं लागले होते; परंतु गणपतराव यांच्या अभिनयामध्यें जो साहजिकपणा असे तो दुर्दैवानें कोणत्या हिनटाच्या वांट्यास न आल्यामुळें रंगभूमीवर आपल्या अष्टपैलू तेजानें प्रेक्षकांस दिपवून टाकील असा एकहि नट पुढें आला नाहीं. शाहूनगरवासी मंडळीचा १९०१ सालापासून तों १९०६ सालापर्यंतचा काळ भाग्यसूर्याच्या माध्यान्हीचा होता.

गणपतरावांबरोबर काम करणारे नट गणपतरावांप्रमाणेंच उमेदवार असल्यामुळें नाटकास फार चांगला रंग चढत असे. फाल्गुनराव नाटकांत गणपतराव आश्वीन शेटचें काम जसें उत्तम करीत असत त्याचप्रमाणें कृष्णाजीपंत गोखले हे फाल्गुनरावाची भूमिका

फारच मार्मिकरीतीनें वठवीत असत. रेवतीचें काम अर्थात् बाळाभाऊं-च्याकडे होतें, आणि तें काम ते इतक्या उत्कृष्ट रीतीनें करीत असत कीं, त्यांना बाकीचे कामांतील अभिनय जमेस धरला नाहीं तरी सुद्धां एवढ्याच एका कामावर नट म्हणून त्यांस लौकिक मिळवितां आला असता. रेवती ही एका वेश्येची कन्या असून घरंदाज कुलवधूच्या वृत्तीची अशी स्त्री नाटककारानें दाखविलेली आहे. वेश्यावृत्तीचा बाह्यवेष आणि त्याच्या अनुषंगानें अल्लड वयांतल्या तरुणीच्या अंगांत येणारें स्वभावसहज चांचल्य यांचा कुलवधूच्या मनोवृत्तीशीं व सभ्यपणाच्या वागणुकीशीं विरोध असतांना सुद्धां या परस्परविसदृश मनोवृत्तींचें आविष्करण बाळाभाऊ इतक्या बेमालूम रीतीनें करून दाखवित कीं, कोणीहि सहृदय प्रेक्षक थक्क झाल्याशिवाय राहात नसे. गणपतराव वझे यांची कृत्तिकेची भूमिका वाखाणण्यासारखी होत असे. हेच गृहस्थ सुपेकरबुवांचीं पिल्या वगैरेचीं सर्व कामें पुढें चांगलीं करूं लागले होते. सध्यां ते सांगलीच्या ‘ सरस्वती केमिकल वर्क्स’चे मालक आहेत. फाल्गुनराव नाटक इतक्या मार्मिक रीतीनें रंगभूमीवर वठविलें जात असे तरी पैशाच्या दृष्टीनें तें मंडळीस कधींहि फलदायी झालें नाहीं, त्याचें कारण त्या वेळच्या श्रोतृसमूहाची वृत्ति भारदस्त अभिनयाकडे जास्त होती हेंच होय; अलीकडे कांहीं तरी नवें नाटक असावें ह्या हेतूनें याच फाल्गुनरावाचें संगीत रूपांतर कै० देवल मास्तर यांजकडून गंधर्वमंडळीनें ‘संशयकल्लोल’ या नांवाचें करून घेतलें आणि या संशयकल्लोलांतील गंधर्वरूप कविहृदय न समजलेली रेवती ही शाहूंच्या फाल्गुनरावांतील रेवतीपेक्षां अभिनयाच्या गुणांत अत्यंत कमी दर्जाची असून सुद्धां सदर मंडळीनें कोणत्या साधनसामुग्रीवर मुंबईतील प्रेक्षकांस

पुष्कळ दिवस झुलवून ठेविलें आहे हें मार्मिक प्रेक्षकांस सांगण्याची जरूर आहे असें नाहीं. कै० गणपतराव यांच्या मुंबईमुक्कामच्या शेवटच्या १९२२ मधील खेपेच्या वेळीं त्यांच्या व्यवहारचतुरव्यवस्थापकांनीं फाल्गुनराव, अर्थात " संशयकल्लोल " या नाटकाचे तीन प्रयोग करविले. पहिल्या प्रयोगाला जी गर्दी झाली ती गर्दी दुसऱ्या दोन्हीं प्रयोगांना झाली नाहीं. सदर प्रयोगांत कै० गणपतराव यांनीं फाल्गुनरावाची भूमिका घेतली होती आणि तें काम त्यांनीं खरोखरच फार मार्मिकपणें केलें. फाल्गुनरावाच्या कामासंबंधानें ' गणपतराव ते गणपतराव आणि बोडस ते बोडस' असे जे उद्गार पुष्कळांनीं त्यावेळीं काढले त्या उद्गारांतील खोंच प्रेक्षकांच्या बदललेल्या अभिरुचीच्या मनोवृत्तीची उत्तम साक्ष पटविणारी खास होती.

वास्तविक पाहिलें तर गंधर्वनाटकमंडळीला संशयकल्लोलांतील खरें कविहृदय जर समजलें असतें, तर त्या मंडळीनें त्यांतील पात्रें नांवाप्रमाणें सजवून तदनुरूप भूमिकाहि वठविण्याचा प्रयत्न खास केला असता, आणि फाल्गुनशेटादि पात्रांना शेणवी किंवा परभूंच्या वेषांत कधींहि सजविलें नसतें; पण ज्या मंडळीनें आपल्या हातानें आपला समाजशिक्षणाचा अधिकार गमवून प्रेक्षकांचें केवळ द्रव्योपार्जनार्थ दास्य पत्करलें तिच्यावर अशी टीका करण्याचा प्रसंग सहजीं येतो तेथें इलाज नाहीं.

इ.स. १८९१ पासून तों १९०६।०७ चे कालपर्यंत गणपतरावांचा लौकिक वाढत्या प्रमाणांत होता; परंतु या वाढत्या लौकिकाबरोबर व कंपनीच्या वाढत्या पसाऱ्याबरोबर कंपनीची स्थिति कायमची चांगली राहावी म्हणून ज्या तऱ्हेची खबरदारी घेणें मालकांस आवश्यक

असतें त्या तऱ्हेची खबरदारी गणपतराव आणि त्यांचे साथीदार बाळाभाऊ यांपैकीं कोणासहि घेण्याची बुद्धी झाली नाहीं यामुळें व या दोन्ही नटांच्या शिथिल वागणुकीमुळें कंपनी दिवसें दिवस खालावत चालली. कंपनींतील बरींचशीं माणसें गणपतरावांशीं एकनिष्ठ असल्यामुळें त्यांनीं बरेच दिवस मंडळींत टिकाव धरला. परंतु बहुतेक नटांस मंडळीच्या मालकांच्या शिथिलपणामुळें कंटाळा येऊं लागला. पिल्याच्या कामावर प्रसिद्धीस आलेले सुपेकरबुवा, फाल्गुनराव मंबाजी वगैरे कामांत प्रसिद्धीस आलेले कृष्णाजीपंत गोखले, कमळा मर्जीना सईबाई पद्मावती वगैरे कामांवर रंगभूमि कितीएक दिवस झुलवीत ठेवणारे सदोबा दाते वगैरे मंडळी मंडळींतून हलके हलके पाय काढूं लागली, आणि कित्येक वेळां दुय्यम प्रतीच्या नटांवर गणपतरावांस आपलें नटाचें काम भागवून घेणें भाग पडूं लागलें. या गोष्टीचा परिणाम गणपतरावांच्या सांपात्तिक स्थितीवर होऊं लागला. हॅम्लेटमधील राजाच्या "व्यसनपंकांत रुतलेला व्यसनी दुःस्थितीमुळें जास्त जास्त खोल जाऊं लागतो" या वाक्याची प्रचीति गणपतराव यांस व्यवहारांत हरघडी येऊं लागली. साधारण प्रेक्षकवर्गाच्या आश्रयावरच केवळ आपल्या अभिनयकौशल्याच्या मदतीनें गणपतराव यांस लोकांवर छाप ठेवणें जरूर पडूं लागलें, व उत्तरोत्तर वरिष्ट दर्जाच्या वाङ्मयसेवकांपैकीं कोणीहि जवळ येईनासा झाल्यानें मध्यम प्रतीचे नाटकलेखक व मध्यम प्रतीचे स्टाल्स रिझर्व स्टाल्स यांना आश्रय देणारे रसिक परंतु गरीब प्रेक्षक यांखेरीज गणपतरावांचे चहाते फार विरळा दृष्टीस पडूं लागले. यामुळें आणि याच सुमारास दुय्यम दर्जाच्या नाटकमंडळ्यांनीं आपल्या धंद्यामध्यें द्रव्यार्जनाच्या ज्या एका सोप्या युक्तीचा अवलंब केला, त्या

युक्तीच्या चक्रव्यूहांत कै० गणपतराव यांसहि सांपडणें अपरिहार्य झाल्यामुळें मंडळीच्या सांपत्तिक स्थितीस ओहटी लागली. वरील युक्ति म्हटली म्हणजे नाटकमंडळ्यांनीं आपल्या धंद्यांत मक्तेदार मंडळीस भागीदार केलें ही होय. ज्या मानानें मंडळी मक्तेदारांच्या हातांत जाईल त्या मानानें मक्तेदार ज्या दर्जाच्या माणसांत तिकिटें खपवीत असत त्या दर्जाच्या माणसांसच केवळ पसंत पडतील अशा तऱ्हेचे नवे नवे प्रयोग बसविणें भाग पडूं लागलें व कदाचित अशा नव्या नाटकांचे प्रयोग करणें शक्य नसल्यास अशा तऱ्हेच्या प्रेक्षकांस खूष करण्यासारखे प्रकार कितीहि कमदर्जाचे असले तरी ते आपल्या नाटकांत घुसडून देणें भाग पडूं लागलें. गणपतरावांच्या कर्मगतीमुळें शाहूनगरवासी मंडळी या चक्रांत सांपडली. किर्लोस्कर कंपनीच्या एका विवक्षित आयुष्यकालांत त्या मंडळीसहि मक्तेदारांच्या ग्रहणांतून सुटतां आलें नाहीं. किर्लोस्करमंडळी ज्याप्रमाणें या चक्रांतून पुढें लौकरच बाहेर पडली आणि आपले तेजानें जशी रंगभूमी पुन्हां उज्वल करूं लागली, त्याचप्रमाणें शाहूमंडळीनें सुद्धां योग्य संधि येतांच या परिस्थितींतून आपली सुटका करून घेतली आणि गणपतरावांच्या शेवटच्या शेवटच्या दिवसांत पुन्हां शाहूनगरवासी मंडळी बदललेल्या परिस्थितींत सुद्धां लोकांच्या आदरास पात्र झाली. हें जरी खरें आहे तरी मंडळीच्या इतिहासांतील उपरोक्त काळांत गणपतरावांची मंडळी फार अडचणींत सांपडली होती हें निर्विवाद आहे. गणपतराव यांची दानत, माणुसकी, इभ्रत, सचोटी, चिकाटी, सत्यनिष्ठा व कार्यनिष्ठा हीं कसोटीस लागण्याची हीच वेळ होती. मक्तेदारांच्या मर्जीचा कल संभाळून आपली इभ्रत जाऊं न देतां रंगभूमीचा दर्जा कायम ठेवून कित्येक प्रसंगीं एका हॅम्लेट नाटकावरच

गणपतरावांची रंगभूमी प्रेक्षकांस वेळोवेळीं तल्लीन करून सोडीत असे. बरोबरीच्या नटांनीं सोडलें, नांवाजलेल्या नाटककारांनीं सोडलें, प्रतिष्ठित प्रेक्षकवर्गानें सोडलें, इतकेंच नव्हे तर मंडळीच्या आद्योत्कर्षाला कारणीभूत झालेले कांहीं थोर कालवश झाल्यामुळें व जिवंत असलेल्यांस शाहूंनीं सोडिल्यामुळें कंपनीचा आधार सर्वस्वी तुटून गेला. अशा स्थितींत गणपतराव यांनीं आपल्या अप्रतिम अभिनयकौशल्यावरच भिस्त ठेवून बाळाभाऊंच्या मदतीनें जी मंडळी जिवंत राखिली ती केवळ आपल्या दानतीच्या जोरावरच. श्रीतुकारामरामदासादि नाटकांनीं शाहूनगरवासी मंडळीस या पडत्या काळांत हात दिला. सदर्हु नाटकांची व गणपतरावांच्या अभिनयकौशल्याची त्रोटक हकीकत मागें आलीच आहे.

नाट्यसृष्टींत नवीन खळबळ उत्पन्न करून रंगभूमीला एक तऱ्हेचें नवीन वळण लावण्याची घटना याच सुमारास घडून येत होती. सदर घटनेचाहि परिणाम एकंदर नाटकमंडळ्यांच्या स्थितीवर झाला, व त्याबरोबरच तो शाहूनगरवासी मंडळीचें विशिष्टत्व काय आहे हें जनतेच्या मनावर ठसविण्यास उपयोगी पडल्याशिवाय राहिला नाहीं. शाहूनगरवासी मंडळीचें यश पाहून संगीतनाटकाप्रमाणेंच गद्यनाटकानेंसुद्धां प्रेक्षकांचें मन आकर्षित करितां येतें अशी कल्पना कित्येक शिकाऊ नटांच्या मनांत येऊन त्यांच्या मनोवृत्तींचें दृश्य फल म्हणून महाराष्ट्रनाटकमंडळी या नांवाची संस्था याच सुमारास हलके हलके पुढें येऊं लागली. किर्लोस्कर कंपनींतील कै० भाऊराव, मोरोबा, नाटेकर, बालगंधर्व व गद्यमंडळींतील नटरत्नें कै० गणपतराव जोशी व बाळाभाऊ यांच्यासारखें तेज आपणांस नाहीं ही जाणीव असल्यामुळें

म्हणा अथवा अन्य कांहीं कारणांमुळें म्हणा परंतु सदर मंडळीनें नव्या तऱ्हेच्या नाटकांचा उपक्रम सुरू केला. ही मंडळी सुरवातीला कै० आपटे ह्यांचें 'जयध्वज' नाटक व दुसरीं किरकोळ प्रहसनें यांवरच आपला गुजारा करीत असे. विद्यमान लेखकांपैकीं रा. खाडिलकर यांनीं या मंडळीस हातांत धरण्याचें मनात आणिलें आणि त्यांच्या लेखणींतून उतरलेल्या 'कीचकवध' या नाटकानें महाराष्ट्रमंडळीस पुढें आणिलें. कीचकवध नाटकाची रचना एक तऱ्हेनें खोंचदार होती. पुराणकालांतील गोष्टीचा चालू राजनीति व सामाजिक स्थिति यांशीं कशा तरी रीतीनें संगीत विद्याहरणाप्रमाणेंच ओढून ताणून मेळ घालून त्या वेळच्या राजकीय स्थितीवर रूपक म्हणून हें एक नाटक लिहिलें गेलें होतें. लोकांस अशा प्रकारच्या नवीनपणामुळें कांहीं कांहीं वेळीं मजा वाटते हें खरें; परंतु ह्या नाटकामुळें महाराष्ट्रमंडळीच्या 'नोचार्थो विफलोऽपि दूषणपदं दुष्यस्तु कामो लघुः' ह्या ब्रीदवाक्यास हरताळ फांसला गेला, हें रसिकांस सांगण्याची जरूर नाहीं. रंगभूमीच्या अवनतीस याच नाटकानें प्रारंभ केला. खाडीलकर यांच्या सारख्या विद्वानानें आपला दर्जा विसरून जाऊन आपल्या लेखणीचा दुरुपयोग करून तात्पुरत्या गुणावर सवंग लोकप्रियता संपादन करण्याच्या भरीस पडून नाटककारांच्या पडद्याआड लपावें आणि नाट्यसृष्टीस कमदर्जाचा थिल्लरपणा आणून तिसऱ्या वर्गाच्या प्रेक्षकांच्या छिचोर वृत्तीस उत्तेजन देऊन पैसे मिळविण्याची हांव धरावी याच्यासारखें वाङ्मयसृष्टींतील विधींचें विचित्रविचेष्टित दुसरें कोणतेंच नसेल. हा प्रकार अनिष्ट तर खराच परंतु त्यामुळें शाहूमंडळीसारख्या साध्या सिध्या मंडळींस आपले दिवस काढणें उत्तरोत्तर कठीण होत गेलें.

नाटकमंडळ्यांच्या जीवनास अडथळा आणणारी तिसरी एक गोष्ट याच सुमारास उद्भूत झाली होती. सदर काळ एकंदरीनें महाराष्ट्रास फार संकटपरंपरेचा गेला आणि त्याचा परिणाम नाटकमंडळ्यांच्या आयुष्यक्रमावरहि झाला. ती वेळ प्रत्येक संस्थेंत दुही माजण्याची आली होती. फर्ग्यूसन कॉलेजसारख्या शिक्षणसंस्था आणि राष्ट्रीय सामाजिक परिषदांसारख्या विद्वान लोकांनीं हातांत धरलेल्या लोकोपयोगि संस्था यांपासून तों तहत लोकांचें मनोरंजन करणाऱ्या नाटकमंडळ्यांसारख्या गरीब संस्था यांपर्यंत दुहीचें साम्राज्य आपली छाया पाडूं लागलें होतें. त्यामुळें किर्लोस्करांतून गंधर्व उत्पन्न झाले, बळवंत उत्पन्न झाले, यशवंत उत्पन्न झाले, फार काय पण महात्माहि उत्पन्न झाले. त्याचप्रमाणें महाराष्ट्राचा विस्तार होऊन भारतनाटकमंडळी उत्पन्न झाली. या गोष्टी नाट्यसृष्टीशीं परिचय असणाऱ्या गृहस्थांस माहीत आहेतच. या दुहीचा परिणाम शाहूनगरवासी मंडळीसहि जाणवला असता आणि थोड्याफार अंशानें तो जरी जाणवलाहि तरी गणपतरावांच्या मंडळींतून निघून गेलेला एकहि नट गणपतरावांच्या इतका तेजस्वी नसल्यामुळें व गणपतरावांच्या हाताखालीं तयार झालेल्या मंडळींची शिस्तहि गणपतरावांच्या दानतीस अनुरूप असल्यामुळें आपणांस गणपतरावांचे चेले म्हणवणारे परंतु शाहू मंडळीच्याच वळणावर निघालेल्या मूळच्या सामाजिक नाटकमंडळींतील एक नट व पुढें शाहूंत शिक्षण मिळविण्यासाठीं दोन वर्षें पगार घेऊन राहिलेले नानबा गोखले ह्यांखेरीज कोणाहि नटानें स्वतंत्र मंडळी स्थापन केली नाहीं. वरच्या दरजाचे नट कंपनींतून निघून गेल्यानंतर आपापला स्वतंत्र धंदा करूं लागले व खालच्या दर्जाचे नट दुसऱ्या मंडळ्यांतून नौक-

रीस राहिले. अशा नौकरींत राहिलेल्या नटांचें तेज गणपतरावांच्या पुण्याईमुळें ते ज्या ठिकाणीं गेले त्या ठिकाणीं चमकलें खरें, परंतु त्यांपैकीं एकाहि नटास स्वतंत्र मंडळी काढण्याची हिम्मत झाली नाहीं व त्यामुळें शाहूनगरवासी मंडळीचा एकसूत्रीपणा जो कायम राहिला, तो अजूनपर्यंत आहे. हा एकसूत्रीपणा केवळ गणपतराव ह्यांच्या अभिनयकौशल्यामुळें आणि दानतीमुळें कायम राहिला हें उघड आहे.

याशिवायहि आणखी जी एक गोष्ट गणपतरावांच्या आंगचा चिकाटीचा गुण कसोटीस लावण्यासारखी व नाटकाच्या परंपरेंत एका दिशेनें क्रांति करण्यासारखी घडून येत होती तिचाहि परिणाम शाहूमंडळीवर झाला व या परिणामामुळें उत्पन्न झालेल्या अडचणींतून शाहू मंडळीचा जो निभाव लागला त्याचेंहि कारण केवळ गणपतरावांचें अभिनयकौशल्य हेंच होय. ज्या महाराष्ट्रनाटकमंडळीनें एक तऱ्हेची नवीन छटा नाट्यदेवतेच्या रंगावलीस दिली त्याचप्रमाणें दुसऱ्या एका रंगाची छटा रंगभूमीच्या चित्रपटावर उदयास येऊं लागली होती. ही छटा वरच्या दर्जाची होती आणि ही छटा देणारें कलम--रा० खाडीलकरांसारख्याच दुसऱ्या एका वाङ्मयसृष्टींत मुरलेल्या परंतु आपल्या लेखणीचा दर्जा कामय ठेवूं इच्छिणाऱ्या कलमबहादरानें हातांत धरलें होतें. हे कलमबहादर अद्यापी आपल्या लेखणीच्या तेजानें रसिकांस झुलवीत आहेत, नाट्यदेवतेस सजवीत आहेत व राजकारणासारख्या खळबळ उत्पन्न करणाऱ्या विषयांस आपल्या काव्याच्या जोरावर रमणीयता आणून प्रतिपक्ष्यांस सुद्धां आपलें कौतुक करावयास लावीत आहेत. महाराष्ट्राच्या लेखणीची इभ्रत कायम ठेवणाऱ्या या सहृदय-हृदयरंजक वाङ्मयसेवकानें नवरदेवाची जोडगोळी उत्पन्न करण्यांत दाखविलेलें कौशल्य

रसिकतेच्या पहिल्या पिढींत जरी रंगभूमीच्या पचनीं न पडतां ती जोडगोळी अक्षयींची दबली गेली, तरी या सुप्रसिद्ध सरस्वतीभक्ताचा दुसरी एक नाटकमंडळी हाताशीं धरून, रंगदेवतेस लागूं पहाणारें अनिष्ट वळण दुरुस्त करूं पाहण्याचा जो यत्न केला तो कालगतीमुळें व्हावा तितका जरी यशस्वी झाला नसला तरी प्रशंसनीय झाला यांत संशय नाहीं. सवाई माधवरावांच्या मृत्यूचें नाटक लिहितांना 'हॅम्लेट' आणि 'अथेल्लो' या दोन्हीं प्रकृतींचें ( Characters ) संमिश्रण ज्यांत झालें आहे अशा कल्पित पात्रांची जोड श्रीमंत सवाई माधवरावांसारख्या इतिहासप्रसिद्ध व अनुकंपनीय अशा महाराष्ट्राला अभिमानास्पद असलेल्या राजपुरुषाच्या स्वभावास देऊन आपण नाट्यसृष्टींतील सवाई ब्रह्मदेव आहोंत अशी घमेंड मारणाऱ्या लेखकबुवानें सदर नाटक लिहितांना बिचाऱ्या नानाफडणविसांवर नकळत अथवा कळून जे दुर्गंधीचे शिंतोडे उडविले होते त्याबद्दल अनुतप्त होऊन सदर्हु महामुत्सद्याच्या सच्चारित्र्याचें आविष्करण यथाशक्ति करावें या हेतूनें प्रेरित होऊनच कीं काय सदर्हु नाट्यलेखकानें तोतयाच्या बंडाच्या वेळचा इतिहास नाटकरूपानें महाराष्ट्रास अर्पण केला. सदर्हु नाट्यलेखक म्हणजे हल्लीं सर्व महाराष्ट्राच्या पूर्ण परिचयाचे झालेले श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर हे होत हें वाचकांस सांगण्याची जरूर नाहीं. कै० प्रो० केळकर हयात असतां हें सवाई माधवरावांचें नाटक खाडीलकरांनीं शाहूंत बसविण्यासाठीं आणिलें होतें; परंतु तो खाडीलकरांचा ओंगळ हॅम्लेट म्हणून परत केलें होतें. असो. सदर केळकरांचें तोतयाचें बंड हें नाटक ज्याप्रमाणें नाट्यशास्त्राच्या नियमाला अनुसरून लिहिलें असल्या कारणानें हृदयंगम झालें आहे त्याचप्रमाणें त्यांतील भाषेचीं व्याकरण-

शुद्धता व प्रौढता आधुनिक नाट्यसृष्टींत तरी केवळ अलौकिक आहे यांत संशय नाहीं. सदरहु लेखकाच्या भारदस्त लेखणीची झांक ज्याप्रमाणें त्याच्या सर्व नाटकांत दृष्टीस पडते त्याचप्रमाणें त्याच्या सरळ मनाची साक्ष त्यानें लिहिलेल्या चंद्रगुप्तनाटकाच्या प्रस्तावनेंत प्रत्ययास येते. 'बायकांचें बंड' लिहितांना टेनिसनच्या प्रिन्सेस काव्याच्या कथानकाचा आधार चित्रांतील पाठीमागच्या देखाव्या (ब्याक ग्राउन्ड) प्रमाणें आधारभूत घेतला आहे, ही गोष्ट लपवून ठेवण्याचा खाडीलकरांनीं प्रयत्न केला आहे असा एखाद्यास भास होईल, परंतु चंद्रगुप्तनाटकाच्या रचनेच्या वेळीं वुडस्टॉक कादंबरींतील पात्रांचा आधार सदर नाटकरचनेस जोड देणारा म्हणून घेतला आहे, ही गोष्ट रा. नरसोपंतांनीं अगदीं प्रांजलपणेंच कबूल केली आहे. अशा सरळ हृदयाच्या मार्मिक लेखकानें लिहिलेल्या नाटकाच्या कौशल्याचें सारसर्वस्व कृष्णार्जुनयुद्ध या नाटकांत दिसून येतें. 'आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति' हें वेदांताचें अथवा व्यवहाराचें तत्व सदर नाटकांत फार हृदयंगम रीतीनें विशद करून दाखविलें आहे. केळकर यांचीं नाटकें व त्या वेळेपर्यंत शाहूमंडळी करीत असलेलीं नाटकें या दोन प्रकारच्या नाटकांत एक विशेष फरक आहे तो असा कीं, शाहूमंडळी पूर्वी शेक्सपीयरचीं जी नाटकें प्रायः करीत असे त्यांत एक अथवा दोन पात्रांवर विशेष भर असून इतर पात्रें सदर मुख्य पात्रांच्या सर्व भावांचा परिपोष करण्यासाठीं योजलेलीं असत. या एक दोन मुख्य पात्रांच्या भूमिका कै. गणपतराव व बाळाभाऊ यांनीं करण्याचा प्रघात ठेवल्यामुळें त्या उत्तम रंगत असत, व इतर मंडळीहि त्यावेळीं वाकब असल्यामुळें हॅम्लेट, त्राटिका, भीमदेव, मॅकबेथ, तुकाराम, रामदास

अथेल्लो वगैरे नाटकें लोकप्रिय झालीं. नवीन मनूंत कै० गणपतराव यांच्या इतका वाकबगार नट एकहि नसल्यामुळें त्यांच्या नाटकांचा एकाधिकार म्हणजे मोनापोली नसतांहि त्यांचीं नाटकें कोणीच करण्यास धजत नसत. यासाठीं आपले मंडळीस अनुकूल व लायक खेळ करावे असा विचार करून महाराष्ट्र व इतर मंडळ्या त्या तऱ्हेची योजना करूं लागल्या. विविधज्ञानविस्तारांत १८९३ चे सुमारास खंडशः छापत असलेलीं 'मोहना' व 'सवाई माधवराव' हीं नाटकें पुढें आलीं, व त्याच थाटामाटांचीं इतर नाटकें रचण्याची प्रवृत्ति दिसून येऊं लागली. खाडीलकर यांच्या हलक्या दर्जाच्या कोट्या व हास्यरसोत्पादक प्रवेश पाहून रंगभूमीस लागत चाललेलें भ्रष्ट वळण डोळे मिटून गिरवणें मंडळ्यांना भाग झालें, व त्यामुळें लोकाभिरुचीसहि भ्रष्ट वळण लागू लागलें. या आघातास प्रत्याघात म्हणून चित्ताकर्षक मंडळी हातीं धरून तोतयाचें बंड, चंद्रगुप्त, अमात्य माधव, कृष्णार्जुनयुद्ध हीं नाटकें पुढें आलीं. चित्ताकर्षक मंडळीहि स्थूल मानानें पूर्वीं सांगितल्याप्रमाणें शाहू-मंडळींतील सुपेकर बोवांनीं हातीं धरलेल्या सामाजिक नाटकमंडळीचेंच रूपांतर होती. हीं माणसें स्वभावतः गणपतरावांच्याच वळणाचीं असल्यामुळें नाटकें बरीं करीत असत. परंतु रंगभूमीस महाराष्ट्रनाटक-मंडळीनें खाडिलकरांच्या मदतीनें लावलेल्या भ्रष्ट वळणामुळें सामान्यतः त्या वेळच्याच काय अथवा इतर वेळच्या काय मनुष्यस्वभावाचा कल अश्लीलपणाकडे जास्त असल्यामुळें चित्ताकर्षक मंडळीनें रसिकांचीं मनें आकर्षण करून घेतलीं खरीं पण वित्त आकर्षण करण्याची त्यांची छाती झाली नाहीं. कारण, वित्त देणाऱ्या स्टॉलस, रि० स्टॉलस, पिट व ग्यालरी या भागांतील माणसांस खाडीलकरी छचोरी वळणाचा

मोह सुटणें अशक्य झालें होतें व अजूनहि तीच स्थिति कायम आहे. शिवाय या काळच्या नाटकांत पुष्कळ मंडळीस सारखीं कामें करणें अवश्य असल्यामुळें प्रत्येक नट गणपतरावांच्या योग्यतेचा नसला तरी साधारण संचांत बऱ्यापैकीं असल्यामुळें प्रयोगास रंग भरत असे. विनायकराव कानिटकर, मामा भट, रामभाऊ गोखले, भिडे, भागवत, टिपणीसबंधु, पोतनीस, औंधकर, दाते, आपा टिपणीस, तात्या आपटे, बाळू जोशी, पागनीस वगैरे माणसें साधारण बऱ्यांपैकीं अभिनय करणारीं खरीं व त्यांच्या नाट्यगुणांमुळेंच त्यांच्या मंडळ्या पुढें आल्या हेंहि खरें, परंतु त्यांच्यामध्यें कै० गणपतरावांच्या तोडीचा एकहि नट नसल्यामुळें गणपतरावांचीं नाटकें करण्यास कोणासहि धैर्य झालें नाहीं. कै० गणपतरावांच्या नाटकांस ' मोनापोली ' नाहीं याचेंहि कारण हेंच आहे. उलटपक्षीं गणपतराव यांच्या मंडळींत यांपैकींच कांहीं नट असूनहि त्यांचें तेज इतरत्र जितकें पडल तितकें शाहू मंडळींत असतांना पडलें नाहीं. त्याचप्रमाणें उपरोक्त नटांच्या तोडीचे नट शाहू मंडळींत असूनहि गणपतराव व बाळाभाऊ यांचे पुढें ते फिके पडत असत. शाहूमंडळीच्या पूर्वींच्या म्हणजे १८९८ सालापूर्वींच्या अमदानींतील नट कमी झाल्यानें मंडळी केवळ गणपतराव व बाळाभाऊ यांच्याच जोरावर चालली होती.

उपरोक्त कारणांमुळें शाहू मंडळीस १९०६ सालानंतर नवें नाटक पुढें आणणें अशक्य झालें, व जुन्या नाटकांवरच तिनं आपला गाडा चालू ठेविला. १९०९ सालचे सुमारास मंडळी मुंबईमुक्कामीं असतां कांहीं अंशीं गणपतरावांच्या व बाळाभाऊंच्या अव्यवस्थितपणामुळें व कांहीं अंशीं महाराष्ट्र व चित्ताकर्षक यांनीं लोकाभिरुचीस

लावलेल्या नवीनपणामुळें, व त्याचप्रमाणें गणु गद्रे मृत्युमुखीं पडल्यावर इतर नट सोडून गेल्यामुळें मंडळीस फार कष्टाचे दिवस आले. सावकारांचा त्रास होऊं लागला, कित्येक सावकार कंपनीबरोबर फिरू लागले व गणपतरावहि फार जेरीस आले. या वेळीं नवा उपक्रम करून मंडळीची घडी पूर्ववत् बसवावी म्हणून मंडळीच्या जुन्या चहात्यांपैकीं मुंबईचे रा. जोगळेकर वकील व पांडुरंग गोपाळ परांजपे यांनीं फार प्रयत्न केले; परंतु दैवयोगानें त्यांत त्यांना यश न येतां, जवळ जवळ एक वर्षाच्या मुक्कामानंतर मंडळीस सोलापुर मुक्कामीं जातां आलें. पुढें १९१० च्या सुमारास रा. बाळाभाऊ हवा पालटण्याकरितां कोंकणांत आपल्या गांवीं गेले असतां त्यांस तेथें एकाएकीं हृदयाच्या विकारानें देवाज्ञा झाली व महाराष्ट्ररंगभूमीवरील अत्यंत तेजस्वी असा एक जागा भरून न येणारा दैदीप्यमान तेजस्वी तारा अक्षयींचा अस्तंगत झाला.

---

## प्रवेश चौथा

सन १९०६ सालच्या मे महिन्यांत शाहूमंडळी बेळगांवीं गेल्यावर तेथें भारतनाट्यसमाजाच्या चिटणिसांकडून मंडळीकडे एक त्या समाजासंबंधाचें पत्र आलें होतें व त्याचें जें उत्तर गणपतराव आणि बाळाभाऊ यांच्या सह्यांचें त्या संस्थेच्या चालकांकडे गेलें होतें, त्यावरून त्या मुज्ञ नटद्वयांचीं त्या संस्थेसंबंधाचीं मतें काय होतीं तें व्यक्त होण्यास तें पत्रच वास्तविकपणें प्रसिद्ध व्हायला पाहिजे होतें. परंतु गणपतरावांच्या भाकिताप्रमाणेंच त्या संस्थेची एकंदर स्थिति स्वार्थपरायणतेची अशी जी आज दिसते आहे, आणि ज्या संस्थेचा

कारभार सध्यांच्या अकर्तृत्ववान चिटणिसांच्या ताब्यांत गेला आहे, त्यांच्याकडून तादृशहि मदत होण्याचीं चिन्हें, त्यांच्या अव्यवस्थित कारभारामुळें न दिसल्यानें, तें पत्र उपलब्ध होणें सध्यां तरी अशक्य झालें आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. 'आधीं पोटोबा आणि मग विठोबा' अशी एखादी संस्थाचालक मंडळी जेथें जमते, तेथें अविश्वासाच्या घाणीनें वातावरण कुचकें बनतें व मग त्यांतील सद्‌गृहस्थांनां हलकें हलकें आपलीं अंगें त्यांतून बाहेर काढून घेणें हेंच जर भूषणावह वाटलें, तर त्यांत नवल तें कोणचें! या संस्थेसंबंधानें शाहूमंडळींतील वरील दोघां नटांचें मत पहिल्यापासूनच प्रतिकूळ होतें. तरी पण १९०९ सालीं मंडळीचा पुण्यास मुक्काम असतां, रा. दादा फाटक यांच्या अत्याग्रहानें गणपतराव, मी आणि बाळाभाऊ असे तिघे त्या संस्थेच्या पुण्याच्या सोशल क्लबनें केलेल्या वार्षिक सम्मेलनाला हजर राहिलों होतों. त्या वेळीं कै० डॉ० गर्दे हे अध्यक्ष होते. यानंतर आमच्या पूर्वीच्या वहिवाटीप्रमाणेंच आम्ही तिघेंजण केव्हांहि पुन्हां तसल्या समारंभास हजर राहिलो नाहीं आणि कोणच्याहि तऱ्हेचा तशा समारंभास हातभारहि लाविला नाहीं. या संस्थेचे संस्थापक जे रा. अ. वा. बरवे, त्यांच्याशीं माझें जें या बाबतींत एकदां बोलणें झालें होतें, त्याप्रमाणें जर बरव्यांनीं घडवून आणिलें असतें तर शाहूमंडळीचा त्या संस्थेशीं पुढें चिरकाल संबंध राहिला असता असें म्हणायला हरकत नाहीं; परंतु बरव्यांच्या नेहमींच्या दुर्दैवानें नेहमींप्रमाणेंच त्यांना माझ्या सूचनेच्याहि कामीं दगा दिल्यामुळें गणपतरावांसारख्या अद्वितीय नटाकडून मिळणाऱ्या लाभाला ते पारखे झाले. शंकरराव मुजूमदारांना ज्या सालीं बरव्यांनीं अध्यक्षपदावर निवडिलें त्या सालीं गणपतरावांना अध्यक्षपदावर निवडण्याच्या माझ्या सूचने-

कडे बरव्यांनीं जो काणाडोळा केला, त्यावरून संस्थेचें तारूं कोणच्या दिशेनें झुकत चाललें होतें याची कल्पना करतां येते. गणपतराव चांगले वक्ते होते. त्यांच्या भाषणांत समयसूचकतेबरोबर बहुश्रुतपणाचा ओघ नेहमीं वाहात असे. ते अनुभवानें चांगलेच ज्ञानवृद्ध झाले असल्या कारणानें भारतनाट्यसमाजाला जेवढे म्हणून विद्वान् व नाटकी अध्यक्ष लाधले त्या सर्वांपेक्षां अधिक विस्तृतपणानें गणपतरावांनीं आपल्या तीन तपांच्या नाट्यविषयक अनुभवाचें अधिकारी वाणीनें नाट्यसृष्टीचें चित्र जनतेपुढें मांडून, कारणपरंपरेनें ज्या गोष्टी आपल्या हातून घडणें अशक्य झालें होतें, त्या घडवून आणण्याच्या अनुभविक सूचना त्यांनीं जनतेपुढें खात्रीनें मांडिल्या असत्या; परंतु एवढेंहि भाग्य त्या नाट्यसमाजाच्या दुर्दैवांत लिहिलें गेलें नव्हतें, आणि त्याचमुळें अहंमन्यतेच्या पोकळ अभिमानी व कंगाल अशा खादाड माकडाला त्या रत्नाची पारख झाली नाहीं हेंहि योग्यच झालें !

या पुस्तकांत गणपतराव आणि बाळाभाऊ यांचे जे नाटकी सोंगांचे व साधे फोटो दिले आहेत ते सर्व ज्या सालीं एकाच दिवशीं रा. रामचंद्र नारायण जोशी ड्रॉइंग मास्तर यांनीं आमचे घरीं काढिले, तें साल हेंच पुण्याच्या सोशल क्लबनें भारतनाट्यसमाजाचें संम्मेलन केलेलें १९०९ हें होय. नाट्यविषयक हावभावांचे फोटो देण्याच्या कामीं मुख्यत्वें गणपतरावच जे कुचराई करीत असत त्यांतलें वर्म एवढेंच होतें कीं, त्यांना जरी जगाकडून ' ॲक्टर ' या पदवीचा मान मिळत होता, तरी त्या सालापर्यंत त्यांचा त्या बाबतींतला आत्मविश्वास दृढ झालेला नव्हता. श्री. बाळासाहेब मिरजकरांनीं जरी त्यांचे फोटो घेतले होते व त्यांपैकीं जरी कांहीं प्रसिद्धहि झालेले आहेत, तरी त्यांत

आणि प्रस्तुतच्या पुस्तकांत जे दिले आहेत त्यात महदंतर आहे, हें कोणीहि सांगूं शकेल. ते त्यांचे दोन्ही प्रकारचे फोटो कसेहि असले तरी त्यांत भ्रष्ट मनोवृत्ती करून सोडणारा व उत्तान शृंगारसागरांत पोहण्याची वासना उत्पन्न करणारा अनीतिमत्तेचा लवांशहि नाहीं. बालगंधर्वांनीं जसे आपले विषयलंपट बनविणारे प्रणयी व विश्वयोषितांनाहि खालीं माना घालायला लावणारे फोटो प्रसिद्ध करण्यांत स्वतःच्या मनाला यत्किंचितहि लाज वाटूं दिली नाहीं, आणि तशा फोटोंनीं तरुण बांड पोरें बिघडतील किंवा कसें याची लवमात्रहि पर्वा केली नाहीं, तद्वत् बाळाभाऊ आणि सुरूप भाऊराव यांनाहि आपल्या ऐन उमेदींत करतां आलें नसतें असें नाहीं; पण बालगंधर्वांप्रमाणें ते आपला दर्जा आमरण विसरले नव्हते. मृच्छकटिकांतील वसंतसेनेची मनोवृत्ति व रहाणी उच्च प्रतीची कवीनें दाखविली असतांहि तिचें स्वरूप शृंगारिक मनोवृत्तीचें आणि पारदर्शक वर्तनाचें हिडिसपणें दाखविण्यानें तज्ज्ञांकडून जसा बालगंधर्वांचा उपहास होत असतो तसा आपल्या वेषधारणेचा करून घेण्याचा आणि चारगट प्रेक्षकांच्या मनोवृत्ति अधिक छिनाल बनविण्याचा त्या दोघांनीं राजरोसपणें कधींच प्रयत्न केला नाहीं. आपण समाजशिक्षक असल्यानें, आपल्या अवनत राष्ट्राला आपण कोणचें शिक्षण देणें अवश्य आहे याची जाणीव हृदयांत ठेवूनच ते आपलें सोंग जगापुढें मांडीत असत. बाळाभाऊंचा नांवलौकिक मोठा झाला असतांहि गणपतरावांप्रमाणेंच त्यांचा त्यांनाच आत्मविश्वास वाटत नव्हता, आणि अद्यापि आपल्याला आपल्या अंगीकृत कार्यांत फार पुढची मजल मारायची आहे असेंच त्यांना गणपतरावांप्रमाणेंच वाटत होतें, म्हणून तेहि आपले फोटो देण्यास केव्हांहि राजी होत नसत. ज्या टोपपदरांना महा-

रणींहि नांवें ठेवतात तीच चाल बालगंधर्वांनीं प्रचारांत आणिल्यानें त्यांच्या देशभगिनींचे वेष लांब पदराच्या इस्त्रायली स्त्रियांनाहि शरम उत्पन्न करणारे असे सध्यां आमच्या समाजांत रूढ होऊं लागून, जो समाज कांहीं कालापूर्वी कानाशीं हितगुज करणाऱ्या वळणाच्या पदरांवर भयंकर टीका करण्यास मार्गे पुढें पाहात नव्हता, त्याच्याच सध्यांच्या पिढीचे गंधर्वी टोपबाज पदरासारखेच मानसिक कान लांबले गेले असल्यानें समाजाचें वळण जिलबी घांटाच्या लिबलिबित छिनाल वेणीच्या धर्तीप्रमाणें कसें वाह्यात होऊं लागलें आहे हें सुज्ञांस सांगणें नलगे. अशा ह्या टोपपदरी छिनाल नखरी फॅशननें सभ्य आणि शिष्टाचाराच्या हावभावांना सध्यां रसातळाला नेऊन पोंचविण्याचाच जणूं काय विडा उचलला असल्याचें दिसून येत असल्यामुळें, नवरसांतलें कोणच्याहि रसाच्या हावभावाचें कां प्रदर्शन असेना, तें आपलें पदराच्या टोंकांच्या दोन्हीकडच्या कुरळ्या दोन्ही हातांच्या बोटांनीं चुरगळीत राहण्यानें यथासांग होतें असेंच अलीकडच्या बहुतेक अज्ञ व अनुकरणलोलुप स्त्रीवेषधारी मूर्ख नटांना वाटूं लागल्यानेंच, आधींच बहकत चाललेल्या आमच्या समाजाचें तारूं भलत्याच प्रकारच्या वातलहरींनीं भयंकर तुफानी वाऱ्यांत सांपडण्याची भीति वाटूं लागली आहे. या एकंदर प्रकारावरून आम्हांला हॅम्लेट नाटकाच्या तिसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांतल्या हॅम्लेटच्या एका भाषणाची आठवण होते, आणि तें येथें बरेंचसें लागूहि पडतें. तें भाषण येणेंप्रमाणें:—

**हॅम्लेट**—( ऑफिलियेस ) कायग, तुझा बाप ( पोलोनियस ) यावेळीं कुठें आहे ?

**ऑफिलिया**—ते घरीं आहेत !

**हॅम्लेट**—त्याला म्हणावं, आपला शहाणपणा आपल्या घरीं चालव ! आमच्या वाड्यांत नको !

या लाक्षणिक संवादाचा बोध घेऊन गणपतरावांना गुरूप्रमाणें पूज्य मानणारे गुणी व उत्तम नटराज बालगंधर्व पुन्हां पूर्ववत् आपलें किर्लो-स्करी शिष्टाचारी वळण गिरवूं लागून आपल्या समाजांत पूर्ववत् क्रांती करून धन्यवाद मिळवतील अशी आम्हांला आशा आहे.

गणपतराव आणि बाळाभाऊ यांना, आपण नांवलौकिक मिळवीत असलेले नट असूनहि, आपल्या कर्तबगारींच्या आपण अद्यापि शिख-रास पोंचलों नसल्याची जाणिव असल्यानें व मनुष्य हा आमरण विद्यार्थी असून परमेश्वरावांचून इतर कोणीहि पूर्णत्वानें भरलेला नसतो याचा त्यांना आत्मविश्वास असल्यानेंच फोटो देण्याच्या कामीं त्यांचें वेष-धारणेचें धाडस प्रसिद्धपणें होत नव्हतें. तुकाराम, रामदास, शिवाजी वगैरे अलौकिक विभूतींचे आपल्या वेषधारणांचे फोटो देण्यांत, त्या पर-मपूज्य विभूतींची पायमल्ली होते अशी त्या दोघांची बालंबाल समजूत असल्यानेंच त्यांनीं फक्त हॅम्लेट व मॅक्बेथ या दोन प्रसिद्ध नाटकां-तील आपल्या वेषांचे फोटो मोठ्या मिनतवारीनें आम्हांस जे घेउं दिले तेहि घेण्यांत आम्हांला बरीच शिताफी लढवावी लागली. अनेक युक्त्या योजून प्रथम आम्ही बाळाभाऊंना वश करून जर घेतले नसते, तर गणपतरावहि फोटो घेण्यास कधींच संमति देते ना. जोशी ड्रॉइंग मास्तरांनीं प्रथम बॅक ग्राउंडचा पडदा घरीं तयार करून ठेवून मग युक्तीनें बाळाभाऊंना आमच्या घरीं आम्हीं जेवणास म्हणून नेले आणि सोशल क्लबचें सामान आणवून बाळाभाऊंचे फोटो घेतल्यावर गणपत-रावांकडे आमच्या घरीं जेवणास बोलावण्यास मी टांगा घेऊन गेलों व

त्यांना घेऊन आलों. नंतर आमचे घरचा पूर्वीं उडालेला रंग त्यांस सांगण्यांत आल्यावर व बाळाभाऊंनीं त्यांना इरेला घातल्यावर ते आपले फोटो द्यायला तयार झाले. अशी ही या कैलासवासी नटद्वयांचे फोटो घेतल्याची पूर्वपीठिका आहे.

शाहूमंडळी या सालाच्या आदल्या सालीं इंदुरास असतांना द्रव्याच्या फारच टंचाईत सांपडून, त्यांचा सावकार त्यांच्या कंपनीबरोबर हिंडूं लागायच्या आधीं ती मंडळीं इंदुरास १९०८ सालीं बहुतेक मोडलीच होती. पूर्वींचा तुंबलेला पगार दिल्यावांचून पात्रें रंगेनात आणि तीं कंपनीहि सोडून जाईनांत. अशा तऱ्हेनें खेळ बंद पडल्यामुळें भोजनखर्चाचा बोजा आणि उठल्या सुटल्या नोकरमंडळीचे तगादे यांना कंटाळून गणपतराव तेथून एकदम निघून पुण्यास माझ्या घरीं आले. पत्रबित्र कांहीं आगाऊ आलें नसतां गणपतरावांना एकदम अनपेक्षित अवस्थेंत आलेले पाहून, मला आश्चर्य वाटलें. जेवणखाण झाल्यावर त्यांनीं कंपनीच्या दुस्थितीचें फारच हृदयद्रावक वर्णन सांगितलेलें ऐकून त्यावर मीं एक त्यांस जी तोड सुचविली ती त्यांना पसंत पडून दुसऱ्या दिवशीं सकाळीं ती अमलांतहि आणण्याचें ठरवलें. इंदुरास कंपनींतील माणसांचा पुढारीपणा स्वीकारून ज्यानें गणपतरावांना भंडावून सोडिल होतें, त्या व्यक्तीला कशी तरी तेथून उचलून इकडे आणविण्याची ती युक्तीची तोड होती. ती ठरल्याप्रमाणें त्या व्यक्तीच्या एका दूरच्या भावाला गांठून त्याच्याकडून त्याला इकडे निघून येण्याबद्दलची रेलवे भाड्याच्या खर्चाच्या रुपयांसह अर्जंट तार केली व त्याला येथें आणविल्यावर बाळाभाऊनांहि पुण्यास बोलावून घेतलें. येथें कांहीं रकमेची व्यवस्था करून खर्चापुरती रक्कम

इंदुरास धाडिली व मंडळींला नाशिकास येण्यास पत्र लिहिलें. मंडळी त्याप्रमाणें नाशिकास येऊन सुरू झाली. मंडळीबरोबर सावकार कर्ज-वसूलीकरितां हिंडूं लागण्याची हीच ती पहिली वेळ होय. याच वेळीं शंकरराव मुजूमदारांनीं आमच्या नटद्वयांना प्रत्येकीं दोनशें रुपये दरमहा घेऊन शाहूमंडळी याच नांवाखालीं नाटकें लावून आपले नोकर बनावण्याची पर्यायानें जी सूचना केली होती, त्या सूचनेची जेव्हां गणपतरावांनीं आम्हांला हकीकत सांगितली, त्या वेळीं गणपतरावांचें जें उग्रस्वरूप दिसलें आणि त्यांनीं शंकररावांना जेव्हां कांहींच उत्तर न देण्याच्या संकल्पानें त्यांच्या क्षुद्र मनाबद्दल जी तुच्छता दर्शविली, त्यांत त्यांनीं धीर पुरुषाचें काम केलें नाहीं असं कसें म्हणावें? ‘ केसरीचा देह जरी शरपंजरीं पडला असला, तरी त्याच्या पराक्रमी मनाची उडी आमरण मत्त हत्तींच्या कळपांच्या गंडस्थळांवर उड्या घेतच असते हें मुजूमदाराच्या प्रत्ययाला आल्यावांचून कधीं राहणार नाहीं’ अशा सारखेंच त्या वेळीं ते मानी गणपतराव जें कांहीं अपमान सहन न झाल्यानें संत्रस्ततेच्या मुद्रेनं बोलले त्याचें प्रत्यंतर नंतर फारच थोडक्या अवधींत आलें. किर्लोस्कर संगीत मंडळी सध्यां महाराष्ट्रांतून नामशेष होऊन उत्तरहिंदुस्तानांत वर्षानुवर्ष स्वभाषालेदु होऊन, ज्या मराठी भाषेनें त्या मंडळीला वैभवाच्या शिखरावर चढविलें तिनेंच त्या आपल्या उन्मत्त पोरीला आपल्या घरांतून काढून लावून सदयतेनें आपल्या बहिणीच्या दारीं म्हणजे हिंदी भाषेच्या द्वारीं लाजीरवाण्या अवस्थेंत राबायला लाविलें आहे! केवढा हा उन्मत्तपणाचा कळस! देशत्यागापर्यंत पाळी यावी यापेक्षां दुसरें दुर्दैव तें कोणचें? गणपतराव आणि बाळाभाऊ यांना आपली नोकरी करतां का म्हणून पर्यायानें विचारण्यांत शाहूमंडळीला

ताबेगहाण करून घेऊन तिच्या मालकांना आपले नौकर बनवायचे अशा प्रकारच्या गर्विष्ठपणाचा डाव टाकणाऱ्या शंकरराव मुजूमदारानांच स्वतः मातृभाषेच्या शापामुळेंच तिच्या हिंदीभाषाबहिणीच्या द्वारीं नौकरी करून तुकडे खात पडण्याची वेळ आली, ती कोणच्या पुण्याईचें फळ हें आम्ही सांगायला नको. भाऊसाहेब सोमण म्हणजे रा. कृष्णाजी लक्ष्मण सोमण ऊर्फ किरात हे गृहस्थ सध्यां याच कंपनीबरोबर गांवें बघत हिंडत आहेत असें ऐकतों. हे गृहस्थ टीकाकार या नात्यानें महाराष्ट्रांतील गतपिढीच्या चांगलेच परिचयाचे आहेत. या गृहस्थांशीं आमच्या गणपतरावांचा व बाळाभाऊंचा प्रथम परिचय पुण्यास जो १८९१ सालीं झाला तो गणपतराव आणि बाळाभाऊ यांशीं आमरण कायम होता. बाळाभाऊ वारल्यानंतर अलीकडील बारा वर्षांपैकीं हे गणपतरावांच्या संगतींत त्यांच्याबरोबर सुमारें दोन तीन वर्षे हिंडत होते, त्यामुळें निकट परिचयाच्या योगें त्यांनीं गणपतरावांच्या चरित्राच्या कांहीं टिप्पण्या घेतल्या असल्याचें जें प्रो. टिपणीस यांच्या नवयुगांतील लेखावरून समजतें, तें खरें असावें असें मानायला एक सबळ पुरावा माझ्यापाशीं असा आहे कीं, मीं त्यांस पाटणा मुक्कामीं धाडिलेल्या माझ्या पत्राचा माझ्या विनंती प्रमाणें त्यांनीं जबाब दिला नाहीं. 'आपण चरित्र लिहिणार असाल तर आपलेपाशीं जीं कांहीं टिप्पणें असतील तीं मजकडे धाडण्याची तसदी घेऊं नये; पण नसाल लिहिणार तर धाडिल्यास मला मदत केल्यासारखें होईल.' असें जें मीं लिहिलें होतें त्याप्रमाणें त्यांनीं ज्या अर्थीं तीं टिप्पणें मजकडे धाडिलीं नाहींत त्या अर्थीं ते चरित्र लिहिणार आहेत असा तर्क बांधण्यास हरकत नाहीं. आनंदाची गोष्ट आहे कीं, माझ्या या बोबड्या प्रयत्नाला त्यांच्यासारख्या महाराष्ट्रप्रिय कसलेल्या लेखकाची

पुस्ती लागून, त्याचें महत्त्व वाढण्याचा सुप्रसंग आल्यास आणि या पुस्तकांतील दोषांचें आविष्करण झाल्यास मला धन्यता वाटेल! रा. किरातांनीं एवढें काम प्रो. टिपणीसांच्या सूचनेला मान देऊन आवश्यमेव करावें आणि आपल्या ऐतिहासिक मित्रनटांच्या ऋणांतून मुक्त व्हावें.

बाळाभाऊ कोंकणांत जाऊन आपल्या घरीं वारले त्या सालापर्यंत शाहूनगरवासी नाटकमंडळी जे अनेक नाट्यप्रयोग करीत असे त्यांतील जनतेंत जे विशेष प्रसिद्धीला आले ते येणें प्रमाणें:—

**ऐतिहासिक**—राणा भीमदेव, पानपतचा मुकाबला, तुकाराम, रामदास, एकनाथ, बाजीदेशपांडे व पन्नारत्न.

**काल्पनिक**—मंजुघोषा, झोंपी गेलेला जागा झाला, ढेरपोट्याचा फजीता व फाल्गुनराव.

**शेक्सपियर**—विकारविलसित ( हॅम्लेट ), त्राटिका ( टेमिंग ऑफ दि श्र्यू ), झुंजारराव ( अथेल्लो ), मानाजीराव ( मॅक्बेथ ), कान्तीपूरचे दोन गहस्थ ( टू जंटलमन ऑफ व्हेरोना ), तारा ( सिंबेलाईन ), कपिध्वज ( किंग जान ) आणि विश्वामित्र ( टायमन ऑफ ऍथेन्स ).

रोमियो ऍन्ड ज्यूलिएट या शेक्सपियरच्या प्रसिद्ध नाटकांतील ज्यूलिएटची भूमिका करून दाखविण्याची बाळाभाऊंना जी मोठी लालसा त्यांच्या अंतकाळापर्यंत होती, ती प्रो. केळकरांच्या अकाली मृत्यूनें अखेरपर्यंत तडीस गेली नाहीं ती नाहींच. तें नाटक त्यांना इतकें प्रिय वाटत असे कीं, ' जेथें जेथें त्या नाटकाचा प्रयोग जे जे कोणी करतील, त्या त्या रंगभूमीच्या भोंवतीं माझा आत्मा घिरट्या घालीत राहील' असें बाळाभाऊ नेहमीं म्हणत असत. बाळाभाऊंच्या अकाली

मृत्यूनें महाराष्ट्र-रंगभूमीची तर कल्पनातीत हानी झालीच, पण त्यामुळें गणपतरावांचा एक हातच तुटला असें त्यांस होऊन त्यांच्या तरुण मनावर एकदम वज्राघात झाल्यासारखेंच झालें. बाळाभाऊंच्या मृत्यूची बातमी ऐकतांच गणपतराव ज ओक्साबोक्शीं रडूं लागले त्याचा सुमारच करतां येणार नाहीं. त्या शोकजनक वार्तेनें गणपतराव जे अंथरुणाला खिळले, ते अखेरीस बुधगांवास सांभारे वैद्यबोवांच्या औषधानें बरे होण्यासाठीं जाऊन राहिले, तेथें ते दोन महिने होते.

या वेळेपर्यंत महाराष्ट्रांत एकंदर नाट्याभिनयाचीं तीन वळणें जरी मुख्यत्वेंकरून प्रसिद्धीस आलीं, तरी त्या सर्वांचें मूळ जें कै. विष्णुदास भाव्यांचें वळण त्याचा सध्यां सर्वांशीं लोप होऊन, त्यांतूनच किर्लो-स्करी, शाहूनगरवासी आणि महाराष्ट्रीय अशीं तीन वळणें सुधार-लेल्या आवृत्तीच्या रूपांत बाहेर पडलीं. शाहूचें वळण बरेंच कठीण म्हणजे बिवलकरी कित्त्याप्रमाणें निसर्गस्वरूप असल्यानें, तें यापुढें फार दिवस टिकेल असें वाटत नाहीं. किर्लोस्करी वळण हें बंडुनानी वळणा-प्रमाणें दिखाऊ ढबीचें आणि बरेंच सोपें असल्यानें त्याचा प्रसार अद्यापि मध्यम अवस्थेंत जीव धरून राहिला आहे. महाराष्ट्री वळणा-संबंधानें तर बोलायची सोयच नाहीं. तें वळण अत्यंत कृत्रिम अस-ल्यानें व त्यांतील भाषेचे वर्णोच्चार मराठी भाषेच्या उच्चारांचें नैस-र्गिक स्वरूप विकृत करणारें असल्यानें, इंग्रजीनें जशा मराठेशाहीच्या चिंधड्या उडविल्या त्याप्रमाणें मराठी भाषा बोलणाऱ्या नटांच्या आवा-जांच्या चिंधड्या उडून जरी नरड्यांचीं फुटकीं मडकीं होत आहेत, तरी तें भरभराटींत राहण्याचा रंग दिसतो आहे यांत संशय नाहीं. जेथून जें चांगलें दिसेल त्याचा सज्जनांनीं अवश्य संग्रह करावा, ही

गोष्ट जशी सत्य आहे, तशीच पचेल तेंच खावें हें म्हणणें तरी असत्य कोठें आहे ? परकीय वर्णोच्चारांच्या वळणावर आमची मराठी भाषा उच्चारण्याचें शिक्षण देणारे पण रंगभूमीवर नटांची कोणच्या बाबतींत कशी त्रेधा उडते या गोष्टीच्या विद्येचा स्वानुभवी संस्कार तिळमात्र नसणारे अदूरदर्शी साहाय्यकर्ते व आधुनिक गचाळ मुनिवर्य महाराष्ट्रमंडळीला क्षणैक हातीं धरणारे मिळाले, व त्यामुळें त्या मंडळींतील पात्रांची स्थिति काय झाली, त्यांच्या नरड्यांतून ' चिर्र, पिर्र, किर्र ' असे आवाज कसे भाषणप्रसंगीं निघूं लागले, आणि त्यामुळें तिच्यांतील पात्रांच्या अभिनयांचें कसें मातेरें झालें, ही गोष्ट जरी प्रसिद्धच आहे तरी पण, ' यथा राजा तथा प्रजा ' या न्यायानें सध्यां जर आमच्या देशांतील सर्वच गोष्टींनीं आपल्यावर परकीय सत्तेचा छाप मारून घेण्याचें पतकरल्याचें व्रत धरलें आहे, तर आमच्या हीन दीन झालेल्या नाट्यकलेनेंहि हाफ् कॅस्ट असें मॅक्मिलनी मोडी अक्षराच्या वळणाचें इंग्रजी वळण कां बरें गिरवून, आपल्या पूर्वार्जित सुवर्णाला कागदी चलनी नाण्याचें बदसुरीं वळण देऊं नये ? फार कशाला ! आमच्या सर्व नाट्यसंस्थांतील पात्रांचीच स्थिति पाहा ! अगदीं हुबेहुब स्वैरवृत्तिच्या भटक्या पाश्चिमात्त्यांची ! घरांतली राहणी अगदीं दारिद्र्याची, पण बाहेर पडलें कीं सर्व संपत्ति बरोबर ! कारण, ती तशीच आटपशीर आणि यःकश्चित जरी असते, तरी भपक्याचीशी सहजीं वाटते ! एक शर्ट, एक कॉलर, एक ओपन ब्रेस्टचा कोट, एक धोतर, एक बूटजोड आणि नेहमीं बिघडणारें एक रिस्ट वॉच ! झाली ! संपत्तीची यादी संपली ! बिऱ्हाडीं एखादी ट्रंक जरी यदाकदाचित असली, तरी तिचे यजमान बाहेर पडले कीं ती तोंड वासून मळक्या

साडेतीन वस्त्रांसह रिकामी पडलीच, आणि यजमान घरीं आले कीं, पुन्हां यजमानांना आपल्या जवळच्या वस्त्रांचा आहेर करून, त्यांच्या अंगावरच्या भपक्याच्या ड्रेसची ती संरक्षक बनलीच! अशा प्रकारच्या किती म्हणून गोष्टी लिहाव्या! त्याचा हजार पांचशें पानांचा एक स्वतंत्र ग्रंथच होईल! या सर्व गोष्टींचें दृश्य अलीकडे सुमारें दहा पंधरा वर्षांत जसें गंधर्व कॅपच्या बंडांत दिसूं लागलें आहे, तसें पूर्वींच्या किर्लोस्कर आणि शाहूमंडळींत कधींच दिसलें नाहीं. त्या दोन्ही मंडळ्यांची घरांत आणि बाहेर अगदीं शिष्टाचाराला योग्य अशीच वागणूक असे! मोरोबा, भाऊराव, नाटेकर वगैरे मुख्य नट व त्यांचे साथीदार यांचे पेहेराव आणि जनतेशीं येणारा संबंध या गोष्टींत समाजाला त्यांच्या संबंधानें टीका करण्यास जशी सबब नव्हती तशीच गणपतराव, बाळाभाऊ, जोशीबोवा, शास्त्रीबोवा, सुपेकरबोवा आणि त्यांच्या साथीची मंडळी यांच्याहि संबंधानें स्थिति होती; परंतु सध्यांचें युग मोठ्या घाईचें आणि काळ मोबदल्याचा असल्यानें सर्वत्र पारडें फिरून—

न संध्येतें साधी, नियमित निमाजा न पढतो
न मुंजातें बांधी कटिस, न च सुंतेस करि तो
न रोजा जाणें तो, व्रत न हरिचें कांहिं करितो
न काशा मक्काही, यवन न च हिंदूहि गमतो ॥

असें ज मराठी सुभाषितपारिजातकारानें म्हटलें आहे तशाप्रकारची स्थिति पाहाण्याचें नशीबीं येणें हा काळमहिमाच होय!

या सालापर्यंत गणपतराव आणि बाळाभाऊ या दोघांना मिळून जीं एकंदर पंचवीस तीस सुवर्ण पदकें मिळालीं, त्यांपैकीं श्री. बाबासाहेब

इचलकरंजीकर यांनीं जीं दोन पदकें, रा. रामचंद्र मोरेश्वर जोग—कारभारी संस्थान जव्हार यांजपाशीं रुपये तीनशें देऊन चांगल्या कारागिराकडून करवून देण्यास सांगितलें होतें, तीं पदकें त्यांनीं मुंबईचे केसरीचे एजंट रा. नारायणराव दातार यांच्या मार्फत मे. जी. बी. नाईक आणि कंपनीकडून करवून दिलीं होतीं; परंतु दुःखाची आणि अविश्वासाची गोष्ट अशी कीं, श्री. बाबासाहेब इचलकरंजीकर यांच्या खर्ची पडलेल्या दहा तोळे सोन्याच्या मोबदला, फक्त पंधरा वीस रुपये किंमतीचा सोन्याचा मुलामा केलेला तांब्याच्या पत्र्याचा माल शाहूंच्या हातीं पडला. या गोष्टीपासून संस्थानिक व धनिक यांनीं बोध घ्यावा इतकाच हीं गोष्ट येथें नमूद करण्याचा उद्देश आहे, यापेक्षां अधिक कांहीं नाहीं. बाळाभाऊंच्या मृत्यूनंतर श्री. बाबासाहेबांनीं विलायतेहून परत आल्यावर गणपतरावांना मुद्दाम इचलकरंजीस बोलावून नेऊन त्यांस त्यांच्या गुणगौरवाबद्दल जी मोठीं देणगी स्वहस्तें अर्पण केली, त्यावरून वरील सुवर्णपदकांच्या बाबतींत झालेली अविश्वासू कारवाइ श्रीमंतांच्या कानावर गेली असली पाहिजे असें म्हणावें लागतें. गणपतरावांवर श्री. बाबासाहेबांचें जें अत्यंत प्रेम असें त्याचें कारण, ते खऱ्या गुणाचे परीक्षक आहेत. त्यांनीं आपल्या इंग्लंडच्या सफरींत शेक्सपियरचीं नाटकें इंग्लंडांत श्री. सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या प्रमाणेंच मुद्दाम पाहूनच गणपतरावांची योग्यता ठरविली होती. श्रीमंत सयाजीराव यांनीं आपल्या ऐपतीप्रमाणें पांच हजारांचें वर्षासन शाहूमंडळीला दिल्याकारणानेंच शाहूमंडळीला ज्याप्रमाणें वर्षांतून एक वेळ दोन प्रयोग करून दाखविण्यास बडोद्यास जावें लागत असें, तद्वत श्री. बाबासाहेब इचलकरंजिकर घोरपडे यांनींहि आपल्या ऐपतीप्रमाणें गणपत-

रावांचा बहुमान केला होता, तरी तो गायकवाडीप्रमाणें फार वर्षें त्यांना त्यांच्या अकाली मृत्यूमुळें उपभोगायला सांपडला नाहीं.

श्री० सयाजीराव हे शाहूंच्या ज्या तीन नाटकांवर विशेषेंकरून प्रसन्न असत तीं तीन नाटकें म्हणजे—त्राटिका, विकारविलसित आणि कान्तीपुरचे दोन गृहस्थ—हीं होत. ‘ इंग्लंडांतील त्राटिका आम्हांला नाटकगृहांतून बाहेर घालवण्यासारख्या कर्णकठोर किंकाळ्या मारून त्रास उत्पन्न करते, तर शाहूंची त्राटिका आम्हांला मनांत गुदगुल्या करून प्रयोग संपेपर्यंत नाटकगृहाच्या बाहेर पडण्यास अवसरच देत नाहीं ’ असे जे श्री. सयाजीरावांनीं १९०० सालांतील एके उत्सवप्रसंगीं उद्गार काढले त्यांची प्रशंसा कोण करणार नाहीं ! श्री० बाबासाहेब इचलकरंजीकरांनींहि १९१८ सालीं ‘ इंग्लंडांत असतां सर हर्बर्ट ट्री या प्रख्यात नटाचें हॅम्लेटचें काम मीं पाहिलें, परंतु त्याच्यापेक्षां आमचे गणपतराव जोशी हे तें काम किती तरी पटीनें अधिक चांगलें करतात अशी माझी खात्री झाली आहे ’ असे जे उद्गार काढले ते अयथार्थ होते असें म्हणण्याचें धारिष्ट आजपर्यंत कोणीहि केलेलें नाहीं.

गणपतरावांचा दैवयोग असा होता कीं, त्यांना त्यांच्या बालपणापासूनच गृहसौख्य नव्हतें. त्यांच्या तारुण्यांतलीं जी कांहीं वर्षें त्यांच्या प्रथम पत्नीच्या सहवासांत त्यांना सुखकरशीं लाभलीं तेवढ्यांतच त्यांचें खरें गृहसौख्य संपलें. यानंतर गणपतरावांनी १९१३ मध्यें आपल्या एकुलत्या एक कन्येचें मोठ्या प्रेमानें मुंबईस आपल्या ऐपतींप्रमाणें दोन तीन हजार रुपये खर्च करून चांगल्याच थाटाचें लग्न केलें, पण त्या बाबतींतहि त्यांच्या व्याह्यांच्या ठकबाजीनें त्यांना सुखाला अंतरावें लागलें. जांवयाला पी. ई. पासून बी. ए. होईपर्यंत शिकण्यास लागणाऱ्या

खर्चाची रक्कम ज्याह्यांनीं मागितली तेवढी गणपतरावांनीं आगाऊ दिली असतां, लग्न झाल्यावर त्यास कॉलेजांत सहाच महिने ठेवून ज्याह्यांनीं पुढें त्या आपल्या मुलाला चाकरी धरण्याबद्दल तगादा सुरू केला. गणपतरावांकडून आणखी द्रव्य उकळण्यासाठीं सुनबाईची नानाप्रकारें छळणूक करण्यांत येऊं लागली. माणुसकीला न शोभणारे व ज्या गोष्टीला शास्त्र लाजतील असे प्रकार सासरेबांनीं तरुण सुनबाईच्या बाबतींत केले. एकदां तर बिचाऱ्या रंगूला दादरहून सासरेबोवांनीं मुंबईस एकटीच आणून पेणशांच्या चाळीच्या दाराशीं गिरगांवांत अनाथ अबलेप्रमाणें धाय मोकलीत सोडून दिली व तिच्या नवऱ्याला ती पळून गेली असें सांगितलें. रंगू रडत उभी असलेली पांडोबा परांजपे यांच्या दृष्टीस पडली व त्यांनीं तिला घरांत नेऊन गणपतरावांना सोलापुरास तार केली. गणपतराव मुंबईस आले व त्यांनीं आपल्या एकुलत्या एक लाडक्या कन्येची स्थिति मोठ्या दुःखी अंतःकरणानें अवलोकन केली. ते तिला मोठ्या दुःखी व जडान्तःकरणानें आपल्या कपाळाला हात लावून सोलापुरास घेऊन गेले. आपले गर्हणीय दोष उघडकीला येऊं नयेत म्हणून सासूसासऱ्यांनीं ज्या कांहीं खोटयानाटया गोष्टी आपल्या चिरंजीवांना सांगितल्या त्यांचा पूर्ण विचार न करतां माधवरावांनीं रंगूला क्रिकेटच्या स्टंप्स व ब्यॅटीं यांनीं जी अनेकदां मरेमरेपर्यंत झोडली ती हकीकत आमचेपाशीं त्यांनीं स्वतःच एके वेळीं जेव्हां मोठ्या सद्गदित कंठानें व दुःखी अंतःकरणाच्या कळवळ्यानें सांगितली, तेव्हां मीं जी त्यांना अविचारी नरपशूची एकदम उपमा दिली, ती त्यांनीं मुकाट्यानें पश्चात्तापपूर्ण मनानें सहन केली. गणपतरावांनीं रंगूला सोलापुरास नेल्यावर, माधवराव बापटांनीं आपल्या सासऱ्याकडून पुढें कॉलेजांत शिकण्यास मदत होणें अशक्य

आहे असें समजून पोस्ट खात्यांत नौकरी धरली. आपल्या बापाची नीच वृत्ति जरी पुढें माधवरावांच्या निदर्शनास आली, तरी काय करावें हें त्यांस सुचेना. त्यांच्या बापानें त्यांस त्यांचें दुसरें लग्न करून देण्याचाहि मोह उत्पन्न करण्यास कमी केलें नाहीं. निराळा संसार थाटून राहण्यास माधवरावांचें मन जनलज्जेस्तव माघार घेऊं लागलें. अशा स्थितींत त्यांनीं तीन वर्षें काढलीं. शाहूमंडळीचा मुक्काम सन १९१७ सालीं मुंबईस असतां माधवराव मनाचा धडा करून मोठ्या शरमिंधे-पणानें गणपतरावांस भेटण्यास गेले. परंतु गणपतरावांनीं त्यांच्याशीं मुळींच संभाषण केलें नाहीं. तें पाहून माधवरावांनींच त्यांच्याशीं बोलण्याची सुरवात केली व झाल्या अपराधाबद्दल त्याची क्षमा मागून निराळा संसार थाटण्याची आपली इच्छा व्यक्त केली. गणपतरावांनीं लगेच चार पांच माणसांच्या संसाराला पुरेशा सर्व सामानाची नवी खरेदी करवून आपल्या अंबूताई नांवाच्या बहिणीच्या देखरेखीखालीं आपल्या जांवईबुवांच्या स्वतंत्र संसाराची थाटणी केली. त्या वेळीं रंगूच्या अंगावर तिच्या सासरचें मंगळसूत्र व एक फाटकें लुगडें एवढ्या दोनच वस्तु काय त्या होत्या. गणपतरावांनीं मुलीच्या लग्नाप्री-त्यर्थ तीन हजारांचा ऐवज दिला असतां, तिच्या सासऱ्यानें तिला भणंग भिकाऱ्याच्या पोरीप्रमाणें वागवून, बुच्या अवस्थेंत गणपतरावांना तिचा स्वतंत्र संसार मांडण्याची जी पाळी आणून दिली, तीबद्दल हरि-दास म्हणविणाऱ्या बापट व्याह्यांना कवडीचीहि शरम वाटली नाहीं ही गोष्ट जरी खरी, तरी त्याबद्दल गणपतरावांनीं आमरण दुःखाचा एकहि जो उच्चार काढला नाहीं तो जसा त्यांच्या शीलाला भूषणभूत झाला, तद्वतच त्यांच्या बापट व्याह्यांनीं त्यांच्याशीं जें वर्तन केलें तेंहि त्यांच्या

हलकटपणाच्या हरदासी वळणाला शोभेसेंच झालें. असो. पुढें आपलीं मुलगी व जांवई हीं दोघें आपल्या बहिणीच्या सहवासांत आनंदानें वागूं लागल्याचें पाहून गणपतरावांना बरेंच समाधान वाटूं लागलें. त्यांना त्यांच्या दोघां नातवंडांवांचून पुढें करमेनासें होऊं लागलें. त्यांनीं १९२२सालच्या प्रारंभीं आमचेपाशीं ठाण्यास एके प्रसंगीं असे उद्गार काढिले कीं, 'आतां लौकरच आपण आपला धंदा दुसऱ्याच्या हवालीं करून, आपली मुलगी जांवई, बहीण व नातू यांच्या संगतींत कोठें तरी स्वतंत्र घर विकत घेऊन, 'हरि हरि' म्हणत राहण्याचा विचार केला आहे. जांवयांना पैका देऊनहि ते शिकले नाहींत, पण आपल्या नातवांना शिकवून आपण विद्वान करण्याच्या उमेदीनेंच ही इच्छा धरली आहे.' असें जेव्हां त्यांनीं सांगितलें, तेव्हां मला मोठें कौतुक वाटून, मीं गणपतरावांच्या विद्यासक्तीच्या अभिरुचीचें अभिनंदन केलें. पण या गोष्टी भोगण्याचें कोणाच्याच नशीबीं नव्हतें तेथें इलाज नाहीं. तरी पण गणपतरावांनीं आपल्या नातवंडांच्या शिक्षणाची सोय आपल्या अखेरच्या व्यवस्थापत्रांत चांगलीच करून ठेविली आहे.

गणपतरावांचा नांवलौकिक अनेक देशी आणि परदेशी वर्तमानपत्रांतून जो गुणगौरवपर असा १८९१ सालापासून १९२२ सालापर्यंत म्हणजे सुमारें एकतीस वर्षे अव्याहत होत होता, त्या सर्वांचे उल्लेख करण्यास स्थलावकाशाची गैरसोय असल्यानेंच, त्यांना परदेशी युरोपियन लोकांकडून जीं अनेक सर्टिफिकीटें मिळालीं त्यांपैकीं कांहीं मागें दिलींच आहेत. आतां यापुढें नाशीकक्षेत्रस्थ ब्रह्मवृंदानें मोठ्या आदरानें जें त्यांना शके १८३९ च्या ज्येष्ठमासांत मानपत्र दिलें त्याची नक्कल देऊन हा प्रवेश पुरा करतों.

उपमैका शैलूषी संप्राप्ता चित्रभूमिकाभेदान् ।
रंजयति काव्यरंगे नृत्ययति च तद्विदां चेतः ॥

एतेषां नाट्यलीलाप्रयोगकर्तृणां शाहूनगरवासीनां नवरसादिज्ञानोत्पादकं नाटकं दर्शनार्हमिति । एते शाहूनगरवासि नाट्यलीलाप्रयोगप्रवर्तकाः कालिदासभवभूतिबाणप्रभृतिकविवर्याणां नाटकेषु ये रसाः तेषां अभिज्ञाः प्रेक्षकजनानां चित्ताकर्षणे तथा मानसारविन्दाविकासे शरच्चंद्रनिभाः वाक्चातुर्याभिनयगांभीर्यादिगुणालंकृताः ज्योतिषीत्युपनामक नाट्यशास्त्रधुरंधर गणपतराव प्रभृतयः । एतेषां नाट्यलीलावलोकनेन संतुष्टैः श्रीमद्गोदातीरप्रोल्लसत् श्रीनाशिकक्षेत्रस्थ विद्वज्जनैः प्रेमपुरस्सरं इदं मानपत्रं शाहूनगरवासि नाटकप्रयोगाभिनयकर्तृभ्यः रन्ध्रगुणवस्विन्दुमित शाके ( १८३९ ) ज्येष्ठमासे शुक्लपक्षे द्वादश्यां समर्पितमितिशम् । एतेषु आशिषः समुल्लसन्तुतराम ॥ शुभंभवतु ॥

१ लक्ष्मण चिंतामणी दीक्षित शौचे । १ अत्रार्थे संमतिः सदाशिवसुनोः काशीनाथस्यास्ति किल शौचइत्युपनाम्नः । १ चिंतामण शंभु दीक्षित मनोहर । १ दामोदर रामचंद्र फणशे । १ वामन नारायणभट्ट दांडेकर । १ गंगाधर आत्मारामशास्त्री गायधनी । १ संमतमिदं गग हरिशास्त्रिणः सूनोर्लक्ष्मणशास्त्रिणः । १ शीशंकराचार्यदत्तधर्मशास्त्रनिपुण रत्नाकरपदवीधारक महाशब्देत्युपनामक सीताराम शास्त्रिणः संमतिः । १ भालचंद्र पुरुषोत्तमशास्त्री पटवर्धन । १ पद्मनाभीत्युपनामक विष्ण्वात्मज भालचन्द्रशास्त्री । १ दामोदर एकनाथ बर्वे । १ धोंडभट्ट बिन्न बाळंभट विश्वामित्र । १ चिंतामण जगन्नाथ दीक्षित भडकमकर ।

---

# अंक पांचवा.

## प्रवेश पहिला.

बाळाभाऊंच्या मृत्यूच्या आकस्मिक संकटानें गणपतराव यांस जवळ जवळ वेड लागण्याचीच स्थिति आली होती व ते शरीरानेंहि कमजोर होऊन सन १९१० सालच्या अखेरपर्यंत फार आजारीच होते. सांगली जवळ बुधगांव नांवाच्या गांवीं त्यांचा मुक्काम होऊन शाहूमंडळींतील कांहीं एकनिष्ठ नोकर व नटहि त्यांस धरून राहिले होते. त्या मंडळीच्या परिश्रमानें, सांभारे वैद्य यांच्या कौशल्यानें व महाराष्ट्ररंगभूमीच्या सुदैवानें गणपतराव यांच्या प्रकृतीस आराम पडून, श्री. जमखिंडीकरांचे प्रोत्साहनानें कंपनीचा जम पुन्हां बसला. या मध्यंतरींच्या काळांत गणपतरावांच्या संबंधीं कित्येक वेळां वाईट बातम्या पसरल्या होत्या; परंतु त्या सर्व खोट्या ठरून पुन्हां गणपतराव आपल्या मंडळीसह रंगभूमीवर चमकूं लागले. बुधगांवीं असतां मंडळींतले पूर्वींचे हरकामी नट गणपतराव वझे यांचें जें मंडळीस फार साहाय्य झालें. त्यांच्या त्या मदतीबद्दल व प्रस्तुत लेखक यांनें केलेल्या अल्प मेहनतीबद्दल गणपतराव नेहमीं जोगळेकर वकीलांसारख्या अनेक सद्गृहस्थांपाशीं प्रशंसापर उद्गार काढीत असत असें म्हणतात. या वेळीं शाहू मंडळींत हल्लीं काम करीत असलेले आठवले बंधू व गणेश येशवंत देसाई या नांवाचे एक नट व मामा भट अशी मंडळी येऊन मिळाली, व जमखिंडी येथील सरकारचे आश्रयाखालीं सुरवातीचा प्रयोग श्रीगजाननाचे साक्षीनें करून नंतर मंडळी इचलकरंजीस गेली. त्या वेळीं गणपतराव यांनीं मुंबईहून रा. जोगळेकर वकील यांस मुद्दाम बोलावून नेऊन मंडळीचीं

एकंदर व्यवस्था दाखविली व पुढें मंडळी कशा धोरणानें चालवावयाची तें निश्चित केलें. पुढें इचलकरंजीच्या मुक्कामीं कृष्णाजी लक्ष्मण ऊर्फ भाऊसाहेब सोमण ऊर्फ किरात हे कंपनींत येऊन राहिले व सुमंत या टोंपण नांवाच्या कवींची गणपतरावांबरोबर ओळख झाली. या दोन गृहस्थांशीं त्यांचा स्नेह आमरण कायम होता. यानंतर मुक्काम दर मुक्काम करीत मंडळी मुंबई मुक्कामीं आली व या खेपेस भाऊसाहेब सोमण यांनीं रचलेलें 'विजयानगरचा डळमळीत राजमुगूट' हें नाटक मंडळीनें बाहेर आणिलें. परंतु तें अखेरीस डळमळलेंच. शाहूनगरवासीच्या दुसऱ्या आयुष्यक्रमास सुरवात होण्याचा हा काळ एकंदर महाराष्ट्रास फार काळजीचा होता. सरकारची वक्रदृष्टि होऊन प्रत्येक बाबतींत प्रजेंत राजद्रोह त्यांना जास्त जोराचा दिसूं लागला. त्याचे जे परिणाम नाट्यसृष्टीस भोगावे लागले त्यांपैकीं, नाट्यवाङ्मय जप्त करणें व कोणत्याहि नाटकाचा प्रयोग सरकारी परवान्याशिवाय होऊं न देणें हे फार जाचक झाले. गणपतराव यांच्या अंगच्या व्यवहारचातुर्याची ओळख जनतेस याचवेळीं चांगली पटली. रा. शिरवळकर यांच्याकडून 'दिव्यराजनिष्ठा' हा खेळ तयार करवून घेऊन त्याचे प्रयोग मुंबईचे दुसऱ्या सफरीचे वेळीं त्यांनीं मुंबईस सुरू केले. सदर नाटकांत मामाभट, यांचें व त्याच्या पश्चात् बाळू जोशी. याचें पन्नादाईचें काम फार उत्कृष्ट होत असे. यानंतरच्या मुंबईंतील मुक्कामाच्या वेळीं बापू आठवले हा मुख्य स्त्रीपार्टाचें काम करूं लागला. रा. जोगळेकर वकील यांच्या परिश्रमानें मुंबईस स्थापन झालेला 'सत्कार्योत्तेजक नाटकमंडळी' या नांवाचा क्लब या वेळीं बहुतेक गणपतरावांचींच नाटकें करूं लागला होता. सत्कार्योत्तेजक नाटकमंडळींतील नट कै० गणपतराव व बाळाभाऊ यांस गुरुस्थानीं मानून

रंगपटांत त्यांचे प्रयोगाचे वेळीं त्यांचे तसबिरींचा सन्मान करून प्रयोगास सुरवात करीत असत. या मंडळीनें गणपतराव यांचे समक्ष हॅम्लेट नाटकाचा प्रयोग करून मुंबईतील प्रमुख नागरिकांचे हातून गणपतराव यांस एक मानपत्र दिलें व त्यांचा अपूर्व सत्कार केला. शाहू मंडळीच्या नव्या स्थित्यंतरापासून पुणें व मुंबई येथील अब्रूदार व सुशिक्षित गृहस्थांचें लक्ष पुन्हां मंडळीकडे लागूं लागलें. १९११ पासून १९१४ पर्यंतचा काल एकंदर देशांस जरी चिंतेचा गेला तरी सुद्धां शाहू मंडळी ज्या ज्या ठिकाणीं जाई त्या त्या ठिकाणीं तिचा बोल-बाला होतच होता. १९१३ सालीं मुंबईंत असतांना शाहू मंडळीनें 'सुलो-चना' या नांवाचें एक नवीन नाटक पुढें आणिलें. हें नाटक यशस्वी झालें नाहीं, परंतु याच सुमारास मंजुघोषा नाटकाचे प्रयोग पुन्हां सुरू झाले.

अलीकडील घनघोर युद्धांतून जिवाची पर्वा न करतां योग्य प्रकारें राजकाजीं देहार्पण करणाऱ्या वीरांना जसें व्हिक्टोरिया क्रॉसनें विभू-षित करण्यांत येतें, त्याप्रमाणें महाराष्ट्राच्या रंगभूमीवर आमरण नाट्य-कलेला देहार्पण केलेल्या आमच्या नटनायक गणपतरावांस प्रथमच जरा त्यांच्या मृत्युवार्तेच्या लेखांत बालगंधर्वासारख्या गुणी नटानें 'नटसम्राट' ही पदवी सर्वानुमतें अर्पण केली आहे व त्यायोगें जरी गणपतरावांच्या अलौकिक कीर्तींत भर पडली आहे, तरी त्या पदवीच्या वरच्या दर्जाची आणि अद्यापपर्यंत जी पदवी ज्यांना म्हणून मिळाली ती त्यांची कधींच कोणाला हिरावून घेतां आली नाहीं अशी जी 'आचार्य' ही सर्वोच्च पदवी तीच त्यांना विभूषित करण्यास सर्वतोपरी योग्य आहे असं आम्हांप्रमाणेंच अनेकांना वाटतें, आणि म्हणूनच श्री० बालगंधर्वांनीं पूज्य-भावानें 'नटसम्राट' ही जी पदवी त्यांना अर्पण केली आहे, ती कायम

ठेवूनच आम्हीं गणपतरावांच्या नांवाला ' नटसम्राट गद्यनाट्याचार्य ' या नामाभिधानानें विभूषित केलें आहे.

वास्तविक पाहिलें तर ' सम्राट ' ही पदवी ' अग्रणीच्या ' जरी वरची आहे, तरी या दोन्ही पदव्या अनेकदां अनेकांच्या छिनावल्या गेल्या आहेत व पुढेंहि हिसकाविल्या जातील; परंतु 'आचार्य' ही पदवी मात्र अद्यापि कोणी कोणाची हिसकावून घेतल्याचा जो दाखला नाहीं, त्याचें कारण इतकेंच कीं, ती पदवी शत्रुमित्रांना संमत होऊनच मिळालेली असते. ही स्थिति ' सम्राट ' या पदवीची नाहीं. शेक्सपियरच्या ज्यूलियस सीझर नाटकांतल्या सुरवातीच्याच प्रवेशांत एक ' जोडशिन्या ' चांभार जसा नगररक्षकाला आपण आपल्या घेतलेल्या वेषास 'सर्जन टु ओल्ड शूज ' म्हणजेच 'मेंन्डर ऑफ बॅड सोल्स' या पदवीनें आपली ओळख पटविण्याचा प्रयत्न करतो, तद्वतच अलीकडे कांहीं नाडापुडे वैद्य आणि नाट्यकलाखंदक उपटसुंभ यांनीं जो उठल्या सुटल्या हव्या त्या यःकश्चित नाटक्यालाहि ' नटसम्राट ' म्हणून पदवीदान करण्याचा सपाटा चालविला आहे, ती गोष्टहि वरील 'खेटरांच्या शस्त्रवैद्यासारखीच' अश्लाघ्य असल्यानें, ती पदवी अत्यंत थट्टास्पद व हवी तव्हां रद्द करतां येण्यासारखी आहे म्हणून ती गणपतरावांना लावण्यास आमची जरी मनापासून इच्छा नव्हती, तरी आज खरोखरच आपल्या नाट्यगुणांनीं योग्य प्रशंसेस पात्र झालेल्या, परंतु अदूरदृष्टी अशा आमच्या बालगंधर्वांसारख्या गणपतरावांच्या पूर्ण अभिमानी भक्ताकडून ती मिळाली असल्यानें त्यांच्या गुणग्राहकतेचा मान राखण्यासाठीं आम्ही त्या पदवीची जोड मुद्दाम गणपतरावांना दिलेल्या ' नाट्याचार्य या पदवीच्या आधीं जोडून गणपतरावांच्या नांवाची कीर्तिरूप नटी उत्तम तऱ्हेनें नटविली आहे.

हॅम्लेट नाटक तर गणपतरावांची कामधेनूच होतीं. सदर नाटकांत उतार वयांत सुद्धां गणपतराव तारुण्याच्या तरतरीनें काम करीत असत. मंडळीच्या याच उत्कर्षाच्या काळांत कृष्णाजी हरी दीक्षित यांचीं 'रुक्मिणीहरण' व 'राजा सत्वधीर' हीं नाटकें मंडळीनें बसविलीं. याच सुमारास सामाजिक नाटकमंडळींतील प्रसिद्धीस आलेले रा. भिडे हे नट शाहू मंडळीस येऊन मिळाले. या नटाची अंगलट गणपतरावांच्या अंगलटेशीं इतक्या सारखेपणाची होती कीं, गणपतराव रंगभूमीवर येण्याचे पूर्वी जर एखाद्या प्रयोगांत भिडे पुढें आले तर त्यांसच गणपतराव समजून नजरचुकीच्या देखाव्यानें प्रेक्षक त्यांचा टाळ्यांच्या गजरानें केव्हां केव्हां सन्मान करीत असत, पण पुढें आवाज ऐकल्याबरोबर 'जें जें चकाके तें तें सोनें नसें' या भूलचुकीच्या पश्चात्तापानें पुढचें नाटक गणपतरावांच्या आगमनाची वाट बघत मुकाट्यानें बघूं लागत. सदरहु नट गणपतराव यांच्याच मंडळींत अखेर पर्यंत होता. तीन चार सालांपूर्वीं तो अकस्मात् तापाच्या विकारानें मुंबईस कैलासवासी झाला.

या नंतरचें शाहू मंडळीचें नवीन नाटक म्हणजे 'माझी बहीण' हें होय. सदर नाटक भाऊसाहेब सोमण यांनीं जरी मूळ लिहिलें, तरी ते टीकाकार या नात्यानें जसे कुशल म्हणून एके काळीं प्रसिद्धीस आले होते तद्वत ते नाट्यकुशललेखक नसल्यानें त्यांच्या इतर भाराभर नाटकांपैकींच तें एक झालें होतें. आपलें एखादें तरी नाटक शाहूनीं बसवावें असा त्यांचा जो फारा दिवसांचा अग्रह त्याला अनुसरून व मित्रप्रेमास्तव, गणपतरावांनीं त्याचें मूळचें नांव बदलण्यापासून त्याची सर्वांगानें दुरुस्ती करून तें बसविलें. पन्नारत्नांतील व त्यांतील करुणरस गणपतराव इतक्या उत्तम रीतीनें वठवीत

कीं प्रेक्षकांस रडूं आवरत नसे. सदरहु काल गणपतरावांच्या नव्या उत्कर्षाचा जरी होता तरी दिवसें दिवस त्यांची शक्ति क्षीण होत चालली होती. मंडळीचे मुक्काम वेळोवेळीं हालवतांना व मंडळीचा मुक्काम कायम असतांना सुद्धां आपली भूमिका वठविण्यापलीकडे कोणतीहि दगदग त्यांच्या कडून होई-नाशी झाली होती. याच मुदतींत मक्तेदारांच्या कचाटींतून गणपतराव यांनीं आपली मुक्तता करून घेतली होती, व कंपनीच्या पडत्या काळांत झालेलें देणें अवश्य तेवढें देऊन टाकिलें होतें. यापैकीं पुष्कळसें देणें मुदतीच्या बाहेरहि जरी गेलेलें होतें, तरीहि गणपतराव यांनीं तें देऊन टाकिलें. 'माझी बहीण' या नाटकानंतर गणपतराव यांनीं नाथमाध-वांचें 'जातीवंत मराठावीर' हें नवें नाटक १९१५त अखेरचेंच बसविलें, पण तेंहि त्यावेळीं अयशस्वीच ठरलें.

मुंबईच्या शेवटच्या दोन तीन मुक्कामांत शाहू मंडळीची व्यवस्था सामान्यतः गंधर्वमंडळीकडे व विशेषतः गंधर्वमंडळीचे जुनें म्या-नेजर रा. पंडित यांजकडे असे व मंडळी कोणत्याहि मुक्कामीं असली तरी आंतरव्यवस्था सर्व बाबू आठवले आणि वैद्य यांजकडे असे. गणपतराव यांची तब्यत थकत चाललेली पाहून त्यांच्या मित्रमंडळीनें त्यांस कायमचें एका जागीं राहून विश्रांती घेण्याबद्दल सुचविलें; परंतु आपल्यावर अवलंबून असलेल्या मंडळींतील पांच पंचवीस माणसांस रजा देणें योग्य नव्हे व आपल्या पश्चात् शाहूनगरवासीमंडळी अबाधित रीतीनें पूर्वीच्या इभ्रतीनें चालावी अशी कांहीं तरी व्यवस्था केल्याखेरीज आपण नाट्य-सृष्टीस रामराम ठोकणें योग्य नाहीं असें समजून मुंबईकर अथवा पुणें-कर मित्रांचा आग्रह गणपतराव यांनीं मनास आणिला नाहीं. कित्येक वेळां हॅम्लेट, त्राटिका, अथेल्लो व म्याक्बेथ या चार नाटकांचे चित्रपट

सीनेमाकरितां गणपतराव यांनीं द्यावे अशाबद्दलहि मित्रमंडळीकडून खटपट झाली, परंतु तोहि योग निरनिराळ्या कारणांनीं आला नाही. आपल्या पश्चात् कंपनी चालावी ह्या हेतूनें कितीएक मुक्कामांत बापू आठवले याजकडून आपलीं कामें करवून घेऊन त्याची संवय प्रेक्षकांस लावण्याचा प्रघात गणपतराव यांनीं सुरू ठेविला होता व बापू आठवले याच्याहि कामांत उत्तरोत्तर सुधारणा होत चालली होती. गणपतराव काम करण्यास नसले तरी मंडळीस उत्पन्न ठीक होऊं लागलें होतें. अशा स्थितींत १९२१ सालअखेर कंपनी मुंबईस आली असतां पुढलि व्यवस्था रा. जोगळेकर वकील, पांडुरंग गोपाळ परांजपे व रामभाऊ सोहनीं या त्रिवर्गाच्या सल्यानें व गंधर्वमंडळीचे म्यानेजर बाळासाहेब पंडित यांच्या धोरणानें करावी असा गणपतराव यांचा हेतू होता. पण ईश्वरी योजना निराळी होती. मंडळीचा मुक्काम ठाण्यास असून आड-वारीं प्रयोग मुंबईस होत असत. या प्रयोगांची छाप मुंबईस फारच उत्तम पडूं लागली होती. या मुक्कामाचे पूर्वीं दोन तीन वर्षें मंडळींस करमरकर या नांवाचे एक नट येऊन मिळाले होते व हे नट पुढें चांगले नांवा-रूपास येऊन बाळाभाऊ जोगांचे खालोखाल काम करूं लागतील असा अंदाज दिसत असल्यामुळेंच आम्हांस ‘ किंग लियरचें ’ भाषांतर करून देण्याविषयीं गणपतराव यांनीं सूचना दिली होती. त्याप्रमाणें सदर भाषांतर तयार होऊन तें नाटक रंगभूमीवर करून नंतर रंगभूमीस व नाट्यसृष्टीस अखेरचा रामराम ठोकून आपले वार्धक्यांतील दिवस नातवंडांच्या सहवासांत काढावे असा गण-पतराव यांचा मनोदय होता; परंतु भवितव्यतेचा मनोदय निराळा होता. ठाणें व मुंबई येथील दोन्ही ठिकाणच्या प्रयोगांची मेहनत गणपत-

राव यांस झेपेनाशी झाली व त्यामुळें त्यांच्या उदराच्या विकारानें जरीं पुन्हां उचल खाल्ली, तरी मुंबईचा मुक्काम कसा तरी पुरा करून मंडळीस रत्नागिरींस पाठवावें व आपण लोणावळ्यास जाऊन विश्रांति घ्यावी असा गणपतराव यांनीं बेत केला व त्याप्रमाणें मुंबईतील राष्ट्रीय मेडिकल कॉलेजास मदतीदाखल म्हणून त्राटिका नाटकाचा प्रयोग पार्लीवाला ग्रॅन्ड थियेटरमध्यें केला. हा प्रयोग इतका उत्तम वठला कीं, जुन्या प्रेक्षकांस शाहूमंडळीच्या अगदीं सुरवातीच्या दिवसांची आठवण झाली. गणपतराव यांचें प्रतापरावाचें काम त्या दिवशीं फारच बहारदार झालें, परंतु हें काम त्यांचे आयुष्यांतील शेवटचेंच होईल अशी कल्पना मात्र त्या वेळीं कोणासहि झाली नाहीं. दिवा जातेवेळीं जसा मोठा होतो त्याप्रमाणें गणपतरावांच्या चरित्राची समाप्ती जवळ जवळ येत चालल्यामुळेंच गणपतरावांची व त्यांच्या मंडळीची या प्रयोगाचे वेळीं फारच वाहवा झाली. हा प्रयोग झाल्यानंतर शाहूनगरवासी मंडळीचा मुक्काम मुंबईतून हलून रत्नागिरीस जाऊन पडला व खुद्द गणपतराव प्रकृती सुधारण्याकरितां म्हणून लोणावळ्यास निघून गेले. तीन वर्षांपूर्वीं बेळगांवास ज्या रोगानें आपलें डोकें गणपतरावांच्या देहांतून बाहेर काढिलें होतें त्याच जलोदराची भावना या वेळीं त्यांस सुरू झाली होती. त्यावर सुरू केलेल्या लोणावळें येथील वैद्याच्या औषधानें गुण न येतां गणपतराव यांस मुंबईस परत यावें लागलें. मुंबईत आपले मुलीच्या घरीं बिऱ्हाड ठेवून त्यांनीं औषध सुरू केलें. या वेळीं शाहूनगरवासी मंडळी रत्नागिरीस खेळ करीत होती. त्यांनीं आपल्या मताप्रमाणें देवतांचीं अनुष्ठानें वगैरे सुरू केलीं. गणपतराव मुंबईस आजारी असतांना नवीन नाटकाचें वाचन व विवेचन नेहमीं चालू असे. फावल्या वेळांत रा. जोगळेकर वकील,

प्रोफेसर टिपणीस व मुंबईतील त्यांचे इतर स्नेही यांच्याशीं नाट्यचर्चा चालू ठेवावी व डॉक्टराकडून प्रकृतीचें मान ऐकून सदाशीवराव दाते करंदीकर, वझे वगैरे जी मंडळीं वेळोवेळीं येत असत, त्यांच्याजवळ पुढील योजनेसंबंधानें बेत करावेत, असा गणपतराव यांचा नित्यक्रम सुरू होता. मुंबई येथील औषधास न जुमानतां बळावत चाललेला रोग केवळ त्यांनीं आपले इच्छाशक्तीवर दाबून ठेविला होता. मंडळीचा मुक्काम रत्नागिरीहून बेळगांवास न्यावा व तेथें सदाशिवराव दाते, बाळासाहेब पंडीत, जोगळेकर वकील व इतर स्नेही मंडळी यांच्या विचारानें मंडळीचीं कांहीं तरीं कायमची व्यवस्था करावी असा गणपतराव यांचा बेत झाला होता, परंतु या इच्छाशक्तीस न जुमानतां त्यांचा रोग दिवसें दिवस जास्त बळावत चालला, तेव्हां तात्पुरतें व्यवस्थापत्र १९२२ सालच्या फेब्रुआरी महिन्याचे सुरवातीस करून गणपतराव कायमची विश्रांति घेण्याच्या वेळेची वाट पाहात बसले. ‘ देणें कोणाचें कवडी नसावें, विश्वेश्वराच्या जवळी असावें ’ अशी जी आपली मूळपासूनची मनीषा ती भगवदिच्छेनें जरी पूर्णपणें पार पडली नसली तरी जगद्रंगभूमीवरील प्रवेशाच्या पहिले अंकापासून तों शेवटच्या अंकापर्यंत आपलें काम व आयुष्यांतील जबाबदारी हीं आपण यथाशक्ती पार पाडलीं आहेत व त्यामुळेंच ‘ आम्ही जातों आपल्या गांवा आमुचा राम राम घ्यावा.’ असें श्रीतुकाराम महाराजांप्रमाणें आपल्या अल्प शक्त्यनुसार परिचित झालेल्या मंडळीस सांगण्याची वेळ आली आहे अशा भावनेनें गणपतराव अखेरच्या क्षणाची वाट पाहूं लागले. रत्नागिरीहून बापु आठवले, करमरकर, वैद्य, वैशंपायन वगैरे मंडळी मुंबईस आली. मंडळीची व्यवस्था करणें बाकीच्या माणसांवर सोंपवून, गणपतरावांना माझी बहीण असें

जिला म्हणण्याचा अधिकार प्राप्त झाला होता व जिनें आपल्या कष्टमय आयुष्याचीं शेवटचीं बारा तेरा वर्षें गणपतरावांस कधींहि दूर न करितां घालविलीं होतीं ती गंगाभागीरथी अंबूताईहि अखेरच्या प्रसंगीं रत्नागिरी येथून ' अण्णांची ' अखेरची भेट घेण्याकरितां म्हणून आली. ती आली त्या वेळीं गणपतराव यांनीं शांत मनानें तिच्याशीं बोलून व ' चि० सौ० रंगूस व तिच्या मुलांस तुझ्या हातीं सोंपविलें आहे. नाटकमंडळीची व्यवस्था आपल्या मृत्युपत्राचे ट्रस्टी रा० जोगळेकर वकील, पांडुरंग गोपाळ परांजपे व रामभाऊ सोहनी यांच्या सल्ल्यानें करावी' असें सांगून ऐहिक व्यवहाराशीं आपला संबंध कायमचा सोडण्याची वेळ आणिली व त्यामुळें पुढें जैगिक व्यवहाराचा कोणत्याहि तऱ्हेचा लोभ ठेवणें योग्य नाहीं असें मनांत आणून कोणाशींहि भाषण करावयाचें नाहीं असें ठरविलें व तशा स्थितींतच शक्ती क्षीण होत जाऊन अखेरीस ता. ७ मार्च सन १९२२ रोजीं मंगळवारीं दुपारीं ११॥ वाजतां गणपतरावांनीं जगाचा शेवटचा निरोप घेतला !!! अशा प्रकारें महाराष्ट्र–रंगभूमीवरील हा अत्यंत दैदीप्यमान नट जगांतून नाहींसा झाला, व या जगांतील त्याच्या जन्मलीलानाटकाचा पांचव्या अंकाचा अखेरचा पडदा अक्षयींचा पडला.

# उपसंहार

गणपतरावांचा स्वभाव फार मितभाषणीं होता. त्यांस पूर्वजन्मदुष्कृतानें जें एकच एक व्यसन होतें त्याबद्दल त्यांस अतिशय खेद होत असे व त्यांचें मन त्याबद्दल त्यांना खात असे. या मुळें ते फारसे मंडळींत मिसळत नसत व कोणाजवळ फारसे बोलतहि नसत. आपण आपल्या व्यसनामुळें पतीत झालों आहोंत व या मुळें प्रतिष्ठित माणसांत उजळ माथ्यानें वावरण्याचा आपल्यास अधिकार नाहीं अशी त्यांची भावना असे. त्यामुळें ते चार लोकांत कधींहि यत जात नसत. परमेश्वरावर त्यांची अत्यंत निष्ठा असून भगवद्गीतेचा पाठ ते नेहमीं करीत असत. दर सोमवारची शंकरावरची एकादशनी त्यांची जशी आमरण चुकली नाहीं, तद्वतच गणेशोत्सवाचें व गोकुळाष्टमीचें ब्राह्मणसंतर्पणहि आमरण त्यांचे हातून मोडलें गेलें नाहीं. ते मोठे रामभक्त होते. धंद्याच्या व्यवहारांत ते अत्यंत चोख असून आपल्या अत्यंत बिकट परीस्थितींतहि नाटकांतील मंडळीचे थकलेले पगार त्यांनीं वेळोवेळीं देऊन टाकिले आहेत. गणपतराव नाटकाचे व्यवसायांत पडले नसते तर खरोखरच पदवीधर होऊन फार मोठ्या दर्जाला चढले असते. नाटकाच्या धंद्यांत त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांचा पाश्चिमात्य नटांप्रमाणें राजकीय व सामाजिक असा दुहेरी थाटाचा गौरव दुर्दैवी हिंदुस्तानाला करतां आला नाहीं. त्या धंद्यांत शिरल्याबद्दल गणपतरावांना नेहमीं पश्चात्ताप होत असे. त्यांची बुद्धि फार तीव्र होती. या तीव्र बुद्धीचा उपयोग ईश्वरी योजनेप्रमाणें त्यांनीं रंगभूमीची स्थिति सुधार-



गणपतराव जोशी याचा मृत्यु.

मुंबई, मंगळवार ता. ७ मार्च स. १९२२ ई.

——:o:——

ण्याकडे यथाशक्ती केला, हें त्यांच्या चरित्रावरून दिसून येण्यासारखें आहे. 'नट हे तयार करून होत नसतात. त्यांस उपजत अंगचेंच कसब असावें लागतें,' असें जरी ते नेहमीं वरकरणीं म्हणत असत तरी त्यांत बरेंच तथ्यहि होतें; पण यामुळें त्यांना आपल्या खालोखाल नट तयार करतां आला नसतां हें मात्र खरें नाहीं. असो.

बुधवार ता. ८ मार्च रोजीं प्रातःकाळीं पुण्यास 'लोकमान्य' 'गणपतराव जोशी वारले' अशा 'लोकमान्य' वर्तमानपत्र विकणाऱ्या रस्त्यांतील पोराची आरोळी आम्ही स्पष्टपणें बुधवारच्या रस्त्यांत ऐकली, व त्या बरोबर आमच्या मनांत मित्रप्रेमानें जी भावना एकदम उद्भवली तिचा सारांश पुढीप्रमाणें होता:—

हरिणी.

अस्तिरुचिरगा शीतप्रांशू नभीं शशिपंकजीं ।
हृदय विमुहा पावे त्याचा सुगंध यशस्रजीं ।
पवन विचरी त्याची ती हे असे यमकल्पना ।
कमलहृदया आतां तूझा निवास वदे मना ॥ १ ॥

आपलें पर्णदल टवकारून प्रफुल्लित दिसणाऱ्या व आनंदानें शीतजलावर डुलून तरंगत राहणाऱ्या, ज्याला आतां दुःखाची कल्पनाहि नाहीं आणि मानवी मेन्दूंना सदोदीत त्रस्त करून सोडणाऱ्या अस्वस्थतेचा ज्याच्या ठायीं आतां विचार कधींहि येणें शक्य नाहीं, अशा श्वेतरक्तवर्णकमलांतील शान्तिदेवते, तूं आम्हांला कां सोडिलेंस? तूं कोठें जाऊन बसली आहेस? कांहींच उत्तर देत नाहींस ना? ता. ७ मार्च १९२२ मंगळवारच्या दिवशीं सूर्यनारायण खमध्यांत येतांना तूं आपलें स्वरूप खरेंच शांत केलेंस! कारण, पूर्वेकडून जात जात पश्चिमेकडे अस्त पावणाऱ्या सूर्यगतीप्रमाणेंच तूं आपली गति दाखविलीस! पूर्वदिशे-

कडील महाराष्ट्राच्या राजधानीला अखेरच्या हॅम्लेटमॅक्बेथांच्या ट्रॅजेडींची सलामी देऊन पश्चिमेकडच्या मुंबई नगरीच्या इंग्रजी राजधानींत जी तूं आपली स्वतःचीच ट्रॅजेडी केलीस ती खरोखरीच अनन्य अशी जगापुढें ठेविलीस. 'किंग लियर' ची ट्रॅजेडी जगाला दाखवून स्वतःच्या नैसर्गिक " बर्थ कॉमेडीच्या डेथ ट्रॅजेडीची " मार्गप्रतीक्षा करण्यच्या आधींच तूं आपल्या अस्ताचा निराळाच मार्ग शोधलास ! हॅम्लेट नंतर लियरचें काम दाखवून महाराष्ट्राला ट्रॅजेडीची अत्यंत हृदयविदारक कल्पना करायला लावण्याच्या आधींच हे शांतिदेवते, तूं आपल्या बरोबरच ट्रॅजेडीला आमच्यांतून पळवून नेलीस ना? इंग्लंडांत गॅरिक आणि बॅरी या नटद्वयांच्या ' किंग लियरच्या ' कामासंबंधानें ' दि रायव्हल लियर्स ' म्हणून कवितेच्या ज्या चार ओळी—

> The town has found out different ways
> To praise the different Lears
> To Barry they give loud huzzars!
> To Garrick—only Tears.

याप्रमाणें प्रसिद्ध आहेत, तद्वत् गॅरिकप्रमाणेंच तुझी अखेरची इच्छा असतांहि ती तूं पार न पाडतां, स्वतःच्याच आत्महत्येनें महाराष्ट्ररंगभूमीला अश्रू ढाळीत बसविलेंस ना? असो. तुझ्यासंबंधानें आमचे कविमित्र रा. हरि सखाराम गोखले हे जगताला आपल्या कवित्वांत काय सांगताहेत तें ऐक—

> देवगणीं मान जसा पहिला ठरला असे गणेशाचा ।
> नटवरगणीं गुणानें तोच असे मान या गणेशाचा ॥ १ ॥
> नटनायक हा झाला सेनानायक जसा स्वसेनेस ।
> यानें पराक्रमानें केलें सकलां अपात्र तुलनेस ॥ २ ॥

बुधवारीं शनिवारीं ही स्वारी जेथवां करी स्वारी ।
वैरी सर्व निवारी शूर असा हाच नाट्य-कैवारी ॥ ३ ॥
देवाज्ञा त्या झाली अर्थ असे हाच या अनर्थाचा ।
कीं स्वर्गीही नाहीं गणपतरावांपरीस नट साचा ॥ ४ ॥
लोकीं बहुधा नाहीं जें कांहीं पाहिजे तसें कोठें ।
परि गणपतरावांच्या नाट्यापुरतें ठरेल हें खोटें ॥ ५ ॥
अभिनय, कंठमधुरता, रसज्ञता, रूप, हूप, आवेश ।
गुण गणपतरावांचे परि सहजपणा तयांतला खास ॥ ६ ॥
पडदा कपडा अथवा नट ते करतील काय बेरंग ।
हेरंबाचा महिमा—जाती निरसून सर्व वेडंग ॥ ७ ॥
गणपतराव नटांचा नट नाटक नाटकांत हॅम्लेट ।
संकट कुणा न पडतां संमत सर्वांस हाच संकेत ॥ ८ ॥
जीवंतपणीं नायक होउनि मेला कितीकदां खोटा ।
मेला खरा परी हा नायक उरला खरा खरा मोठा ॥ ९ ॥

ही कविकल्पना किती बरें खरी आहे! गणपतरावांच्या उदयास्तांच्या इतिहासाची साक्ष या वरच्या नऊच कविता किती रम्यतेनें देताहेत हें रसिकांना सांगणें नलगे! गणपतरावांचा स्वभाव जितका प्रेमळ तितकाच निष्ठुर असल्यानें त्यांना कॉमेडी आणि ट्रॅजेडी हीं दोन्ही नाट्यें आलौकिकपणें करतां येत होतीं. आपल्या खालोखाल नट त्यांना नट तयार करतां आला नसता असें नाहीं! पण त्यांनी जी १८९२ सालीं त्या कामीं एका मूर्ख नटाच्या कृतघ्नपणाबद्दल अंतःकरणपूर्वक शपथ घेतली होती ती त्यांना अखेरपर्यंत पाळणें भाग पडलें होतें. श्वसनेन्द्रियांची शक्ति वाढवून संगीताप्रमाणें भाषणांतील मुख्य रसानुसार स्वरांचे आरोहावरोह करून त्यांतील मुद्यांचे शद्ब परिणामकारक प्रकारांनी कसे व केव्हां उच्चारावे याचें शिक्षण योग्यप्रकारें विष्णु मारुळ--

कर या नांवाच्या एका नटाला गणपतराव उपरोक्त सालीं पुण्यास देत असतां व तो मध्यम प्रतीचा असा त्यांच्या तालमींत तयारहि झाला असतां, त्याच्या आणि मराठी रंगभूमीच्या दुर्दैवानें त्याला अत्यंत दोषास्पद अशा ज्या एका अपराधांत ढकलिलें व त्याचें प्रायश्चित त्याला गणपतरावांच्या तळतळलेल्या अंतःकरणांतून निघालेल्या शापवाणीनें जें दिलें, त्याचा परिणाम पुढच्याच राणा भीमदेवाच्या प्रयोगांतील त्याच्या सोंगाच्या आवाजांतील 'चिर्र पिर्र' स्वरानें जो प्रेक्षकांमधल्या त्याच्या दुर्लौकीकांत झाला, तेथेंच गणपतरवांनी मनापासून शिक्षण देण्याच्या कामाचा रस्ता---त्या असामान्य नटानें घेतलेल्या शपथेनें अंधळा करून सोडला.

बांधा, वर्ण, स्वरूप, आवाज आणि श्वसनेंद्रियशक्ति या गोष्टी नेपथ्यविधान आणि शास्त्रोक्त पद्धती यांनीं नटाला परिश्रमपूर्वक अंशतः जरी साध्य करून घेतां येतात, तरी या सर्व गोष्टी निसर्गतःच गणपतरावांप्रमाणें इतर कोणा नटांत असलेल्या आजपर्यंतच्या महाराष्ट्र-रंगभूमीनें पाहिलेल्या खास नाहींत. गणपरावांना नट म्हणूनच परमेश्वरानें तयार केलें होतें असेंच यावरून म्हणणें प्राप्त होतें. अथेल्लोच्या सोंगाच्या समयीं त्यांचा पीतगौरवर्ण जरी भीषण काळा बनवावा लागत असे आणि त्या वर्णाला शोभेसाच घोगरा आवाज जरी ते काढीत असत, तरी ते जगांतील व्यवहाराच्या बाबतींत कांहीं अथेल्लोच्या हृदयाचे खास नव्हते. बाळाभाऊ आयागोचें सोंग करीत पण ते हृदयाचे अत्यंत भोळे अथेल्लो होते. गणपतराव अथेल्लोचें सोंग करीत असतां, त्यांच्या जोडीला नानबा गोखले जसे अयागोच्या सोंगांत बरेचसे उतर-त्याचें गणपतराव म्हणत असत, तशी त्यांनीं त्या सोंगांत बाळाभा-

ऊंची प्रशंसा केलेली कोणी ऐकल्याचें ऐकीवांत नाहीं. गणपतरावांची भाषणशैली व अंगविक्षेप हीं जशीं साहजिक असत, तशीं अद्यापी कोणाहि नांवाजलेल्या नटांत दिसत नाहींत. आपला मुद्राविक्षेप कोणच्या प्रसंगीं कसा असावा ही गोष्ट गणपतराव स्वमताशीं ठरवून रंगभूमीवर बाळाभाऊंच्या प्रमाणेंच ऐन वेळीं करून दाखवीत. ते त्या गोष्टी तालमींत कधींच करीत नसत. कांहीं नटांना मात्र तशा बाबतींत केव्हां केव्हां लहरीप्रमाणें तद्विषयक ते सूचना मात्र देत असत. आपल्या मुद्राविक्षेपानें आणि भाषणाच्या स्वराविर्भावानें ज्या त्या रसाचा परिपोष करून आपल्या तन्मय वृत्यनुरूप प्रेक्षकांची वृत्ति बनविण्याचें जें सामर्थ्य गणपरावांत होतें, त्याचमुळें महाराष्ट्रानें त्या नटाचार्याला अनन्य सामान्यत्वाचा गौरवपर मान दिला आहे.

अशा त्या अनन्य इतिहास प्रसिद्ध सामान्य नटाचार्याचा जणूं काय त्याला श्रुतिबोध झाल्यानेंच श्रुतिबोधालयांत, उदरव्यथेनें अंत झाल्यावर नाट्याग्रणी म्हणविणाऱ्यांतील बालगंधर्वासारख्या नटराजानें पुष्पमाला आणि दोन तीनशें रुपये किंमतीचा भरजरी शेला अंगावर घालून जो मान केला तो अद्यापी कोणाहि नटाला लाभल्याचें पाहाण्यांत नाहीं किंवा ऐकण्यांतहि नाहीं. गंधर्वनाटकमंडळी, लोकमान्यनाटकमंडळी, ललितकलानाटकमंडळी आणि रंगभूमीमंडळी या संस्था गणपतरावांच्या मृत्युसमयीं मुंबईत असल्यानें त्यांतील सर्व मंडळी गणपतरावांचें दर्शन घेण्यासाठीं हां हां म्हणतां जमा झाली होती व ज्यांनीं त्यांनीं आपापल्या प्रेमानुरूप व ऐपतीप्रमाणें गणपतरावांच्या शवाचें अखेरचें दर्शन घेऊन त्याची पुष्पहारांनीं मोठ्या पूज्यभावानें पूजा केल्यावर त्या शवाचा जो फोटो घेण्यांत आला तो यांत दिलाच आहे.

## उपसंहार.

सर्व मंडळी जमून गणपतरावांची स्मशानयात्रा निघण्यास सायंकाळचे सहा वाजले. स्मशानयात्रेच्या आधीं गांवांत जें हस्तपत्रक वांटलें गेलें होतें तें येणें प्रमाणें होतें:—

### हाय ! हाय ! गणपतराव गेले ! गेले !

आज ( ता. ७।३।२२ ) दुपारी ११। वाजतां महाराष्ट्र-रंगभूमीवरील हिरा श्री. गणेश कृष्ण जोशी, प्रसिद्ध शाहूनगरवासी ना. मंडळीचे मालक व मुख्य नट ( हॅम्लेट ) यांस देवाज्ञा झाली! महाराष्ट्र रंगभूमीचें आज यामुळें अपरिमित नुकसान झालें आहे. या महान् नटाच्या शेवटच्या दर्शनास कोण येणार नाहीं? प्रेतयात्रा आज सायंकाळीं सहा वाजतां खेतवाडी १० वी गल्ली श्रुतिबोध येथून निघेल. तरी त्या नटवीराचे दर्शनास सर्वांनीं येऊन आपलें मित्रकर्तव्य करावें.

मृताच्या ठायीं वसत असलेल्या पूज्यतेचें दर्शक म्हणून त्यांच्या सन्मानार्थ रा. फाळके यांच्या 'रंगभूमी' नाटकाचा आज होणारा प्रयोग बंद ठेवण्यांत आलेला आहे.

दा. सा. यंदे. य. ना. टिपणीस. डॉ. ना. दा. सावरकर. के. पी. पंडीत. ना. श्री. राजहंस. नानबा गोखले. प्रो. गो. गो. टिपणीस. त्र्यं. ब. पेंढारकर. धुं. गो. फाळके. शं. ना. चाफेकर. भा. वि. वरेरकर. सालोमन सॅम्पसन. अ. ग. शेकदार. अ. शं. करंदीकर. अ. ह. गद्रे. त्र्यं. चिं. जोशी.

ठरल्या वेळीं स्मशानयात्रा मोठ्या समारंभानें निघून नाट्यसंस्थांच्या लोकांसह मुंबईच्या गणपतरावांच्या प्रेमी मंडळीचा मोठा संघ सोनापुरांत जाऊन पोंचला. तेथें गणपतरावांच्या शवास बाबूराव आठवले यांचे कडून अग्नि दिल्यावर, जळत्या निर्जीव कुडीचें अखेरचें दर्शन देणारी जी प्रथम ज्वाळा ऊर्ध्वगामिनी झाली त्याबरोबर सर्व स्मशानभूमि दुःखा-द्गारी हुंदक्यांच्या भीषण स्वरूपानें गजबजून गेली. रा. जोगळेकर वकील, डॉ. नारायणराव सावरकर, प्रो. टिपणीस वगैरे मंडळींचीं तेथें जीं भाषणें झालीं, त्या सर्वांतील गोषवारा गणपतरावांच्या गुणवर्णनपर

असून, त्यांच्या मृत्यूनें नाट्यसृष्टीची जी हानी झाली व तिच्या बरोबरच हिंदुस्तानच्या वैभवी शोभेचें जें नुकसान झालें त्याचेंहि यथार्थ स्पष्टीकरण होतें. हीं भाषणें त्या वक्त्यांनीं अत्यंत शोकदायक अशा जडांतःकरणांनीं आणि अश्रुपूर्ण नयनांनीं केल्याचा देखावा पाहाणें खरोखरीच नाट्यसृष्टीच्या इतिहासांत अपूर्व होतें. नटवर्गापैकीं कालक्यांच्या रंगभूमी संस्थेंतील त्रिंबकराव जोशी यांनी त्यांचें गणपतरावांच्या ठायीं जें निरतिशय प्रेम होतें, तें अत्यंत पूज्यबुद्धीनें आपल्या भाषणांत व्यक्त केल्यावर नटादि सर्व जनता अस्थिसंस्कारानंतर शहराकडे जडपदांनीं परतली.

याप्रमाणें मुद्राविक्षेपादि खऱ्या नाट्यभिनयाच्या कसोटीस पूर्णपणें उतरलेला अप्रतिम नटाचार्य इहलोकची यात्रा संपवून व आपली अतुल कीर्ति मागें ठेवून काळाच्या करालदंष्ट्रामार्गें ब्रह्मस्वरूप होण्यासाठा नश्वरदेहाला मृत्युलोकीं ठेवून निघून गेला खरा, पण ज्याच्या अस्तित्वानें महाराष्ट्रनाट्यरंगलक्ष्मी गेलीं तीन तपें मोठ्या कौतुकास्पद अभिनवाभिनयानें नटून थटून गौरवयुक्त मिरवत होती, ती मात्र एकदम फटफटीत कपोलप्रदेशाची आणि दुर्मुखलेल्या रडव्या मुखश्रीची दिसूं लागली. आतां तिचे पांडुरवर्ण कपोलभाग कधीं कोणचा नटरंगवीर पुन्हां खुलवील तो खुलवो.

शेक्सपियरसारख्या अद्वितीय नाटककाराचा हिंदुस्तानाला मराठींत सर्वोत्तमपणें परिचय करून देणारा आमचा नट गणपतराव किती अलौकिक बुद्धिमत्तेचा असला पाहिजे हें सांगणें नलगे. गणपतरावांना केव्हांहि, कोठेंहि व कशाहि स्थितींत रंगभूमीवरील आगमनप्रसंगीं रंगदेवता जी खडी ताजीम देत असे, तोच त्यांच्या जन्माचा ईश्वरी

संकेत असल्याचें त्यांनीं पूर्णपणें ओळखून, त्यांच्या निर्माणकर्त्याच्या इच्छेनुरूप त्यांनीं आपलें इहलोकचें कार्य केलें आणि त्यामुळेंच त्यां जीवित सफल झालें. याप्रमाणें गणपतराव जरी स्वजीवितकार्यमुक्त होऊन ऐतिहासिक नट या नात्यानें इतर थोर व्यक्तींच्या मालिकेंत चिरस्मरणीय झाले आहेत, तरी त्यांच्या संबंधानें त्यांच्या गुणग्राहकांचें त्यांचें स्मारक करण्याचें जें कार्य आतां अवशिष्ट राहिलें आहे, तें ते प्रेमादरानें यथाकालीं घडवून आणून आपली त्यांच्या बद्दलची श्रद्धा व भक्ति व्यक्त करतील अशी आम्हांला जशी आशा आहे, तद्वतच आमची गणपतरावांच्या मृत्युपत्राच्या व्यवस्थापक ट्रस्टींसहि अशी एक अत्यंत नम्र विनंति आहे कीं, त्यांनीं तशा त्या महान् ऐतिहासिक नटाचार्याचीं जीं त्यांच्यापाशीं अनेक सुवर्णपदकें गणपतरावांच्या स्मारकरूप आहेत, तीं पदकें त्यांनीं ऐतिहासिक पदार्थसंग्रहालयांत अगर त्यांच्या स्मारक संस्थेंत व्यवस्थापूर्वक जतन करून ठेवण्याची व्यवस्था केल्यास ती गोष्ट त्यांना भूषणावह होणार आहे. इतकें सांगून, व मराठी रंगभूमीवर ज्यानें सुवर्णपदक मिळविण्याचा प्रथम विजयी नटवीर म्हणून जो अलौकिक मान मिळविला त्याच्या इतर अनेक मनोरंजक हकीकतींचा सारांशहि स्थलाभावीं आतां येथें उल्लेखितां येत नाहीं असें मोठ्या दिलगिरीनें नमूद करण्याबद्दल वाचकांची क्षमा मागून हा उपसंहार येथेंच संपवितों.

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 236